मधुकर सोनवणे

# मांडुक्य उपनिषद

# मांडुक्य उपनिषद
# व कारिका

## काव्यमय भाष्य

# मधुकर वि. सोनवणे

# मांडुक्य उपनिषद  व कारिका

मधुकर वि. सोनवणे

20, विजय नगर कॉलनी

नवा आडगाव नाका पंचवटी नाशिक-3

422003

फ़ोन: ९४२२७५६३३३

**msonavane@hotmail.com**

हे पुस्तक प्रताधिकारमुक्त असून
आपण हे कायदेशीररित्या
कोणालाही विनामूल्य पाठवू
शकता.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० जुलै २०२१ (आषाढी एकादशी १९४३)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



# अल्प परिचय

मी मधुकर वि. सोनवणे. वयाच्या आठव्या वर्षी श्री ज्ञानेश्वरी हा आमच्या पणजोबांनी १९०५ ला घेतलेला श्री ज्ञानेश्वरीचा ग्रंथ हाती लागला. न समजताही वाचू लागलो.

सुदैवाने बालपणापासून अनेक महनीय व अभ्यासू व्यक्ती जीवनात आल्या. माझ्या आजींच्या बरोबर देवळात कीर्तने/प्रवचने ऐकू लागलो.

श्री करपात्री स्वामी { अध्यक्ष – राम राज्य परिषद } यांची मराठी चवथीत असतांना भेट झाली त्यांनी ज्ञानेश्वरी नुसती वाचू नकोस त्यांत अधिक खोल जा. अडले तर माऊलीलाच विचार असे सांगितले. वाचन सुरु झाले.

ज्ञानेश्वरी वाचीत असतांना अध्याय १६ मध्ये माऊलीने ‘वेद प्रतिपाद्य’ अशा ईश्वराला गोचर करायचे असेल तर श्रुतींचा अभ्यास करा, असे सूचित केले ते वाचनात आले. माऊलीचे दर्शन स्वप्नात २-३ वेळा झाले. त्यांची कृपा अनुभूत होत आहे.

श्रुति म्हणजे ऋषि मुनींना त्यांच्या ध्यानावस्थेत दिव्य वाणीचे कानी पडलेले श्रवण.

सर्व श्रुतीत ‘मांडुक्य उपनिषद’ हे अति महत्वपूर्ण म्हटले गेले आहे. अवघ्या १२ श्लोकात गहन अर्थ असलेले. कितीदा वाचून आशय नेमका काय आहे, हे सहजी समजत नाही. नेमके आचार्य गौडापाद यांचे कारिका वरील भाष्य २-३ अधिकारी व्यक्तींच्याकडून लिहिलेले वाचनात आले.

मला झालेला आनंद काव्यमय आशयाद्वारे व्यक्त करण्याचा माऊलीचा आदेश आला. आणि परिणामी हे कठीण कार्य पार पडले. या कामी शेगांवच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे से.नि. प्राध्यापक डॉक्टर पद्माकर पाटील – श्री आर. डी. पाटील यांचे बहुमोल सहाय्य लाभले. व आताही लाभत आहे. त्यामुळे त्यांचा केवळ कृतज्ञ उल्लेख करीत आहे.

हा लेखन पसारा चार खंडात आहे. जसे वाचत जालं, तसे अद्वैताचे पैलू उलगडले जाऊन एकच एक परब्रह्म कसे सर्वव्यापी आहे, हे उमगू लागते. अद्वैत हेच ज्ञेय आहे.

माऊलीचा कृपा प्रसाद म्हणून ‘ई साहित्य प्रतिष्ठान’ या संस्थेचे पाठबळ लाभले. आणि आपले लेखन असंख्य वाचकांच्या पर्यंत पोचण्याचा मार्ग गंवसला. श्री सुनीळ सामंत व त्याचे सहकारी, तत्वज्ञानाच्या लेखनात आवड असणारे असल्याने, त्यांचे सहकार्य यांनी उद्युक्त होऊन लेखनाला बळ आले.

या उपनिषदा नंतर इतरही उपनिषदे अभ्यासून त्याचे काव्यमय भाष्य प्रकाशित करण्याचे कार्य सुरु आहे.

जीवनाचा सूर्य ८२ व्या वर्षात पश्चिम क्षितीज जवळ आल्याचे सूचित करीत आहे. माऊलीची इच्छा असेल तेवढे हे कार्य होऊन आपल्याला सादर करणे घडेल.

यातील उणीवा ज्ञात्यांनी सांभाळून घ्याव्यात व मला निर्भीड अभिप्राय कळवावा.


**अण्णा**

१५/०७/२०२१.

20, कल्पतरू विजयनगर कॉलनी

नवा आडगाव नाका, पंचवटी –नाशिक -३

9422756333

msonavane@hotmail.com

annasonavane02@gmail.com

## अर्पण पत्रिका

## हे लेखन आचार्य गौडपाद यांचे चरणी अर्पण करीत आहे.



आपल्या महान लेखनाचा मराठीत काव्यमय भाष्य हे आपल्याच कृपेचा प्रसाद आहे. आपणास विनम्र वंदन. अद्वैतात असल्याने आपण या लेखनाला जाणत आहांत. आपलीच कृती अनुवादित करून व समजेल तेथे विस्तार करून आपल्या चरणी अर्पण करीत आहे.

माझे अल्पज्ञान हे यातील उणीवांना कारण आहे. त्याबद्दल क्षमायाचना

विनम्र

अण्णा

आषाढ शयनी एकादशी

२०/०७/२१.

# काव्यमय मांडुक्य -कारिका

## मनोगत

मांडुक्य उपनिषदाचे श्रेष्ठत्व सर्वश्रुत आहे. त्याचे वाचन अनेकदा करूनही आशय मनी भावेना. वाचनात आले की, गौडपाद स्वामी यांच्या कारिका हे त्यावरील विस्तृत व यथार्थ भाष्य आहे. त्यांचा अभ्यास करून सुलभ भाष्य-रचना करावी.

सुदैवाने खालील ग्रंथ उपलब्ध झाल्याने, या महान ग्रंथातील तत्वज्ञानाचा अभ्यास सुलभ झाला. जोडीला गुरुदेव ज्ञानेश्वर माऊलीची प्रेरणा व कृपा होतीच. गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर हा अभ्यास सुरु झाला.

संदर्भ ग्रंथ- १.कल्याण उपनिषद विशेषांक २.स्वामी विद्यानंद यांचे भाष्य. २००८ ३. स्वामी परमार्थानंद यांच्या भाष्याचा इंग्रजी अनुवाद ४. Essentials of Goudapaada- स्वामी सच्चिदानंद सरस्वती १९९७. ५.स्वामी निखीलानंद यांचे हिंदी भाष्य १९४९. ६.सत्संगधारा ७.श्री ज्ञानेश्वरी ८. गौडपादासार भाग १-२. [महेशानंद गिरी १९९४.] यातील वाचन आणि भावणारा आशय काव्यमय केला आहे. कारिकांचे पहिले ‘आगम’ प्रकरण हे मूळ उपनिषद व कारिका या उभयसहित असल्याने गोधळ टळावा या हेतूने श्लोक/मंत्र यांचे क्रमांका आधी ‘मां.’ म्हणजे मूळ मांडुक्य उपनिषदातील क्रमांक व ‘का.’ म्हणजे कारिका असा संदर्भ आगम प्रकरणातच नमूद केलेला आहे.

माझे संस्कृतचे अल्प ज्ञान आणि इंग्रजीशी विशेष सख्य नसल्याने हा उपक्रम कितपत सुयोग्य झाला आहे, हे मी ज्ञात्यांचे वर सोपवितो. हे शिवधनुष्य कितपत पेलले आहे, याचा खुलासा ज्ञाते करतील, ही अपेक्षा.

माऊलीच्या कृपेने हे कार्य हाती घेतले आहे. उणीवा माझ्या आणि सुयोग्यता त्यांच्या कृपेची.

आज चैत्री पौर्णिमा, ही हनुमान उडी व माता रेणुकेचे आशीर्वाद याद्वारे येथवर आलो आहे. आपल्या सहकार्याची अपेक्षा.

या मंगल उपक्रमाला वटसावित्री पौर्णिमेला संपन्नता यावी, ही भगवंताची कृपा

अध्यात्माचे बीज मांडुक्य उपनिषदातील अवघ्या बारा श्लोकात आहे. त्याच्या कारीकाद्वारा महा वटवृक्षात रुपांतर भगवान आचार्य गौडपाद यांनी २१५ कारीकाद्वारा केले.

याचा सखोल आशय जाणून घेण्याच्या कार्यात अनेक भाष्ये उपयोगी झाली, आणि हे काव्य-भाष्य चारही प्रकरणात गुंफता आले ही माऊलीची कृपा आणि आचार्य गौडपाद यांचे आशीर्वाद.

त्यांना व जगद्गुरू शंकराचार्य यांना विनम्र वंदना

|| हरी ॐ || – अण्णा

मधुकर वि.सोनवणे नाशिक-पंचवटी

२७/०४/२०२१./ २४/०६/२०२१.

annasonavane02@gmail.com .

msonavane@hotmail.com {9422756333} नाशिक- पंचवटी



# मांडुक्य उपनिषद  व कारिका

## काव्यमय भाष्य – वंदना

विनम्र वंदन गुरु माऊली, हृदय मंदिरी तूं असशी |
लेखणी माझी, तुझी प्रेरणा, वंदन तुझिया चरणाशी || १.

ज्ञानदेव श्री सद्गुरू माझे, जीवन बुद्धी चालविती |
आदेश त्यांचा आदरुनी मी, काव्य रचियले अल्पमती || २.

नाना भाष्यांच्या आधारे, मराठीत काव्याधारे |
जैसे आकलन झाले मजला, आशय हा शब्दाधारे || ३.

उपनिषदांतील अति लहान हे, परि महान नि गहन असे |
अथर्ववेदाच्या अंती हे, महिमा ॐ चा सांगतसे || ४.

सामवेदी या म्हणती उद्गीथ, यजुर्वेदी परि प्रणव म्हणे |
अथर्ववेदी महामंत्र हा, जाणियला ॐ नामाने || ५.

कंठातुनि तो ‘अ’ कार उपजे, ‘उ’ उपजे ओष्ठाद्वारा |
आणि अंती ध्वनी होतांना, नासिकेतुनी होत पुरा || ६.

उत्तमांगिच्या विशुद्ध चक्री, जेथं निवासे सरस्वती |
ॐकाराची उगमे गंगा, गती घेत जाई पुढती || ७.

’उ’ ये ओठी मुर्ध्नी स्पर्शुनी, येथे झाली मध्यगती |
गोचर प्राणस्थानी विसावे, व्हाया प्रणवा सुलभ गती || ८.

ॐ मंत्र हा बहु बलशाली, ब्रह्म नि आत्मा सेतू बने |
मंत्रा आधी तया लाविता, अनुभूती एकाग्र मने || ९.

ॐकाराचे वैभव आणि, रहस्य श्रुती ही वर्णीतसे |
बारा मंत्री सूक्ष्म ज्ञान हे, सकल श्रुतींचा सार असे || १०.

## ग्रंथ परिचय

श्रुति अभ्यासी मांडुक्याची, महती शब्दी न येत असे |
या समान हे एकचि केवळ, गहन आशया जरि गंवसे || १.

आकलन केवळ याचि श्रुतीचे, विद्या ब्रह्माची उमजे |
सहित कारिका, आचरी जीवनी, सहजी उच्च पदी साजे || २.

श्रीराम म्हणति, मौक्तिकोपनिषदी, "नको वाचण्या अन्य श्रुती |
मांडुक्यचि हे एक पुरेसे", जरि परब्रह्माची आसक्ती || ३.

ब्रह्माची ही महान विद्या, प्रतीति श्रुतीने येत असे |
शब्द शब्द उकलावा तेंव्हा, गर्भित आशय तो गंवसे || ४.

सारे विश्वचि हे ॐकारी, विश्लेषण ही श्रुती करी |
गीता ज्ञानेश्वरीही महती, ॐकाराची शिरी धरी || ५.

ब्रह्मदेवही सृष्टी सजविती, जप करुनी ॐकाराचा |
सकल चराचर प्रत्यय त्याचा, विकास हाचि प्रणवाचा || ६.

सांगे ज्ञानेश्वरी ॐ  असे, साऱ्या मंत्रांचा राजा |
शब्दब्रह्म हे विनटे विश्वी, ॐ विना ना भाव दुजा || ७.

आत्मदर्शना होई सहायक, ठेविता श्रद्धा ॐकारे |
मार्ग दाविला ‘आगमा’त तो, कारिकांचिये द्वारे || ८.

द्वादश मंत्री लघु श्रुती ही, प्रकाश तिचिया तेजाचा |
जणु आदित्यचि महान तेजे, आशय सांगती ब्रह्माचा || ९.

गौडपाद स्वामींनी केला, रचुनि कारिका विस्तार |
परात्परचि गुरू आचार्यांचे, महिमा त्यांचा अति थोर || १०.

आदि गुरु श्री नारायणचि, ब्रह्मदेव हे शिष्य प्रीति |
वशिष्ट शक्ती पराशरहि ते, व्यासदेव हेही पुढती || ११.

परंपरा शुक मुनि तेथुनी, गौडपादचि शिष्य तया |
पुढती गोविंदांनी विद्या, स्वयेचि दिधली आचार्या || १२.

महान तेजोदीप असा हा, उजळित ब्रह्मज्ञानाशी |
भाग्य आपुले काल प्रवाही, टिकुनी लाभे आम्हाशी || १३.

बारा जरि ते श्लोक श्रुतीचे, दोन-शे नि पंधरा फुले |
माला कारीकांची विलसे, आशय पदीचा तो उकले || १४.

ज्ञानवंत हे वाचस्पतीचि, विनम्र वंदन त्या चरणा |
अल्पमती मी धजू पाहतो, काव्यी मराठीत रचना || १५.

महान भाषा संस्कृत असता, माझी केवळ बाल मती |

इतरांच्या आधारे रचना, मजवरि माऊलीची प्रीति || १६.

छंद न जाणे, तसे व्याकरण, परी कृपा ती श्री गुरूंची |

कुबड्या अन्यांच्या आधारे, एक एक मी पंक्ती रची || १७.

ज्ञाते आपण क्षमाचि उणीवा, हेतू सुलभचि होण्याचा |

थोडे लिहिले, अधिक जाणणे, हेतू प्रसार ज्ञानाचा || १८.

वंदन माझे गुरु माऊली, हृदयी माझ्या नित्य वसे |

तुझी प्रेरणा, शब्द लिहितसे, ज्ञान माझिये अल्प असे || १९.

समजावुनी तूं मला सांगता, लिहिले सारे धैर्याने |

मति विस्तारी, सुलभ शब्दचि, असे नित्यचि हो लिहिणे || २०.

अण्णा- मधुकर वि. सोनवणे

लेखन सुरुवात १३-एप्रिल २०२१.- गुढीपाडवा चैत्र शुद्ध प्रतिपदा प्लव संवत्सर १९४३.

## शांती मंत्र –प्रार्थना

*ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।*
*स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥*

हे देवांनो नम्र प्रार्थना, जीवनी सारे शुभ व्हावे |
तंव कृपेने सारे मंगल, कृपाछत्रची लाभावे || १.
सदैव शुभचि आणि हितकर, बोलचि ते कानी यावे |
नेत्रांनी ते शुभचि पहावे, अशुभा नित्यचि टाळावे || २.
सुस्थिर सक्षम राहो अवयव, कृती त्याकरवी शुभ व्हावी |
कृतज्ञता आपुले कृपेची, वाणीने तंव स्तुती व्हावी || ३.
निरामयचि नि कार्यक्षम ते, आयुष्य आम्हा लाभावे |
जीवनात श्रेयस्कर लाभो, शुभचि मनाने चिंतावे || ४

# || ॐ श्री मांडुक्य उपनिषद प्रारंभ ||

मंत्र- ॐ ओमित्येतदक्षरमिदं सर्वं तस्योपव्याख्यानम् ।

भूतं भवत् भविष्यदिती सर्वमोंकार एव । यच्चान्यत् त्रिकालातीतं

तदप्योंकार एव ॥ मां.१ ॥

ॐ असे हे ऐसे अक्षर, क्षर न जयाचा होत असे |

सारे विश्वचि तेच असे नि, त्रिकालातही तेच वसे || ५.

मुनि पतंजली म्हणती सूत्री, ॐ नाम हे ब्रह्माचे |

पूर्णब्रह्म शाश्वत परमात्मा, स्वरूपचि हे ॐकाराचे || ६.

ॐकारचि तो प्रथम नाद नि, प्रकाश पहिला तोच असे |

तोचि प्रतिक या परमात्म्याचे, ॐकारी हरि नित्य वसे || ७.

सागर लाटा, बालक मुखी वा, ऐकू येई ॐकार |

वायू वृक्षामधुनी धावे, ॐ चि श्रवणी साचार || ८.

तृप्ती होता सहजी निघतो, कंठातूनी जो हुंकार |

तीच अनुमती ॐकाराची, सारा एकची ॐकार || ९.

पशु, पक्षी वा सजीव सारे, आरुष बोला त्या वदती |

सारे सारे ॐकारचि ते, अभंगी ज्ञानदेव म्हणती || १०.

प्रपंच दुःखे शिणता प्राणी, आर्त जीव त्या हांकारी |

ॐकाराने साद घालिता, धावे घेत तत्क्षणी हरी || ११.

नीरव शांती ब्राह्ममुहूर्ती, मौने श्रवणी ॐकार |

नित्य सृष्टी हे करी उच्चारण, जणू ब्रह्मचि साचार || १२.

उभय श्रवण परि नाद एकचि, चिदाकाशी तो जेथं मिळे |

आज्ञाचक्री शिवची तेथे, दुजेपणा जेथे वितळे || १३.

हृदय मंदिरी ॐ निवासे, सारे व्याप्त तये केले |

व्यक्त होत तो अंतर्नादे, उचित मार्गदर्शना बोले || १४.

मंत्र- सर्वं ह्येतद् ब्रह्मायमात्मा ब्रह्म ।

सोऽयमात्मा चतुष्पाद् ॥ मां २ ॥

हे जे सारे अनुभुत होते, सारेची हे ब्रह्म असे |

प्रथम जयाला 'ते' संबोधन, मुनि म्हणती त्या 'हे' कैसे? || १५

गौडपाद संकेते वदती, दूर न ते तर, अति जवळी |

तूंहि त्यातुनी अलग असेना, ॐ तर तूही असे मुळी || १६.

विश्वामाजी जेही आहे, हे सारेचि ब्रह्म असे |

आत्मा-तूर्या-ब्रह्म तयाला, चतुष्पाद म्हणती ऐसे || १७.

चार चरण हे नसती वेगळे, अभिन्न अंगचि ब्रह्माचे |

अ उ म आणि अर्धचंद्रही, मिळुनि स्वरूप हो त्याचे || १८.

चतुर्मात्री हा श्री गणेशची, अकार पावन चरण असे |

उदर विशाल नि मस्तकमंडली, अंतिम मात्रा म चि वसे || १९.

दोन्ही मिळता ओठ सुचवी हे, संपली द्वैताची सीमा |

नीरव शांती, निवास हरीचे, अद्वितीय ज्या ना उपमा || २०.

नाद संपता कंपनी शांती, मूलस्थानचि ते हरीचे |
पूर्ण शांती चि अनुभवी तुर्या, अर्धचंद्र हे स्वरूप तिचे || २१.

सूक्ष्म स्वरूप ॐकाराचे, आकलनी यावे म्हणुनी |
शब्दे समजावे यासाठी, म्हणती चार पावलांनी || २२.

मंत्र- जागरितस्थानो बहिः प्रज्ञः सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः
स्थूलभुक् वैश्वानरः प्रथमः पादः ॥ मां. ३ ॥

चार अवस्था ज्या देहांच्या, पाद तेचि ॐ ब्रह्माचे |
उकल तयाची केली ऋषींनी, एक एक अवस्थांचे || २३.

प्रथम पाद नामे वैश्वानर, स्थान जागृती हे त्याचे |
ओढ तयाची बाह्य सारखी, स्वरूप साती अंगांचे || २४.

एकोणीस त्या मुखे वर्णिली, स्थूल भोग ते घेण्याला |
एवं ध्यानी प्रथम पाद तो, यावा तो अनुभूतीला || २५.

असे जागृती संसाराची, निज भानाला ते विसरे |
इंद्रियस्पर्शे बोध होतसे, आकलन वाटे तेचि खरे || २६.

श्रुति छांदोग्यही देत दुजोरा, वैश्वानर विद्येमाजी |
स्थूल बोध हा बाह्यप्रज्ञचि, बोध देत जागृतीमाजी || २७.

सदैव जागृत बाह्यविषयीची, देहासाठी सर्व करी |
भान नसे आत्म्याचे ऐसी, बहि:प्रज्ञ विसरेचि हरी || २८.

मस्तक, नेत्र, विसर्जनस्थाने, हृदयाकाश नि प्राण असे |
हात पाय ही साती अंगे, सप्तांगी म्हणती ऐसे || २९.

विकार आणि विचार सृजना, केंद्रस्थानी मस्तक ते |
बाह्यचि गुंतती सदैव आणि, कर्मी देहा गुंतविते || ३०.

नेत्र पाहती या संसारी, मना प्रेरणा ते देती |
बाह्य सृष्टीचे दर्शन जैसे, मनासि तैसे गुंतविती || ३१.

देहा अनुचित, तेचि त्यागिती, उचितचि ठेविती ते देही |
हृदयाचे तर कार्यची मोठे, तयेची जीवन हे राही || ३२.

प्राण चालवी सर्व तनूला, यंत्रणाही सारी चाले |
जीवाच्याची सामर्थ्याने, प्राणचि सांभाळी सगळे || ३३.

हातचि करविती, कृती योजियल्या, हवे तेथं पायची नेती |
वैश्वानर जो प्रथम पाद त्या, असती अंगे ही साती || ३४.

ब्रह्मसूत्रीच्या प्रथमाध्यायी कथिले, ब्रह्म नि आत्म्याला |
वैश्वानर हि त्याची संज्ञा, जेही नाम ते अग्नीला || ३५.

ईशावास्य हि श्रुती सांगते,’ न कर्म लिप्यते नरे’ |
कर्म करी परि भोगासक्ती, जो ‘नर’ त्याठायी न उरे || ३६.

असुनि चेतना-स्वरूप नि जगती, स्वयेचि कर्मफलीदाता |
जागृती माजी विरक्त राही, वैश्वानर संज्ञा येता || ३७.

अग्नी हीचि असे चेतना, आणि मूळ ते ज्ञानाचे |
गुप्तरूपाने सुप्त राहुनी, सामर्थ्य देई शक्तीचे || ३८.

कुणी म्हणती विद्वानहि ऐसे, सात लोक हे सप्तांगे |
ब्रह्मांडाचे सकल आकलन, विराट पुरुषा त्या योगे || ३९.

अहंकार मन बुद्धी चित्तहि, पांच प्राण, इंद्रिये दहा |
एकोणीस ही मुखे तयाची, भोग बाह्यचि चाले हा || ४०.

संज्ञा ‘स्थुलभूक्’ ही त्या कारण, विषय भोग हे बहिर्मुखी |
विषय स्पर्शे ती उत्तेजित, भोगे लटक्या होत सुखी || ४१.

मंत्र- स्वप्नस्थानोऽन्तः प्रज्ञः । सप्ताङ्ग एकोनविंशतिमुखः ।
प्रविविक्तभुक्तैजसो द्वितीयः पादः ॥ मां.४ ॥

स्वप्नावस्था दुजा पाद तो, स्तब्ध इंद्रिये ती होती |

प्रबळ वासना मना खेळवी, स्वयेची नाट्याला करिती || ४२.

ब्रह्मसूत्री जी ज्योती तेज वा, 'ज्योतिश्चरण' पदे उमगे |

वाचक तेही ब्रह्म असेही, श्रुतीतहि अन्यचि नलगे || ४३.

तैतरेय नि छांदोग्यही ते, 'तेजस' भगवंता वदती |

म्हणुनि जीवात्मा दुसरे पादे, मांडुक्यी वर्णन करिती || ४४.

जगतस्वामी जो हिरण्यगर्भचि, तेजस ज्ञानी विकसतसे |

ज्ञानस्वरुप ही दुसरी मात्रा, दुजा पादचि शोभतसे || ४५.

स्वप्नी इंद्रिये मनात विरती, झोप येई ती पुरुषाला |

जागेपणी जे श्रवण नि दर्शन, विविध रंगविती त्याला || ४६.

'प्रश्नश्रुती' सौयार्यण पुसता, पिप्पलाद त्या उत्तरती |

मनी एकत्रित सर्व इंद्रिये, पुरुष झोपलाचि वदती || ४७.

नवल असे हे संस्कारांचे, व्यापारहि ते सूक्ष्म मने |

कल्पनेतली दृश्ये निर्मुनी, नसता अनुभवी ती स्वप्ने || ४८.

**कारभार हा अंत:प्रज्ञचि, लटके सारे अनुभवती |**

**पाहण्यास जो प्रकाश लागे, तोही तेचि निर्मियती || ४९.**

**प्रसंग मोठे वा देखावा, जेंव्हाही तो अनुभवता |**

**संकोचित त्या रूप देऊनी, सूक्ष्मचित्र मनि आठविता || ५०.**

**पुनश्च जेही त्यास भावले, खजिन्यामधुनी मन काढी |**

**सूक्ष्मरूपाने उपभोगास्तव, स्वप्नी दावितसे आवडी || ५१ .**

**सहजी आत्म्याच्या अस्तित्वे, प्रकाश 'तेजस्' तात्पुरता |**

**प्रकाश असतो जरि मायावी, तरि तेणे येई बघता || ५२.**

**सप्तांगे नि मुखे ही तीचि, कार्यान्वित जी सूक्ष्मरूपे |**

**कल्पनेतला असे खेळ हा, जरि कार्यचि प्रत्यक्ष लपे || ५३.**

मंत्र- यत्र सुप्तो न कंचन कामं कामयते न कंचन स्वप्नं पश्यति तत्सुषुप्तम् ।

सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानन्दमयः ।

ह्यानन्दभुक् चेतोमुखः प्राज्ञः । तृतीयः पादः ॥ मां.५ ॥

गाढ अवस्था निद्रेमाजी, स्वप्न जागृती उभय नसे |

नाम ‘सुषुप्ती’ असे तियेचे, आनंदमय जी पूर्ण असे || ५४.

मुख त्याचे चैतन्य असे ते, तृतियपाद ॐकाराचा |

सर्व इंद्रिये, मनही स्तब्धचि, अनुभव नीरव शांतीचा || ५५

नसे द्वैत वा अद्वैतही ते, जसे पाहणे अंधारी |

ज्ञानहि होई सुप्तची तेंव्हा, सुस्त सुप्तता मनावरी || ५६.

विषय सुप्त ते म्हणुनी तेंव्हा, ब्रह्म जरि जवळीच असे |

सुख-दुःखाचा अभाव जरि तो, ब्रह्मस्थिती ही मात्र नसे || ५७.

जरि असते ती ब्रह्मस्थितीचि, पुनश्च जागृती असेचि ती |

आनंद आहे हा अज्ञानी, म्हणुनि समाधी ना म्हणती || ५८.

सुषुप्तीमाजी ज्ञाता-ज्ञेय हि, नसे उभयता कोणीही |

केवळ ज्ञानची मी आनंदी, जीवा स्मृती म्हणुनी राही || ५९.

केवळ प्राणचि जागृत तेंव्हा, जीव भोगितो आनंदा |
शून्य उपाधी, ज्ञानवानचि, प्राज्ञ तयालाचि संज्ञा || ६०.

बृहत् अरण्यक श्रुतित प्राज्ञचि, परमात्मा नामे विलसे |
हाच उपाधीशून्य भोगी जो, विज्ञानात्मा पुरुष असे || ६१.

सुषुप्तीच्या या तिसऱ्या पादी, जीव शिवाच्या जवळी असे |
स्वयेचि आत्मा हो स्वानंदी, विषयांचा व्यापार नसे || ६२.

सुषुप्तीत जीव विना उपाधी, तिथे जाणणे कांही नसे |
जागृतीमाजी येई तेंव्हा, संज्ञा 'प्राज्ञ' हि त्यास असे || ६३.

'प्रश्नश्रुती'तही पिप्पलाद ते, सांगताती सौर्यायणीला |
देही प्राणाग्नीचि जागृत, सुषुप्तीत त्या समयाला || ६४.

जरी उपाधीशून्य भोगी तो, स्पर्शे, ऐके, वास चवी |
चिंतन करितो ज्ञानही सारे, आनंदाते अनूभवी || ६५.

सुषुप्तीत ना कसली कामना, नसे रूप नि देखावा |
जागृती स्वप्नीच्या ज्ञानाला, ना येथे कसला ठावा || ६६.

चेतोमुख हे द्वारचि याचे, आनंद केवळ अनुभूती |
ॐकाराच्या तिसऱ्या मात्री, येथं जीवाची हो प्रगती || ६७ .

सुषुप्ती मधुनि जाणे स्वप्नी, किंवा जागृतचि होणे |
यांसी कारण असे चेतना, 'चेतोमुख'चि त्या म्हणणे || ६८.

अनुभूती ॐकाराविण जेंव्हा, सुषुप्तीत ये जीवाला |
शबल ब्रह्म तो तदा अनुभवी, सोडिले न अज्ञानाला || ६९.

चतुष्पाद या ॐ च्या द्वारे, अज्ञान न कांही उरते |
पूर्णब्रह्मचि परमात्मा तो, उंच नेई त्या प्रगतीते || ७०.

पुरुष तेधवा आत्म्यामाजी, सुस्थिर ऐसा होत असे |
द्वैतामधुनी अद्वैताची प्रगती येथे स्पष्ट दिसे || ७१.

मंत्र- एष सर्वेश्वर एष सर्वज्ञ एषोऽन्तर्याम्येषयोनिः ।

सर्वस्य प्रभावाप्ययौ हि भूतानाम् ॥ मां.६ ॥

तीन पाद हे परब्रह्माचे, कारणची या विश्वाचे |

स्थावर जंगमी असीम सत्ता, उत्पत्ती, स्थिती प्रलयाचे || ७२.

सर्वज्ञ नि तो अंतर्यामी, त्रिकाल ज्ञानी तोचि वसे |

तोचि चालक या विश्वाचा, ॐकारे जो प्रतीत असे || ७३.

'विश्वश्रियेचा मी भर्ता' हे, नव-अध्यायी तोचि म्हणे |

पंचभूतावरी आज्ञा त्याची, देई चेतना तो प्राणे || ७४.

सकलांच्याचि हृदयादेशी, बुद्धी स्फुरे जी अहर्निशी |

जाणावी 'ती' वस्तू मीच गा, बुद्धी मी 'अमुका' ऐसी || ७५.

दशमाध्यायी हरी सांगती, जळीच जळ जैसे खेळे |

तैसा मीचि या संसारी, ज्ञानियासी हेच कळे || ७६.

तीनही पादांच्या भागा या, गौडपाद 'आगम' म्हणती |

ॐकाराचा जेथे निर्णय, आणि प्रापंचिक व्याप्ती || ७७.

पहिल्या यातील नऊ कारिका, पूर्वभागी या कथियेल्या |

यथामती विश्लेषण त्यांचे, आशयी तेथे व्यक्तविल्या || ७८.

## पूज्यपाद श्री गौडपादाचार्य यांच्या संबंधित कारिका – पहिले प्रकरण- आगम [२९ पैकी पहिल्या नऊ]

श्लोक- बहिष्प्रज्ञो विभुर्विश्वो ह्यन्तःप्रज्ञस्तु तैजसः ।

घनप्रज्ञस्तथा प्राज्ञ एक एव त्रिधा स्मृतः ॥ का.१ ॥

तीन प्रकारे अनुभुत होई, एकरूप जरि असे हरी |

बहिष्प्रज्ञचि जेंव्हा ज्ञाता, नाम 'विश्व' हे तो धारी || ७९.

'तेजस्' स्वप्नी त्या संबोधिती, वासनादिका तो ज्ञाता |

अंतर्बाह्यहि उभय न जाणे, म्हणती 'प्राज्ञ' चि भगवंता || ८०.

जागृतीत तो विश्व म्हणोनि, बाह्यदृष्यीची अनुभूती |

स्वप्नी वा चिंतनी सूक्ष्मचि, तेजस् नामे ओळखती || ८१.

घनप्रज्ञ ती सुषुप्ती असता, 'प्राज्ञ' अनुभवी, आनंदा |

अंतर्बाह्यहि उभय न जाणे, पूर्ण भोगितो सुखचि सदा || ८२.

निर्लेपचि नित आत्मदेव तो, उपाधि आरोपा घेई |

ज्ञाता अनुभवी, विना उपाधी, परमात्माचि त्या हृदयी || ८३.

भोगितसे तो देह उपाधी, तेंव्हा म्हणती देहात्मा |

जीव म्हणुनि ती जाणीव होता, तदा उपाधी जीवात्मा || ८४.

दीप तेज ते, गवाक्ष भेदे, कधि वाटोळे, चौकोनी |

निराकार परि तेज दीपाचे, विचलित ना तो भेदांनी || ८५.

तैसा आत्मा घटा घटातुनि, विविध नाम नि विविध रूपे |

त्या साक्षित्वे सारे घडते, जाणताचि त्या विश्व लपे || ८६.

श्लोक- दक्षिणाक्षिमुखे विश्वो मनस्यन्तस्तु तैजसः ।

आकाशे च हृदि प्राज्ञस्त्रिधा देहे व्यवस्थितः ॥ का.२ ॥

'विश्व' निवासे उजव्या नेत्री, मना अंतरी 'तेजस्' ते |

हृदयाकाशी 'प्राज्ञ' निवासी, ऐसा आत्मा प्रतीतीते || ८७.

नेत्र जोवरी असती उघडे, विषय सेविती जागृती ते |

मृत्यू येता, वाम नेत्रीचे, तेज आधीचि ते जाते || ८८.

दक्षिण नेत्रा 'इंध' नाम ते, अधिक विसावा प्राणाशी |

बृहदारण्यी श्रुती कथितसे, विश्व नाम त्या स्थानाशी || ८९.

अनुभव सुक्ष्मीचा घेतांना, तेजस् मनीचे ते विकसे |

सुषुप्तीत परि हृदयाकाशी, प्राज्ञ तदा ते सुखी असे || ९०.

श्लोक- विश्वोहि स्थूलभुङ्नित्यं तैजसः प्रविविक्तभुक् ।
आनन्दभुक्तथा प्राज्ञस्त्रिधा भोग निबोधत ॥ का.३ ॥

जागृतीत ते विषय स्थूलचि, विश्व बाह्यचि अनुभवती |

तेंव्हा इंद्रियेहि धावती, विषया माजी मना प्रीति || ९१.

होता इंद्रियेची निद्राधिन, स्वप्न-विश्व ते अवतरते |

सूक्ष्मरूपाने स्वये सर्वची, तेजस् म्हणुनि मन रमते || ९२.

जागृतीत वा विसर जगाचा, स्तब्ध इंद्रिये ती होता |

मनोराज्यी ते स्वये रंगुनी, मन जेंव्हा चिंतन करिता || १३.

आणि गाढचि येता निद्रा, जागृती स्वप्नहि ना उरती |

प्राज्ञ होऊनि सुखावतो जीव, असुनि नसे तो या जगती || १४.

अशा तीन या भोग अवस्था, प्राज्ञी सुखाची ती व्याप्ती |

तीन अवस्थातुनी जात या, वेगळीच ती अनुभूती || १५.

श्लोक- स्थूलं तर्पयते विश्वं प्रविविक्तं तु तैजसम् । आनन्दश्च तथा प्राज्ञं त्रिधा तृप्तिं निबोधत ॥ का.४ ॥

स्थूल विषय विश्वा दे तृप्ती, सूक्ष्म विषयी मन संतोषे |

प्राज्ञ सुखावे, सुषुप्तीत ते, तृप्ती ऐसी होत असे || १६.

श्लोक-त्रिषु धामसु यद्भोज्यं भोक्ता यश्च प्रकीर्तितः ।
वेदैतदुभयं यस्तु स भुञ्जानो न लिप्यते ॥ का.५ ॥

तीन अवस्था, भोज्य वस्तूही, तीनहि तैसे त्या भोक्ते |
भोज्य नि भोक्ते ज्ञात जयाला, जाणे अलिप्त भोगाते || ९७.
भोज्य नि भोक्ते, दिसती वेगळे, उपाधीच हे द्वैत करी |
द्वैत संपता, सारे ब्रह्मचि, अलिप्त भोक्ता राही दुरी || ९८.
भोक्ता भोज्यहि व्यक्तचि होती, पंच भुताच्या आधारे |
सारी भुते आकाशातून, वेगवेगळे नाम धरे || ९९.
रूप नाम ते जरि वेगळी, भोक्ता आणि भोज्याची |
वास्तविक ते उभय एकचि, जैसी लेणी सोन्याची || १००.
पदार्थ जरि ते एकचि असता, ओळख दृष्ट्यागणी बदले |
भोग भोगता, प्रत्येकाचे, अनुभव वेगळेचि झाले || १०१.
जागृत असता, जेहि भोगे, ते सारे तर मिथ्याची |
स्वप्नी भोग तर सारे कल्पित, ओळख ना त्या सत्याची || १०२.

सुषुप्तीत तर भोग नि भोक्ता, सारेची विलया जाती |

तिन्ही धामी या भोग नि भोक्ता, दोन्ही ते एकचि असती||१०३.

पक्षी जीवाचा प्राज्ञ बांधितो, जणु ब्रह्माच्या दोरीला |

जीव विहरतो आनंदाने, परत येत तो देहाला || १०४.

भोक्ता जाणे ओळख आपुली, सोय पदार्थी न क्षमतेचि |

अनुभव भोक्त्याचाही जसा तो, परिचय बदले तैसाची || १०५.

श्रुती म्हणतसे जो बघणारा, सत्य सदाचि अन्य नसे |

परि भोज्य ते असे पराधिन, म्हणुनी ते मिथ्याचि असे || १०६.

ज्ञाता जाणे परमसत्य मी, नित्य शुद्धचि राहतसे |

पंच इंद्रिये अनुभव देती, भोग तयाने होत असे || १०७.

परि सत्य तो भोग नसेचि, परिणामहि तो होत नसे |

बाहेरी मी पाणी फेकिता, नभ ओले होईल कैसे? || १०८.

श्लोक- प्रभवः सर्वभावानां सतामिति विनिश्चयः ।

सर्वं जनयति प्राणश्चेतोंशून् पुरुषः पृथक् ॥ का.६ ॥

पुरुषा म्हणते ‘प्राण’ श्रुती ही, तो सकलांचा निर्माता |

ज्ञानरूप किरणे साकारी, तो सकलची या जगता || १०९.

या जगती ना नविन निर्मिती, ना नवीन ते जन्माला |

सुप्त असे ते प्रगट होतसे, त्या त्या निश्चित समयाला ||११०

जे जे येई व्यक्तदशेला, पूर्वी असते अव्यक्ती |

या म्हणती ‘सत्कारवाद’चि, या नामे शास्त्रे ख्याती || १११.

अनात्म्य घेई सहाय्यास ते आत्मा प्रगटि करण्याशी |

म्हणुनी अद्वैती द्वैतहि दिसते, गम्य इंद्रिया होण्याशी || ११२.

आज दिसे ते उद्याही असते, नाम तेचि परि, रुप बदले |

नाश कशाचा ना होई, रूप धर्म नवे झाले || ११३.

प्रवाह काळाचा नित बदले, त्यासंगेचि बदलावे |

आपुली भूमिका उत्तम करणे, चित्त ब्रह्मी परि नित्य हवे ||११४.

जरी जगी या मिथ्या सगळे, सत्य समजुनी वर्तावे |
व्यवहारा इहलोकी करिता, अलौकिक ते ना व्हावे || ११५.

ठिणग्या निघती वन्ही मधुनी, प्रत्येकहि ती अलग असे |
असो ठिणगी ती लहान मोठी, वन्हीगुणाविण अन्य नसे ||११६.

प्राणचि निर्मी सकल वस्तू त्या, नाम रूपे ती विविध जरी |
आपुल्या ज्ञानरूप किरणांनी, सृष्टी सृजिवी चराचरी || ११७.

जरी तुर्येचा अनुभव आला, जगत दृश्य हे ना विरते |
असेल मिथ्या अध्यात्मि ते, व्यवहारी परि सत्यचि ते || ११८.

पूर्ण रसिकता, चित्ती असावी, आणि भान नीति-नियमांचे |
ज्या साठी आलो या जगती, भान न सोडी कार्याचे || ११९.

एक सूर्यचि विवीध पात्री, आकार जली ते विविध किती |
एक अग्नि परि अनेक ठिणग्या, अग्नीला ना तये क्षिती || १२०.

नाम रूपे ती विविध विश्वी या, सकला व्यापित एक हरी |
जीव अंश हा भगवंताचा, देही विविधता असे जरी || १२१

श्लोक- विभूतिं प्रसवं त्वन्ये मन्यन्ते सृष्टिचिन्तकाः ।
स्वप्नमायासरूपेति सृष्टिन्यैर्विकल्पिता ॥ का.७ ॥

कुणी चिंतनी मानी ऐसे, सृष्टी जी जगती भासे |
भगवंताच्या ऐश्वर्याचा, विस्तारचि हा सर्व असे || १२२.

कुणी ज्ञाते परि असे मानिती, ही मायावीची नगरी |
काल्पनिक नि असेच मिथ्या, नसे कदापि परि खरी || १२३.

पहिले असती सृष्टिचिंतक, विषयी जीवचि संसारी |
देहावरणा सत्य मानिती, जयास वाटे सृष्टी खरी || १२४.

निद्रेमाजी मूढ प्राणी ते, मायेला मानिती खरे |
भवचक्राच्या फेरी अडकले, जन्म मृत्यू त्या कधि न सरे ||१२५.

परि दुसरे मत ते ज्ञात्यांचे, मानिती ही ईश्वर माया |
मायेच्या ते पैल जाऊनी, ईशप्राप्तीचे ध्येय तया || १२६.

जागृती-स्वप्न नि सुषुप्ती असती, तिन्ही अवस्था मायावी |
साक्षी केवळ तो परमात्मा, जाण हीच ती नित यावी || १२७.

ब्रह्म सत्य नि मिथ्याचि जग, जाणुनी हे पुरते घ्यावे |
देहाकरवी अलिप्त कर्मे, हरीला क्षण ना विसरावे || १२८.

श्लोक-इच्छामात्रं प्रभोः सृष्टिरिति सृष्टौ विनिश्चिताः ।
कालात्प्रसूतिं भूतानां मन्यन्ते कालचिन्तकाः ॥का.८ ॥

सृष्टीचिंतक असे मानिती, सृष्टी-सृजन ईश संकल्पे |

कर्म जसे ते फलहि तैसे, म्हणुनि येथे विविध रूपे || १२९.

सारे इथले नित्य बदलते, नियम येथला हा असता |

हरिमानस परि नसेचि चंचल, ना संकल्पा या दाता || १३०.

म्हणुनि ज्ञाते ऐसे म्हणती, सृष्टी सृजन हे कालाने |

काले उद्भव, त्यांत राहणे, लयांत कालातची जाणे || १३१.

श्लोक- भोगार्थं सृष्टिरित्यन्ये क्रीडार्थमिति चापरे । देवस्यैष
स्वभावोऽयमाप्तकामस्य का स्पृहा ॥ का. ९ ॥

कुणा वाटते, सृष्टी निर्मिती, मानव भोगाच्यासाठी |

कुणा वाटते, सारे सृजन, केवळ हे क्रीडेसाठी || १३२.

सत्यबुद्धीने विचार करिता, सृष्टीसृजन हा स्वभावचि ||

पूर्णकाम तो असता ईश्वर, त्या मनी इच्छा ती कैची ? || १३३.

नसता इच्छा, ना संकल्पहि, सृष्टी सृजन ना संकल्पे |

सागर तिरी किरणे शिंपेवर, चमकदार भासेचि रूपे || १३४.

हा आभासचि मोठी माया, तिन्ही अवस्था त्या होती |

जागृती, स्वप्न नि गाढ सुषुप्ती, जीवा अनुभवा येती || १३५.

कुणा वाटते, सृष्टी पदार्थही, भोगमयचि अवघेहि असे |

मानव जन्मी घ्याव्या भोगा, ईश्वरास हे वाटतसे || १३६.

मंत्र- नान्तःप्रज्ञं न बहिष्प्रज्ञं नोभयतः प्रज्ञं न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम् ।
अदृष्टमव्यहार्यमग्राह्यमलक्षणमचिन्त्यमव्यपेदशमेकात्मप्रत्ययसारम् ।
प्रपञ्चोपशमं शान्तं शिवमद्वैतम् चतुर्थं मन्यन्ते स आत्मा स विज्ञेयः
॥ मां. ७ ॥

तुर्याचि परब्रह्म असे हे, तूर्या होऊनी जाणावे |

सर्वव्यापी सर्वज्ञ अवस्था, मीचि अनुभवी हे यावे || १३७.

जरि संबोधन पाद म्हणोनी, 'अमूक' ओळख तया नसे |

जाण तयाला ना अंतरीची, बाह्य ज्ञान ही नाही तसे || १३८.

परि ना जाणे, ऐसे नाही, जाणे ऐसेही नाही |

जाणण्याचीच ना जाणीव त्याशी, तैशी नेणीव ना कांही||१३९.

जाणीव नेणीव असण्यासाठी, अहंताचि नाही त्यासी |

नित स्वानंदी नि अद्वैती, ज्ञानमयचि ही स्थिती अशी || १४०.

जो समरसला तूर्येमाजी, अभाव त्याशी दुःखाचा |

नित अद्वैती नि आनंदी, अनुभव ब्रह्मानंदाचा || १४१

तो कैसा? हे तोची जाणे, वर्णन शब्दा-पलीकडले |

जो जाणे तो त्यासी समरस, म्हणुनी वर्णनी ना बोले || १४२.

अंत:प्रज्ञ ना, बहिश्प्राज्ञ ना, उभयप्राज्ञहि नसे तसा |
प्रज्ञ नसे, ना प्रज्ञानघन, अप्रज्ञ ना त्या, म्हणु कैसा || १४३.

नसे कदा तो अव्यवहार्यही, अग्राह्य अचिंत्यहि न असे |
लक्षणशून्य न त्यासी म्हणावे, अदृष्टहि तो कदा नसे || १४४.

एकरूपता दर्शन त्याचे, मंगलमय नि शांत सदा |
प्रपंच निरसन तेणे होई, तयासारखा कुणी न कदा || १४५.

निर्गुण निराकार परमात्मा, निर्विशेष ते स्वरूप असे |
श्रुति संबोधित चवथ्या पादे, सर्वज्ञचि ज्या सीमा नसे || १४६.

बाहेरील ना, अंतरीची ना, नसेच दोहीहि कडली |
सर्वज्ञचि ते असे स्वयंभू, जाणीव नेणीव ना कसली || १४७.

त्याचे नयने नसेच दर्शन, व्यवहारी तो येईना |
ग्रहण न त्याचे येई करता, चिंतनातही गंवसेना || १४८.

ज्याला येई अनुभुती त्याची, वर्णु न जाणे तया कसे |
कोणतेही ना लक्षण त्याचे, प्रपंचात तो ना गंवसे || १४९.

परी तोचि तो सारे कांही, त्याचाचि आधार असे |
सत्ता त्याची प्रमाण हेचि, अनुभुतिविण ना तो गंवसे || १५०.

तुरीय म्हणुनि ॐकाराचा, चवथा पाद न शब्दांनी |
येई वर्णिता, निखळ सत्य ते, प्रतीति होई समरसुनी || १५१.

इतर पाद जे तीन वर्णिले, सारे वर्णन मायेचे |
अनुभुत होता चवथ्या पादा, कळे मूळ हे सकलांचे || १५२.

श्रुती न सांगती 'तुर्या' हाचि चतुर्थ पद उल्लेखाने |
परि योजिती 'असे मानती', 'मन्यते'चि या शब्दाने || १५३

तोचि एक सर्वत्रची असता, चवथा मोजुनिया न कळे |
कारण तो जरि असे तिघातहि, पूर्ण वेगळा, तो सगळे || १५४.

तीन पाद जे आधी वर्णिले, जणू भूमिका नाटकीच्या |
सारे करणेचि समरसुनी, नित्य अलिप्तचि परि त्यांच्या || १५५.

नाटक संपे, भूमिका विसरे, प्रसंग जेही नाटकीचे |
त्यांचा ना संबंध राहिला, मूळ रुप हे तुर्येचे || १५६.

जीही भुमिका जगात करणे, करा पूर्ण ती समरसुनी |
घ्या आनंदचि जीवन कार्यी, परि तयांत न गुंतोनी || १५७.

अध्यात्माचा मार्ग न रूक्षचि, पूर्ण रसिकता, व्यवहारी |
शिव नि सुंदर ते अनुभवता, दाद देतसे परोपरी || १५८.

सारे करणे रसचि घेऊनी, निष्ठेने नि क्षमतेने |

नियम एकचि नसे गुंतणे, वर्तमानचि अनुभवणे || १५९.

इथले कांही नसेची माझे, नाती गोती तात्पुरती |

नाटकातले नाटकी असू द्या, नकोच विचलित मन शांती || १६०.

जोवरी जे संपर्की येती, तोवरची कि, जवळिक ती |

व्यक्ती प्रसंगहि बदलत जाती, ना आनंद नि ना खंती || १६१.

या पादाने परि गोचर जग, नसत्या आधार सत्याचा |

जरी असे हे कांही नसणे, सर्प न अनुभव रज्जूचा || १६२.

ऐसा चवथा पाद वर्णिती, प्रज्ञावंत नि ऋषी मुनी |

तोचि आत्मा ज्ञेय आपुले, नरजन्मी घ्या जाणोनी || १६३.

यथार्थ होता निजरुप ओळख, 'नसणे' उमगे असण्याने |

तरंग दिसतो, परि ते जलची, दिधला आधार तोयाने || १६४.

'अमूक' ऐसे नसता कांही, निर्देशावे त्या कैसे ? |

शून्य सांगण्या, पोकळ बिंदू, पाटीवर लिहिला जैसे || १६५.

अद्वैताचे भान न सोडी, जरि द्वैताने व्यवहारी |

पुरा नेटका प्रपंच करणे, अलिप्त राही नित्य परी || १६६.

द्वैती दिसे ते, नसते तैसे, वेगळेपणा वरवरला |
सारे शेवटी अद्वैतचि ते, कधी ना विसरी तूं याला || १६७

अद्वैताचे करण्या वर्णन, शब्दि द्वैत ते येत जसे |
चवथा पादहि तसे बोलणे, त्या गुण नि आकार नसे || १६८.

'तत्वमसि', 'अयमात्मा ब्रह्म'हि, श्रुती वाक्येही महान ती |
सबाह्याभ्यंतरीं एक तो, प्रयास शब्दे करी किती? || १६९.

नाम रूप त्या नसता कांही, म्हणतो 'आत्मा' परि त्यासी |
सर्वव्यापी परि म्हणतो त्यासी, वसतो हृदयाच्या देशी || १७०.

तेजस्, विश्व नि आनंदाच्या, शब्दी वर्णिती ज्यासी श्रुती |
उपाधी नसता, देणे लागे, जसे रूपे नि ती शुक्ती || १७१.

अंत:प्रज्ञ नि विशेषणेही, सारी निर्देशासाठी |
त्याचे असणे, हेचि सत्य की, अन्य आरोपहि त्या साठी || १७२.

पूर्ण ज्ञान आम्हासि होण्या, प्रयास सारा शब्दांचा |
श्रुतीमाऊली शिकवी बालका, ध्यास तिला तो प्रगतीचा || १७३.

प्रपंचात सुख शोधीत असता, शोधुनियाहि ते गंवसेना |
होता केवळ आत्मबोधचि, सरती साधने ती नाना || १७४.

दहा पासुनि अठरा ज्याही, कारिकाचि त्या ज्या पुढच्या |
स्पष्टीकरण ते यथार्थ करिती, कला विकसती ज्ञानाच्या || १७५.

मंत्र- निवृत्तेः सर्वदुःखानामीशानः प्रभुरव्ययः ।

अद्वैतः सर्वभावानां देवस्तुर्यो विभुः स्मृतः ॥ का.१० ॥

साऱ्या दुःखांची निवृत्ती, एकमात्र तो असे हरी |

सत्ता त्याची सर्वत्रहि तो, सकला एकचि आधारी || १७६.

निजरुप बोधे अनुभुत तुर्या, श्रुती ज्या चवथा पाद म्हणे |

त्या बोधाचा अभाव सृजितो, सारी दुःखे मायेने || १७७.

चवथ्या पादा पूर्ण जाणता, निवृत्ती त्या दुःखांची |

सृजन व्यथांचे तीन पदे त्या, भासमान जी मायेची || १७८.

येता दुःखाची अनुभूति, स्मरण करावे मी तूर्या |

होता समरस तुर्येशी ते, जात असे दुःखचि विलया || १७९.

अव्यय नित्य नि एकरुपी तो, सर्व भाव त्याचेच असे |

स्थावर-जंगम सकलहि तोचि, सकलामाजी तोचि वसे || १८०.

अद्वैती तो स्वयंप्रकाशी, शब्दांच्या नित पैल असे |

'तुरीय' संबोधिती म्हणुनीचि, सूक्ष्म त्याहुनि कांही नसे || १८१.

सारीकडे अस्तित्वी तुर्या, उगा म्हणती पद हा चवथा |

मायेचा जोवरती पगडा, चार पाद मानणे वृथा || १८२.

पूर्ण बोध होता ब्रह्माचा, द्वैताचे नामहि नुरे |
तिन्ही अवस्था ज्या कि दुःखमय, प्रभाव त्यांचा सहजी सरे||१८३.

ध्यानी ठेवा बोध असा हा, नसेचि जाणुनि घेण्याचा |
शुद्धचि जाणीव अशी मनाची, 'मीचि ब्रह्म' अनुभवण्याचा||१८४.

उजेड नसता, रज्जू मार्गीची, जणु वाटे हा सर्प असे |
दचकुनि पाऊल फिरते मागे, भयहि अंतरी दाटतसे || १८५.

विश्व नि तैजस प्राज्ञ जणु ते, पादचि सर्पी मानियल्या |
रज्जूचे ते तुर्यी ज्ञानचि, चवथ्या पादी सामवल्या || १८६.

सर्प नुरेचि, रज्जू जाणता, रज्जू; केवळ-सर्प नसे |
म्हणुनि तीनही वर्णियले पद, शब्दांचा तो खेळ असे || १८७.

जाणण्यास ही तुर्या म्हणुनि, पाद चार हे कल्पियले |
नसे पाद वा अन्य न कांही, ब्रह्मचि सर्वरुपे नटले || १८८.

भवचक्री या जन्मी येणे, जगणे आणि पुन्हा मरणे |
ऐसे नित्यचि सदैव होणे, मोठे दुःखचि अनुभवणे || १८९.

जशी वासना तसे जन्मही, वासनाचि मूळ जन्माचे |
नवमासहि ते गर्भि उकडणे, जन्मचि कारण दुःखाचे || १९०.

सर्व वासना करि कृष्णार्पण, याचि जन्मी त्या गंवसावे |
अनन्य भावे शरण तयाला, दुःखमुक्तचि नित व्हावे || १९१.

**मंत्र- कार्यकारणबद्धौ ताविष्येते विश्वतैजसौ ।**

**प्राज्ञः कारणबद्धस्तु द्वौ तौ तुर्ये न सिध्यतः ॥ का. ११ ॥**

**विश्व नि तेजस् उभय बध्दचि, कारण आणि कार्याने |**

**परी प्राज्ञ तो कारणबध्दचि, विश्व नि तेजस् ना तेणे || १९२**

**प्राज्ञ अशी ही सुप्तावस्था, अवस्थाचि अज्ञानाची |**

**सत्य काय नि असत्य कायही?, नसे कल्पना कसलीची || १९३.**

**'नसे जाणणे' म्हणती त्याला, आवरण जैसे बीज जसे |**

**विपरित परि ते, जेही जाणणे, त्या 'विक्षेप'चि नाम असे || १९४.**

**विश्व–तेजसी दोन्ही असती, प्राज्ञस्थितीतचि आवरण |**

**बीजरूपाने अज्ञानचि ते, प्राज्ञस्थिती ऐसी जाण || १९५.**

**नसे आवरण वा विक्षेपही, तूर्या विशुद्ध जाणावी |**

**देह नसे मी, हा विक्षेप न, ज्ञाने पूर्णताचि यावी || १९६.**

श्लोक- नात्मानं न परांश्चैव न सत्यं नापि चानृतम् ।

प्राज्ञः किंचन संवेत्ति तुर्यं तत्सर्वदृक्सदा ॥ का.१२ ॥

आपुले वा परक्याचे ज्ञानही, 'प्राज्ञा'ला ते मुळी नसे |

सत्य न जाणे, वा असत्यही, तुरिय परि सर्वज्ञ असे || १९७.

सुषुप्तीत निजज्ञान नसेची, विषय अभावी सुख वाटे |

परि ती मायेचीच अवस्था, अद्वैती प्रतीति कोठे?|| १९८.

म्हणुनि वदती 'प्रज्ञानघन' त्या, निजरुप जाणीव अभावची |

आपुल्या अस्तित्वाशी एकरूप, तुरिया ती स्वानंदाची || १९९.

सूर्य न जाणे अंधाराला, अनुभूती केवळ तेजाची |

तसेच तुर्यी अज्ञानाचा, अभाव अनुभूती ज्ञानाची || २००.

परि ना जाणीव ती ज्ञानाची, ज्ञानमयचि ही असे स्थिती |

ना नेणीवही असेच तेथे, पूर्णतया ती अद्वैती || २०१.

श्लोक- द्वैतस्याग्रहणं तुल्यमुभयोः प्राज्ञतुर्ययोः ।

बीजनिद्रायुतः प्राज्ञः सा च तुर्ये न विद्यते ॥ का.१३ ॥

नसे स्पर्श जरि तो विषयांचा, नसे ग्रहण अद्वैताचे |

सुषुप्तीत ती बीजनिद्राचि, लक्षण नच अद्वैताचे || २०२.

बीज निद्रा ये अज्ञानाने, सुषुप्ती अनुभव तो येतो |

परि पूर्णचि जंव बोध होतसे, स्वयेचि तूर्या तो होतो || २०३.

तूर्या राहे सदा अद्वैती, म्हणुनी न ग्रहण की द्वैताचे |

प्राज्ञ बद्ध ते बिजनिद्रेने, तुर्या स्वरुपचि मुक्तीचे || २०४.

तुरीयेस ना कसली उपाधी, एकरसनि ती मुक्त असे |

कालबद्ध ती सुषुप्ती निद्रित, तुलनेला त्या वाव नसे || २०५.

परमसत्य परि नच ते उमगे, निद्रा गाढचि जीवाची |

अनुभवणे ते आत्म्या विपरित, जणु ही अवस्था स्वप्नाची||२०६.

श्लोक-स्वप्ननिद्रायुतावाद्यौ प्राज्ञस्त्वस्वप्ननिद्रया ।

न निद्रां नैव च स्वप्नं तुर्ये पश्यन्ति निश्चिताः ॥का.१४ ॥

विश्व नि तेजस् उभय व्याप्तचि, निद्रा आणि स्वप्नाने |

प्राज्ञ परंतु असे व्याप्त की, स्वप्न-शून्यचि निद्रेने || २०७.

तुर्येची ती जया अनुभूती, पूर्ण जागृती तया असे |

ना मिथ्या वा नाही कल्पना, अद्वैती तो भेद नसे || २०८.

तिन्ही अवस्था पूर्णचि विरती, पूर्ण जागृती अनुभूती |

जेही उमजे यथातथ्यचि, नसे कल्पना ना भ्रांती || २०९.

नसेचि निद्रा अथवा स्वप्नही, स्व-स्थचि तूर्या नित्य असे |

अद्वैती पुरती अनुभूती, स्वानंदीचि नित्य वसे || २१०.

श्लोक- अन्यथा गृह्णतः स्वप्नो निद्रातत्त्वमजानतः ।

विपर्यासे तयोः क्षीणे तुरीयं पदमश्नुते ॥ का. १५ ॥

जे 'जैसे' 'तैसे' न उमगणे, स्वप्न तयालाची म्हणती |

तत्वाचे पुरते अज्ञानहि, निद्रा नाम तया देती || २११.

रज्जुलाचि सर्प समजणे, प्रकार हाही स्वप्नाचा |

जेणे चुकीच्या ज्ञानालागी, अन्यथाचि त्या ग्रहणाचा || २१२.

तैसे अज्ञाने देहाला, स्व-रुप समजुनी आचरणे |

परम सत्य ते अज्ञानाने, विपरित मानिती मायेने || २१३.

ऐशी निद्रा आणि स्वप्नहि, जागृती स्वप्नीही असती |

सुषुप्तीत ती प्राज्ञ अवस्था, निद्रा परि स्वप्ने नसती || २१४.

पावन तुर्या ती अनुभविता, नसे स्वप्न नि निद्रा ना |

परम सत्यचि ते अनुभवणे, खरी अनुभूती ती जाणा || २१५.

श्लोक- अनादिमायया सुप्तो यदा  जीवः प्रबुध्यते ।
अजमनिद्रमस्वप्नमद्वैतं बुध्यते तदा ॥ का.१६ ॥

अनादि माया भगवंताची, जीव झोपला त्यायोगे |

यथार्थ बोधे पुरता जागृत, अद्वैती नित्यचि दंगे || २१६.

प्रभाव मायेचा तो असता, देहालाचि 'मी' मानी |

स्वामित्वाची येत भावना, घर, मुले, माझी पत्नी || २१७.

जे जे येई त्या वाट्याला, पदार्थ-व्यक्ती वा दुसरे |

ममत्व होऊनी तयाचि संगे, वाटे माझे हे सारे || २१८.

सारे जरि ते अनित्य चंचल, आणि विनाशी या जगती |

जेही लाभे वियोग निश्चित, परी वाढवी वृथा प्रीति || २१९.

सुरू होत मग दुःख-सुखाची, जीवनात त्या उतरंडी |

आसुरी संपदाहि तयाला, भुलवुनी आणि रडकुंडी || २२०.

परि दैवे नि सत्संगाने, येई जागृती त्या पुरती |

विवेक आणि विरक्ती योगे, लाभे दैवी संपत्ती || २२१.

येई परब्रह्म अनुभूती, सुखमयचि ती सदा स्थिती |

एकरसचि ती असे प्रतीति, सौख्य नि शांती अद्वैती || २२२.

अनुभूति होता मीचि तुर्या, तेथं असे केवळ ‘असणे’ |

कालासंगे विपरित ज्ञानहि, विरुनी एकचि ते होणे || २२३.

देह काल नि ममत्व सोडुनि, आपणा आपण अनुभवणे |

अनासक्तचि केवळ अनुभव, ऐशा अद्वैती जाणे || २२४.

जाणीव नेणीव सर्व संपली, निज ज्ञानातची आनंदी |

परम सुखमय अशी अवस्था, जिथे अंत ना वा आदि || २२५.

आपुल्या अस्तित्वाच्या करवी, कार्ये होती जगताची |

तुर्या नित्यचि मुक्त त्यांतुनि, स्थिती ही जीवन्मुक्ताची || २२६.

श्लोक- प्रपंचो यदि विद्येत निवर्तेत न संशयः ।

मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः ॥का.१७॥

दिसे मला संसार भवती हा, पराधीन याची सत्ता |

परब्रह्मावरी हा आभासे, ब्रह्मचि आश्रय ते द्वैता || २२७.

याचे असणे आणि बदलणे, अनादीच ईश्वरी सत्ता |

त्या अस्तित्वे कदा न विचलित, अद्वैती रमता ज्ञाता || २२८.

ज्ञाता ना विसरे कर्तव्या, जरी उपाधी मुक्त असे |

जीव अज्ञानी, जेही भवती, पर-उपकार न सोडीतसे || २२९.

सूर्य उदय नि अस्ती चंद्रमा, दिवसामागे असे निशा |

मिथ्या जरि हा खेळ चालला, स्वधर्म जोवरी देह दशा || २३०.

हा जरि आहे खेळ नि मिथ्या, ज्ञान जाहले तुर्येचे |

संबंध न सुटतो जगताचा, असो भान व्यवहाराचे || २३१.

जशी भूमिका, जो अधिकारही, येत स्वभावे वाट्याला |

उत्तम निष्ठेने आचरणे, यास्तव जीव इथे आला || २३२.

अद्वैताचे भान न सोडी, जगती पुरते आचरणे |

द्वैतासंगे या व्यवहारे, सत्यचि म्हणुनि वावरणे || २३३.

खेळ ईश्वराने हा रचिला, घेउनी संगे मायेला |
जीवास त्याने इथे धाडिले, कांही कार्या करण्याला || २३४.

विहीत देहकार्या न सोडणे, परि मायेला ना विसरी |
सारी कार्ये अलिप्ततेने, अंतरी चिंतीत नित्य हरी || २३५.

प्रपंच खोटा म्हणुनि तयाला, उपेक्षिणे ते मुळी नाही |
धरतीवर येणे कार्यास्तव, नच सुटला यातुनि हरिही || २३६.

नष्ट न होईल प्रपंच कधिही, खेळ जरि हा वरवरला |
अद्वैताचा द्वैती खेळ हा, अलिप्त राहुनि खेळ भला || २३७.

ज्ञाता जाणे निजरुप त्याचे, ना गुंते तो संसारी |
त्यांत अडकणे हेचि असे ते, येणे पुन्हाचि माघारी || २३८.

जर हा मिथ्या प्रपंच असता, कुणासाठी या श्रुती स्मृती ?|
कुणासाठी ते गीता सांगणे, सारे मिथ्या जरि अंती || २३९.

म्हणुनी ज्ञात्या निजबोध होता, अवश्य रमणे अद्वैती |
देहाकरवी करवी कर्मे, आचरणी ना आसक्ती || २४०.

श्लोक- विकल्पो विनिवर्तेत कल्पितो यदि केनचित् ।

उपदेशादयं वादो ज्ञाते द्वैतं न विद्यते ॥ का.१८ ॥

पूर्ण बोध तो ज्ञात्या होता, विकल्प सारे ते मिटती |

द्वैता-धारे अद्वैत बोधे, शंकांची हो निवृत्ती || २४१.

तीन पाद कथियले श्रुतीने, वर्णन नाही चवथ्याचे |

चवथी तूर्या अनुभवण्यास्तव, कल्पित तीन हि पादांचे || २४२.

अनुभूतीला येता तुर्या, कळते सारे अखंड हे |

अज्ञानातुनी ज्ञानी येण्या, कल्पित रचिले हे पाहे || २४३.

घट तर आहे केवळ माती, नाम-रुप आभास असे |

घट न नाशिता, असे कल्पिणे, माती- घट उभयचि तसे || २४४.

कांच पात्री ती काठी घालिता, जलामध्ये ती वक्र दिसे |

वाकडेपणा नाही काढण्या, ज्ञाने सरळपणाची असे || २४५.

प्रपंचातचि जरि राहे ज्ञाता, भान नित्य अद्वैताचे |

अलिप्त राहुनि स्वकर्म करणे, सारे कार्यचि हे हरीचे || २४६.

बोधा होण्याआधीही ते, जगतहि सत्यचि ते नव्हते |

तेंव्हाही होते ते मिथ्या, असू देत ते जैसे ते || २४७.

बोध अद्वैताचा तो होता, निज राहील ते अद्वैती |

द्वैती कल्पित खेळ चालू दे, तुर्येला नच बाधा ती || २४८.

देहावाचुनी ज्ञान नसेचि, देहधर्मंहि ना चुकती |

जागृती निद्रा स्वप्नहि राहील, वावरणे आहे जगती || २४९

कर्मयोग तो आचरण्याला, द्वैतचि आवश्यक असते |

नित्य अनुभूती अद्वैताची, तूर्या बाधित ना होते || २५०.

भान ठेविता नित मायेचे, चित्ती ब्रह्मज्ञानाहि |

अंत:संगी, बहिस्त्यागी या, वशिष्ट वचनाशी राही || २५१.

निष्ठेने करी स्वधर्म यज्ञा, जरी पूर्णता अनुभविता |

अपूर्ण जेही त्यासी साहाय्या, परि न सोडणे अद्वैता || २५२.

इहलोकी या येणे जाणे, उचित विहित कर्मे करणे |

हे सारेही सुरूच राहील, कर्तव्या ना विस्मरणे || २५३.

कर्मे करणे अखंड यज्ञचि, संपणार ना केंव्हाही |

त्यांत राहुनि त्यांतची नसणे, असे ऐशीची 'मुक्ती' ही || २५४.

गंगा वाहे आपुल्या वाटे, ध्यास सिंधूचा ना सोडी |

कोण कशास्तव येत प्रवाही, जाणण्यात परि ना गोडी || २५५.

ऐसे अद्वैती हे असणे, सेवा करुनी द्वैताची |

परि अद्वैती भान नित्यचि, हिची फलश्रुती मुक्तीची || २५६

मंत्र- सोऽयमात्माऽध्यक्षरमोंकारोऽधिमात्रं पादा मात्राः ।

मात्राश्च पादा अकार उकारो मकार इति ॥ मां.८ ॥

चतुष्पाद जो कथिला इथवर, स्वरूपी वर्णिला ॐकार |
अ, उ म ध्वनी गोचर मात्रा, नीरव शांती पद चार || २५७.

चवथी गणली मात्रा जीकि, स्थूल-सूक्ष्म या पैल असे |
हळूच नेई, शांतीमाजी, परब्रह्मचि ते विलसे || २५८.

पहिल्या मात्रा तीन व्यक्तचि चवथी ती अव्यक्ताची |
हिची तूर्या, जी ना गोचर, परी अनुभूती तुर्येची || २५९.

स्थान,काल नि देह पैल ती, परि आश्रय ती जगताला |
द्वैता खेळवी अद्वैतावरी, परि ना बाधा तुर्येला || २६०.

अविनाशी अक्षर ॐकारी, सत्ता केवळ आत्म्याची |
विश्वा गोचर होण्यास्तव ही, असे योजना या ॐची || २६१.

नादब्रह्म हा पहिला अंकुर, विश्वास्तव हा ब्रह्माला |
सांभाळुनिया निराकारिता, घडवियले साकाराला || २६२.

ॐकाराची नाद-ध्वनी नि, कंपनेही जी लहरींची |
त्याचे संगे समरस होता, भक्त स्वये हो तो हरीची || २६३.

**मानवावरी विशेष मर्जी, त्याशी निजरूप जाणाया |**

**परब्रह्माने स्वये योजिले, नादब्रह्म ॐकारा या || २६४.**

मंत्र- जागरितस्थानो वैश्वानरोऽकारः प्रथमा मात्राऽऽप्तेरदिमत्त्वाद्वा ऽ आप्नोति

ह वै सर्वान्कामानादिश्च भवति य एवं वेद ॥ मां.९ ॥

ॐकाराची पहिली मात्रा, 'अ' या शब्दाने झाली |
'अ' हे अक्षर सकलची शब्दी, व्याप्त तये वाचा झाली || २६५.

ज्ञानेश्वरीच्या मंगल चरणी, चरण युगलचि हे श्री चे |
सर्वपूज्य श्रीगणेश नमिला, समर्पणचि सर्वस्वाचे || २६६.

बुद्धी दाता, प्रसन्न होई, ऐसे समरसता चरणी |
ज्ञानलाभ तो अती शुद्धचि, अभाव होता अज्ञानी || २६७.

शब्दांचा जो आदि शब्द हा, गीतेत हा प्रभूची विभूती |
'अकारो वै सर्वा वाक' ही, गौरवी ऐतरेय श्रुती || २६८.

प्रथम पाद नामे वैश्वानर, स्थूल देहीच्या जागृतीचा |
पंचभुते, प्राण नि तन्मात्रा, विस्तारचि हा व्याप्तीचा || २६९.

ॐकारी उच्चारण काली, वैश्वानर भगवंताला |
स्मरुनि तयाशी एकरूपता, जीवनी उणीव ना त्याला || २७०.

मंत्र- स्वप्नस्थानस्तैजस उकारो द्वितीया मात्रा ।
उत्कर्षादुभयत्वाद्वोत्कर्षति ह । वै ज्ञानसंततिं समानश्च भवति ।
नास्यब्रह्मवित्कुले भवति य एवं वेद ॥ मां.१० ॥

ॐकाराची दुसरी मात्रा 'उ' या शब्दे व्यक्तविली |
उत्कर्षाची जी का द्योतक, तैजस स्थानी गौरविली || २७१.

ज्ञानेश्वरीतील गणेश वर्णनी, उ-कार उदर स्थानाला |
जेथे स्थिरावली त्रिभुवनेही, उदरी आश्रय तो दिधला || २७२.

पहिल्या तिसऱ्या मात्रा जोडी, उभयत्वाचे कार्य करी |
अधिक श्रेष्ठ ही विश्वाहुनही, देत प्रेरणा उद्धारी || २७३.

सूक्ष्म तत्व हे समानभावी, ज्या उमगे समभाव धरी |
असा ब्रह्मविद् सकल कुलाला, पुण्ये आपुल्या उद्धारी || २७४.

अकाराहुनी उच्च ध्वनित ही, सहजी लहरी ने उंचीला |
मन पवनाची संथ जोडी ती, उच्च अवस्था चित्ताला || २७५.

उकार सहजी ने शांतीला, जागृती स्वप्ना पैल गती |
कैवल्याच्या मंगल वाटे, साधक साधतसे प्रगती || २७६.

जागृती-स्वप्नाच्या संधीला, तन्मयता सहजी साधे |
पहाट समयी, वा निद्रेच्या, पूर्वी ब्रह्मचि दे सादे || २७७.

मन पवनाचे ऐक्य साधुनी, चिदाकाशी ते शांत मने |
उभय गगन ते समरस होता, उजेड येई तो ज्ञाने || २७८.

हिरण्यगर्भाचेच स्थान हे, संकल्पे जो सृष्टी करी |
प्रकाशस्वरूपी चेतन ईश्वर, मानस सृष्टी आधारी || २७९.

हिरण्यगर्भचि विराट कारण, सहजी श्रेष्ठता, त्याची असे |
स्थूल सूक्ष्म या पार पडाया, साह्य तोचि ते करीतसे || २८०.

ॐकारी उच्चारण काली, हिरण्यगर्भचि भगवंता |
अधमांगाच्या वरी जातसे, उत्तम ऐसा जो ज्ञाता || २८१.

जटिल समस्या, विवाद, चर्चा, यातुनि मार्गा तो काढी |
त्याच्या वंशा करि तो मंगल, जाता मायेच्या पैलथडी || २८२ .

मंत्र- सुषुप्तस्थानः प्राज्ञो मकारस्तृतीया मात्रा ।

मितेरपीतेर्वा मिनोति ह वा इदँ सर्वम् ।

अपीतिश्च भवति य एवं वेद ॥ मां.११ ॥

ॐकाराची तिसरी मात्रा, 'म' म्हणता, ओठे मिटली |
संधीकाल द्वैताद्वैताचा, दशा सुषुप्तीची आली || २८३.

प्राज्ञ तयाचा तृतिय पादचि, कारणदेही वास जया |
आकलन आणि सहजी एकता, ईश्वर दैवत असे तया || २८४.

साऱ्या विश्वाचीहि व्याप्ती, हीच अवस्था मोजू शके |
सहजी विलीन त्यांतची होई, परि त्यासी ना कुणी तुके || २८५.

घेता अनुमान विश्वाचे, अमाप सारे जरि दिसते |
अंती उमगे सारी माया, संग्रहिले जे व्यर्थची ते || २८६.

ज्ञानेश्वरीतील गणेश वर्णनी, महामंडले मस्तक हे |
विद्या-ज्ञानाच्या सृजने ते, ब्रह्मांडा सकला पाहे || २८७

स्थान सुषुप्तीचे या स्थानी, मात्रा 'अ' नि 'उ' विरती |
म-कार घुमतो चिदाकाशी तो, हळुहळू देई शांती || २८८.

नीरव शांती निवास ॐचा, सृजन आणि लय, त्या स्थानी |
याचि राउळी हरी निवासे, अनुभुति त्याची ये मौनी || २८९.

सुषुप्तीत ती सुप्त इंद्रिये, विसर होई तो विषयांचा |
सहजी शांती अनुभुत होई, शून्य विचारचि तो मनीचा || २९०.

उपासनेस्तव ॐ चि शिडी ही, अमात्र ने ब्रह्मद्वारा |
आता शिडीचे काम संपले, अद्वैती या ना थारा || २९१.

मस्तकाचिया चिदाकाशी त्या, ॐकाराचे स्थान असे |
आज्ञाचक्री मती स्थिरावे, स्पंदन ब्रह्मरंध्री विकसे || २९२.

श्लोक आठ ते अकरा श्रुतीचे, गौडपाद कारिका अशा |
एकोणीस ते तेवीस रचिल्या, प्रकाशवी त्या मनोदशा || २९३.

श्लोक- विश्वस्यात्वविवक्षायामादिसामान्यमुत्कटम् ।
मात्रासंप्रतिपत्तौ स्यादाप्तिसामान्यमेव च ॥ का.१९ ॥

तीन पाद जे वरी वर्णिले, अकार मात्रे विश्व कळे |
आदित्व आणि व्यापकता हे, जागृतीतले ते आकळे || २९४.

ॐकाराच्या शांत चिंतने, अकार ध्यानी तो येता |
जागृतीतले विश्व कळे हे, खेळवी मायेची सत्ता || २९५.

श्लोक- तैजसस्योत्वविज्ञान उत्कर्षो दृश्यते स्फुटम् ।
मात्रासंप्रतिपत्तौ स्यादुभयत्वं तथाविधम् ॥ का.२० ॥

मधल्या स्थानाच्या मात्रेने, विश्व-प्राज्ञ संबंध कळे |
तैजस ज्ञाने स्वप्नविश्व ते, उमगुनिया मन ते उजळे || २९६.

स्वप्नस्थितीच्या होता ज्ञाना, महत्व कळते मात्रेचे |
माध्यमिक संबंध उलगडे, जागृती आणि सुषुप्तीचे || २९७.

श्लोक- मकारभावे प्राज्ञस्य मानसामान्यमुत्कटम् ।
मात्रासंप्रतिपत्तौ तु लयसामान्यमेव च ॥ का.२१ ॥

मकार देई ज्ञान प्राज्ञीचे, सुषुप्ती मधला लय हि कळे |
'म' मात्रेची एकरूपता, सुषुप्तिशी ती सहज जुळे || २९८.

आनंदाशी होई जवळीक, सौख्य त्याचे ये ध्यानी |
महत्व शांतीचे ते उमगे, सहजी जाता ते मौनी || २९९.

उपासना जरि सकाम तरि ती, फळे हि मिळती भौतिक ती |
निष्कामे साधना ती करिता, कैवल्यचि येई हाती || ३००

श्लोक- त्रिषु धामसु यत्तुल्यं सामान्यं वेत्ति निश्चितः ।

स पूज्यः सर्वभूतानां वन्द्यश्चैव महामुनिः ॥ का.२२ ॥

तीन अवस्था नि महत्व त्यांचे, मात्रांद्वारा अनुभूती |

जाणकार तो महामुनीची, पूज्य नि वंदनीय जगती || ३०१.

ज्या स्थितीचे ते महत्व जैसे, मात्रेमाजी जाणावे |

अध्यात्माच्या चढत्या स्तरी ते, चिंतनात अनुभुत व्हावे || ३०२.

व्यक्ता मधुनि अव्यक्ताची, वाटचाल ही रेखियली |

ऋषी मुनींची दिव्य अनुभूती, शब्दी श्रुतीत अवतरली || ३०३.

पूजनीय श्री गौडपाद ते, गहनाशीही प्रगटियले |

कृतज्ञ भावे वंदन त्यांना, ॐ द्वारे ब्रह्मा नेले || ३०४.

द्वैता आश्रय अद्वैताचा, त्या आधारे मार्ग क्रमी |

विवेक वैराग्याच्या योगे, कैसे मिळणे ते ब्रह्मी || ३०५.

मात्रा या नि तीन अवस्था, यांची यथार्थ ही जुळणी |

आता द्वैत नि अद्वैताच्या, संधीवर ते येवोनी || ३०६.

परब्रह्माच्या महान द्वारी, ॐकाराने पोचविले |

पुढले सुलभचि दर्शन हरीचे, ऋषी मुनींनी करवियले || ३०७.

मागील मंत्री श्रुती माजी ज्या, उपासनेला वर्णियले |
उपासना परि सकाम त्याही, भौतिकतेची त्याची फळे || ३०८.

गौडपाद मुनि आता वर्णिती, निष्कामाची काय फळे |
निर्गुण ब्रह्मासि उपासिता, सर्वोच्चचि लाभे सगळे || ३०९.

ॐकाराचा सूक्ष्म गहनतो, अर्थ उमगता अभ्यासे |
उपासनेला दृढचि करिता, केवळ हरीच्याचि ध्यासे || ३१०.

पूर्ण चिकाटी अंतरी तळमळ, उच्च ज्ञान मजशी व्हावे |
महामुनी आंतल्या आवाजे, सहजी हरीचे पद पावे || ३११.

जीवनमुक्ती विदेहमुक्ती, सारे सारे त्यासाठी |
मौनाचे श्रेष्ठत्व जाणुनि, शरण चरणी त्या जगजेठी || ३१२.

श्रवण नि चिंतन निदिध्यासनही, हाचि मार्ग तो अनुसरतो |
मन बुद्धी तो सोपवी हरीला, वेगळेपणा ना उरतो || ३१३.

श्लोक- अकारो नयते विश्वमुकारश्चापि तैजसम् ।

मकारश्च पुनः प्राज्ञं नामान्ने विद्यते गतिः ॥ का. २३ ॥

करण्या प्राप्ती ती विश्वाची, साह्यचि अ-कार मात्रेचे |

तैजस प्राप्ती उ-कार द्वारे, म-कार फल ते प्राज्ञाचे || ३१४.

आणि लाभता तुरीय पावन, उच्च त्याहुनि कांही नसे |

गती प्राप्तीची तिथे थांबते, ब्रह्मप्राप्तीहुनी काय असे?|| ३१५.

बृहद्अरण्यक, छांदोग्य नि प्रश्न श्रुती हे वर्णितसे |

नित्य सुषुप्ती हरीजवळी ने, परि ते फल चवथ्याचे न असे || ३१६.

सुषुप्ती नेई हरिद्वाराशी, द्वैत जीवाचे ना मिटले |

अज्ञानाचि अजुनी अवस्था, तूर्येविण ना द्वार खुले || ३१७.

श्रेष्ठ असा जो चवथा पादचि, श्रुती बारावे मंत्री असे |

गौडपाद ते नेती आपणा, उकल त्याविना अन्य नसे || ३१८.

मात्रा शुन्यत्वे जी अवस्था, तुरीय ऐसे नाम जया |

ध्येय तेचि की या जन्मीचे, ज्या विण जीवन ते वाया || ३१९ .

मंत्र- अमात्रश्चतुर्थोऽव्यवहार्यः प्रपञ्चोपशमः ।

शिवो द्वैत एवमोंकार आत्मैव संविशति ।

आत्मनात्मानं य एवं वेद ॥ मां. १२ ॥

ॐ द्वारा या मात्रा तीनही, हरी द्वाराशी जरि नेती |

चतुर्थ मात्रा 'मात्रा-शून्य'चि, चवथ्याची दे अनुभूती || ३२०.

येथे लाभ न कांही प्रपंचिक, अद्वैती केवळ शांती |

नाद-कंपने विरती जेथे, तेथे हरीची अनुभूती || ३२१.

पूर्ण मौन ते निर्गुण निश्चल, केवळ ती नीरव शांती |

चिदाकाश ते बाह्याकाशी सहजी मिळे ते अद्वैती || ३२२

पूर्ण मौन ते वाणीचे नि, कांही सांगणे मनी नसे |

चारहि वाणी पूर्ण स्तब्धची, श्वास मंद मन शांत असे || ३२३.

काया वाचा मनही शांत ते, कुणी कृति- संकल्प नसे |

करणे वा ना करणेहि प्रभु इच्छा, पूर्ण समर्पण भाव असे || ३२४.

परि चित्ती ती पुरती जाणीव, अशा समर्पण मौनाची |

जाणुनि मी-पण समरस हरीशी, पूर्णकाम ना इच्छेची || ३२५.

देह जणु की, कठपुतली ती, दोरी हरीच्या हाती असे |
मन बुद्धी ही तया समर्पण, पूज्य भाव अंतरी वसे || ३२६.

जे वाट्या आले संतोषे, प्रसाद म्हणुनी शिरी धरी |
मी हरीचा नि हरी तो माझा, जीवन रथ तो तया करी || ३२७.

अमात्र हिजलाची म्हणावे, समाधानी नि तृप्तचि तो |
प्रपंच-शमने, दुःख अभावे, हरी होऊनिया हरी भजतो || ३२८.

निज इच्छेने कांही न करणे, निराकार ही ब्राह्मी स्थिती |
पूर्ण मौनचि अनुभुत जेथे, अंतर्बाह्यहि ती शांती || ३२९.

व्यवहाराच्या पैल असे तो, प्रपंच उपशम जेथं असे |
जीव उपाधी टळुनी पुरती, हरीमाजीचि नित्य वसे || ३३०.

आता नाही कांही लाभणे, सर्व चराचर तोचि असे |
शिवचि स्थिती ही, येथं सुखाला पार नसे || ३३१.

आता नाही साधन-पूजन, सारी हरिमय अनुभूती |
अपार स्वानंदीचि नित्यचि, अनुभवणे नीरव शांती || ३३२.

जलात मिळता जैसे जलचि, सहजी होई समरसता |
तैशी अवस्था ब्रह्मपदाची, महत्व शब्दी न ये कथिता || ३३३.

येथे नाही येऊनी मिळणे, आपणा आपण ओळखणे |
नित्यप्राप्तचि परब्रह्माला, पूर्णतया जाणून घेणे || ३३४.

ब्रह्मप्राप्तीचे साधन ब्रह्मचि, आणि साध्यहि तेचि असे |
'आत्मानं संविशति' म्हणुनी, आत्मा निजरुपी पुन्हा वसे || ३३५.

जैसा अग्नि काष्ठी स्थिरावे, जाळितोहि तो काष्ठाला |
काष्ठावरी ते काष्ठ घाशिता, स्वयेचि गोचर तो झाला || ३३६.

अग्नि बांधित अग्नीलाची, आणि स्वयेची सोडवितो |
अग्नि सोडवी अग्नीलाची, बंधन दूरचि तो करितो || ३३७.

काष्ठ जाळिते काष्ठालाचि, जळणे हेतू हाचि असे |
साध्य नि साधन एक जाहले, ब्रह्माचे झाले तैसे || ३३८

अंत:करणी बंधनी आत्मा, विचार अग्नि तो प्रगटे |
प्रज्वलित होता ज्ञानाग्नि, कोऽहं चा मनी प्रश्न उठे || ३३९

बीज-भावचि अज्ञानाचा, सुषुप्तीत ब्रह्मा दडवी |
दग्ध करुनी त्या तुर्यी प्रवेशी, स्वये ब्रह्मचि तो होई || ३४०

देही बांधिले आत्माग्निला, मातीत मिळवी जाळुनी |
अग्नि विझता अग्नीत जाई, तूर्या जाई स्वस्थानी || ३४१

ज्ञानाशी अग्निची मूळ हे, ज्ञानेश्वरीत कथियेले |

म्हणुनी चेतविता ज्ञानाग्नी, ब्रह्मी ब्रह्मचि समरसले || ३४२.

पिंडे पिंडाचा हा दंशु ज्ञानेश्वरीत सांगितले |

देह आवरण दूर सारूनि, आत्मदेव स्वरुपी विरले || ३४३.

हरीप्राप्तीस्तव हरीचि साधन, अमात्र नामे गौरविले |

पूर्ण समर्पण होता त्याशी, त्याने निजरुप सोडवले || ३४४.

हा ऐसा ॐकार जाणता, स्वये स्वरूपी ते मिळणे |

जैसा अग्नि पुनश्च काष्ठी, सहजी सामावुनी जाणे || ३४५.

ज्याने ऐशा हरितादात्म्या, निजस्थानी ते अनुभविले |

धन्य तो जगी, धन्य तो जगी, मौने नमना त्या केले || ३४६.

श्लोक-ओंकारं पादशो विद्यात्पादा मात्रा न संशयः ।
ओंकारं पादशो ज्ञात्वा न किंचिदपि चिन्तयेत् ॥का.२४ ॥

आत्म्याचे हे चारी पादहि, ॐकाराशी समरसले |
पूर्ण ज्ञान ते करुनी घेता, कांही लाभण्या ना उरले ||३४७.

ॐकारा जाणुनिया पादे, अन्य कांही न चिंतावे |
शुद्ध भक्तीने तन्मय व्हावे, प्रेमी त्या रंगुनी जावे || ३४८.

सामरस्य ते जेही वर्णिले, पुरत्या चिंतनी झिरपावे |
शब्द नि आशय खोल उतरता, उच्चपदी सहजी जावे || ३४९.

आशय ऐसा चित्ती ठसता, निदिध्यासन ते नित्य हवे |
शुद्ध चित्ती त्या अन्य न चिंतन, केवळ हरिचरणी भावे || ३५०.

इंद्रिये महा बलिष्ठ असती, सिद्धाचेहि मन खेची |
म्हणुनी साधके, सावध नित्यचि, तरीच ज्ञानाची प्राची || ३५१.

परब्रह्म मीलनातचि अद्भुत, सुखमयचि ती होत स्थिती |
आनंदचि हो स्वयेचि आपण, पूर्ण दाटते ती तृप्ती || ३५२.

अनुभव ना तेथे शांतीचा, स्वयेचि शांती, पूर्णपणे |
आदि नसे नि अंतही नाही, स्वयेचि प्रतीत हे होणे || ३५३.

मंत्री रमता जी अनुभूती, निर्विचार नि निश्चल ती |

ॐकारचि आत्मी समरसता, त्याची पुर्णत्वे व्याप्ती || ३५४ .

कदा न विचलित देही मानसी, समरसता ते ॐकारी |

अनंत व्यापक ऐसे व्हावे, त्याविण कांही न संसारी || ३५५.

निदिध्यासन ते असे असावे, त्या वाचुनि अन्य नसे चित्ती |

समरस व्हावे पुरते त्यासी, तेणे त्वरित ती प्राप्ती || ३५६.

'उपासना करितो' ऐशीही, मनी कल्पना ना यावी |

देहीचा तो कणकण केवळ, ॐ शी समरसताचि हवी || ३५७.

श्लोक- युञ्जीत प्रणवे चेतः प्रणवो ब्रह्म निर्भयम् ।

प्रणवे नित्ययुक्तस्य न भयं विद्यते क्वचित् ।।का.२५।।

ॐ उच्चारण-पूर्ण समर्पण, नादी कंपनी, लय होता |
सर्वश्रेष्ठ हे निर्भय ब्रह्मचि, भावे त्याशी समरसता || ३५८.

चराचरचि जंव मीच जाहलो, भय तेथे कांही न उरे |
प्रकाशचि ये अनुभूतीला काळोखाची रात्र सरे || ३५९.

परहित साधन करिता सहजी, प्रणवी होई समरसता |
आर्त विश्वीचे मनी उमटावे, हेची जाणणे अद्वैता || ३६०.

जेंव्हा गोचर नाद कंपने, सगुण ब्रह्मचि ॐकार |
मात्रा-शून्यी निर्गुण ब्रह्मचि, अनंत व्याप्ती ना पार || ३६१.

जेंव्हा मन ते निश्चल पवने, विचार मनीचे स्तब्ध असे |
सहजी प्रणवाशीचि ध्यावे, हृदयी प्रत्यक्षचि दिसे || ३६२.

मिटुनी नयने, शांतचि चित्ते, हृदयी घ्यावी ती प्रतीति |
मंद पवन तो, निश्चल चित्ते, देही पूर्णचि ती शांती || ३६३.

स्वये न करिता ते उच्चारण, चिदाकाशी ते लक्ष हवे |
आपण कल्पुनी पावन जागी, ॐकाराला ऐकावे || ३६४.

एक-दोन ना अनेक मुनिवर, घोष ॐ चा ते करिती |
कान ऐकती, नयन पाहती, दिव्य तेज त्या ॐ भंवती || ३६५.

त्वचेसहि तो दिव्य स्पर्शचि, परब्रह्म ॐकार रुपी |
सुगंध दिव्य चि अनुभूतीला, सारे विश्वचि ॐरुपी || ३६६.

प्रणव समाधी अशी साधता, तेज नि शांती अनुभूती |
विरक्त जीवन, शुद्ध आचरण, सहजी अंतरी ती शांती || ३६७.

आसक्ती बाह्याची जाता, गोडी आंतली ती वाढे |
देहाकरवी स्वधर्म पालन, विरक्ती तुर्येशी जोडे || ३६८.

सकलासाठी यथार्थ करणे, परहितकृति ना सांगावी |
हरीने केले हरीच्या साठी, म्हणुनि प्रसंशा ना व्हावी || ३६९.

श्लोक- प्रणवो ह्यपरं ब्रह्म प्रणवश्च परः स्मृतः ॥

अपूर्वोऽनन्तरो ऽ बाह्योऽनपरः प्रणवोऽव्ययः ॥ का.२६ ॥

प्रणव असे हे अपर ब्रह्मचि, तो परमात्मा परहि असे |

नादी सगुण तो, शांतीत निर्गुण, कारणशून्य नि कार्य नसे || ३७०.

ॐकाराचा नाद ऐकता, सगुण ब्रह्म ते अनुभवणे |

आणी समरस शांतीत होता, निर्गुणाशी ते समरसणे || ३७१.

बोधहि होता, जगती आचरण, सकाम व्यक्तीसम व्हावे |

कामुक वश करण्यास्तव जैसा, तैसे जगता दावावे || ३७२.

सामान्यासम नित वर्तावे, जगी अलौकिक नोहावे |

चित्त ब्रह्मी परि व्यवहाराशी, नाते कधि न तोडावे || ३७३.

भेदशून्य तो अद्वितीयचि, सर्वव्यापि नि अव्यय तो |

जैसे ज्याचे ज्ञानहि तैसा, तो त्यासी गोचर होतो || ३७४.

चिंतनात ते खोल उतरता, ज्ञान-जाण त्या पादांची |

विरते, उरते निखळचि केवळ, सुखमय साक्षात्काराची || ३७५ .

या स्थितीला ना आदि अंतहि, ना झिजते वा ना बदले |

तरि ब्रह्मांडा सहजी पाळी, नियमाने सारे चाले || ३७६.

त्याच्या केवळ अस्तित्वेची, बलशाली उर्जा भंवती |

पूर्ण चंद्रमा नभात येता, जैशी सागरास भरती || ३७७.

लोह-चुंबकचि जवळी येता, सहजी चळवळ लोहाची |

तैसे प्रणवा अंगिकारिता, सहजी गती ती उन्नतीची || ३७८.

विज्ञाना हे ज्ञान जाहले, विद्युत-चुंबकीय शक्ती |

ती-चि कारण या विश्वाला, साऱ्या ब्रह्मांडाशी गती || ३७९.

श्लोक- सर्वस्य प्रणवो ह्यादिर्मध्यमन्तस्तथैव च ॥

एवं हि प्रणवं ज्ञात्वा व्यश्नुते तदनन्तरम् ॥ का. २७ ॥

आदि, मध्य नि अंतही प्रणवचि, पूर्णज्ञान त्याचे होता |

होई सिद्धहि तैसाची तो, ब्रह्मरुपी तो समरसता || ३८०.

नलगे साधन त्यासी कांही, तोचि होतसे स्वये हरी |

कार्य नि कारण याही पैल तो, माया जोवरी असे दुरी || ३८१.

तीन हि देही तीन अवस्था, जोवरी अनुभूतीला येती |

ॐ उच्चारण सगुण ब्रह्मचि, कार्य-कारणा अनुभूती || ३८२.

ऐशा समयी संग सोडुनी, निश्चल निर्गुण ते व्हावे |

परब्रह्म ॐ शी समरसणे, मनी अन्य ना चिंतावे || ३८३.

ऐशी समरसता ती होता, अद्वैतचि केवळ उरते |

सबाह्य एकचि ध्यानी चिंतनी, व्हावे आपण हरिमय ते || ३८४.

श्लोक- प्रणवं हीश्वरं विद्यात्सर्वस्य हृदि संस्थितम् ।

सर्वव्यापिनमोंकारं मत्वा धीरो न शोचति ॥ का. २८ ॥

प्रणवचि ईश्वर अनन्य भावे, ऐसे चित्ती चिंतावे |

हृदयाकाशी त्याची प्रचिती, अनंत रूपे त्या ध्यावे || ३८५.

असे चिंतिता ज्ञाता निर्भय, शोक-शून्यचि तो होई |

सबाह्य सत्ता एकचि त्याची, सदा सौख्यमय तो राही || ३८६ .

विपरित चित्ती अशांत असता, पवने मन ते स्थिर व्हावे |

डोळे मिटुनी ना उच्चारण, परि ॐ घोषा ऐकावे || ३८७ .

सहजी अनुभवे सबाह्य प्रणवचि, एकरूप त्याशी व्हावे |

शांती मधल्या निर्गुण प्रणवे, केवळ शांतीत डुंबावे ||३८८

श्लोक- अमात्रोऽनन्तमात्रश्च द्वैतस्योपशमः शिवः ।

ओंकारो विदितो येन स मुनिर्नेतरो जनः ॥ का.२९ ॥

निर्गुण ॐ तो मात्रा-शून्यचि, असीम जोही अनुभवितो |

तोचि केवळ मुनि जाणावा, अद्वैतीचि तो असतो || ३८९ .

शांत चित्ती ते चिदाकाशीचि, केवळ श्रवणे अनुभूती |

सहजी होई ती समरसता, अनुभविता केवळ शांती || ३९०

श्री मांडुक्य उपनिषद आणि गौडपादस्वामी यांच्या 'आगम'

प्रथम प्रकरण कारिका भाष्य समाप्त|| हरी ॐ ||

चैत्र शुद्ध पौर्णिमा – २७/०४/२०२१.

||कुलस्वामिनी माहुर वासिनी श्री रेणुका मातेस समर्पण||

सुधारित लेखन- १४/०५/२०२१.- अक्षय्यतृतीया

# मांडूक्य कारिका प्रकरण पहिले –आगम

## ग्रंथ परिचय

वेदांताच्या उपनिषद भागाला ‘श्रुति’ म्हणतात. कारण दिव्य ऋषींनी त्याचे ध्यान अवस्थेत श्रवण केलेले असते. ही दिव्य वाणी मग त्यांनी शिष्यांना सांगितली. हा स्वतंत्र असा दैवी ज्ञानाचा स्वयंभू खजिना आहे. काळाच्या ओघात या अमाप साहित्यातील फक्त कांहीच उपलब्ध आहे.

याच्या अभ्यासाच्या तीन पद्धती:- श्रवण, मनन आणि निदिध्यासन

श्रवण- आत्मविचार सुयोग्य गुरुकडून ऐकावा. आचार्य त्यावर जे भाष्य करतात, त्याचे यथोचित आकलन झाले की, त्याचा अभ्यास करण्यासाठी बोधाचे पांच प्रकार आहेत.

१.जाणीव हा देहाचा भाग नाही.

२.तो स्वतंत्र देहाला व्यापून असलेल्या तेजस्वी चैतन्याचे तत्व आहे.

३.ती अमर्याद आहे.

४.देह पंचत्वात विलीन झाल्यावर सुद्धा तिचे अस्तित्व कायम असते.

५.ती व्यवहारासाठी देण्याची गोष्ट नाही. कारण ती वस्तू नाही.

माझा देह, मन आणि जग यांचा अनुभव घेणारा, मी शुद्ध आत्मा आहे.

मग उपनिषद जगाच्या अनुभवा बद्दल सांगते. देह व जग हे 'अनात्मा' आहेत. मी परम सत्य आहे.

२. मनन- श्रवण केल्यावर प्रज्ञेनुसार अनेक शंका असतात. ते अज्ञान मनन केल्याने जाते. त्यासाठी संबंधित श्रवण आणि वाचन तसेच सखोल चर्चा यांची आवश्यकता असते.

३. निदिध्यासन- वरील दोनमुळे अज्ञान दूर होऊन ज्ञानाची स्पष्टता येते. मी परम सत्य आहे, हेही पुरते बिंबले जाते. अधिक तपशील व गहनता यासाठी खोल विचार आवश्यक असतात. ध्यानी आलेल्या महत्त्वपूर्ण गोष्टी अशा असतात.

१.मी सर्वव्यापी जाणीवेचाच भाग आहे.

२.मीच स्थायी शांती सुरक्षा आणि आनंद यांचा स्रोत आहे.

३.माझ्या केवळ अस्तित्वाने मी भौतिक व जड देहाला जीवन देतो.

४.कोणताही प्रसंग मला विचलित करू शकत नाही.

५.माझ्या मूळ स्वरूपाचे विस्मरण होण्याने आयुष्य एक ओझे बनते. परंतु माझ्या शुद्ध जाणीवेने मी जीवन हा दैवी प्रसाद बनविला आहे.

या पांच गोष्टी सहजी प्रज्ञेत ठाम झाल्या पाहिजेत. त्यासाठी निदिध्यासन आवश्यक असते.

मांडुक्य उपनिषद कारिका याचे चार प्रकरणे वा अध्याय आहेत. पहिला 'आगम' प्रकरण यांत पूर्ण उपनिषदातील बाराही मंत्र आणि त्यावरील भाष्य सांगणाऱ्या २९ कारिका पूज्य गौडपाद यांनी भव्य दिव्य अशी सुरुवात करून सांगितल्या.

विषय महत्व- उपनिषदाचे पहिले दोन मंत्र

१.पहिल्या दोन मंत्रात ॐ मंत्राचा विचार आहे.

२.आत्म्याचे तीन पाद –कारिका ३ ते ६

आत्मा हेच आपले निजरूप आहे. मी अनुभूती घेणारा, जाणीवेच्या केंद्रस्थानी आहे. माझी प्रत्येक अनुभूती अनात्मा असते. सारे जग अनात्मा आहे. मन आणि देह त्यांतच अंतर्भूत आहेत. हा मांडुक्य उपनिषदाचा अति महत्वाचा संदेश आहे. हे ध्यानी ठेवावे.

अनुभूती घेणारा स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे, कशावर सुद्धा अवलंबून नाही. परंतु अनुभूत होणारे अस्तित्व केवळ द्रष्ट्याच्या

आकलनावर अवलंबून असते. त्यामुळे ते 'मिथ्या' आहे. द्रष्टा सत्य आहे. परंतु दृश्य मिथ्या आहे. अनात्मा आहे.

श्रुती अनात्म्याचे तीन भाग करते.

पहिला- जागृतीतील स्थूल गोष्टींची अनुभूती.

दुसरी - स्वप्नातील सूक्ष्म जगत आणि गोष्टी यांची अनुभूती आणि

तिसरी- सुषुप्तीतील अनात्मा असलेला कारण देह व कारण जगत यांची.

हे तीन वेगवेगळे भाग आहेत. त्यांना सूक्ष्म-स्थूल आणि अदृश्य-दृश्य असे विभाग आहेत. त्यांची वेगळाली नांवे आहेत.

जागृतीतील विश्व आणि विराट (मंत्र ३) स्वप्नातील तैजस आणि हिरण्यगर्भ ( मन्त्र४) आणि सुषुप्तीतील प्राज्ञ आणी ईश्वर (मंत्र ५ आणि ६)

### ३.तुर्येची व्याख्या (मंत्र ७)

आत्म्याचे वरील तीन भाग आहेत, मग तूर्या काय आहे? तुर्या भाग नसून स्वये आत्मा आहे. त्याचा त्या तीन भागांशी संबंध नसून तो अखंड आहे. मी तेच आहे. मला त्याची अनुभूती कशी येईल? त्या तीन भागांशी संबंध न ठेवता, त्यांना सामावून घेण्याने.

अशी अनुभूती कशी येते? माझे कांहीही ‘करणे’ हे त्या तीन भागाशी निगडित असते. त्यामुळे मला आत्मा वा तुर्या हिचा अनुभव येत नाही. तो सर्वव्यापी असल्याने त्यांना सामावूनच आहे. आत्माच माझे अस्तित्व आहे. माझी जाणीव आहे.

स्फटिकाखाली लाल फूल ठेवल्यावर स्फटिक लाल वाटतो. परंतु त्याचे मूळ रंगहीन असणे त्याने बाधित होत नाही. रंगहीन रंगीत दिसणे हा केवळ दृष्टीला झालेला आभास आहे. तो जाण्यासाठी फूल काढण्याची आवश्यकता नाही, तर केवळ तसे ज्ञान होणे आवश्यक आहे.

त्याच प्रकारे मी आत्मा हा स्फटिकाप्रमाणे निर्मळ निर्गुण आहे. माझेवर विश्व, तैजस आणि प्राज्ञ यांचे सानिध्यामुळे तसे आरोपित अस्तित्व भासते. मी त्याहून अलिप्त आहे. मी नित्य तुर्याच आहे. मी विश्व, तैजस आणि प्राज्ञ हे केवळ भासमान असून मिथ्या आहेत वास्तव नाहीत, असे मला हे ठामपणे ज्ञान उमगल्याने सहजी निजस्वरूपा विषयी मी नि:शंक राहिलो.

हेच ज्ञान श्रुतीच्या ७ व्या मंत्रात दिलेले आहे. हा मंत्र अत्यंत महत्वाचा आहे.

यांतील व्याख्येत दोन शब्द अगदी महत्वाचे आहेत. प्रपंच-उपशम आणि अद्वैत. प्रपंच उपशम याचा अर्थ जगापासून पूर्णतया अलिप्त.

तुर्या म्हणूनच जगाच्या उल्लेखित तीन भाग-तीन पाद यापासून अलिप्त आणि मुक्त आहे. तुर्येत त्यांचा अभाव आहे. म्हणुनच तुर्या अद्वैती आहे. तिला अन्य अस्तित्व नाही.

तुर्या जगापासून अगदी अलिप्त आहे. परंतु याचा अर्थ अनुभूत होणारे जग ती नाकारीत नाही. त्याचे लाल स्फटिकाप्रमाणे दिसणे चालूच राहिल. मात्र मला त्याची ज्ञानाने निर्मळ-रंगहीन असल्याची उमज, तीही ठाम असेल. मी जेंव्हा आकाश निळे आहे असे म्हणतो, तेंव्हा मला ते तसे नाही, याचा बोध झालेला असतो, मात्र जगात व्यवहार करतांना त्याने बाधा येणार नाही. त्याचे तसे दिसणे आणि अनुभव यांत फरक होणार नाही.

मी- तुर्येचे अद्वैती स्वरूप पूर्ण जाणून आहे. मला अन्य अस्तित्व नाही. जग मिथ्या आहे. हे मी जाणून आहे. पण माझे त्याशी व्यवहाराला त्याने बाधा येणार नाही. मिथ्या हे तसे अजिबात नसण्यासारखेच असते.

यथोचित ज्ञानाखेरीज तुर्या अनुभूतीतील विश्व आणि तैजस सारख्या उपाधीपासून पूर्ण स्वाधीनता संभवत नाही. केवळ तूर्या म्हणूनच माझे अस्तित्व आहे.

परंतु विश्व आणि तैजस यांच्याशी मी लिप्त झालो, तर त्यानुसार मी कर्ता असून अनुभव घेणारा आहे. माझे संचित कर्म चालूच राहिल. मात्र प्रारब्ध कर्म विरून जाईल. त्यामुळे मला

आगामी कर्मे येत राहणार, आणि मी ती अलिप्तपणे जग व्यवहारानुसार पार पाडीत राहीन. माझी आगामी कर्मे मृत्युच्या वेळी, संचितात जमा होतील. त्यामुळे मिळणाऱ्या पुढील जन्मी नवीन आगामी कर्मे वाढत राहणार. कर्मांचा प्रवाह चालूच राहिल. हे स्वातंत्र्य नव्हे.

कोणत्याही कर्माशी मी लिप्त न राहणे, त्यामुळे फार आवश्यक आहे. हीच पूर्ण मुक्ती होण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. आत्मविचार त्यामुळेच यथार्थ उमगणे फार आवश्यक आहे.

### ४.ॐकार विचार- मंत्र ८ ते १२.

आठव्या मंत्रा पासून १२ पर्यंत ॐकार विचार आहे. ॐकाराच्या चार मात्रा आहेत. अ, उ  म आणि पूर्ण मौनात्मक शांती. निश्चलता, अक्रियापण.

उपनिषद ॐकाराची ओळख करून देते नंतर त्याचे साम्य व तात्दात्म्यता पूर्ण आत्म्याशी असल्याचे प्रतिपादन करते. त्यानंतर ते तीन भाग-पाद, त्यातील ॐकाराचे पहिले तीन मात्रा- भाग संबंधित असल्याचा उल्लेख येतो. चवथी पूर्ण शांतीची मात्रा तुर्येशी तोलला जाते.

विशेष म्हणजे, उपनिषद तीन मात्रांचे- भागाशी जुळणी करतांना ध्यानाशी असलेल्या साधर्म्याविषयीच उल्लेख गौण

मानते. विराटचा अ शी , हिरण्यगर्भाचा उ शी आणि ईश्वराचा म शी उल्लेख केलेला आहे.

मंत्र हे ध्यानासाठी प्रतीकात्मक दिल्याचे सूचित करते.

विराट चे ध्यान अ उच्चारतांना व्यापकता आणि प्राधान्य याशी साधर्म्य, उ चे हिरण्यगर्भाशी करतांना श्रेष्ठता आणि मधल्या स्थानी असल्याने जुळणीला पोषकता सूचित होते. ईश्वर याचे साधर्म्य म काराशी करतांना मोजमाप आणि आणि तादात्म्यता यांचे प्रतिनिधित्व केले गेलेले आहे. अशा तऱ्हेने तीन मात्रा आणि तीन भाग यांचे प्रतिनिधित्व करतात.

आता निखळ शांती-पूर्ण अक्रियता- पूर्ण मौन यांचे स्पष्टीकरण आहे. अशा शांतीत कांहीच नसणे नसते तर जाणीवेची जागरूक उपस्थिती मात्र पूर्णत्वाने आहे. त्यामुळेच ती अवस्था तुर्येशी निगडित आहे. किंबहुना तिचेच स्वरूप व स्थिती आहे. तेच ब्रह्म वा आत्मा आहे.

एक गोष्ट प्रकर्षाने ध्यानी ठेवावी ती हि की, अ, उ आणि म यांची तुलना वा साधर्म्य विराट हिरण्यगर्भ आणि ईश्वर यांशी ब्रह्माशी प्रतिनिधित्व दाखवितांनाच निखळ शांती हे मात्र प्रतिनिधित्व न करता,

त्याचे स्वरूप –स्थिती असल्याचे सूचित केलेले आहे. मी तेच-आत्मा- आहे.  अशा तऱ्हेने ॐकार विचार पूर्ण होतो.

५.कारिकांतील महत्वपूर्ण मुद्दे

१.६ वा मंत्र ईश्वर आणि प्राण यांची व्याख्या करतो. (कारिक६ ते ९ आणि १७, १८)

या मंत्रात ईश्वर हा बौद्धीक आणि भौतिक कारणांच्या सृजनाचे कारण दर्शविलेला आहे. सर्वेश्वरा आणि सर्वज्ञ म्हणजे बौद्धीक कारण आणि ‘एष, योनिः सर्वस्य – प्रभवाप्ययौ’ हे विधान भौतिक सृजनशी संबंधित आहे. {या संपूर्ण मंत्राचा अर्थ- हाच 'सर्वेश्वर' आहे. हाच 'सर्वज्ञ' आहे. हा अंतरात्मा'-अंतर्यामी, समस्त विश्व'योनि' अर्थात् जन्म देणारा 'गर्भ' आहे. हा समस्त प्राण्यांच्या 'उत्पत्ति' आणि त्यांचा 'प्रलय' आहे.} हा उल्लेख भौतिक सृजनशी संबंधित आहे.

गौडपाद यांनी सृजनशी संबंधित थोडक्यात उल्लेख केला आहे. जगताच्या उत्पत्तिविषयी एक विचार हा येतो की, भगवंताने या जगताची निर्मिती कशासाठी केली असेल? याला अनेक उत्तरे येतात, पण समाधान होत नाही. गौडपाद म्हणतात, हे प्रश्न उद्भवण्याचे कारण नाही, कारण हे जग कुणीच निर्माण केलेले नाही. येथे निर्मितीचाच असंभव आहे. त्याचे अस्तित्व आहे एवढेच जाणवते. जे आधीच आहे त्याची

निर्मिती कशी होणार? जे अस्तित्वात आहे ते तसेच राहणार. त्याचा नाशहि होणार नाही.

महत्वाचे म्हणजे, माया नेहमी ब्रह्मासोबत असते. त्यामुळे ती ब्रह्माला दुषित करू शकत नाही. चित्रपटामुळे पडदा जसा दुषित होत नाही तसे.

२.सातव्या मंत्रानुसार चार पाद व कारिका २ ते ५, १०-१६ यांचा अभ्यास

गौडपाद एक विलक्षण निरीक्षण नोंदवितात. जागृतीत विश्व याला दोन प्रश्न असतात. जागृत झालेल्याला आपण सर्वकाळ तुर्या असतो, याचा पत्ता नसतो. याचे कारण अज्ञान. जागे होणाराला चुकीने असे वाटते की, मीच मला जागे केले. तोच कर्ता आणि अनुभव घेणारा असतो.

अज्ञानाचि परिणीती गैरसमजात होते. अज्ञानाची नावे चार- अज्ञान, अग्रहण, निद्रा आणि कारण

गैरसमजाची चार नावे – अहंकार, अन्यथा-ग्रहण, स्वप्न आणि कार्य.

विश्व आणि तैजस या दोघात अज्ञान आणि गैरसमज दोन्ही असतात.

'प्राज्ञ' याला अज्ञान असते. परंतु निद्राधीनाला गैरसमज नसतात. त्यामुळे त्याला प्रपंच नसतो. अज्ञान जेंव्हा चुकीलाही आणते तेंव्हा समस्या उद्भवतात. तुर्या नेहमीच अज्ञाना व चूक यापासून मुक्त असते.

म्हणून तुर्येत असण्यासाठी अज्ञान आणि चूक जाण्यासाठी ज्ञानप्राप्ती आवश्यक असते. त्याने समज नेहमीच तुर्येशी तादात्म्य होतात.

### ३. मंत्र १२ च्या संदर्भात वेदांतिक ध्यान (कारिका २४ ते २९)

गौडपाद १२ व्या मंत्राचे विश्लेषण करतांना ॐकाराच्या चवथ्या अमात्रेचा विचार करतात. त्यांत ते ॐकार ध्यान हे निदिध्यासनाशी निगडित असल्याचे प्रतिपादीतात. त्यासाठी उपनिषदाचे संपूर्ण श्रवण आणि मनन झालेले असणे आवश्यक आहे.

निदिध्यासन पद्धती- जेंव्हा ॐकार श्रवणी येतो, तेंव्हा माझ्यातून साऱ्याचे विश्वाचा जणु उदय होतो. आणि माझ्यात त्याचा निवास आहे, अशी कल्पना होते. परंतु म कार म्हणतांना सारे विश्व माझ्यात विरून जाते. आता शांतीचा प्रांत चालू होतो,

सुरवातीला ॐकार दीर्घ असतो. आणि शांतीचा अवधी लहान असतो. परंतु हलकेच शांतीची व्याप्ती वाढत जाते.

शांतीच्या काळात मी त्याची अनुभूती असल्याची खात्री करून घेतो. शांती तिच्या जाणीवेनेच अनुभूत होते. आता मी आणि शांती यांचे तादात्म्य होते. इतर जाणीवा उरत नाहीत. मी शांतीचा साक्षीदार बनतो. ते जाणीवेच्यामुळे होते.

मी स्वतःला विचारतो, मला जाणीवेचा साक्षीदार पाहता येईल काय? उत्तर असते. ते असंभव आहे. कारण मी तेच आहे.

शांतीतून मी जाणीवेत येतो. आणि त्यांतून मी माझ्याशी समरस होतो. जाणीव वेगळी उरत नाही. पूर्ण जाणीव हेच माझे अस्तित्व बनते. तेच तुर्या.

सातवा मंत्र सांगतो, माझ्यात सृजनाचा उदय आणि अस्त हि प्रक्रिया अविरत चालू असते. परंतु या उलाढाली चालू असताही, मी निश्चल असतो. जसा रंगहीन स्फटिक लाल रंगाने व्याप्त असताही त्याने दुषित होत नाही. लाल रंगाचा अभाव नसताही त्यावर परिणाम होत नाही.

मी नित्य शुद्ध, दुषित न होणाऱ्या अद्वैताच्या जाणिवेशी समरस असतो. तुर्या.

जे माझ्याशी व माझ्यात घडते त्याला मी होऊ देण्या इतपत पूर्णतया अलिप्त असतो. मी नित्य मुक्त आणि विरक्त-मुक्त असतो.

असे ॐकार ध्यान नेहमी करावे. किती काळ? ध्यान हे स्मरणासाठी असते. आठवण करून देण्यासाठी असते. जोवर अशी स्थिती ही सहजता होत नाही, तोवर.

माझे सारे व्यवहार चालूच असतात. परंतु माझ्यात त्याचे कर्तेपण मी लादत नसतो.

हीच जीवनमुक्ती. ज्याच्या प्रतिपादनाने गौडपाद ॐकार विश्लेषण संपवितात. येथेच पहिले प्रकरण संपते.

याचे वाचन-आकलन-चिंतन आणि अनुभूती होणे हीच जीवनाची कृतार्थता आहे. आता झालेल्या स्पष्टीकरणाने पूर्ण लेखन आत्मसात करू या.

शुद्ध मन, पूर्ण श्रद्धा आणि शुद्ध निष्काम विरक्त व्यवहार याद्वारे आपल्यातील तूर्या नित्य अनुभूत राहो.

|| हरी ॐ ||

अण्णा

सुधारित लेखन – बोधी पौर्णमा

२६/०५/२०२१. /१७/०६/२१.




# वैतथ्य - प्रकरण दुसरे

## पूज्य गौडपाद यांच्या मांडूक्यकारिका.

## प्रकरण- दुसरे वैतथ्य

### पूर्व-पीठिका – || हरी ॐ ||

दिसे दृष्टीला, जे जे कांही, पूर्ण तेचि होता ज्ञान |

विपरित नि भ्रमही तो मिटतो, आणि सरतसे अज्ञान || १.

विपरित दिसणे 'वैतथ्य'चि ते, आहे तैसे ना दिसणे |

मुनी सांगती स्वप्न-जागृती, मिथ्याविण कांहीच नसणे || २.

जे अनात्मचि आहे जगती, खरे वाटते नयनांना |

ज्ञानदृष्टीने परि पाहता, अद्वैतचि येई ध्याना || ३.

द्वैत असे ते सारे मिथ्या, अद्वैतचि ते सत्य असे |

विश्व, नि तेजस आणि सुषुप्ती, त्या त्या वेळी खरे भासे || ४.

द्रष्टा असतो स्वतंत्र परि ते, दृश्य पराधीनचि असते |

दृष्ट्याशी ते जसे आकलन, तैसेचि दृश्यहि दिसते || ५.

सत्य असे तो नित्यचि द्रष्टा, दृश्य असे ते परि मिथ्या |

देह नि मनहि अनात्म तैसे, ज्ञाता जाणतसे तथ्या || ६.

जागृतीत ती स्थूल अनुभूति, सूक्ष्माची परि स्वप्नचि ती |
सुप्तचि सुषुप्तीमाजि असे ती, यासी तीन पदे म्हणती || ७.

जयास लाभे तूर्यावस्था, स्वये ब्रह्मचि तो होई |
तीनही पादांशी तो जाणे, त्या मिथ्या म्हणुनी पाही || ८.

जास्वंदीच्या लाल फुलाने, स्फटिकही जरि तो लाल दिसे |
परी ज्ञान ते पूर्णचि होता, 'मिथ्या'चि तो रंग असे || ९.

अनुभवीतो जोही तूर्याला, तो जाणे तुर्या मीचि |
नित्य राहणे तो अद्वैति, जाणे प्रपंच मिथ्याची || १०.

'प्रपंचोपशम अद्वैता'ची, स्थिती असे ती आत्म्याची |
श्रुती मंत्र सात नि बारावा, हीच लक्षणे की त्याची || ११.

पूर्णब्रह्म ही स्थिति अनुभविता, ज्ञात्या प्रपंच तो नाही |
अद्वैती ना अन्य कुणीही, सारे ब्रह्मचि तो पाही || १२.

दुर्लभ नर-जन्मी न जाणले, मी तुर्याचि हेची खरे |
शास्त्री-वेदी धर्म कथियले, नरजन्मचि तंव व्यर्थचि रे || १३.

विश्व ईश्वरे कां निर्मियले, परोपकारा कां करणे ?|
ज्या अस्तित्वचि नाही तयाशी, कां व्यर्थचि मी आचरणे?|| १४.

**गौडपाद हे या तथ्याची, उकल प्रकरणी या करिती |**

**बाधा ना ये ब्रह्माचरणी, सांभाळुनीया तूर्य स्थिती || १५.**

## प्रकरण ‘वैतथ्य’ प्रारंभ

श्लोक-वैतथ्यं सर्वभावानां स्वप्न आहुर्मनीषिणः ।

अन्तःस्थानात्तु भावानां संवृतत्वेन हेतुना ॥ १ ॥

स्वप्नी दिसे ते खरे न कल्पित, विद्वज्जन सारे म्हणती |

जागृती येता उमजे सारे, खेळ मनीचे ते असती || १६.

मनात जेही, गुढ लपलेले, तेची स्वप्नी दिसत असे |

जागृत होता सारे विरते, प्रत्यक्षी त्या स्थान नसे || १७.

अठरावी कारिका सांगते, जाणत्यासी ते द्वैत नसे |

प्रथम प्रकरणी हेचि वर्णिले, संशय ज्ञाने मिटत असे || १८.

तैजस मधुनि विश्वी येता, कळते स्वप्नीची माया |

एक कणही तो स्वप्न-सृष्टीचा, येत नसे की, जगती या || १९.

स्वप्नी परि ते खरे वाटते, सुख नि दुःखही, जाणवते |

जागृतीत परिणाम न त्याचा, जरि दिसते ते, परि नसते || २०.

म्हणुनी त्या 'मिथ्या' चि म्हणावे, ज्या अस्तित्व नसे कांही |

ते दिसणे नि ती अनुभूती, सत्य न स्वप्नीची कांही || २१.

श्लोक-अदीर्घत्वाच्च कालस्य गत्वा देशान्न पश्यति ।

प्रतिबुद्धश्च वै सर्वस्तस्मिन्देशे न विद्यते ॥ २ ॥

स्वप्नी जातसे दूर देशी ते, विविध गोष्टीही तो पाही |

परि प्रत्यक्षी न कधीही गेला, शय्या सोडुनि कोठेही || २२.

जागृतीत जरि तेथे जाता, स्वप्नीचे ना तिथे दिसे |

स्वप्नी विलास केवळ मनीचा, जरि प्रत्यक्षी कांही नसे || २३.

श्लोक-अभावश्च रथादीनां श्रूयते न्यायपूर्वकम् ।
वैतथ्यं तेन हि प्राप्तं स्वप्न आहुः प्रकाशितम् ॥ ३ ॥

विश्व मनाचे ते मर्यादित, स्वप्नी कालही अल्प असे |
ऐसे असता, मन वाढविते, प्रसंग नि कालासि तसे || २४.
स्वप्नी गेला दूर देशी जरि, आणि बहु जाहली भटकंती |
जागृतीत परि आपुल्या स्थानी, पाय तयाचे ना दुखती || २५.
दिसती स्वप्नी, रथ नि घोडे, अभाव ज्यांचा सर्वस्वी |
कांही नसता, आनंद, हर्ष नि, मानस चटका कधि लावी || २६.
स्वनी कुणीही कुठे भेटता, आणि जेही सांगतसे |
जागृतीत ते पाहू जाता, ना तैसा व्यवहार असे || २७.
बृहदारण्यक श्रुति ही सांगे, खेळ मनाचा हा पुरता |
हर्ष-खेद वा अन्यहि सारे, देखावा हा तात्पुरता || २८.
जगताला या स्वप्नामधल्या अस्तित्वचि ते असे-नसे |
जागृतीत ते मुळी नसे परि, स्वप्न-सृष्टीच्या माजी असे || २९.
स्वप्नी पदार्था करी प्रकाशित, स्वयंप्रकाशी तो आत्मा |
असत्य सारे स्वप्न-पदार्थचि, जागृतीत ना ये कामा || ३०.

नित्य बदलते सत्यताचि ती, वेगवेगळ्या सृष्टीची |
अस्तित्वचि ते एकीत असता, दुजीत नसते ती कैची?|| ३१.
ज्या ज्या सृष्टीत अनुभव आपुला, तेथे सत्यचि ते बदले |
एकीत सत्यचि दुजीत मिथ्या, ऐसे अनुभवा आले || ३२.
स्वप्नी जेही लाभे त्याचा, जागृतीत ना उपयोग |
अमृत अथवा विषही घेता, परिणामी शून्यचि भोग || ३३.
तसेची जागृती मधले जेही, स्वप्नी ना ये दिमतीला |
असुनि नसे ते, परि नसलेले, ये तेथे उपयोगाला || ३४.

श्लोक-अन्तःस्थानात्तु भेदानां तस्माज्जागरिते स्मृतम्।

यथा तत्र तथा स्वप्ने संवृतत्वेन भिद्यते ॥ ४ ॥

जागृतीतले तसेच मिथ्या, वृथा न गुंता त्यामाजी |

दिसते परंतु कांही नसते, हे जैसे स्वप्नामाजी || ३५.

स्वप्न-सृष्टि मर्यादित जागी, देह अंतरी ती घडते |

जागृतीतली सारी सृष्टी, देहा बाहेरी असते || ३६.

पदार्थ, व्यक्ती आणि स्थाने, उभयांची वेगळी नसे |

ना पाहियले वा अनुभवले, स्वप्नीहि ते ना भासे || ३७.

प्रत्येकाची स्वप्न-सृष्टी ती, नित्य वेगळी नि त्याची |

जागृतीतले विश्व एक जरि, भिन्न अनुभूती व्यक्तींची || ३८.

आकलना एकोणीस द्वारे, उभय अवस्थी ती असती |

म्हणुनि दृश्यी, प्रत्येकाची, वेगळीच ती अनुभूती || ३९.

जागृतीतले दृश्य एक जरि, प्रत्येका वेगळे दिसे |

प्रसंग एकचि, परि अनुभूती प्रत्येकाची तीच नसे || ४०.

आचार्य म्हणती जग हे मिथ्या, एक ब्रह्मचि सत्य असे |

स्वप्न जागृती उभयहि मिथ्या, नसता जेही ते भासे || ४१.

पदार्थ व्यक्ती प्रसंग सारे, स्वप्नीचे जेही विरती |

जागृती मधले दिसणारेही, सारे लयालाची जाती || ४२.

उभयी साक्षी केवळ आत्मा, अविनाशी तो नित्य असे |

दृश्य जगत परि येते जाते, कांही त्यातील सत्य नसे || ४३.

श्लोक- स्वप्नजागरितस्थाने ह्येकमाहुर्मनीषिणः ।
भेदानां हि समत्वेन प्रसिद्धेनैव हेतना ॥ ५ ॥

स्वप्न जागृती अनुभवणारा, दोन्हितही तो एक असे |
उभयासी ते मनचि कारण, दिसते कल्पिल तो जैसे || ४४.

स्वप्नीचे कांही न आणता, जागृतीत ते शक्य नसे |
तैसे इहलोकी संग्रहिले, परलोकी ना नेत असे || ४५.

जागृतीतले विश्वचि स्वप्नी, नवीन स्वप्नी कांही नसे |
त्या त्या वेळी खरेचि वाटे, जरि सर्व मिथ्याचि असे || ४६.

जागृती तैसे स्वप्न उभयही, दृश्य नि अनुभव तो मिथ्या |
अविनाशी तो जीव एकचि, सोडी न अक्षर त्या सत्या || ४७.

सारे ज्ञाते हेचि म्हणती, स्वप्न नि जागृती मिथ्याचि |
त्या त्या वेळी खरे वाटते, परंतु सारे क्षणिकची || ४८.

श्लोक-आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानाय तथा ।
वितथैः सदृशाः सन्तो वितथा इव लक्षिताः ॥ ६ ॥

जे नसतेचि प्रारंभी नि, शेवटीहि ते मुळी नसे |
जया जन्म नि मृत्यू आहे, मध्य-काळी अस्तित्व कसे ?|| ४९.
जे दिसती ते पदार्थ व्यक्ती, आज असे परि उद्या नसे |
म्हणुनि त्या मिथ्याचि म्हणावे, मध्य-काली जे जे भासे || ५०.
मृगजळ पाणी, नसे उगम नि, मिळणे सिंधुलाहि नसे |
दिसणे जरि ते खरे वाटते, ते केवळ मिथ्याचि असे || ५१.
ज्या अस्तित्वचि कांही कालचि, आभास केवळ तो मिथ्या |
ज्ञाते जाणती यथार्थ हेचि, असणे ब्रह्मचि या सत्या || ५२.
जागृतीतल्या दृश्यांची परि, अनुभूती ती वेगळी असे |
स्वप्न सृष्टी ही व्यक्तीगतचि की, पुढिल्या त्या संदर्भ नसे || ५३.
उभय सृष्टीतही जसे आकलन, तैशी त्याची अनुभूती |
एकचि दृश्या विविध आकलन, मिथ्या कारण सकलचि ती||५४.
आकाशाला नसे रंग परि, निळे वाटते नयनांना |
ज्या धरतीवर आपुली वस्ती, भासे स्थिर जरि फिरतांना || ५५.

धरती भंवती दिसेचि फिरता, एका जागी, सूर्य असे |

येणे जाणे त्याचे मिथ्या, उदय नि अस्तहि भासतसे || ५६.

पदार्थ व्यक्ती जरि तीच ती, दृष्ट्यानुसार अनुभूती |

म्हणुनि हे ना सत्य कदापि, मिथ्या हिची ओळख ती || ५७.

श्लोक-सप्रयोजनता तेषां स्वप्ने विप्रतिपद्यते ।

तस्मादाद्यन्तवत्त्वेन मिथ्यैव खलु ते स्मृताः ॥ ७ ॥

स्वप्नीचे स्वप्नी उपयोगी, जागृतीतले जागृतीचि |

जरि पदार्थ ते एकचि असती, अन्यी ना उपयोगीची || ५८.

स्वप्नी भेटे जीही व्यक्ती, आणि देतसे वचनाला |

जागृतीत नाकबूल जाई, मिथ्या गणने व्यक्तीला || ५९.

स्वप्नीची जी तहान भागे, वा खाण्याने पोट भरे |

अनुभव स्वप्नी जागृतिचाचि, जे तेंव्हा वाटते खरे || ६०.

जरि व्यक्ती ती एकचि असते, नाते अलगचि व्यवहारी |

मित्र दुज्याचा, शत्रू माझा, एका जवळिक, दुज्या दुरी || ६१.

जरि नाते ते, एक राहते, तरी भावना नित बदले |

देही आचरणी नसे नित्यता, शाश्वत कांही ना इथले || ६२.

मैत्री असता, दिसती सद्गुण, त्याशी बिनसता, दुर्गुणी तो |

आज पदावरी मोठ्या; आदर, खाली उतरता तुच्छचि तो || ६३.

आज असे ते उद्या असेलचि, कशाचाही भरवसा नसे |

क्षणा क्षणाला सारे बदले, तया सत्य म्हणणे कैसे?|| ६४.

श्लोक- अपूर्व स्थानिधर्मो हि यथा स्वर्गनिवासिनाम् ।
तानयं प्रेक्षते गत्वा यथैवेह सुशिक्षितः ॥ ८ ॥

द्रष्टा जाई स्वप्नावस्थी, अपूर्व ऐसे कधी दिसे |
जे न पाहिले, जागृतीत ते, द्रष्टा स्वप्नी पाहतसे || ६५.
स्वप्नि दृश्य कधि असे विलक्षण, आपण पाहू उडतांना |
दोन सोंडीचे दिसती हत्ती, वा ऐशा गमती नाना || ६६.
या विश्वाची ऐशी रचना, जसे स्थान अनुभुती तशी |
'स्थानिधर्म' हे, रोमशी जाता, होणे रोमन त्या देशी || ६७.
विरतो स्वप्नीचा तो द्रष्टा, जेंव्हा जागृती येत असे |
द्रष्टा मिथ्या, दृश्य हि मिथ्या, स्वप्न म्हणोनि सत्य नसे || ६८.
जगत तेच जरि, आकलन परि ते, साधन संगे बदलतसे |
निळाच चष्मा, निळे जग दिसे, जरी ते नाहीचि तैसे || ६९.
डोळे मिटता श्रवणी ये जे, आकलन तैसेची होई |
आपुल्या नेत्रे परि पाहता, ठसा अन्यचि मनी येई || ७०.
कुणास कांही दोष इंद्रियी, आकलनहि तैसे बदले |
कुणा चंद्र तो दिसेचि पिवळा, काळोखी भासास भुले || ७१.

जगताचे अस्तित्व वेगळे, दृष्ट्यानुरूप दृश्याला |
कसे म्हणावे सत्य तयाला, क्षणहि न लागे बदलाला || ७२.

व्याधी असता, बदले चव ती, वार्धक्यी विपरित ऐके |
शुभ वार्ताही कुणी सांगता, विपरित समजुनी तो दचके || ७३.

नव्या जन्मी, ती नवीन योनी, नवे आकलन हो तैसे |
गवत नको ते वाघाला परि, हरणाचे ते खाद्य असे || ७४.

मिथ्या जागृती आणि स्वप्नहि, एक न सकला अनुभूती |
तुर्येमाजी सारे एकचि, कारण नित्यचि अद्वैती || ७५.

श्लोक-स्वप्नवृत्तावपि त्वन्तश्चेतसा कल्पितं त्वसत् बहिश्चेतोगृहीतं सद्दृष्टं वैतथ्यमेतयोः ॥ ९ ॥

अपूर्व ऐसे स्वप्नी पाहिले, मनोकल्पना जशी असे |
द्रष्टाही तो कल्पनेतला, म्हणुनी कदा तो सत्य नसे || ७६.

श्लोक-जाग्रदवृत्तावपि त्वन्तश्चेतसा कल्पितं त्वसत् बहिश्चेतो गृहीतं सद्युक्तं वैतथ्यमेतयोः ॥ १० ॥

सत्य मानिती सकलचि त्याला, प्रत्यक्षचि जे व्यवहारी |
परि जे केवळ कल्पनेतले, असत्यचि ते सर्वपरी || ७७.

अंत:श्चेतन ग्रहण करी जे, परी कृती ती ना घडली |
बहीश्चेतना पाही तेंव्हा, कृती सत्य तीचि झाली || ७८.

विचार केला दान करावे, परि कृति ना जोवरती |
तोवरी सारे कल्पनेतले, सत्य कृति परि नसेचि ती || ७९.

कल्पनेतल्या विश्वामाजी, जणु कांही ती कृति घडे |
कृतीत ना प्रत्यक्ष तोवरी, जागृतीत जणु स्वप्न पडे || ८०.

{श्लोक ११ ते १३ यांचे भाष्य, सुयोग्य संदर्भांसाठी पुढे घेतले आहे.}

– { आधार- स्वामी परमार्थनंद यांचे भाष्य}

श्लोक-चित्तकाला हि येऽन्तस्तु द्वयकालाश्च ये बहिः ।

कल्पिता एव ते सर्वे विशेषो नान्यहेतुकः ॥ १४ ॥

अंत:कल्पित पदार्थ स्वप्नी, 'चित्त-काल' त्या मर्यादा |

स्वप्न संपता, 'एक-काल' त्या पुन्हा पाहता ये न कदा || ८१.

स्वप्नि काल मी, जे हि पाहिले, आज झोपता, ते वेगळे |

जे मी एकदा कधी पाहिले, दिसेल कधि ते नाचि कळे || ८२.

चित्त-काल नि द्वय-काल हे, स्वप्न नि जागृती उभयांचे |

द्वय-काल हा जागृतीतला, जोवरी नाश न, दिसणे त्याचे || ८३.

परि जागृतीचे कल्पित बाह्यचि, जोवरी नाश न ते दिसती |

स्वप्नी चोरी, किंवा मृत्यू, जागृतीत ना अनुभूती || ८४.

उभय अवस्थामाजी जे असे, शाश्वत त्यांतील कांही नसे |

द्रष्ट्याच्या अनुभूतीने ओळख, म्हणुनी ते मिथ्याची असे || ८५.

प्रपंच अंत:-बाह्य तसाचि, अंत:जन्य तो स्वनीचा |

बाह्य पसारा दिसे सर्व जो, मनोरथीच्या दृश्यांचा || ८६.

श्लोक-अव्यक्ता एव येऽन्तस्तु स्फुटा एव च ये बहिः ॥
कल्पिता एव ते सर्वे विशेषस्त्विन्द्रियान्तरे ॥ १५ ॥

जागृतीत वा स्वप्नी दिसते, यथार्थ दिसणे कदा नसे |
जसे आकलन द्रष्ट्याचे ते, तैसे दिसणे भासतसे || ८७.

उभय अवस्थी भिन्न आकलन, पदार्थ नित्यचि बदतसे |
दुजे जे ही अस्तित्व असे त्या, शाश्वत ना मिथ्याचि असे || ८८.

जरी जगत हे एक असेचि, मानव-पशुला भिन्न दिसे |
जैशी क्षमता आकलनाची, तैसे वेगळेचि भासे || ८९.

म्हणुनि यांतील कांही सत्य ना, दृष्ट्यानुरूपचि जे बदले |
तूर्या हेचि पूर्ण सत्य जे, अद्वैतीचि नित वसले || ९०.

श्लोक ११ ते १३.{पंक्ती ८० पुढील}

श्लोक-उभयोरपि वैतथ्यं भेदानां स्थानयोर्यदि ।

क एतान्बुध्यते भेदान्को वै तेषां विकल्पकः ॥ ११ ॥

श्लोक-कल्पयत्यात्मनाऽऽत्मानमात्मा देवः स्वमायया ।

स एव बुध्यते भेदानिति वेदान्तनिश्चयः ॥ १२ ॥

श्लोक-विकरोत्यपरान्भावान्तश्चित्ते व्यवस्थितान् नियतांश्च

बहिश्चित्त एवं कल्पयते प्रभुः ॥ १३ ॥

दृश्य नि द्रष्टा, स्वप्न-जागृती, मिथ्या दोनीहि स्थानी |

सिद्धचि होता, उभयी मिथ्यता, प्रश्न अनेक येतात मनी || ९१.

दोन्ही अवस्था या जर मिथ्या, कोण कल्पना करी याची ? |

या भेदांना कोण जाणते? कोठुनी येती पदार्थचि? || ९२.

सुषुप्तीत तो, कांही नसता, होई आनंद अनुभूती |

याचि करणे श्रुती यालाची, म्हणती 'आत्मा कल्पयति' || ९३.

उत्तर याचे, स्वयेचि भोक्ता, आत्मा संकल्पे खेळे |

तोचि होऊनि जीव जाणतो, जरि मिथ्याचि हे सगळे || ९४.

परि सारे जरि, द्वैतचि भासे, नच बाधा अद्वैताला |

मीचि भोग नि मीचि भोक्ता, जैसे तरंग येती जला || ९५.

जीव दशेने जीवात्मा तो, मिथ्या द्वैता अनुसरतो |
मायेचा हा खेळ असे जो, वृथा तयातची तो रमतो || ९६.

कर्मांचा मी कर्ता मानुनी, वृथा फली तो गुंततसे |
प्रभाव मायेचा तो ऐसा, मिथ्या त्यासी सत्य दिसे || ९७.

सत्ता आणि स्फूर्ती सहजी, आत्म्याच्याची अस्तित्वे |
जैसे लोह-चुंबकहि जवळी, सहजी लोहा खेचावे || ९८.

गीतेत सांगती कृष्ण अर्जुना, हे सारेही मीचि असे |
स्थिती-उत्पत्ती-लयहि मीचि, सकलांच्या मी हृदयी वसे || ९९.

मीचि होतो अखिल चराचर, आणि खेळ हा चालतसे |
खेळ असे हा सर्व अनादि, कदापि याला अंत नसे || १००.

अज्ञानचि या जगता असण्या, जीव स्वप्न जणु पाहतसे |
पूर्ण ज्ञान ते हीच जागृती, सकली मी मग एक दिसे || १०१.

श्लोक-जीवं कल्पयते पूर्वं ततो भावान्पृथग्विधान् ।
बाह्यानाध्यात्मिकांश्चैव यथाविद्यस्तथास्मृतिः ॥ १६ ॥

ईश्वर कल्पित आधी जीवाला, विविध भाव मग सृजित असे |
बाह्य नि अंतरी पदार्थ जे-जे, स्मृती-ज्ञाना सह निर्मितसे || १०२.

पूर्वकर्म ते जीवास स्मृत जे, भोग भोगण्या ते तैसे |
विश्वी अनुकुल तैशी रचना, सहजी ईश्वर करीतसे || १०३.

जागृतीचे जग करीत रचना, सहाय्य शक्ती मायेचे |
अनुभव ज्याचा जीव घेतसे, बाह्य जगत त्या रमण्याचे || १०४.

पूर्वकर्मि जे बीज पेरिले, बाह्य निर्मिती तैशी असे |
विविध लोकहि त्यासी निगडीत, आणि भाव अंतरीचे तैसे||१०५.

जसे विषय नि आकलनाशी, भाव जीवनी उपयोगी |
मनोभाव ते त्या-त्या जीवा, तशी प्रेरणा हो जागी || १०६.

प्रारब्धीचे भोग भोगण्या, सहजी प्रेरणा कर्माची |
'यथाविद्यस्तथास्मृतिः' ही, परंपरा संस्काराची || १०७.

बाह्य निर्मिती विविध लोकीची, अनुकुल ती प्रारब्धाला |
जसे जीवीचे प्रारब्धी ते, तसे लोक ये वाट्याला || १०८.

कारण-कार्ये विविध जीवांची, निगडित तैसे विश्व बने |
विविध भोग जे सृष्टी द्वारा, सूक्ष्म जीवांच्या त्या सृजने || १०९.

सुरु होते मग प्रपंच-नाटक, विश्व-तेजस नि प्राज्ञाचे |
कुणी विवेके नि वैराग्याने, ज्ञान घेतसे तुर्येचे || ११०.

श्लोक- अनिश्चिता यथा रज्जुरन्धकारे विकल्पिता।

सर्पधारादिभिर्भावस्तद्वदात्मा विकल्पितः॥ १७॥

प्रकाश अपुरा, दिसता रज्जू, आकलन निश्चित होत नसे |
आत्म्यस्वरूपीहि तैसेचि, आरोप जीवचि करीतसे || १११.
असते दोरी वेडीवाकडी, विविध आकलन आरोपे |
कुणा वाटते, सर्प असे हा, कुणी म्हणे जल ओघरूपे || ११२.
मिटता काळोखहि तेधवा, समजे ज्ञात्या, ही दोरी |
तैसे मिटता अज्ञानहि ते, सत्यचि आत्मा, मिटे दुरी || ११३.
जोवरी निद्रा अज्ञानाची, ज्ञाता-भोक्ता मी आत्मा |
हे समजेना, वृथाचि मिथ्या, उमगे आश्रय जरि तमा || ११४.
जागृतीत जे दिसते नयना, परावलंबी आकलना |
एकचि वस्तू दिसे वेगळी, आरोप व्यक्तीहि नाना || ११५.
विपरित ज्ञाने, विविध आकलन, सत्यचि सृष्टी स्वप्नाची |
प्रपंच हे तर स्वप्नचि केवळ, न ये जागृती बोधाची || ११६.
स्वप्न नि जागृती उभय स्वप्नचि, नसे तेही ते परि भासे |
भल्याभल्यांना माया चुकवी, मिथ्या सत्यचि आभासे || ११७.

दृष्टीने ना दिसतो ईश्वर, दिसणे हे तर द्वैत असे |
ज्ञाता अनुभवी हृदय मंदिरी, एकपणाविन उल्हासे || ११८.

शास्त्र-जनित ज्ञानेचि अनुभूती, म्हणती ‘शास्त्रयोनित्वात्’ |
शास्त्रचि जननी ती ज्ञानाची, मार्ग दाखवी प्रसंगोपात् || ११९.

‘सर्वं शून्यं शून्यं’ म्हणती, इंद्रियातीतचि कारण ते |
परि नसे ‘शून्यवाद’ चि ब्रह्माविण कांही न उरते || १२०.

मीचि असे कि, आत्मतत्वचि, ज्ञाने निश्चय तो होई |
म्हणती ‘आत्मैवेदं सर्वं’, तेचि सत्य सकलाठायी || १२१.

श्लोक- निश्चितायां यथा रज्ज्वां विकल्पो विनिवर्तते ।

रज्जुरेवेति चाद्वैतं तद्वदात्मविनिश्चयः ॥ १८ ॥

शुद्ध ज्ञान होता ते उमजे, निश्चित हा रज्जूचि असे |

नसे सर्प ही दोरीची, शंका मनी कांहीचि नसे || १२२.

नसे सर्प ही असे दोरीची, सत्य दोरी ही जाणावे |

व्यवहारी गेलेचि मिथ्या भय, दोरी जाणुनी आचरावे || १२३

शुद्ध ज्ञान तैसे होताचि, विकल्प सारे ते मिटती |

ना जागृती वा स्वप्न-सुषुप्ती, मी तुर्याचि अद्वैती || १२४.

प्रयास हटले, सर्प मारण्या, वा मंत्रे त्या घालविणे |

उपाय निश्चित एकचि त्यासी, पूर्ण प्रकाशी अनुभवणे || १२५.

तैसे भवसागर हा तरण्या, अनुभूती होण्या ब्रह्माची |

नको कराया कर्मकांड वा, वाट धराया क्लेशाची || १२६.

विवेक-वैराग्ये आचरुनी, शुद्ध ज्ञान ते लाभावे |

अज्ञानाचा नाशचि पुरता, निज-रुप शुद्धचि जाणावे || १२७.

विश्व नि तेजस प्राज्ञ अवस्था, सर्पासमचि भास असे |

जे नाही त्या निवारण्यास्तव, मनी कर्माचे वृथा पिसे || १२८.

हे गर्दभ नि हा तर राजा, उपाधी, या तर वरवरल्या |
जैसे दोरीशी अन्य मानुनी, चित्तवृत्ती त्या बावरल्या || १२९.

आत्म्याला ती नसे उपाधी, उपाधी भ्रांती मिथ्याची |
उपाधी संगे तसे आचरण, ना विस्मरणा अद्वैताची || १३०.

बोध जोवरी ना ज्ञानाचा, 'कोण मी असे' विस्मरणे |
श्रुती शिकविती, ज्ञान-प्रकाशी, ब्रह्म जाण तूं निज-ज्ञाने || १३१.

जागृती हाचि रज्जू सर्पचि, अज्ञानाच्या अंधारी |
अपुऱ्या अथवा विपरित ज्ञाने, जीव विसरला 'मीचि हरी' ||१३२.

मिथ्या सर्पचि सत्य वाटणे, आणि तैसे आचरणे |
फसवी भव-चक्रांत वृथाचि, नसत्या बंधनी ते पडणे || १३३.

उपाय याला एकचि निश्चित, श्रुती सांगती ठामपणे |
शुद्ध ज्ञान ते निज-रूपाचे, देह-बुद्धीतुनि ते सुटणे || १३४.

शुद्ध ज्ञान ते होता उमगे, तिन्ही अवस्था मिथ्याची |
मीचि तूर्या, पूर्ण ब्रह्म मी, जाण सत्य नि मिथ्याची || १३५.

जेही पाहिले नि अनुभवले, आजवरी ते जाणियले |
सारे होते नाटक जणु ते, हे मजला आता कळले || १३६.

परि ज्ञान ते ऐसे होता, सोडू नये नाटक करणे |
विविध भूमिका त्या पात्रांच्या, समजुनी सुयोग्य आचरणे ||१३७.

माझी भुमिका ना विसरावी, नाटक उत्तम सजवावे |
परि कदा ना मूळ स्वरूपा, विसरुनि वर्तन ते व्हावे || १३८.

सारे नाटक सुयोग्य करणे, सहजी आले वाट्याला |
मी चपराशी, किंवा राजा, न्यायचि देणे भुमिकेला || १३९.

ऐसे अद्वैतात राहुनि, द्वैताला न्यायहि देणे |
कृतार्थ जीवन होईल आपुले, आनंद उभयी तो घेणे || १४०.

या जन्मी जे मजशी धाडिले, समजुनी घ्यावे ते पुरते |
क्षमता आणि विशिष्टता मम, वापरणे इह-कार्याते || १४१.

ऐसे जीवन यथार्थ जीवन, सार्थक ते नर-जन्माचे |
निज कार्ये नि स्वामी कार्ये, संतोषे मन श्रीहरीचे || १४२.

गौडपाद आचार्य यापुढे, सांगती 'विपरित' अर्थ कसे |
श्रुती वाचुनी अशुद्ध ज्ञाने, विपरित मार्गा धरीतसे || १४३.

एकोणीस ते अठ्ठावीस या, कारिकात त्यांनी रचिले |
आनंदगिरीचे भाष्य त्यावरी, अभ्यासू होण्यास भले || १४४

श्लोक- प्राणादिभिरनन्तैश्च भावैरेतैर्विकल्पितः ।

मायैषा तस्य देवस्य यया संमोहितः स्वयम् ॥ १९ ॥

आत्म्याला कुणी प्राण मानिती, परी असे हे तर माया |

मोहविले मायेने जगता, दुस्तर ही बहु लंघाया || १४५.

ही तर भगवंताची शक्ती, गीतेत सांगे 'दुरत्यया' |

आत्म्यालाही हिने भुलविले, जीव कष्टतो तो वाया || १४६.

नसते तेहि, असते वाटे, धावे जीव ही त्यासाठी |

भासवी जवळी असता दूरचि, हृदयी जरि तो जगजेठी || १४७.

श्लोक-प्राण इति प्राणविदो भूतानीति च तद्विदः ।

गुणा इति गुणविदस्तत्त्वानीति च तद्विदः ॥ २० ॥

कुणी म्हणती हा प्राण चि आत्मा, कुणी मानिती पंच-भुते |

अन्य कुणी विद्वान मानिती, गुणात्मकचि या जगताते || १४८.

कुणी तत्ववेत्ते परि मानिती, प्रभाव सारा तत्वांचा |

एकवाक्यता नसे तयांची, सर्व प्रभावचि श्रद्धेचा || १४९.

श्लोक- पादा इति पादविदो विषया इति तद्विदः ।

लोका इति लोकविदो देवा इति च तद्विदः ॥ २१ ॥

मांडुक्याचे श्रुती अभ्यासू, म्हणती चार पाद ब्रह्माचे |
त्याची अवस्था चार वर्णिल्या, वर्णन तेचि सत्याचे || १५०.

चार पाद या ब्रह्माचे जे, कल्पियले समजायाते |
या चारांच्या आधारेचि, सकल विश्व घेई गतीते || १५१.

विषयातील आनंदी रुचि ज्या, ज्ञान-इंद्रियांची महती |
म्हणती आनंदास्तव जीवन, सत्य इंद्रियांना म्हणती || १५२.

आनंदास्तव जग निर्मियले, विषय-इंद्रिये युती द्वारा |
भगवंताचा हाचि हेतू, म्हणुनी पसारा हा सारा || १५३.

सृजन आनंदाचे होते ते, या जगताचे सत्य असे |
भोगवादी विद्वान म्हणती ते, हाचि अर्थ आम्हा गंवसे || १५४.

विविध पुराणे अभ्यासुनी जे, ज्ञातेजन आहे जगती |
देव देवता आणि लोकहि, म्हणती, सत्यचि ते असती || १५५.

वेदामाजी पानोपानी, स्तुती नि प्रार्थना त्यांची असे |
वेद प्रमाणचि म्हणुनी म्हणती, सत्य याविना अन्य नसे || १५६.

श्लोक- वेदा इति वेदविदो यज्ञा इति च तद्विदः ।

भोक्तेति च भोक्तविदो भोज्यमिति च तद्विदः ॥ २२ ॥

जाणकार जे वेदांचे ते, म्हणती आत्मा वेद असे |
यज्ञ निपुण ते, परंतु म्हणती, यज्ञावाचुनी अन्य नसे || १५७.

वेदाध्यायी म्हणती ऋचाचि, आणि शिकती ते अर्थांना |
खोल आशयी ना जाता त्या, वरवरल्याचि घे ज्ञाना || १५८.

तसेचि यज्ञे विविध प्रकारे, जैसे ग्रंथी वर्णियले |
देत आहुती, म्हणुनी मंत्रा, परि आशय ना जाणियले || १५९.

वेद-शास्त्री जी व्रते वर्णिली, फळे तयांची वाचुनिया |
लागती आचरणाच्या मागे, सकाम श्रद्धा ती वाया || १६०.

गंध टिळे नि माळा विविधा, भस्म-विलेपन अंगाशी |
बदलती वेषा, स्तोत्रे म्हणती, भुलले ते देखाव्याशी || १६१.

कर्ता आत्म्याला न मानिती, भोक्ते म्हणती तो भोक्ता |
कुणी समजती सत्य भोज्यचि, कशास अन्यचि त्या वार्ता ||१६२.

श्लोक-सूक्ष्म इति सूक्ष्मविदः स्थूल इति च तद्विदः ।
मूर्त इति मूर्तविदो मूर्त इति च तद्विदः ॥ २३ ॥

ज्ञाते जे अणु-परमाणूचे, ठाम मतावरी या असती |
अति सूक्ष्म तो, असेचि आत्मा, अती विरळ त्याची ख्याती||१६३.
स्थूल देहीचा प्राणहि जाता, सूक्ष्म देह मन-बुद्धीमयी |
जात असे ती जीवासंगे, नसे जात तो कधि विलयी || १६४.
श्रुतीत ऐसे कथीयले की, आत्मा अतीचि विरळ असे |
परि सांगती त्याच श्रुती की, आत्मा सर्वांठायी वसे || १६५.
गहन अर्थ तो 'सूक्ष्म' विशेषण, नच ते की आकाराचे |
अर्थ तयाचा तत्व सूक्ष्म ते, विषय न मन नि बुद्धीचे || १६६.
परि ज्या आस्था सगुण-स्थुलाची, वेद न मानित नास्तिक ते |
ते म्हणती हा स्थूल देहची, जीवन जोवरी ते असते || १६७.
स्थूल देहचि आहे म्हणुनि, भोग भोगता येत असे |
स्थूलाशीचि तत्व मानणे, संयुक्तिक ते अन्य नसे || १६८.
ज्ञाते सांगती विधान चूकचि, निद्री वा ते मृत असता |
जरि स्थूल प्रत्यक्ष तिथे ते, सांगा कोण असे भोक्ता ?|| १६९.

कुणास रुचि ती साकाराची, म्हणती मूर्तीत देव असे |
चक्रधारी श्री विष्णू अथवा, अष्टभुजा अंबा विलसे || १७०.

ठामपणाने कुणी सांगती, जागृत दैवत हेचि असे |
प्राणप्रतिष्ठा ती केलेली, नवसाला नित पावतसे || १७१.

कुठे धातुची, पाषाणाची, काष्ठाची वा बर्फाची |
पूजन अभिषेक भोग वा, होई पूर्ति इच्छेची || १७२.

कुणी चोर ते रात्री चोरी, ऐशा जागृत देवाची |
नास्तिक कुणी ते करिती भग्नहि, कोठे शक्ती पळे त्याची?||१७३.

चार वेळ काशीचे मंदिर, तोडियले ते यवनांनी |
देवत्वचि कां विरुनी जाई, हाल चालता सैतानी ?|| १७४.

शून्यवादी ते म्हणती ऐसे, सारे-सारे शून्यचि ते |
बघतो आपण सकलचि विरते, काळाच्या मुखी ते जाते || १७५.

बुद्ध-वाद हा जो शून्याचा, चतुर्थात खंडण त्याचे |
गौडपादचि देतील उत्तर, दर्शुनि उचित आधाराचे || १७६.

आपआपली मते मांडता, आग्रही ते वेत्ते होती |
परि पूर्ण ज्ञाता तो मिळता, सहजि निरुत्तर ते होती || १७७.

श्लोक-काल इति कालविदो दिश इति च तद्विदः ।
वादा इति वादविदो भुवनानीति तद्विदः ॥ २४ ॥

कालतत्ववेत्ता ते म्हणती, सारी कालाची सत्ता |
त्यांतचि सृजन, त्यांत राहणे, त्यांतचि लय होणे विरता || १७८.
अनुकुल-प्रतिकुल कालप्रवाही, घडते त्याच्या सत्तेने |
एक काल तो अखंड वाहे, परिवर्तन या नियमाने || १७९.
काल असे परि क्रियाजन्यचि, अधिन क्रियांच्या स्वये असे |
त्याची कैसी स्वतंत्र सत्ता, आपुल्या जो स्वाधीन नसे || १८०.
दिशावादी ते म्हणती तत्व ते, दिशांचेची केवळ चाले |
दिशा कोणती अनुकुल-प्रतिकुल, कवण कार्यी त्यानेचि कळे||१८१.
नित्य भ्रमण हा विश्व नियमचि, कवण दिशा राही स्थायी? |
अवकाशी हा खेळ चालला, दिशा तरि बदलत राही || १८२.
स्थैर्य जियेला स्वयेचि नाही, पराधीन ती दिशा असे |
बदले स्वयेचि स्थान प्रवर्तनी, होइल ती ते तत्व कसे? || १८३.
जेही वादांचे वेत्ते ते, म्हणती वादचि तत्व असे |
बुद्धि-निश्चये सृजन तयाचे, महत्व डावलता कैसे ?|| १८४.
ज्ञाते उत्तरतीचि तयाशी, कवण वाद तो स्थायी असे ?|
कुणी सांगता वाद तयाचे, पुढती खंडण काय नसे?|| १८५.

आज सांगती ठामपणाने, आमुचेची ते सत्य असे |
उद्या त्याहुनि कुणी जाणता, सारे खोडुनि काढीतसे || १८६.

विचारांची ती प्रणाली बदले, शास्त्र जातसे पुढे पुढे |
आजच्या वादा उद्या न थारा, ना तत्वा सातत्य घडे || १८७.

भुवनवादी ते म्हणती भुवनचि, तत्व एकले मानावे |
सप्त स्वर्ग, साती पाताळा, स्थानचि तत्वाचे द्यावे || १८८.

ज्ञाते म्हणती चौदा भुवने, कुणी पाहिली आजवरी ?|
इहलोकचि हा व्यवहारी ये, तितुका दृष्टीस येत जरी || १८९.

सूक्ष्म लोक हे, विषयहि नसती, पुराणातचि वर्णियले |
तया तत्व ते कसे मानणे, केवळ शब्दीचि ऐकियले || १९०.

श्लोक- मन इति मनोविदो बुद्धिरिति च तद्विदः ।
चित्तमिति चित्तविदो धर्माधर्मों च तद्विदः ॥ २५ ॥

जेही मनोवैज्ञानिक असती, अनुभव दाता मनचि असे |
सुख-दुःखाला कारण केवळ, त्याची वृत्ती अन्य नसे || १९१.

सारे इच्छिती शांती मनाची, तत्व मनाला मानावे |
हेचि संयुक्तिक की केवळ, अन्य विचार कशास हवे?|| १९२.

ज्ञाते म्हणती, परतंत्रचि मन, हेचि कारण दुःखाला |
तत्व त्यासि कैसे मानावे ?, जे कि कठीणचि स्थैर्याला || १९३.

नित्य अवस्था त्याची बदले, कधी उदास कधि उल्लासे |
मन तर देहाचे साधन ते, तत्व म्हणावे त्या कैसे? || १९४.

म्हणती कुणी विद्वान असे के, तत्व बुद्धीला मानावे |
'बुद्धिरिति च तद्विदः' कथिले, योगाचारि न विसरावे || १९५.

ज्ञाते म्हणती योगाचारहि, एक विचारचि बौद्धांचा |
दुषित नि खंडित मत हे त्यांचे, तत्वी विचार न बुद्धीचा || १९६.

सुषुप्ति समयी, अभाव असतो, तेंव्हा बुद्धी तेथं नसे |
तीही लीनचि सुषुप्तीमाजी, तत्व म्हणावे तिज कैसे?|| १९७.

कुणी देत ते महत्व चित्ता, निवास जे संस्कारांचा |
कर्म-वासना जनक तयाचे, अधिकारी ते तत्वाचा || १९८.

ज्ञाते म्हणती, नित्य बदलती संस्कारांचे रूप नवे |
आदि अंतहि असे जयाला, तत्व तया ना मानावे || १९९.

कर्मकांडी ते सत्वर उठले, धर्म-अधर्मचि तत्व असे |
पुण्य-पापचि कारण त्यांचे, तत्व त्याहुनि अन्य नसे || २००.

ज्ञाते म्हणती, धर्म-अधर्महि, नित्यचि ते बदलत राही |
ते तत्वाचे ना अधिकारी, यांत वाद नसे कांही || २०१.

श्लोक- पञ्चविंशक इत्येके षड्विश इति चापरे ।

एकत्रिंशक इत्याहुरनन्त इति चापरे ॥ २६ ॥

सांख्यवादी ते म्हणती ऐसे, जगत पंचविस तत्वांचे |

परमेश्वर ही अधिक मिळवुनी, कुणी मानिती सव्वीसचे || २०२.

पंचप्राण ते त्यांत मिळवुनी, कुणी एकतीस ते करिती |

अनंतावादी म्हणती सीमा ना, तत्वे अनंतची असती || २०३.

ऐसी मान्यता एक न तत्वी, सारे जरि ते विद्वान |

इथे न थांबे तत्व गलबला, वाढविती ते अज्ञान || २०४.

श्लोक-लोकॉल्लोकविदः प्राहुराश्रमा इति तद्विदः ।
स्त्रीपुंनपुंसक लैङ्गाः परापरमथापरे ॥ २७ ॥

कुणी म्हणती हे विचार सगळे, आधारित कारणावरी |
काय जगाचे कारण त्यासि, तत्व मानिता खरोखरी || २०५.

असे वाद ना कधी संपती, विचार करि हे जगत असे |
काय प्रयोजन निर्मात्याचे, त्याविण अन्यचि तत्व नसे || २०६.

साऱ्या विश्वाचे कारण हे, प्रसन्न करि या जगताला |
'लोकान् लोकविदः' प्रयोजन, हेच तत्व असे याला || २०७.

परि माहित हे सकल जगतहि, प्रसन्न कधि ना होणार |
एकाचे ते रंजन करिता, दुज्यास इर्षा राहणार || २०८.

आनंदी करण्यास जानकी, रावण संगे लढणेचि |
एकाचे सुख, दुःख दुज्याचे, ही न पात्रता तत्वाची || २०९.

जे ही मानिती आश्रम-धर्मा, म्हणती आश्रमधर्म खरा |
हाचि खरा परमार्थ असे की, तत्वा विचार ना दुसरा || २१०.

ज्ञाते म्हणती धर्म पाळणे, अर्थपूर्ण जरि प्रवृत्ती |
सुयोग्य होणे कठीण सदाची, तत्व म्हणुनि त्या ना गणती || २११.

नुसते पालन परि अज्ञानी, जन्म जातसे तो वाया |
जेथं न शुद्धी अंतरीची ते, तत्व नसे केवळ माया || २१२.

कुणी ज्ञाते ते व्याकरणाचे, म्हणती त्रिलिंगे सृष्टी वसे |
नर, नारी नि तृतीयपंथी, लिंगविचारचि तत्व असे || २१३.

ज्ञाते म्हणती, व्याकरणाला, कसे आणणे व्यवहारी ?|
भाषे-भाषेमधे भिन्नता, लिंगाची असते दुसरी || २१४.

कांही शब्द ते असे त्रिलिंगी, विचार करिता भाषेचा |
तत्व कसे ते त्यास म्हणावे,? योग्य विचार न हा त्यांचा || २१५.

कुणी म्हणती ते ब्रह्म दोनकी, पर नि अपरहि शास्त्र म्हणे |
ज्ञात उभय ते अवश्य होणे, तरीच हे चर्चा करणे || २१६.

ज्ञाते म्हणती, दोन विचारी द्वैतचि होई, ब्रह्म परि नित अद्वैती |
दोन ब्रह्म ते नसती कदापि, तत्व तया कैसे म्हणती || २१७.

श्लोक-सृष्टिरिति सृष्टिविदो लय इति च तद्विदः ।
स्थितिरिति स्थितिविदः सर्वे चेह तु सर्वदा ॥ २८ ॥

कुणी म्हणती विद्वान असे की, सृष्टीत मुख्यचि उत्पत्ती |
वास्तविक त्या तत्वालागी, केवळ ब्रह्मदेव असती || २१८.

कुणी म्हणती कि, नवी निर्मिती, लया वाचुनी शक्य नसे |
त्यासाठी तो संहाराचा, महारुद्र चि तत्व असे || २१९.

कुणी म्हणती उत्पत्ती कारण, केवळ कर्माने घडते |
त्यासाठी तो पालनकर्ता, श्री विष्णू हा तत्वचि ते || २२०.

एकवाक्यता कुणात नाही, हा तर केवळ वाद असे |
तत्व म्हणोनि कशा म्हणावे? पूर्ण तर्क तो यांत नसे || २२१.

कुणी पाहिले ब्रह्मा, विष्णू आणि रुद्र तो संहारी |
सारी हि तर असे कल्पना, अलग धर्मी असे दुसरी || २२२.

या जगती ते धर्म पंथहि, किती त्या नाही गणना |
तत्वे मानिती आप-आपली, सूत्र तयाला एकचि ना || २२३.

विभुति दर्शनी दशमोध्यायी, स्वये सांगती भगवंत |
कांति-शक्ति मम ऐश्वर्यचि, माझ्या विभूतीस ना अंत || २२४.

भेद रहित तो एकचि आत्मा, अन्य विकल्पी अज्ञान |
तेजोमय मार्गा मानावे, सत्य एक ब्रह्म-ज्ञान || २२५.

श्लोक- यं भावं दर्शयेद्यस्य तं भावं स तु पश्यति ।
तं चावति स भूत्वा सौ तद्ग्रहः सुमपैति तम्॥ २९ ॥

'इदं सर्वं यदयमात्मा', बृहदारण्यक सांगतसे |
जेणे अनुभव लाभे सत्यचि, त्याविण पथ तो अन्य नसे || २२६.

ज्यांनी अनुभविले त्या तत्वा, स्वये ब्रह्म ते अद्वैती |
आत्म-रूप एकचि तत्व ते, कदा न फसणे ते द्वैती || २२७.

ठाम मानसी मीच तत्व ते, निष्ठा पुरती त्यावरती |
एक मार्ग जो मनास भावे, अन्य सर्व सोडुनि देती || २२८.

शुद्ध मनाला जेही भावे, आणि अनुभूती ये तैसी |
निश्चित ती मानावी प्रेरणा, सोडुनि द्यावे अन्यासी || २२९.

ठामचि निष्ठा फलदायी ती, उगा वादी ते पडू नये |
योग्य गवसता मार्ग अनुसरी. तत्व तेचि, प्रचिति ती जये || २३०.

वैष्णव मानिती श्री विष्णूला, कुणास संतोषी माता |
ठाम तत्व ते करीत रक्षा, फल ते सहजी ये हाता || २३१.

आपुल्या तत्वा कधि न सोडणे, दुज्यास आग्रह ना करणे |
मुहम्मदाच्या अल्लाला वा, अन्या दूषण ना देणे || २३२.

हनुमंताने लिहिले नामचि, रामाचे ठेऊनि श्रद्धा |
पाषाणहि ते सहजी तरले, असुनी जड ते तरि सुद्धा || २३३.

रामा शंका, तरले कैसे?, केवळ लिहुनि मम नाम |
पाषाणा या बघतो सोडुनि, मी तर स्वयेचि की राम || २३४.

परि सोडिता नाही तरला, जळात पुरता बुडलासे |
हनुमंत मागुनि तो हंसला, श्रीरामाला सांगतसे || २३५.

तुझ्यापासुनि सुटता देवा, कुणी न कधि तो तरलासे? |
श्रद्धेने परि आम्ही लिहिता, पाषाणहि बुडतील कसे? || २३६.

नव्हती अक्षरे पाषाणावरी, श्रद्धा होती ती ठाम |
मम प्रभु नामी, अपार शक्ती, तरतीलचि लिहिता 'राम' || २३७.

पूर्णचि निष्ठा ठाम असावी, जये अनुभूती येत असे |
सहजी ब्रह्मचि स्वयेचि होती, मनी शंका ती मुळी नसे || २३८.

धरसोडीला निष्ठा करिता, ना इहलोकी न परलोकी |
'इतो नष्टस्ततो भ्रष्ट:', वचनहि असे प्रसिद्ध ते की || २३९.

श्लोक- एतैरेषो पृथग्भावैः पृथगेवेति लक्षितः ।
एवं यो वेद तत्त्वेन कल्पयेत्सो विशङ्कितः ॥ ३० ॥

समरस ज्ञाता जरि अद्वैती, स्वधर्म पाळी या जगती |
सुयोग्य ऐशा करुनी कार्या, नसे परि त्या आसक्ती || २४०.
कुणी व्यथित ते जगती दिसता, भोगिती प्रारब्धा आपुल्या |
यथाशक्ती त्या मदतचि करणे, परि न विस्मृती कैवल्या || २४१.
हेचि अनुभव अमृती लिहिले, श्री ज्ञानेश्वर माऊलीने |
आजही वत्सल हात कृपेचा, फिरवितीचि ते प्रेमाने || २४२.
ज्ञानमयी ती दृष्टी असता, अनात्म जगती कांही नसे |
सारे कांही वासुदेवमय, सकला ठायी तोच वसे || २४३.
या जगती देहाकरवी तूं, स्वधर्म पालन ना सोडी |
परि ना गुंते द्वैतामाजी, परब्रह्माविण ना आवडी || २४४.
ब्रह्मलाभ तो होण्यासाठी, साधना एकचि या जगती |
अंतरीचि ऐकुनि प्रेरणा, जेणे होईल अनुभूती || २४५.
अनेक भाव नि अनेक वादहि, गुंतू नये ते ज्ञात्याने |
ज्या मार्गाने हरी तो गंवसे, ठाम रहावे श्रद्धेने || २४६.
गीता अठरावे अध्यायी, श्लोकी पंचावन वदती |
ज्ञानेश्वरी आधारे सांगे, कृष्ण उक्ती मी यथामती || २४७.

ज्ञान भक्ती ती थोर अर्जुना, मी नि भक्त अलग नसती |
'शुद्ध भक्ती' म्हणती ते ज्ञानी, हिलाची 'स्व-संवित्ति' || २४८.

'शक्ती' तिजला म्हणती शैव ते, आम्ही म्हणू 'परमचि भक्ती' |
आटे विवेक नि वैराग्यहि ते, ना प्रवृत्ती ना निवृत्ती || २४९.

चारी भुते विरली आकाशी, अद्वैती ती अनुभूती |
गंगा भेटे सागराशी ती, गंगा सागर एकचि ती || २५०.

कुणी कुणाला तेथे पूजणे, आणि भजणे कुणी कुणा ?|
सारे एकचि परब्रह्म ते, जळात न कल्लोळपणा || २५१.

सिद्धची तो ते तीर्थ जाहला, होई चालणे यात्राची |
मुखातुनी त्याचिया मी बोले, कृती त्याची हे पूजनचि || २५२.

जरि वाटे तो गाडे ओढी, संसारी व्यापाराचे |
सामान्यासम जगती वर्ते, भान नित्य परी ब्रह्माचे || २५३.

हेची ओळखणे आपणाशी, आकलन केवळ ज्ञानाचे |
मजला मी तर नित्य प्राप्तचि, नुरले कांही मिळविण्याचे ?|| २५४.

गौडपाद आचार्यचि म्हणती, येथं नसे कांही प्राप्ती |
मीच ब्रह्म हा भावचि निश्चल, नित्यचि येईल अनुभूती || २५५.

आविष्कार हा अद्वैताचा, श्रद्धे जैसी अनुभूती |
ओतप्रोतहि ब्रह्मचि जगती, केवळ श्रद्धेची ही महती || २५६.

जगतामाजी आत्मदृष्टीने, नित्य पहावा भगवंत |
अनात्म सारे विरुनी जाईल, द्वैताचा होता अंत || २५७.

जगतामाजी जेही दिसते, ज्ञान-दृष्टीने त्या पाही |
असे उपाधी ती वरवरली, चैतन्याविण ना कांही || २५८.

भेद सोडुनि, पहा अंतरी, विविधे नटला एक हरी |
कुणी उच्च ना, कुणी नीचहि, रूपे तयाची ही सारी || २५९.

अलंकार ना दृष्टी यावे, केवळ बघणे ते सोने |
तरंग, लाटा माजि अनुभवा, केवळ जळचि ते ज्ञाने || २६०.

प्रसंग कांहीही अनुभविता, विचार करि सहभागाचा |
कवण कृति मम ये उपयोगी, करी विचार केवळ याचा || २६१.

व्यवहारिक हि द्वैती भक्ती, परोपकारचि हरी सेवा |
कर्तव्याशी कधि न चुकावे, अंतरी ब्रह्मरुपी ठेवा || २६२.

अल्लाह हि हो, वा मरिअम्मा, भैरव वा ते अन्य कुणी |
सारे सारे आत्मदेवचि, निष्ठा ठामचि ठेवोनी || २६३.

ज्ञान कांड वा कर्म साधना, अनेक परि श्रद्धा असता |
तूर्या तत्वची सकलाठायी, आदि अंत कांही नसता || २६४.

संशय-शंका हाचि अडथळा, श्रद्धा नित्यचि निश्चल ती |
याचि देही, ब्रह्म लाभते, अनुभुत ती ब्राह्मीशांती || २६५,

नर-जन्मी या नसे वर्ण तो, आचार-धर्महि कांही नसे |

जे हि वाट्याला आले ते, स्वधर्मपालन तेचि असे || २६६.

श्लोक-स्वप्नमाये यथा दृष्टे गन्धर्वनगरं यथा ।
तथा विश्वमिदं दृष्टं वेदान्तेषु विचक्षणैः ॥ ३१ ॥

स्वप्नसृष्टी वा गारुडी दर्शन, नगरी वा गंधर्वांची |
अज्ञान्याला सत्य वाटते, चाले बुद्धी न ज्ञात्याची || २६७.

वेगळी स्वप्नामधुनी जागृती, जागृतीतली जागृती ही |
अद्वैताचा ज्ञानी जेथे, द्वैत जगालाही पाही || २६८.

नसे वागणे कदा अलौकिक, वर्तन सामान्यचि तसे |
मिथ्याचा उल्लेख न जगती, परी अंतरी भान असे || २६९.

अज्ञानासमचि वर्तावे, जरि पूर्ण ज्ञानीचि असे |
समष्टीत सहभाग उचितचि, भुमिकेला सोडणे नसे || २७०.

हमाल हो वा राजा अथवा, उत्तम वठवी भुमिकेला |
एक क्षणहि परि हरी न विसरे, ना सोडी अद्वैताला || २७१.

जगती आपुले व्यर्थ न येणे, स्वधर्म पालन सोडू नये |
अलिप्त राहुनि करि ती कर्मे, ब्रह्म-स्मरण नित होई जये || २७२.

'तथा विश्वमिदं दृष्टं', ब्रह्मचि केवळ अनुभूती |
सारे कर्मचि होईल पूजन, अंतरी नीरव ती शांती || २७३.

प्रभुचि माया अती चतुरचि, बांधी विवेके ज्ञात्याला |
लोभ्या बांधे लोभाद्वारे, कामे तैसा कामीला || २७४.

वशिष्ट सांगती श्री रामाला, ‘मुक्ती हवी मज’ बंधन हे |
सोड बंधना, आणि अनुभवी, नित्य मुक्तचि मी आहे || २७५,

संपर्की जेही ते येते, निश्चय करि हे जाणार |
निपटुनि काढी आसक्तीला, तसेच ममता अनिवार || २७६.

जोवरी संगत, करि कर्तव्या, संगत सुटता, मनी शांती |
नको ममत्व नि नको गुंतणे, अनात्म सारीची भ्रांती || २७७.

सर्प विंचू हे जरि नारायण, वंदन त्या करणे दुरुनी |
तुझे पाहणे ज्ञान दृष्टीने, देह-धर्म त्या परी मनी || २७८.

वर्तमान क्षण हाचि सत्य हे, सदा मानसी ठेवावे |
भविष्यातले वा भूतीचे, विचार नच येऊ द्यावे || २७९.

श्लोक-न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ।

न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥ ३२ ॥

मिथ्या असता प्रपंच सारा, खेळ असे हा मायेचा |
अद्वैताची ही अनुभूती, अलगपणा तेथे कैचा ?|| २८०.

ना निरोध नि ना उत्पत्ती, बद्ध नि मुक्त हि उभय नसे |
नसेचि साधक आणि मुमुक्षुहि, असणे-नसणे भाव कसे ?|| २८१.

प्रपंच सारा, हा मिथ्याची, नसे प्रलय वा उत्पत्ती |
सारे आहे ब्रह्मचि केवळ, लहरी येती नि जाती || २८२.

असत्य सर्वचि असे पसारा, जो वरवरला चि भासे |
सारे कांही एकचि असता, व्यष्टी-समष्टी भेद कसे?|| २८३.

ना उपाधी ना विशिष्ट ओळख, मी तू पण सारे सरले |
एकचि हरी तो अन्य कुणी ना, मीपण विलयाला गेले || २८४.

स्वप्नीचे ते प्रसंग जैसे, स्वप्नी सत्यचि वाटतसे |
अद्वैतीही ज्ञाता असता, सत्य जगा समजणे तसे || २८५.

व्यवहारीचे प्रसंग सारे, जेंव्हा येती सामोरे |
सामान्यासम वर्तन तेंव्हा, जरि जाणणे हे न खरे || २८६.

अशी नाटकी भुमिका करणे, ना विसरी हे 'मी तूर्या' |
बाधा नाही अद्वैताशी, करीत जरि द्वैती कार्या || २८७.

जरि सारे हे ब्रह्मचि असता, ना सोडी व्यवहाराला |
कुणी कुत्रा धावे चावाया, सोडू नये त्या पळण्याला || २८८.
असे असावे नसुनी जगती, परि भासविणे कि मी तोचि |
समाधान ते चित्ती असावे, नित्य असे श्रीहरी मीचि || २८९.

श्लोक- भावैरसद्भिरेवायमद्वयेन च कल्पितः ।
भावा अप्यद्वयेनैव तस्मादद्वयता शिवा ॥ ३३ ॥

परमात्मा तो नित अदवैती, वेढुनि कल्पिताशी राही |
अद्वैताने तया कल्पिले, अधिष्ठान स्वये होई || २९०.

अधिष्ठान हे अतीव मंगल, कल्याणचि ते स्वये असे |
अद्वैतचि तो शिवा एकची, अन्य कल्पना शिवा नसे || २९१.

परि सारे हे मिथ्या स्मरूनी, असंगेचि राही संगी |
सारे करुनी नाही गुंतणे, असे रहावे नि:संगी || २९२.

माये माजी ना गुंतावे, परी दाविणे गुरफटला |
अलौकिक नोहावे जगती, परि मदत ती प्रगतीला || २९३.

तूर्येमाजी संग न कसला, द्वैताविण व्यक्तता नसे |
अधिष्ठान ते द्वैताला नित, अद्वैताचेची असे || २९४.

उसने अनुभव द्वैती येती, ज्ञात्याला हे ज्ञान असे |
नि:संग राहुनि करी तो संगा, जगास देही भासतसे || २९५.

आनंदी नि दुःखी व्हावे, नाचावे क्रोधी व्हावे |
परि ते सारे जाणुनी नाटक, विरक्तीस ना सोडावे || २९६.

जगती असणे परि ते नसणे, अद्वैती परि नित असणे |
स्वधर्म पालन करीत जीवन, विश्वा व्यक्ती ते होणे || २९७

श्लोक-नात्मभावेन नानेदं न स्वेनापि कथंचन । न
पृथङ्नापृथक्किंचिदिति तत्त्वविदो विदुः ॥ ३४ ॥

मिथ्या जरि हे विश्व म्हणावे, व्यवहारास्तव असे खरे |
अधिष्ठान त्यासी ब्रह्माचे, पुरते कल्पित आधारे || २९८.

ब्रह्म आश्रये दिसते हे जग, काय उभय संलग्न असे ? |
ब्रह्म नि जग ही उभय अनादि, एक-दुज्याविण कांही नसे || २९९.

परि विधान हे नसे योग्यचि, उजेड आणि अंधार |
कसे म्हणावे संलग्नचि ते, विरोधीच ते असणार || ३००.

ज्ञाते म्हणती उजेड नसणे, हाचि असे की, अंधार |
उजेडातही सावली रूपे, मंद रूपे तो दिसणार || ३०१.

उजेड येता सहजी सावली, स्वयंसिद्ध ती कधि नसे |
प्रकाश नसणे हेचि असणे, अंधाराचे नित्य असे || ३०२.

सकल जगत हे नाम रूपांचे, स्वयंसिद्ध ते कदा नसे |
जिथे ब्रह्म ते सहजी जगतहि, तया सिद्धता सहजी असे || ३०३.

पदार्थ जोही दिसतो आता, क्षणी पुढल्या तो अलग असे |
नाम तेचि परि, रुप ते बदले, एकसारखा कदा नसे || ३०४.

असे भिन्नता अनेक असता, मांगल्या बाधा येई |
परी एकचि समदृष्टीने, ब्रह्म तिथे मंगल होई || ३०५.

नसता सागर कैशा लहरी, आणि खेळही लाटांचा |
लाटा लहरी सागर आश्रयी, द्वैता तो अद्वैताचा || ३०६.

सूर्यही असता, मिटुनी डोळे, घुबडा अंधारचि भासे |
परी डोळसा तयेची वेळी, राज्य उजेडाचेचि दिसे || ३०७.

तैसे अज्ञान्या हा दिसतो, नाम-रूपांचा संसार |
आत्मभाव तो सूर्य प्रकटता, ज्ञात्या ब्रह्मचि दिसणार || ३०८.

दृष्टी व्यावहारिक असता, द्वैताचेचि राज्य असे |
परी पारमार्थिक ती असता, अद्वैतावीण कांही नसे || ३०९.

जोवरी बंधन; द्वैत तोवरी, ममत्व कारण बंधाचे |
मनी विरक्ती ना आसक्ती, अनुभव ते अद्वैताचे || ३१०.

वस्तू एकचि दृष्टी वेगळी, फरक पडे तो आकलनी |
सुवर्णमूर्ती भक्ता देवचि, चोराच्या सोनेच मनी || ३११.

द्वैत भासते अद्वैतावरी, सत्ता वेगळी ना त्याची |
परि ज्ञानमय दृष्टी नसता, दिसे भिन्नता जगताची || ३१२.

म्हणुनी सत्ता असणे नसणे, सर्वस्वे हे दृष्टीवरी |
तसेचि आकलन भिन्नचि द्वैती, व्यवहाराते बदल करी || ३१३.

द्वैती सत्ता जरि भासता, विविध विश्व प्रत्येकाचे |
म्हणुनी 'विलक्षण' म्हणती त्याशी, ऐसे स्वरूप जगताचे || ३१४.

वस्तु व्यक्ती संपर्काने, क्षणोक्षणी आकलन बदले |
कालवरी जे मंगल होते, अमंगलचि ते झणी झाले || ३१५.

म्हणुनी द्वैती सत्ता असे तरि, एकसारखी कदा नसे |
परि अद्वैती नित्यची मंगल, ‘शिव’चि तिजला म्हणत असे ||३१६

श्लोक- वीतरागभयनोधैर्मुनिभिर्वेदपारगैः ।

निर्विकल्पो ह्ययं दृष्टः प्रपञ्चोपशमो द्वयः ॥ ३५ ॥

वेदशास्त्री जे अति निपुण नि, सिद्धची आत्मा जाणोनी |
वेदालागी पूर्ण जाणुनि, स्वये आणिती आचरणी || ३१७.

नित्य विवेकी, नि वैरागी, चिंतनात जे मग्न सदा |
अर्थ जीवनाचा जाणोनी, ना भुलले मायेस कदा || ३१८.

आवड-निवड तया असेना, कृतीत सदैव निष्काम |
परहिततत्पर, सेवा पूजन, जागृत तो आत्माराम || ३१९.

आले जेही ते वाट्याला, आचरती ते निष्ठेने |
विहित कर्म ना कदा सोडिती, समाधानी ते तृप्त मने || ३२०.

अखंड आणि नित अद्वैती, अलिप्त द्वैता पासोनी |
असे दिव्य जे परब्रह्म ते, अनुभविले त्या समरसुनी || ३२१.

अखंड अनुभव तुर्येमाजी, 'परब्रह्म मी' ना विसरे |
देहबुद्धीला पूर्ण त्यागिले, अहंभाव तो सहजी विरे || ३२२.

पूर्णकाम नि शुद्धचित्तचि, हर्ष-शोक न जया मनी |
क्रोधरहित नि अनासक्तचि, निर्भय ऐसे ऋषी मुनी || ३२३.

आत्मदेव प्रत्यक्ष पाहिला, स्वये ब्रह्म ते होवोनी |
विनम्र वंदन त्यांचे चरणा, मार्ग दाविला हा त्यांनी || ३२४.

त्यांचे मार्गीची चालावे, अनुभव घ्यावा ब्रह्माचा |
आदर्श अनुसरुनियाचि होईल, लाभचि तुर्या प्राप्तीचा || ३२५.
कृपावंत ते त्यांनी व्हावे, चुकल्या मार्गा दावावे |
अलभ्य या नरदेहाचे ते सार्थक करुनिया घावे || ३२६.

श्लोक- तस्मादेवं विदित्वैनमद्वैते योजयेत्स्मृतिम् ।
अद्वैतं समनुप्राप्य जडवल्लोकमाचरेत् ॥ ३६ ॥

होता प्राप्ती ती ज्ञानाची, अद्वैतास ना सोडावे |
अखंड चिंतन ब्रह्मत्वाचे, द्वैती कदा ना गुंतावे || ३२७.

भगवंताची बलशाली माया, तिच्या कदा ना ये पकडी |
भल्याभल्यांना चकवा देई, मोहाची दावी गोडी || ३२८.

सावधान ते नित्य राहुनि, सदा विवेका आचरणे |
स्तुती-निंदा वा अपमानाने, विचलित कदापि न होणे || ३२९.

श्रवण-मनन नि निदिध्यासनहि, करुनी ब्रह्मचि दृढ मनी |
नि:संगे तो संग करावा, शुद्ध अंतरी राहोनी || ३३०.

अद्वैताची नित्य प्रचीति, जगी अलौकिक ना व्हावे |
जगा होऊनि नित्य धाकटे, सेवेला ना सोडावे || ३३१.

या लोकी जे आलो आपण, स्वकर्म निष्कामे करणे |
उदासीन ते नित व्यवहारी, विवेकास ते आचरणे || ३३२.

नाश अनर्थाचा तो करुनी, परमचि कल्याणा करिते |
ऐशा अद्वय ब्रह्मालागी, जाणुनि घ्यावे ते पुरते || ३३३

सुख-दु:खाला समचि मानुनी, लाभ नि हानी नसे मनी |
उत्तम मार्गे धन कमवावे, विनियोगचि तो उदासुनी || ३३४.

जी ही साधन संपत्ती ती, लाभे ज्ञाता त्या जाणे |
सारे स्वामींचे, त्या-साठी, विनियोगचि तो पूर्णपणे || ३३५.

समान दृष्टी ती सकलाशी, द्वेष असूया नसे मनी |
मन बुद्धी मम चरणी वाहुनि, अंतरात समाधानी || ३३६.

ना ज्ञानाची कदा हि प्रौढी, जगा भासवी जणु वेडा |
अनासक्त तो जगती ओढित, निजकर्माचा नित गाडा || ३३७.

कसोटीचे ते प्रसंग येता, विपरित होई परिस्थिती |
पूर्ण शरण ते हरीशी जावे, देईल योग्यचि तोचि मती || ३३८.

श्लोक- निस्तुतिर्निर्नमस्कारो निःस्वधाकार एव च।
चलाचलनिकेतश्च यतिर्यादृच्छिको भवेत् ॥ ३७ ॥

मन वाचा नि कायेनेहि, कर्म जेहि ते करीतसे |
कुणा न सांगे, नसे गवगवा, परहिताविण कार्य नसे || ३३९.

सत्काराशी सदैव टाळी, स्तुती नकोशी ती श्रवणी |
पाया वंदन त्या न आवडे, नम्रभाव परि नित्य मनी || ३४०.

जरि शास्त्रांचे ज्ञान तयाशी, जनी प्रदर्शन ना त्यांचे |
कुणी विचारी तयास सांगे, व्रतचि अन्यथा मौनाचे || ३४१.

व्रत-वैकल्ये, दैवत पूजन, वा देखावा भजनाचा |
हे सारेचि त्याज्य तयाला, संग नित्यचि ब्रह्माचा || ३४२.

साक्षी भावे लक्ष तयाचे, उचित न्याय तो भुमिकेला |
होण्याआधी कृति तपासी, विवेक नित्यचि अनुसरला || ३४३

यथाशक्ती ती मदत गरजुला, नसे अपेक्षा परि स्तुतीचि |
कुणा पासुनि नसे अपेक्षा, फल वा मानही घेण्याची || ३४४.

वादळ येवो, महापूरहि, विपरित कांही अन्य स्थिती |
ही सारी स्वामींची लीला, मनी कदा ना त्या खंती || ३४५.

सहजी आले जे वाट्याला, ईश-प्रसादचि तो मानी |
जेही लाभे तृप्त तयाताचि, नसे अपेक्षा कांही मनी || ३४६.

सारे जगती जेही पाही, आत्मदर्शनचि तया घडे |
अनुभूती त्या चैतन्याची, उपाधीत जे गुप्त दडे || ३४७.

दैवास्तव देहाचे पाळण, नसे आवडी खाण्याची |
जेही लाभे जसेहि लाभे, तये पूर्तता देहाची || ३४८.

श्लोक-तत्त्वमाध्यात्मिकं दृष्ट्वा तत्त्वं दृष्ट्वा तु बाह्यतः ।
तत्त्वीभूतस्तदारामस्तत्त्वादप्रच्युतो भवेत् ॥ ३८ ॥

तत्व हे न ऐकणे न बघणे, अंतर्बाह्यचि अनुभवणे |
मीच ब्रह्म प्रत्यक्ष अनुभूती, सारीकडे प्रत्यय येणे || ३४९.

एकरूपता अनुभूतीशी, मीचि सर्व येता प्रतिती |
परमसत्य हे मीच असे ही, ऐशी नित्यची अनुभूती || ३५०.

दिव्य अनुभूती आत्मरुपाची, नलगे साधन वा कि स्मृती |
पूर्ण विश्वचि एकरूप हे, व्यष्टी समष्टी कुणी नसती || ३५१.

आता संपले जाणे-येणे, वा कांही प्राप्तहि होणे |
कदा न विचलित या सत्याहुनी, ब्रह्मभावचि अनुभवणे || ३५२.

निदिध्यासन ते ना सोडावे, नाही सोडणे व्यवहारा |
देहा करू दे स्वधर्म पालन, कुठे गुंतणे नाही जरा || ३५३.

सारे जरि माझेच असे तरि, स्वामित्वाला ना थारा |
नसे एषणा, ममत्व तैसे, समजुनी नाटक, व्यवहारा || ३५४.

जगताचा हा सर्व पसारा, त्यांत असुनिही परि नसणे |
बहुरूप्याच्या खेळामाजी, अलिप्त राहुनि जणु करणे || ३५५.

परि व्यवहारा कांही करता, मिथ्या ना त्या समजावे |
प्रसंग व्यक्ती व्यवहारहि ते, खरे समजुनीचि व्हावे || ३५६.

परंतु मी कांही जे केले, जणु ना केले, वृत्ती अशी |
वाहत वारा वृक्ष डोलतो, कृति कुणाची नाही जशी || ३५७.
मजचि स्तव हे सर्व जाहले, परि हे मी नाही केले |
अशी निःसंगी नित्य भावना, कर्तेपण पुरते विरले || ३५८.
गंगेचे ते नित्य वाहणे, भागवीत सहजचि तृषा |
स्नान स्वच्छता वृक्ष पोषणे, कैक पूर्तता जरि अशा || ३५९.
गंगेमनी ना कर्तेपण वा, जाणहि घडले जे त्यांची |
जे होई ते न घडविले, होऊनि जाई सहजेची || ३६०.
या विश्वी ना कुणीही कर्ता, एक दुज्यांच्या ज्याही कृती |
नियमे सारे विश्व चालते, चंद्र पाहता जशी भरती || ३६१,
सारे बदले क्षणोक्षणी ते, परमसत्य परि ना बदले |
द्वैता-अद्वैता उमगोनी, निःसंगचि राहणे भले || ३६२.
सुख-दुःख नि ते शीत-उष्णहि, सारे येती नि जाती |
ऊन-सावली खेळ नित्यची, विचलित ना तेणे वृत्ती || ३६३.
एक परंतु ध्यानी ठेवी ते, प्रभावीच माया पगडा |
एकदा जरि, कधि गुंतले, धावे उतरणीस गाडा || ३६४.
कमावणे बहु कठीण असे ते, गमावण्याला क्षण न लगे |
मार्कंडेय नि नारद भुलले, जरि राहिले सत्संगे || ३६५.

**म्हणुनी विवेके, नि वैराग्ये, सावध राहुनी हरी भजनी |**

**जगती आचरुनी स्वधर्मा, हरी नित्यचि ठेवी मनी || ३६६.**

|| हरी ॐ ||

**श्री गौडपाद मांडुक्य कारिका ‘वैतथ्य प्रकरण भाष्य समाप्त**

तुवा करविले तुला समर्पण

{१४/०५/२०२१. अक्षय्यतृतीया}

पूज्य गौडपाद यांच्या मांडुक्य कारिकातील दितीय वैतथ्यप्रकरणाने काय शिकविले?

मांडुक्य उपनिषदाच्या ७ व्या मंत्रात तूर्या - आत्म्याचे वास्तव स्वरूप विषद केले आहे. तूर्या अगर आत्मा यांच्या व्याख्येतील दोन महत्वाचे शब्द म्हणजे, प्रपंचोपशमन आणि अद्वैत.

प्रपंचोपशमन म्हणजे प्रपंच मिथ्यत्व. प्रपंच म्हणजे जागृतीत अनुभूत होणारे जग. उपशम याचा शब्दश: अर्थ अभाव- नसणे. याचा अर्थ आपल्याला दिसणारे; परंतु वास्तविक नसलेले. जे नसतांनाही फसवे असल्याने भासणारे. यालाच मिथ्या अथवा वैतथ्य असे म्हणतात.

गौडपाद यांनी ३८ कारीकांचे एक पूर्ण प्रकरण त्यासाठी खर्ची घातले आहे. दिसणारे फसवे जग आणि त्याशी व्यवहार याचा खुलासा ते करतात. अद्वैत विषय पुढील प्रकरणात घेतलेला आहे.

१. स्वप्न-जगताचे मिथ्यत्व (कारिका १ ते ३ )

गौडपाद यांनी रोजच्या अनुभूतीतील स्वप्न कसे मिथ्या असते हे, त्यासाठी समजावून सांगण्यासाठी घेतलेले आहे. त्यावरून जागृतीतील जगाचा सादृश्यतेने विचार समजणे जाते. स्वप्न मिथ्या असल्याची ते दोन कारणे त्यासाठी देतात. ज्याचा जागृतीतील अनुभूतीशी सापेक्ष विचार करणे सुलभ होईल. कोणत्याही पदार्थाला काळ आणि जागा यांची उपलब्धी आवश्यक असते. तसेच पर्याप्त काळ आणि जागा त्याच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते. या उभय पूर्तता नसल्या तर

पदार्थाचे अस्तित्व वस्तुत: नसते. हत्ती सुटकेसमध्ये घातला ! असे वचन मिथ्या मानावे. अपुरी जागा असताही हत्तीचे अस्तित्व कसे असू शकेल?

सारे स्वप्न जगत माझ्या देहात- मस्तकात- निवास करते. अनेक दऱ्या डोंगर, हत्ती-घोडे, सूर्य-चंद्र आदि त्या मर्यादित जागेत अगदी मर्यादित काळात दृश्यमान होतात. त्याचा निवास आणि अस्तित्व यासाठी लागणारा काळ आणी जागा त्यासाठी अपुरी आहे. त्यामुळे तो आभास आहे. मिथ्या आहे. त्यांचा अनुभव येतो पण त्यांचे अस्तित्व नसते. ती अनुभूती वास्तव नसते. स्वप्नातील प्रसंग आणि पदार्थ व व्यक्ती त्यामुळेच परंतु स्वप्नात असतांना त्यांचे अस्तित्व खरे वाटते. जागृत झाल्यावर त्यांचे मिथ्यत्व उमगते,

२. अहं सत्यं- जगन्मिथ्या (कारिका ४ ते १८)

दुसरे प्रकरणातील महत्वाचे प्रतिपादन या विभागात आहे. ज्याद्वारे जागृतीतील दृश्य-अनुभूत जगत सुद्धा स्वप्नासाखे सत्य वाटत असताही मिथ्या असल्याचा खुलासा आहे.

याचे कारण काय? गौडपाद म्हणतात, याचे कारण जरा वेगळे आहे. येथे जागेचा अभाव नसतो. गौडपाद कारिका ६ मध्ये म्हणतात, स्वप्नजगत मिथ्या असण्याचे मुख्य कारण म्हणजे त्याचे अस्तित्व व्यक्तिगत आणि निव्वळ त्या-त्या अनुभूती कालखंडानुसार असते.

जागृतीतील जगत जागृतीत अनुभूत होते, मात्र स्वप्नात आणि सुषुप्तीत त्यावर पडदा पडतो. त्याची अनुभूती जागृती काला पुरती असते. स्पप्नसृष्टी आणि जागृतीतील जीवसृष्टी त्या-त्या काळापुरते अनुभूत होतात. इतर काळी त्यांचा अभाव असतो. दोन्ही त्याबाबत सारखेच आहेत. मिथ्यत्व नियम उभयतांना लागू पडतो.

अन्य महत्वाच्या शंकावरील खुलासा करणाऱ्या गोष्टी

१. सत्य असलेल्या गोष्टीचा उपयोग व्हायला हवा. या आग्रहावर गौडपाद म्हणतात, त्या-त्या जगातील गोष्टी त्या-त्या जगातच उपयोगी आहेत. परंतु दुसरीत नाहीत. म्हणून उभय मिथ्या आहेत.

२. जागृतीतील जगत बाहेरची अनुभूती असते. परंतु स्वप्न सृष्टीची अंतरीची असते. त्यामुळे केवळ स्वप्नसृष्टी आंतली असल्याने मिथ्या मानावी. परंतु जगताची बाह्य असल्याने सत्य मानावी. या आग्रहावर गौडपाद म्हणतात, स्वप्नात असतांना स्वप्न सृष्टी बाह्यच वाटते, त्यामुळे हि तर्कप्रणाली चूक आहे.

३. सातत्य हि सत्य असण्याची महत्वाची खूण आहे. जागृतीतील जगत अविरत चालूच असते. त्यामुळे ते सत्य आहे. तसे स्वप्नसृष्टीचे नाही. ते विस्कळीत असते. त्यामुळे ते मिथ्या असते. गौडपाद म्हणतात, उभय सृष्टी अनुभवतांना आपण स्वत:ला जागृत समजतो पण वास्तव तसे नसते.

४.	जागृतीत दिसणारे जगत प्रत्यक्ष जसे आहे तसे अनुभवता येते, पण स्वप्नाचे तसे नाही. म्हणून स्वप्न सृष्टी मिथ्या आहे पण जागृतीतील नाही.

यावर गौडपाद म्हणतात, उभयांना स्वतंत्र सत्यता नाही. कोणतीही व्यक्ती वा पदार्थ नेहमी बदलता आणि द्रष्ट्यानुसार वेगळा असतो, तसेच जे आज असते, ते उद्या नसते. त्यामुळे दृश्य जगत मिथ्याच आहे. जरी जग एकच आहे, प्रत्येकाला अनुभूत होणारे जगत वेगवेगळे असते. त्यांच्या दर्शनाला सातत्य नाही.

गौडपाद म्हणतात, जोवर मला सत्य उमगत नाही, तोवर, मला मिथ्याही सत्य वाटत राहते. सत्याविषयक अज्ञान हे मिथ्याला सत्य मानते. रज्जू सर्प वाटणे हे त्याचेच उदाहरण आहे. जागृतीतील मिथ्या समस्या निर्माण करते.

मिथ्या हे स्थिर नसते. आणि जगत कदापि स्थिर नसते. सत्य नित्य आणि शाश्वत असते. तसे जग नाही त्यामुळे ते मिथ्या आहे.

मिथ्याला सत्य समजून त्याचा आधार घेतल्याने अनेक समस्या उभ्या राहतात. तत्कालीन पद, नाम, स्थान, कीर्ति, ताकद आणि अवस्था तसेच नाते-संबंध यांचा आधार किती फसवा असतो, हे आपण प्रत्यही पाहतो. मिथ्या मिथ्याच राहते. त्याचे मुख्य कारण अज्ञान आहे.

३.	चुकीचा सत्याशी संबंध (कारिका १९ ते २९ )

मीच सत्य आहे. परंतु आपणाला इतर समजतो, त्यामुळे अनेक समस्या उद्भवतात. मी वस्तू वा पदार्थ नव्हे. विज्ञान द्रव्याला सत्य मानते. कुणी परमाणु सत्य मानतात. कुणी प्रकृती. कित्येक धर्म व संप्रदाय नुसार अनेक दैवते सत्य मानतात. गौडपाद म्हणतात, सत्य एकच आहे पण गैरसमज अनेक.

शेवटी गौडपाद निखालस सत्य सांगतात. अनात्मा जरि मिथ्या आहे, तरि आत्मा सर्वव्यापी असल्याने त्याचे अस्तित्व –असणे- हे आत्म्यामुळेच आहे. सर्प असत्य असला तरी त्याचे अधिष्ठान दोर, सत्य आहे. त्यामुळे श्रद्धेनुसार प्रार्थना अनात्माला असल्या तरी, आपल्याला कारिका २९ अनुसार सर्वव्यापी आत्म्याद्वारे इच्छित फळ मिळते. त्यामुळेच द्वैत भक्ती त्याज्य नव्हे पण ती प्राथमिक अवस्था आहे. शेवटी अद्वैत हेच परम-सत्य आहे.

४. ४ ते १८ मधिल शिकवणुकीचा सारांश कारिका ३० ते ३४.

अ. }जागृतीतील जग आणि स्वप्न-जगत दोन्ही मिथ्या आहेत.

आ. }द्वैत हे जागृतीतील किंवा स्वप्नातील असो, मिथ्याच आहे.

इ. }अद्वैत हाच आधार आहे. तुर्या –आत्मा हेच परम सत्य आहे.

ई. } द्वैताने प्रत्येक गोष्ट प्रत्येकाला वेगळाली दिसते-अनुभूत होते. हे मिथ्यत्वाने घडते. द्वैत आणि जाणवणारा भेद दोन्ही मिथ्या असतात.

३.	}घट आणि माती एका दृष्टीने सत्य, तर दुसरीने उपयोगानुसार मिथ्या वाटतात. पण वस्तुत: दोन्ही एकच आहेत. मातीत पाणी भरता येत नाही, ते घटात भरता येते. व्यवहार म्हणून द्वैत अंगिकारावे लागते. प्रारंभिक अवस्थेत भक्त-भगवंत हे पावन-द्वैत राहते.

गौडपाद म्हणतात, अनात्मा आणि आत्मा यांचा फरक अनुभूत असतो पण सांगता येत नाही. परंतु अनात्माचे अधिष्ठान आत्माच असते. द्वैत हे अद्वैतावर आरोपित असते. जसे जळावर तरंग. म्हणून हे भेद जरि जाणवत असले तरि ते वरवरले आहेत. मिथ्या आहेत.

व्यवहार होण्यास द्वैत आवश्यक असते. अनुभूती-व्यवहार आणि उपयुक्तता यासाठी द्वैत अंगिकारले तरि, अद्वैताचे आपले मूळ स्वरूप विसरू नये.

जगातील गोष्टींशी म्हणून जगासारखे वागावे. मात्र त्यातील शांती, सुरक्षा, आणि आनंद यांवर अवलंबून राहू नये. त्यासाठी ब्रह्म- आत्मा समर्थ आहे. जोवर आत्मा उमगत नाही, तोवर ईश्वराचा आधार घ्यावा.

प्रसंगांचा प्रवाह चालूच राहणार. पण त्याचा आपल्यावर परिणाम होऊ नये. मी अद्वैत सत्य आहे. जगत द्वैत मिथ्या आहे. हे गीतेतील कृष्णाचे वचन ध्यानी ठेवावे.

५.	साधना आणि फळे (३५-३८)

श्रवण. मनन आणि निदिध्यासन याचा खुलासा मागे आला आहे. निदिध्यासनाचे प्रकार दोन. एक समाधी-अभ्यास रूपा आणि ब्रह्म-अभ्यास रूपा

पहिल्याने ठराविक वेळी करण्याची साधना आहे, तर दुसऱ्यात जगाशी व्यवहार करतांना सावधानता ठेवण्याचे भान ठेवणे आहे. निदिध्यासन करतेवेळी मागील प्रकरणातील महत्वपूर्ण पांच गोष्टी पुन्हा खाली देत आहे.

१. मी सर्वव्यापी जाणीवेचाच भाग आहे.

२. मीच स्थायी शांती, सुरक्षा आणि आनंद यांचा स्रोत आहे.

३. माझ्या केवळ अस्तित्वाने मी भौतिक व जड देहाला जीवन देतो.

४. कोणताही प्रसंग मला विचलित करू शकत नाही.

५. माझ्या मूळ स्वरूपाचे विस्मरण होण्याने आयुष्य एक ओझे बनते. परंतु माझ्या शुद्ध जाणीवेने मी जीवन हा दैवी प्रसाद बनविला आहे.

या पांच गोष्टी सहजी प्रज्ञेत ठाम झाल्या पाहिजेत. त्यासाठी निदिध्यासन आवश्यक असते. याचे स्मरण नव्हे तर अनुसरण आवश्यक आहे. त्यामुळे परमसत्याशी तादात्म्यता येते. साधक आत्मनिष्ठ, ज्ञाननिष्ठ, तुर्यानिष्ठ, स्थितप्रज्ञ किंवा ब्राह्मीस्थितीत

असणारा होतो. हेच तर जीवनाचे उद्दिष्ट आहे. सुदैवाने पूज्य गौडपाद यांच्या अनमोल कारिका काळाच्या ओघात लुप्त झाल्या नाहीत. आणि तत्वचिंतक त्यावर अभ्यास करून भाष्य देतात त्याची उपलब्धी आहे.

जीवन मंगल व सफल होवो. हीच शुभेच्छा . ||हरी ॐ||

अण्णा

सुधारित विस्तार

२८/०५/२०२१ १८/०६/२१.




# प्रकरण तिसरे

# अद्वैत

# मांडूकय कारिका प्रकरण तिसरे –अद्वैत

|| हरी ॐ ||

जरि विकल्पचि प्रपंच केवळ, सहजी तो जाईल लया |

आगमात हे कथिले पूर्वी, शेवट ना तो म्हणुनि तया || १.

जोवरी ब्रह्म, भले अद्वैती, खेळ न संपे द्वैताचा |

अद्वैताला समजुनि घेऊ, कळेल अर्थहि खेळाचा || २.

मंत्र सातवा श्रुतीत सांगे, उपशम होत प्रपंचाचा |

कळेल अर्थहि आता येथे, उपशम नि अद्वैताचा || ३.

अभाव द्वैताचाचि समजता, अद्वैताची उकल घडे |

दृश्य ‘दिसे’ परि ‘नसे’ म्हणावे?, उलगडेल हेही कोडे || ४.

## तृतीय अद्वैत प्रकरण प्रारंभ

श्लोक-*ॐ उपासनाश्रितो धर्मो जाते ब्रह्मणि वर्तते ।*

*प्रागुत्पत्तेरजं सर्वं तेनासौ कृपणः स्मृतः ॥ १ ॥*

श्लोक-*अतो वक्ष्याम्यकार्पण्यमजाति समतां गतम् ।*

*यथा न जायते किंचिज्जायमानं समन्ततः ॥ २ ॥*

जीव उपासक तो ब्रह्माचा, जन्म घेतसे पुनःपुन्हा |

म्हणे सृष्टीच्या आरंभी तर, जन्माचे ते नामचि ना ? || १.

या इहलोकी विशाल सागर, दऱ्या नि डोंगर सर्व दिसे |

वेगवेगळ्या व्यक्ती प्राणी, कैसे सृजनावाचुनि रे ?|| २.

गौडपाद त्या कृपणचि म्हणती, ज्ञान न झाले त्या पुरते |

कारण ब्रह्मा अलग मानणे, दर्शवी उणीव ज्ञानाते || ३.

जगत दिसे प्रत्यक्ष समोरी, ऐके, बोले, व्यवहारे |

कैसे त्या जाणत्या म्हणावे, तूं अज्ञानी कृपण रे || ४.

द्वैत मानिता, प्रपंच दिसतो, तुर्या परि ती अद्वैती |

ज्ञानदृष्टी ती हवीच येथे, उकलचि होण्या ती पुरती || ५.

जेंव्हा उमगे ‘मीचि तुर्या’, उमजचि ही तर द्वैत असे |
कारण ‘मी’ नि ‘तुर्या’ एकचि, ‘अमुक’ म्हणावे मग कैसे? || ६.

उपाधीच भगवंत-भक्त या, द्वैत सूक्ष्म हे दावितसे |
जाणीव-नेणीव नाहीच तेथे, ‘होणे’ वदणे मग कैसे? || ७.

येथे ना जाणीव ‘अमुक’ मी, केवळ त्यासी अनुभवणे |
शब्दातीतचि, शब्दी कैसे, निजरुप माझे मी जाणे || ८.

ज्ञाता आचरता संसारी, ‘पावन द्वैत’चि त्या म्हणणे |
अद्वैताचे भान ठेऊनी, अलिप्ततेने आचरणे || ९.

अंतरी अद्वैती राहुनिया, संसारी ते आचरणे, |
भक्ती द्वैते केली तरीही, अद्वैता पुरते जाणे || १०.

‘पावन द्वैता’च्या आधारे, भक्त जाणतो, प्रपंच हा |
आभास केवळ वरवरलाचि, अद्वैतचि ते त्यांत पहा || ११.

व्यवहारास्तव मानी द्वैता, परि भान हे ठेवावे |
अद्वैताविण अन्य न कांही, कल्पित मिथ्या मानावे || १२.

द्वैत मानणे तात्पुरतेचि, जणु तात्कालिक उपचार |
ठाम निश्चये पुढे उमगते, रूपे सर्व निराकार || १३.

दोन असती ते प्रकार द्वैता, द्वैतचि कारण संसारा |
एकामाजी मी जीवात्मा, दिसणारे जग हा दुसरा || १४.

त्यास म्हणावे लौकिक द्वैत नि, पावन द्वैतचि ते दुसरे |
भक्त आणि भगवंत वेगळा, प्राप्ती उपासनाद्वारे || १५.

अंती न राही द्वैतामाजी, अभाग्यचि राहणे तसे |
गौडपाद ते प्रयास करिती, हे सारे अद्वैत असे || १६.

कुणी म्हणे मी भगवंताशी, ऐक्यचि पुरते साधियले |
कल्पनेचिया राज्यी अजुनी, ब्रह्म तयाला नच कळले || १७.

कुणी रंगती, सगुण भक्तीच्या, देखाव्यातचि ते पुरते |
श्रुती सांगती, प्रपंच मिथ्या, परि राहणे त्यांतचि ते || १८.

लाभुनिया हा दुर्लभ जन्मही, द्वैती अंतचि ना व्हावा |
उमगावे ते सत्य अद्वैती, अनुभव तैसाची यावा || १९.

यासाठी या अध्यायाची, केली योजना समजाया |
द्वैतामधुनी या बाहेरी, पुरते जागृत होऊनीया || २०.

नसे जन्म वा पुनरावृत्ती, नसे सृजन वा लय येथे |
सत्य ज्ञान हे यथार्थ व्हावे, जाणुनि घ्यावे तुर्येते || २१.

जगताचे असणे जरी मिथ्या, अनुभव त्याचा ना मिथ्या |
गौडपाद ते म्हणती ऐसे, जाणुनि घ्यावे या सत्या || २२.

प्रपंचास तो मिथ्या म्हणुनी, व्यवहाराला ना करणे |
अभिप्रेत हे नाही त्यांना, केवळ बंधनी ना पडणे || २३.

पुरता द्वैती भक्त असे जो, अभागीच गणने त्याशी |
तो अजुनी ना 'तुर्या' झाला, निगडित तो संसाराशी || २४.

असे भक्त ते जीवात्माचि, म्हणे जन्महि मम झाला |
पावन द्वैता'च्याच तीरावर, कल्पनेत परि तो रमला || २५.

ईश्वर राज्यी कार्य नि कारण, ऐसा भेद मुळी न असे |
ब्रह्माने ना जीव निर्मिला, कल्पनाच ती, सृजन नसे || २६.

जीवात्म्यास ते व्यर्थ वाटते, कधि होतो मी हरीजवळी |
ताटातूट कधी ना झाली !, सारी कल्पनेची खेळी || २७.

ब्रह्माहुनी जे मानिती परके, कर्मयोगी त्यांनी व्हावे |
आधीच जे की, प्राप्त असे त्या, प्राप्तीस्तवचि कष्टावे || २८.

ब्रह्मावाचुनी नसेचि कांही, दुजे न कांही संभवते |
नसे दुज्याची कदापि वार्ता, अन्य कुणीही वा दिसते || २९.

जेही घडते, कुणी न घडविते, सहजी दिसे ते आकारी |
कुणी ना सृजिले, वा घडवियले, निश्चल ब्रह्म न कांही करी || ३०.

ब्रह्म न कारण या जगताला, उसना आधार तो दिधला |
जसे जळावर तरंग येती, सागर ना कारण त्याला || ३१.

कुणी मागता पिण्यास पाणी, तहान भागाया त्याची |
कपात देणे पाणी परंतु, परतची घेणे तो कपची || ३२.

तैसे समजायास्तव म्हटले, ब्रह्मचि कारण जगताचे |
काढी अध्यारोपा अपवादे, अमृत पडता बोधाचे || ३३.

ब्रह्माला ना जन्म नि बदलहि, नच सृजीते ते कवणाला |
बदल नि सृजन आभास केवळ, समजे हे परि ज्ञात्याला || ३४.

ते ना येई शब्दी वर्णिता, दृश्य म्हणुनि ना दाखविता |
ते तर वाणीस करि बोलकी, कधि न सोडी अद्वैता || ३५.

श्लोक- *आत्मा ह्याकाशवज्जीवैर्घटाकाशैरिवोदितः । घटादिवच्च संघातैर्जातावेतन्निदर्शनम् ॥ ३ ॥*

आता जीवसृष्टीचे 'नसणे', सिद्ध करिती ते तर्काने |
उदाहरण म्हणुनि त्यासाठी, पोकळी घेतली ती ऋषीने || ३६.
आत्मा –तुर्या यांची तुलना, केली त्यांनी पोकळीशी |
स्पर्शिता न ये आणि दिसेना, हे गुण आहे उभयाशी || ३७.
निराकार नि रंग-हीन ते, असेची सर्वव्यापी तसे |
अखंड आणि निर्लेपचि ते, सकला सामावित असे || ३८.
खुली पोकळी, व्याप्त पोकळी, प्रकार ऐसेहि झाले |
कुंभाराने घटा निर्मिता, बाहेरील नि ते आंतले || ३९.
अखंड आकाशाचे विभजन, बाधा जरीही ना त्याला |
व्याप्त पोकळी, ये उपयोगा, नाम-रूप ही, व्याप्तीला || ४०.
अनेक घट ते विविध प्रकारे, आकाशाही, नामे ती |
मूळ स्वरूपी, परि आकाशा, नसेचि कांहीही क्षिती || ४१.
अनेक देह नि मने अनेकही, सारी निर्मिती मायेची |
सर्वव्यापी ती एकचि जाणीव, परि अनेकता झाली तिची || ४२.

मुख्य देहीचि व्याप्त ती जाणीव, मी-पण त्यांतचि होत असे |
‘माझे’ मन नि देह हि ‘माझा’, अशी अहंता त्यांत वसे || ४३.

सर्वव्यापी ती जाणीव तिजला, अशी अहंता मुळी नाही |
व्याप्त जाणीवेशी ते येता, जीवात्मा अशी संज्ञा ही || ४४.

सर्वव्यापी त्या जाणीवेसचि, म्हणू लागले परमात्मा |
दोन भेद हे कल्पित असती, अखंड परि राही आत्मा || ४५.

आकाश जरि ते निराकारचि, घटात दिसते वाटोळे |
छप्परास ते जसे छिद्र ते, दिसते तैसे त्याजमुळे || ४६.

आकाशातुनी सृजन नसे हे, सीमित दृष्टीने केले |
जागा दृष्टीची ती बदलता, काय  नवेपण त्या आले?|| ४७.

असले सृजन नसे निर्मिती, प्रतीति ही आकलनाची |
जसे आकलन तशी अनुभूती, मूळ रूपा ना बाधाचि || ४८.

कुंभाराने घटा निर्मिता, व्याप्त पोकळी ये सहजी |
तिला वेगळी नसे निर्मिती, सहज सृजन व्याप्तीमाजी || ४९.

जैशी घटाकाशीची सहजी, पोकळी होई व्याप्तीने |
तसा जीवात्मा ‘ये जन्माला’, देहाच्या आवरणाने || ५०.

सर्वव्यापी परब्रह्म वेढिले, देही जागा भरण्याला |
स्पर्शचि चैतन्याचा होता, सजीवता ती देहाला || ५१.

देह, इंद्रिये आणि मनही, आपुली ती करिती कार्ये |
ईश्वर मायेने हे घडते, जीव अलिप्तचि असे तये || ५२.

अशी सजीवता जोवरी देही, नाम तयाला जीवात्मा |
देह सोडिता, चैतन्याविण, मुक्त पोकळी परमात्मा || ५३.

सर्वव्यापी तो असीम आत्मा, व्याप्त मन नि तो देहाने |
व्यवहारास्तव द्वैतचि लागे, तरीच होईल आचरणे || ५४.

व्याप्त पोकळी ये उपयोगी, घडे व्यवहारचि तो तेणे |
कांही वस्तूला भरणे वा, वाहुनिया कांही आणणे || ५५.

नाम रूप ते बदले जगती, जरि पोकळी एक असे |
व्यवहाराच्या कार्ये नामे, ओळख अन्यथा ती कैसे?|| ५६.

कुणी काठीने पाण्यावरती, रेष रेखिता तीही दिसे |
सहजी जाई तीही विरुनी, 'जन्म मृत्यू' हा काय असे?|| ५७.

दृष्टी आमुची सीमित जैशी, तैसे भासे आकारे |
निराकारपण आकाशाचे, परी बाधित होते कारे?|| ५८.

रज्जूला ते सर्प कल्पिता, दचकुनी होई माघारी |

सर्पाचा कां जन्म जाहला? उजेडात तो नसे परी || ५९.

मंदबुद्धीचे असती त्यांना, जोवरी सत्य न उलगडले |

त्यांना व्यवहारास्तवचि सांगणे, कर्मे भोगचि हे आले || ६०.

पृथ्वीपासुनी घटा निर्मिती, उणीव ना परि पृथ्वीला |

भंग घटाचा होतो जेंव्हा, अधिक कांही नच मिळे तिला || ६१.

तैसा आत्मा जीवरूपाने, जरि अलगचि तो भासे |

नाम, रूपहि होत वेगळे, ब्रह्म परि जैसे तैसे || ६२.

ब्रह्म असे ते सर्वव्यापीची, जरि वेगळे कांही दिसे |

ब्रह्म परि ते असेच तेथे, प्रश्न प्रवेशाचा ही नसे || ६३.

*श्लोक- घटादिषु प्रलीनेषु घटाकाशादयो यथा । आकाशे संप्रलीयन्ते तद्वज्जीवा इहाऽऽत्मनि ॥ ४ ॥*

{हीच कारिका अनुवादिली, बुद्धवाङ्मयी मुक्तपणे |
तिबेटातल्या आहे ग्रंथी, 'शांतरक्षिता' बौद्धाने || ६४.

भंग पावता घटादि पात्रे, माती मिळते मातीशी |
आकाश आंतील मुक्त(?) होतसे, आणि मिळे बाह्याकाशी || ६५.

परि मुक्ती ही अध्यारोपचि, तसेच 'मिळणे' ही नसते |
नित्य मुक्त ते आकाश असता, 'मुक्ती' नि 'मिळणे' नाही ते || ६६.

शब्द योजिले समजायास्तव, अपवादे ते ही मागे |
जीव तसाची नित्य मुक्तचि, ऐसेची श्रुती ते सांगे || ६७.

जेंव्हा देहाचे आवरण, पंचत्वी विरुनी जाते |
देही कोंडले आत्मतत्व ते, सहजी स्वरूपी सामावते || ६८.

आधीही ते मुक्तचि होते, सर्वव्यापी ते नित्य असे |
जाणे येणे नसते त्याचे, नित्य जवळी तरि तेच वसे || ६९.

नित्यचि घडते, येणे जाणे, देह क्षर हा नश्वरची |
आत्मतत्व ते सर्वव्यापीची, निश्चल ते तर तैसेची || ७०.

उत्पत्ती, स्थिती आणि लयही, ही तर केवळ अनुभूती |

बाह्य दृष्टीने वाटे सारे, मायेची ही सर्व कृती || ७१.

धर्म अधर्म ही इंद्रियेची ती, घडवुनी आणिती मन द्वारे |

वाटे ऐसे जीवात्म्याने, घडवियलेचि हे सारे || ७२.

सुषुप्ती काळी, ब्रह्म निकट ते, परि अज्ञाने ना कळते |

शांत स्थिरावे, जीव तेधवा, भरती ये आनंदाते || ७३.

आत्मतत्व ना अलग कदापि, आवरण देहाचे नडते |

अहंकार तो विलया जाता, सहजी त्याशी समरसते || ७४.

या समरसण्यास्तव कृती असेना, ना कुठले येणे जाणे |

आधीही ते होते तेथे, घडले केवळ समरसणे || ७५.

म्हणुनि जीवात्मा वा परमात्मा, ऐशी उपाधी अलगपणा |

नाही दोन ते, कधिही नव्हते, ऐक्याला ती बाधा ना || ७६.

कांही न सृजिते, वा लय होते, खेळ असे हा भ्रांतीचा |

जैसा खेळामाजी रमता, विसर सहजी तो स्वरूपाचा || ७७.

या जगताचे नित्य बदलणे, येणे लयास ते जाणे |

अनुभव हा तर नाही मिथ्या, सत्य नाही परि ते 'दिसणे' || ७८.

अनुभव जैसा तसे वागणे, परि मिथ्या हे ठेवी मनी |
लहरी येती आणि जाती, सृजन नि लयही नच दोन्ही || ७९.

जरी अनुभवे पृथ्वी स्थिर ती, सारे फिरते त्याभंवती |
निर्णय परि तो आता बदलला, फिरे आपुल्याची भवती || ८०.

जरि अनुभव तो आताही तोचि, सारे फिरते तिज भवती |
बदले निर्णय नच अनुभव तो, तसे पाहणे या जगती || ८१.

जीवात्मा नि प्रपंच दोन्ही, ब्रह्मासवेची अस्तित्वी |
प्रपंच म्हणुनि जीवात्माही, ऐसी सहजी जाण हवी || ८२.

प्रपंच निर्मिती ब्रह्म न कारण, सहजी सृजन त्या जन्म नसे |
ब्रह्मा संगे जगतहि सहजी, जन्म म्हणावे त्या कैसे?|| ८३.

भिडू भिडू ते दोन बाजूचे, शिपाई मी नि तूं राजा |
खेळ संपता, पुन्हा एक ते, खेळापुरती असे मजा || ८४.

जगतामाजी व्यवहारास्तव, अनुभव येई द्वैताचा |
गौडपाद ना म्हणती खोटा, तरंग लहरी लाटांचा || ८५,

करिता व्यवहारचि या जगती, त्याच तऱ्हेने वागावे |
परि अंतरी ठाम असावे, त्यांत कुठे ना गुंतावे || ८६.

*श्लोक- यथैकस्मिन्घटाकाशे रजोधूनादिभिर्युते ।*

*न सर्वे संप्रयुज्यन्ते तद्वज्जीवाः सुखादिभिः ॥ ५ ॥*

घटाकाश एखादे केंव्हा, मलिन जाहले धुलीकणे |

इतर घटीच्या आकाशे ही, मलिन होत ना परि तेणे || ८७.

आकाश राही निर्लेपचि ते, धूळ धूर परीणाम नसे |

एका घटीच्या मालिन्याने अन्यावर परीणाम कसे? || ८८.

खळग्यांमाजी सांचे पाणी, चंद्रबिंब प्रत्येकी दिसे |

एखादे जर मलीन त्यांतील, अन्यावर परिणाम नसे || ८९.

मूळ चंद्र तो जैसा तैसा, प्रतिबिंबे परिणामी ना |

ब्रह्महि तैसे निर्गुण निश्चल, त्याला बाधा कांहीना || ९०.

तैसे जीवहि कुणी एखादा, अनुभव करितो सौख्याचा |

अन्य जीवावर परीणाम ना, त्या सुख वा दुःखाचा || ९१.

प्रत्येकाचे कर्म नि हेतू त्याच्या वृत्तीनुरूप घडे |

तैसे फळ नि भोग तयाशी, सहजी भोगणेची पडे || ९२.

जरि घटातील पोकळीचा तो, वापर कैसाही होई |

जाण नसे ती आकाशाशी, जीवहि अलिप्तचि राही || ९३.

घट रूपाने व्याप्त पोकळी, नच बंधन आकाशाशी |

नित्य मुक्तचि सदा असे ते, मुक्ती मग त्या रे कैशी || ९४.

*श्लोक-रूपकार्यसमाख्याश्च भिद्यन्ते तत्र तत्र वै।आकाशस्य न भेदोऽस्ति तद्वज्जीवेषु निर्णयः ॥६ ॥*

**घट मठादि जैशी व्याप्ती, रूप, नाम नि कार्य तसे |**

**महादाकाशी कांही भेद ना, जीवाजीवात न भेद असे || ९५.**

**गाडगी, मडकी अथवा रांजण, जरी एकचि आकाशी |**

**प्रत्येकाचि आंतील पोकळी, विविध त्या उपयोगाशी || ९६.**

**ज्याचे त्याचे कर्म वेगळे, आणि फळही त्यासी तैसे |**

**चैतन्ये पुरविताचि उर्जा,  वापरणे त्या हाती नसे || ९७.**

श्लोक- *नाकाशस्य घटाकाशो विकारावयवौ यथा । नैवात्मनः सदा जीवो विकारावयवौ तथा ॥ ७ ॥*

सर्वव्यापी ते आकाश असता, घटा-मठाचे अलग कसे? |
झोपडीतले आकाश आणि महालातले एक असे || ९८.
जेही कल्पिले भेद तयाचे, अवयव ना आकाशाचे |
ना विकारहि तैसेची ते, नाम उपाधी वरवरचे || ९९.
आकाशास ना कुणी विभागे, तेचि सकला सामवते |
अखंडता नि व्यापकता ती, बदल त्यांत ना संभवते || १००.
आणि कार्ये वेगवेगळी, त्याच्या व्याप्तीत होताती |
निर्लेपचि ते आकाश नित्यचि, शुद्धी कधी ना मैळे ती || १०१.
तैसे ब्रह्महि सर्वव्यापी ते, जीव तयाचा भाग असे |
देहावरणे नाम रूपे नि, कार्ये त्या बाधीत नसे || १०२.
अखंडता ती एकरुपात्मक, जीव वेगळा कदा नसे |
तो ना अवयव विकार परि तो , ब्रह्माचाची भाग असे || १०३.
भिंतीने ना खोली बांधुनी, आंत कोंडीले पोकळीला |
पोकळीनेचि सामावुनिया, घेतले असे खोलीला || १०४.

पोकळी ना आंतली आणि ती, बाहेरचीही अलग नसे |
समावेश ती करि व्याप्तीचा, अंतर्बाह्य तिजला कैसे? || १०५.

निदिध्यासनी, हे अखंडपण, नित्यचि अनुभूती घ्यावी |
चिदाकाश नि महदाकाशाचि, नित्यचि समरसता व्हावी ||१०६.

डोळे मिटुनी शांत असावे, देह सीमा उल्लंघावी |
अनंत आपुल्या अस्तित्वाशी, एकरूपता साधावी || १०७.

मी-माझे-पण विसरुनि जावे, अंतरी कांही न चिंतावे |
दिव्यत्वाच्या अनुभूतीने, हरीशी समरसचि व्हावे || १०८.

गर्दीतही एकांत साधतो, डोळे जरि उघडे असता |
'स्व-स्थ'चि ते निजरूप आपुले, नित्य साधणे समरसता || १०९.

देहाच्या या आवरणाने, जीव नाम हो ब्रह्माचे |
निदिध्यासानी भान असावे, अखंड त्या एकत्वाचे || ११०.

श्लोक- *यथा भवति बालानां गगनं मलिनं मलैः ।*

*तथा भवत्यबुद्धानामात्माऽपि मलिनो मलैः ॥८॥*

लहान बालक बघती धूळ ती, उडली असता आकाशी |
म्हणती माखले आकाश सारे, मालिन्य आले ते त्याशी || १११.

निर्लेपचि ते आकाश राही, बाधित नाही निर्मलता |
धूळ धूर वा अन्य मलिनता, लिप्त तयाशी ना होता || ११२.

विवेकहीना तसे वाटते, पाप नि पुण्ये ती घडता |
आत्म्याशीही त्या योगाने, म्हणती आली मलीनता || ११३.

मनाचियाचि मालिन्याने, शुद्धी अशुद्धी कर्मी ती |
आत्म्याला ना बाधा त्याची, शुद्धी त्याच्या नसे क्षिती || ११४.

जगती जे जे दिसते आणि, अनुभुतही जे-जे होते |
तोहि तेथला 'स्थानीधर्म'चि, ते येते नि लया जाते || ११५.

आत्मा निर्लेपची सदा तो, त्यावरती परीणाम नसे |
बदलणे नि असणे वा जाणे, अलिप्त यापासून असे || ११६.

ज्याशी जैशी जगी अनुभुती, तदनुसारचि वर्तावे |
जरि मिथ्या ते त्या समयाला, सत्य समजुनी आचरावे || ११७.

अद्वैतावरी द्वैत भासता, मिथ्या ना ते समजावे |
तुफान धुळीचे जरि ते येता, आपण दूरचि ते व्हावे || ११८.

ऐसे वर्तन प्रपंची करिता, बाधा नच ती अद्वैता |
मनी ठाम हा खेळचि वरला, त्यासाठी आलो जगता || ११९.

सृजन नि लयहि ब्रह्माचे ना, 'दिसणे' फसवे दृश्य असे |
त्याचे होणे, जाणे असणे, ब्रह्माचा संबंध नसे || १२०.

प्रभाव मायेचा हा असतो, जेणे रज्जू सर्प दिसे |
तेथं सृजन न सर्पाचे ते, आकलने तैसे भासे || १२१.

सर्प भासता दूर पळावे, म्हणू नये मिथ्या त्याशी |
जोवरी ज्ञान न होई पुरते, वर्तणुक ही ती तैशी || १२२.

जीव सृष्टीचे 'नसणे' उमगावे, उदाहरणांना समजोनी |
जगत सृष्टीचे मिथ्यापणहि, तेणे येत असे ध्यानी || १२३.

जीवसृष्टी ती नित्य बदलती, वेगवेगळी परि येते |
रूप एकदा जेही पहिले, पुन्हा वेगळेची दिसते || १२४.

आधी नसते, पुढेही नसते, कांही काळची ते दिसणे |
कैशी तिजला 'सत्य' म्हणावे ?, क्षणोक्षणी येणे जाणे || १२५.

श्रुती नि शास्त्रे अभ्यासोनी, स्पष्ट ज्ञानही ते होता |
उभय सृष्टीचा अभाव कळतो, उजेड बोधाचा येता || १२६.

तीन ते नऊ ज्याही कारिका, पहिली पायरी त्यांत असे |
उदाहरण देउनी समर्पक, आकलनाशी उजळीतसे || १२७.

श्लोक- *मरणे सम्भवे चैव गत्यागमनयोरपि ।*

*स्थितौ सर्वशरीरेषु चाकाशेनाविलक्षणः* ॥ ९ ॥

कल्पित आकाशाचे विभजन, व्याप्तीने अलगचि भासे |
तैशी जन्म मृत्यू नि स्थिती, अनुभूत आपणा होत असे || १२८.

व्याप्तीच्या ज्या होत अवस्था, जन्म, स्थिती नि जाण्याच्या |
त्या नच लागू मुक्त स्थितीला, क्षती न कसली असे तिला ||१२९.

विभजन जरि दिसते व्याप्तीने, अनुभव म्हणुनि जरी खरा |
मूळ स्थितीला कदा न बाधा, विभाजनाशी ना थारा || १३०.

एक जागीच्या घटा कुठेही, अन्य जागीही जरि नेले |
की फोडियले वा नवीन जरि ते, मातीमधुनी घडवियले || १३१.

व्याप्तीच्या बदलती अवस्था, मूळ पोकळी विना क्षती |
तशी जीवाची स्थिती ना बदले, ना उत्पत्ती-लय वा की स्थिती ||१३२.

व्याप्त पोकळीस जे वापरणे, ती कार्ये जरि व्यवहारी |
फलित तयाचे नच बाधी ते, पोकळी ती निर्विकारी || १३३.

*श्लोक-संघाता: स्वप्नवत्सर्व आत्ममायाविसर्जिता: ।*

*आधिक्ये सर्वसाम्ये वा नोपपत्तिर्हि विद्यते ॥१०॥*

आता याचे पुढती सांगती, गौडपाद ते आपणाला |

कैशी सृष्टी होई गोचर, माया नित्य बदली तिजला || १३४.

सारी जुळणी संघाती ती, त्यापासोनि देह बने |

भगवंताची बलिष्ठ माया, भासवी ती निज सत्तेने || १३५.

जैसा घट तो कुंभाराने, आकाराशी आणियला |

घटाकाश –आंतली पोकळी- सहजी येतसे जन्माला ||१३६.

तैसी देह व्याप्तीची पोकळी, सहजी व्याप्त ती चैतन्ये |

इंद्रिये नि मन बुद्धी आदी, घडवियेलेचि ते मायेने || १३७.

हे अस्तित्व न पारमार्थिकचि, परी तयाच्या मायेने |

‘अमृत अनुभवी’ गौरविले हिस, ‘शक्ती’ ऐशा नामाने || १३८.

उदाहरण घ्यावे ते केवळ, आकलन होण्या ज्ञानाचे |

उदाहरण ते नीट समजता, स्थान न द्यावे ते स्मृतीचे || १३९.

स्वप्न जरी ते असेचि मिथ्या, आचरणास्तव तदा खरे |

तैसे जीव नि जगत जीवनी, जागृती अनुभवी व्यवहारे || १४०.

मिथ्या दिसणे परि अनुभवणे, नसे जन्म परि वावरणे |
दिसण्या आणि अनुभूतीस या, करणी मायेची जाणे || १४१.

व्याप्त पोकळी उदाहरणाने, जीवात्म्याशी जाणावे |
आणि स्वप्नीच्या उदाहरणे, जगसृष्टीशी आचरावे || १४२.

जेंव्हा निदिध्यासन ते करिता, बोध ध्यानी हा ठेवावा |
असुनी नसणे, नीट उमगुनी, भाव विरक्तीचाचि हवा || १४३.

उचित त्याशी न्यायचि द्यावा, मनी जाणणे मिथ्या हे |
अंतरी अद्वैता न सोडणे, उभयी स्पष्ट असे पाहे || १४४.

दुसरे अध्यायी उलगडले, तो स्तर ठेवी ज्ञानाचा |
चाले जग मग विरक्त राहुनी, बोध असे हाचि याचा || १४५.

पांच भुते ती विविध मिश्रणे, बनवितसे त्या देहाला |
नाम रूप त्या जगती उपाधी, सान-थोर गणती त्याला || १४६.

पदार्थ नि देहहि जगतीचे, भासताती ते अज्ञाने |
ना ब्रह्मा सृजी, सहज निर्मिती, घडते ईश्वर मायेने || १४७.

आकाश पोकळी माय भूतांची, आणिती सृष्टी आकारी |
आणि विरता, शून्यी जाती, मायेची किमया सारी || १४८.

कांही नसण्यामधुनी निर्मीती, ‘असणे’ येई आकारा |
आकार घेता, खोटी ऐट ती, दाविताती आपुला तोरा || १४९.

क्षणिक असे हे आपुले जीवन, नाटकातला खेळ असे |
अहंकार तो नाचवी सकला, जणु अंगी भरलेचि पिसे || १५०

कोण कधि तो सान परि कधि, थोर होत या ना युक्ती |
स्वप्नातही ती अशी दर्शने, सान-थोरही ती दिसती || १५१.

आत्मारामाचि ही इच्छा, वैचित्रे जग बनवियले |
संग लाविला कर्म-फलांचा, सुख-दुःखचि ते नित्य फुले ||१५२.

यांत तयाला आनंद वाटे, खेळ अनादि हा चाले |
आपण ना ते विचलित व्हावे, केवळ स्वधर्म आचरिले || १५३.

कर्मे होती आणि विरती, अंती काहीचि न उरे |
जे येते ते जाण्यासाठी, समजे त्याशी दुःख नुरे || १५४.

*श्लोक-रसादयो हि ये कोशा व्याख्यातास्तैत्तिरीयके ।*

*तेषामात्मा परो जीवः खं यथा संप्रकाशितः॥११॥*

**गौडपाद ते पुढती वर्णिती, मिथ्या जीव-सृष्टी कशी |**

**आधार घेती सद्ग्रंथांचा, श्रुती मुख्य प्रमाणाशी || १५५.**

**तैतरेय ही श्रुती सांगते, पंचकोश रस देहीचे |**

**आधार त्याशी आत्म्याचाची, खेळ त्यावरी द्वैताचे || १५६.**

**अन्न, प्राण मन, विज्ञान नि तो, कोश सूक्ष्म आनंदाचा |**

**अंतर्भागी आत्मारामचि, तोचि आधार सकलांचा || १५७.**

**आनंदमय कोशात बैसुनी, दिव्य पुरुष नित सुचित करी |**

**आंतील आवाजा आधारे, योग्य मार्ग दावितो हरी || १५८.**

*श्लोक- द्वयोर्द्वयोर्मधुज्ञाने परं ब्रह्म प्रकाशितम् ।*

*पृथिव्यामुदरे चैव यथाऽऽकाशः प्रकाशितः ॥१२॥*

जीवात्मा नि परमात्माहि, 'मधु' ब्राह्मणी स्पष्ट रूपे |

व्यवहारी आकाश पृथ्वीशी, सबाह्य पुरतेहि व्यापे || १५९.

पंचकोशी जो दिव्यचि आत्मा, मधु ब्राह्मणी वर्णियला |

बृहदारण्यक श्रुती सांगते, सारचि म्हणती ते 'मधु'ला || १६०.

सकल भुतांचा 'मधू'चि पृथ्वी, दिव्य पुरुष तिजमाजी वसे |

तेजस्वी नि अमृतमय तो, देह-स्वामीहि तोच असे || १६१.

पोकळी जीही पृथ्वीमाजी, आणि उदरी सकळांच्या |

वैश्वानर होऊनिया उदरी, आणि तेजरूपे ते पृथ्वीच्या || १६२.

वैश्वानर चालवी देहाला, दिव्य पुरुष तो पृथ्वीला |

उभय परि ते नाही वेगळे, एकचि उर्जा उभयाला || १६३.

एकचि शक्ती देह चालवी, आणि चालवी संसारा |

म्हणुनी 'पिंडी ते ब्रह्मांडी', असे निराकारचि आकारा || १६४.

ही 'मधु-विद्या' जोही जाणे, ज्ञान तयाला होत खरे |

जगती करि जरि, सारी कर्मे, अंतरी हरीला ना विसरे || १६५.

गीतेत ते भगवंत सांगती, अध्यात्म विद्या मम विभुती |

अलिप्त राहुनी करि व्यवहारा, परि राहे नित अद्वैती || १६६.

श्लोक- *जीवात्मनोरनन्यत्वमभेदेन प्रशस्यते ।*

*नानात्वं निन्द्यते यच्च तदेवं हि समञ्जसम्* ॥ १३॥

महावाक्य ती सकल गर्जती, ब्रह्म नि जीवही एक असे |
भेद मानणे, असे निषिद्धचि, ज्ञाता ऐक्यचि अनुभवितसे || १६७.

भेद जरी तो नाम-रुपातहि, चैतन्यचि परि एक असे |
अविनाशी ते परम-तत्वचि, ब्रह्मांडा चालवितसे || १६८.

देह दिला हा भगवंताने, तोचि तयाला सांभाळी |
देहाद्वारे कार्य विश्वीचे, देह मने द्वैता जवळी || १६९.

*श्लोक-जीवात्मनोः पृथक्त्वं यत्प्रागुत्पत्तेः प्रकीर्तितम्।भविष्यद्वृत्त्या गौणं तन्मुख्यत्वं हि न युज्यते॥१४॥*

**कर्मकांड ते सांगती शास्त्री, जीवे पुजावा परमात्मा |**
**परि असे हे गौण ज्ञानची, जोवरी जाणियला ना आत्मा || १७०.**
**भजन पूजन आणि प्रार्थना, जोवरी 'मी हरी', ना कळले |**
**समरसता होताची तयाशी, प्रयोजनचि ते ना उरले || १७१.**
**कर्म-योग तो समजाया नि, आणाया तो आचरणी |**
**असे द्वैत ही केवळ होडी, जोवरी पैल ना ये ध्यानी || १७२.**
**देह वेगळे, नाम-रुपेही, अलग जरि आपुली असती |**
**एक ब्रह्मचि, आपण सारे, नित्यचि सारे अद्वैती || १७३.**
**पंचतत्व करि देह धारणा, म्हणजे देह हि एक असे |**
**अलंकार जरि वेगवेगळे, सुवर्ण परि वेगळे नसे || १७४.**
**प्राण अंतरी एकचि खेळे, अंतर्बाह्य हि एक सदा |**
**सारे आपण एकचि तुर्या, वेगळे न असतोचि कदा || १७५.**
**देह नि कार्ये जरी वेगळी, विश्व एकचि ते आपुले |**
**एकचि सकळी अंतर्यामी, अद्वैती सारे चाले || १७६.**

केळ जोवरी नाही पिकले, साल न काढी तोवरती |

नंतर साल ती फेकुनी द्यावी, रमणे नाही ते द्वैती || १७७.

आत्मा ज्याला पूर्ण समजला, एकरूप  होई त्याशी |

द्वैत ना उरे, विरे अलगता, समरसता अद्वैताशी || १७८.

उपासनादि नलगे त्याला, मिथ्या मानी संसार |

नित्य राही तो अद्वैतातची, परी सोडी ना व्यवहार || १७९.

*श्लोक-मृल्लोहविस्फुलिङ्गाद्यैः सृष्टिर्या चोदिताऽन्यथा।*

*उपायः सोऽवताराय नास्ति भेदः कथंचन ॥१५.*

माती, लोह, वा ठिणग्या यांनी, विविध सृष्टीचे वर्णन ते |

परि हे केवळ कथनास्तवचि, जाणुनि घे एकत्वाते || १८०.

सृष्टी विलास हा मायेचा, तो आत्म्याचा कदा नसे |

सर्व पसारा पंचभुतातुनी, भगवंताविण भूत कसे?|| १८१.

शिव नि शक्ती सामरस्यचि, भेदा मानावे कैसे?|

दोन ओठ नि एक बोलणे, भेदा येथे स्थान नसे || १८२.

अनुभव जोही संसाराचा, तो मिथ्या नच मानावा |

परि अस्तित्वा सत्य न मानी, माया निर्मित जाणावा || १८३.

विंचू दिसता, दूरचि व्हावे, अनुभव सत्यचि त्या वेळी |

ब्रह्मरूप त्या ना मानोनी, द्वैताला ना त्या टाळी || १८४.

तुला वाटते, ब्रह्म असे ते, अद्वैताच्या ज्ञानाने |

परि विंचवा नसे ज्ञान ते, नांगी मारिता वीष धावे || १८५.

गौडपाद ते म्हणती ऐसे, अनुभव सत्यचि मानावा |

विवेक बुद्धी कधी न सोडणे, अनुभव नित्यचि येत नवा || १८६.

जगती हे अस्तित्व दिसे जे, ते नच असते जगताचे |
त्यासी उसने घेतलेचि की, ब्रह्मापासुनि, रुप त्याचे || १८७.

जग हे ना सृजिले ब्रह्माने, अनुभवते त्या आधारे |
लहरी सृजिल्या नाचि जलाने, जलाधार परि आश्रय रे || १८८.

आज दिसे अस्तित्व तसे ते, पुन्हा कदापि ते न दिसे |
व्याधी, आचरण, शोक-सौख्य ही, अस्तित्वाला बदलितसे ||१८९.

तसेची दिसणे कदा न स्थायी, दूर कुणाला अलग दिसे |
मती-भ्रंश वा दुबळ्या स्मृतीने, व्यक्ती वेगळीच भासे || १९०.

कुणा पाहता, मला वाटते, सज्जन माणूस तो आला |
परी दुज्याला पूर्व अनुभवे, दिसता ये संतापाला || १९१.

ब्रह्मचि द्रष्टा, जैसा पाहे, तैसे रूपचि ते बदले |
एक रूप परि दिसे एक ना, वेळोवेळी जे दिसले || १९२.

म्हणुनि गौडपाद ते म्हणती, अनुभव तैसे वागावे |
त्या-त्या वेळी जशी अनुभूती, तैसेचि आचरण व्हावे || १९३.

जैशी पद्धत साधनेचि ती, सत्यहि तैसे जाणावे |
कर्मयोगी जो, द्वैताधारे, कर्मे करितसे भावे || १९४.

कुणी ध्यानाने, कुणी योगाने, द्वैतामाजी आचरती |
त्यासाठी ना एक नियम तो, स्तरानुरूप साधना रीति || १९५.

केवळ लिहिले शास्त्री म्हणुनी, विवेक ना तो सोडावा |
तसेच द्वैता वापरणे ते, जैसा तो अनुभवचि नवा || १९६.

वापर व्हावा या जगताचा, आपुली प्रगती ती होण्या |
जगास बाजूला सारावे, केवळ दिसणे ये ध्याना || १९७.

शाखेमागे चंद्र दाविता, शाखा पुरती विसरावी |
दृष्टांता ना घट्ट धरावे, विवेक बुद्धी वापरावी || १९८.

जग नि मी जरि दिसे वेगळे, द्वैता समजुनिया घ्यावे |
व्यवहार ना द्वैतावाचुनि, अद्वैता ना सोडावे || १९९.

द्वैत असे ही एक पायरी, चढता तिजला सोडावे |
अद्वैताचे भान असावे, द्वैती ना ते अडकावे || २००.

श्लोक- *आश्रमास्त्रिविधा हीनमध्यमोत्कृष्टदृष्टयः ।*
*उपासनोपदिष्टेयं तदर्थमनुकम्पया* ॥ १६ ॥

समरस तुर्येशी होण्याला, मुख्य तीन त्या असती क्रिया |
हीन नि मध्यम तसेची उत्तम, जशी उपयोगी असे जया || २०१.

यासीची ते आश्रम म्हणती, वेगवेगळ्या उपासना |
जशी पात्रता, अधिकारहि तो, तैशा पद्धती त्या नाना || २०२.

पहिल्या यत्तेमाजी असता, बीजगणिताला ना समजे |
'ग' गवताचा हेही योग्य त्या, तरीच त्याशी ते उमजे || २०३.

जैशी शुद्धी होत असे ती, आंत आणखी बाहेरी |
तशीच बदले उपासनाही, जेणे वेगे सुलभ हरी || २०४.

उत्तम गुरु तो साक्षी भाव नि, आवाज आपुल्या अंतरीचा |
अनेक दैवी शक्ती जगती, सुचविती बदलही मार्गाचा || २०५.

श्रद्धा आपुली ठाम असावी, मायेमाजी न गुंतावे |
श्रवण, नि चिंतन, निदिध्यासने, सुयोग्य मार्गे त्या जावे || २०६.

जितुकी शुद्धी, तितुकी प्रगती, सिंहावलोकन ते करणे |
अंतरी जोवरी नाही पटले, ते न कदापि आचरणे || २०७.

अधिकार तो जैसा तैसे, उपदेशाशी ते देणे |
गौडपादही हेचि सांगती, आशय एकचि परि तेणे || २०८.

*श्लोक- स्वसिद्धान्तव्यवस्थासु द्वैतिनो निश्चिता दृढम् ।*

*परस्पर विरुध्यन्ते तैरयं न विरुध्यते ॥ १७ ॥*

अध्यात्मिक ती जैशी श्रद्धा, तैसे साधक अनुसरती |

कुणी ठाम ते द्वैतावरचि, परि विरोध ना अद्वैती || २०९.

मते जयाची ठाम जाहली, मूर्तीमाजी भगवंत |

फुका वाद ना त्यासी घालणे, ना प्रगटावीही खंत || २१०.

नच अज्ञानी, विचारवंतही, किती एक ते असती असे |

भक्तीचा करिती देखावा, भजन पूजनी रंगतसे || २११.

द्वैताला ते सत्य मानिता, वाद घालणे ना त्याशी |

म्हणुनी आचार्यांनी नेमिली, दैवतेहि ती पुजनाशी || २१२.

मंद नि मध्यम जे अधिकारी, उपासना त्यासी बरवी |

तुर्या अनुभूती ना परि द्वैती, वाट न आपुली सोडावी || २१३.

श्लोक- *अद्वैतं परमार्थो हि द्वैतं तद्भेद उच्यते ।*

*तेषामुभयथा द्वैतं तेनायं न विरुध्यते ॥ १८ ॥*

परम सत्य ते असे एकचि, अद्वैताविण कांही नसे |

द्वैत भासते जगतास्तवचि, हा मायेचा खेळ असे || २१४.

परि परमार्थी, ठामचि तुर्या, अद्वैता ना सोडावे |

द्वैत अनुभूती ती तात्पुरती, तिजमाजी ना अडकावे || २१५.

कारण मिथ्या द्वैत असे ते, व्यवहारास्तवची भासे |

तुर्येशी तादात्म्य साधण्या, अनुभूती अद्वैताचीच असे || २१६.

द्वैती राहुनि, ये अनुभूती, मिथ्या द्वैतचि ते सारे |

ज्ञान दृष्टीने पैलचि जाता, अद्वैताविण कांही नुरे || २१७.

एकमेवचि असतो आत्मा, त्याविण अन्य नसे कांही |

श्रुती सांगती, पानोपानी, तुर्या अद्वैतीच राही || २१८.

शांत बैसता, द्वैतशून्यता, सहजी चित्ती साधतसे |

दिव्यत्वाची ये अनुभूती, परि द्वैती सारे नासे || २१९.

भेद नसेचि द्वैत-अद्वैती, ज्ञान-दृष्टी येता पुरती |

द्वैती राहुनिही मग तेंव्हा, अद्वैताची अनुभूती || २२०.

अद्वैताच्या परिणामाने, द्वैत भासते वरवरले |

वृक्ष एक परि अनेक फांद्या, एकत्वा ना सोडियले || २२१.

श्लोक- *मायया भिद्यते ह्येतन्नान्यथाऽजं कथंचन । तत्त्वतो भिद्यमाने हि मर्त्यताममृतं व्रजेत् ॥ १९ ॥*

अद्वैती ते द्वैत दिसतसे, मायेचा परिणाम असे |
अविनाशी भासती विनाशी, जंव द्वैता सोडीत नसे || २२२.

नित्य अनादि आत्मारामहि, वाटे बहुरुपी रमला |
जन्मा आला, कार्या करुनी, पुनरपि निजधामी गेला || २२३.

बलिष्ठ माया नसता भासवी, गुंतविते ती संसारी |
चिरंजीवाशी मर्त्यहि बनवी, वृथा मुक्तीस्तव यत्न करी || २२४.

कल्पित बंधन स्वये निर्मुनी, सुख-दुःखाची अनुभूती |
स्वानंदी जरि नित्यचि असता, वृथाचि दुःखाची भ्रांती || २२५.

राजा असुनि ओळख विसरे, वृथा फिरे दारोदारी |
समर्थ ऐसा तोचि असता, वृथा दावी तो लाचारी || २२६.

परमात्म्यातुनी जीवात्मा जर, अलग जाहला, सत्य असे |
आणि पुन्हा तो त्याशी मिळुनी, मोक्ष तयाला लाभतसे || २२७.

मोक्ष लाभ हा नसेचि स्थायी, पुन्हा अलगपण शक्य असे |
श्रुति म्हणती एकचि परमात्मा, ताटातूटचि शक्य नसे || २२८.

अलगपणा नि पुन्हा साधना, पुन्हा बोधहि ज्ञानाचा |

आणि पुनश्च येऊनि मिळणे, अंत नसे या चक्राचा || २२९.

ना जीवात्मा कदापि गेला, अथवा पुनरपि समरसला |
अखंडतेला कदा ना बाधा, अलगपणा तो वरवरला || २३०.

तरंग लाटा नसेचि विभजन, जळीच जळ ते खेळतसे |
जाणे-येणे वा ते मिळणे, सारे वरवरलेच असे || २३१.

नसेचि बंधन आणि मोक्षही, बाधा नच अद्वैताला |
द्वैत असे ते केवळ लटके, निमित्त केवळ जगताला || २३२.

ईश्वराची ती बलिष्ट माया, विभजन-मिलन दावितसे |
ज्ञात्याने ना त्यांत फसावे, जरि खेळा चालवी तसे || २३३.

नित्य अनुभूती अद्वैताची, द्वैत कदापि सत्य नसे |
तुर्या अनुभूती अद्वैतीची, द्वैत जाणवे आभासे || २३४.

अखंड चाले संसारहि तो, नये उपेक्षु त्यालाही |
निजस्वरूपचि अखंड तुर्या, सदैव तिजमाजी राही || २३५.

श्लोक- *अजातस्यैव भावस्य जातिमिच्छन्ति वादिनः| अजातो ह्यमृतो भावो मर्त्यतां कथमेष्यति ॥ २० ॥*

अनेक प्रज्ञावंतही म्हणती, जन्म नि मृत्यू आत्म्याला |
चिरंजीव तो कसा स्वीकारिल, मिथ्या मर्त्यचि भावाला || २३६.

व्याप्त पोकळी जशी घटाची, घटाकाश जणु अलग करी |
तैसे प्रपंच व्यवहारास्तव, जीव-भाव नवरूप धरी || २३७.

अखंडतेला परि ना बाधा, विभजन ते तर सत्य नसे |
लटके काल्पनिकचि विभाजन, तूर्या अद्वैतीच असे || २३८.

ज्ञात्यासी जैसाची अनुभव, द्वैती या जगती येई |
नित्य स्मरण तुर्येचे ठेऊनी, न्याय भूमिकेसी देई || २३९.

त्या-त्या वेळी विवेक जागृत, परहित पुरते साधावे |
पूर्ण विरक्ती, मायेमाजी, तुर्येला ना सोडावे || २४०.

*श्लोक- न भवत्यमृतं मर्त्यं न मर्त्यममृतं तथा ।*

*प्रकृतेरन्यथाभावो न कथंचिद् भविष्यति ॥ २१ ॥*

**शाश्वत नित्यचि असीम आत्मा. बदल नि मृत्यू त्यासं नसे |**

**त्यासी ना तो जन्म कदाही, मृत्यू संभवेल कैसे?|| २४१.**

**जोही ज्याचा प्रकृतीधर्मचि, बदल त्यांत नच होत असे |**

**म्हणुनी आत्मा सदैव शाश्वत, जन्म-मृत्यू तो त्यास नसे || २४२.**

**उष्णचि राहील अग्नि नित्यची, कारण प्रकृती धर्म असे |**

**धर्म मूळचा कदा न बदले, आत्मा त्या अपवाद नसे || २४३.**

**जल ते शीतल प्रकृती धर्मे, उष्ण होत ते अग्निमुळे |**

**हे तर केवळ उसनेपणची, सहजी शीतलता त्यास मिळे || २४४.**

**जीवात्मा तैसे उसनेपण, तात्कालिक परि धर्म नसे |**

**कार्य संपता, सहजी निजरुपि, नाटक जोवरी चालतसे || २४५.**

**शिष्य म्हणे तो नकोच मृत्यू, अमरपणचि मज नित्य हवे |**

**कैसे ते मी प्राप्त करावे, हेचि मजला सांगावे || २४६.**

**ऋषी म्हणती त्या, कोण असे तूं, चिरंजीव ते कुणी व्हावे? |**

**देह की आत्मा? कोण तुजशी ते अमर हवे?|| २४७.**

देह प्रकृतीच्याची स्वाधीन, नित्य बदलता, कधी जाणे |
जीर्ण वस्त्र ते ना उपयोगी, काळाच्या स्वाधीन करणे || २४८.

आणि आत्मा, नित्य चिरंजीव, मरण तयाचा धर्म नसे |
हवे तुला ते कधिच लाभले, नित्य अमरपण तुजशी असे || २४९.

ज्याचेसाठी धडपड सारी, ते तर तुजला प्राप्त असे |
शिष्य म्हणे मग कशास शास्त्रे, साधनेसही अर्थ नसे || २५०.

ऋषी सांगती, यत्न नसे हा, अमरपणास्तव जीवनाचा |
हे उमगावे, मी न देह हे, संग न सोडी तुर्येचा || २५१.

आपुल्या दिव्यत्वा जाणावे, उन्नत व्हावे क्षणोक्षणी |
विवेक आणि विरक्ती योगे, नित्य रहावे हरि-चरणी || २५२.

स्वधर्म यज्ञा नित्य करोनी, निष्कामेचि आचरावे |
परहित साधन म्हणुनि देह हा, नि:संगे जीवन जावे || २५३.

हात रिकामे घेउनी आला, तैसे रिकामेची जाणे |
गंगेसम, निष्काम होऊनी, प्रवाहीत अखंडपणे || २५४.

गीतेत हरी अर्जुनासी सांगे, अनुभव विषये सकलही ते |
शीत उष्ण सुख-दुःख दाविती, क्षणिक सहन करी त्याते || २५५.

येती आणि जाती तैसे, उष्ण-शीत जैसा वारा |
खेळ चालतो तो नियतीचा, मिथ्या प्रकार हा सारा || २५६.

कधि सुखद तर केंव्हा दुःखद, ऊन-सावली खेळ जसा |
विरंगुळा हा तुझिया जीवनी, स्वीकार येईल काळ तसा || २५७.

राम-कृष्ण ही आले गेले, सुख-दुखाच्या अनुभवे |
अलिप्त राहुनि, कौतुक पाही, अनुभव येतील नित्य नवे || २५८.

जगत असे हे नित्य अनादि, ब्रह्मासंगे जन्म तया |
अस्तित्व हे परि जगताचे, मिथ्या कारण ती माया || २५९.

दिसणे आणि अनुभव जैसा, स्वीकार करि तो व्यवहारी |
नित्य परि अद्वैती राहणे, नाही सोडणे कदा हरी || २६०.

चिरंजीव ते होण्यासाठी, साधन कांही न लागे तुजला |
तूं आहेसचि नित्य चिरंजीव, त्यागी अज्ञान निद्रेला || २६१.

हाचि तो संदेश आपणा, गौडपाद मुनी देत असे |
व्यवहारी ते असुनी नसणे, तुर्येला ना विसरतसे || २६२.

वीस,एकविस कारिकांशी, नीट म्हणुनि ते समजावे |
मीचि तुर्या नित्यचि स्मरणे, जीवन सार्थकी लागावे || २६३.

*श्लोक-स्वभावेनामृतो यस्य भावो गच्छति मर्त्यताम् ।*
*कृतकेनामृतस्तस्य कथं स्थास्यति निश्चलः ॥ २२ ॥*

**स्वभावेची जे अमर असे त्या, जन्म-मरण हे धर्म कसे?|**

**कशास त्यास्तव कर्मे आणि, उपासनांचे, स्तोम असे?|| २६४.**

**अमरत्व न हे मिळे प्राप्तीने, तो तर प्रकृती धर्म असे |**

**देवांना जे प्राप्त जाहले, उपयोगी ते त्यास नसे || २६५.**

**ब्रह्म्याच्या त्या एकच दिवशी, चवदा इंद्र ही ते होती |**

**परि ज्या लाभे ज्ञानामृत हे, त्यासी मृत्यूची कां भीति? || २६६.**

**चिरंजीवता नच ती लाभते, यज्ञ, साधना, ज्ञानाने |**

**मीचि शाश्वत ऐशी तूर्या, ठामचि ऐशा निष्ठेने || २६७.**

**सर्वश्रेष्ठ ते ब्रह्म असे मी, दिव्य आचरण साजेसे |**

**आत्म्याची अवनती न व्हावी, जगात वर्तन, नित्य असे || २६८.**

श्लोक- *भूततोऽभूततो वाऽपि सृज्यमाने समाश्रुतिः ।*
*निश्चितं युक्तियुक्तं च यत्तद्भवति नेतरत्* ॥ २३ ॥

या सृष्टीची जी उत्पत्ती, भूतजन्य हे कुणी म्हणती |
कुणी म्हणती ते तसे नसेचि, निर्मिती प्रकृतीच्या हाती || २६९.

शास्त्रे म्हणती, पूर्वी ज्यासी, नव्हते अस्तित्वची कदा |
आणि पुढेही ना अस्तित्वचि, सत्य न मानी तया कदा || २७०.

कधि अंधारी दिसे वेगळे, जरी अस्तित्व तसे नसे |
तया निर्मिती कशी म्हणावी?, नसलेले ते आभासे || २७१.

अशी निर्मिती असते भ्रांती, खेळ असे तो मायेचा |
परी अनुभूति येई त्याची, विचार कैसा निर्मितीचा || २७२.

व्यवहारी ते दिसेचि ऐसे, भूतचि भूतास निर्मितसे |
अद्वैताच्या दृष्टीने परि, मिथ्या ही निर्मिती असे || २७३.

असे सृष्टी ही आरोपितचि, वास्तव हे सगळे फसवे |
तरंग ना जन्मे ना विलये, भ्रांतीचे हे देखावे || २७४.

वाद असे हे कधि न संपती, दृष्टी जैशी सत्य तसे |
पारमार्थिक नि मायिक सृष्टी, दृष्टी जैशी तशी असे || २७५.

सृष्टी निर्मिती नसे सत्यची, खरी वाटते अनुभूती |

परि खेळ तो मायेचाचि, दरक्षणी बदल तिथे होती || २७६.

जग ना सृजन ब्रह्मापासून, ते तर निर्गुण निश्चलची |

जगत दिसे जे आपुल्या भवती, जैशी अनुभूती द्रष्ट्याची || २७७.

सूर्य उदय नि अस्त दिसे परि, दिसते तैसे ते नाही |

केवळ दृष्टीशी ही निर्मिती, निर्णय अलगचि तो राही || २७८.

तर्क विचारा न्याय्य वाटते, ग्राह्यचि मत ते मानावे |

दोन दृष्टीने कथन असे ते, तथ्य नेमके शोधावे || २७९.

*श्लोक-नेह नानेति चाऽम्नायादिन्द्रो मायाभिरित्यपि । अजायमानो बहुधा मायया जायते तु सः ॥ २४ ॥*

**वेगवेगळी दिसती रूपे, मायेच्या त्या योगाने |**

**ती न निर्मिती परी खेळची, दिसत असो जो भ्रांतीने || २८०.**

**जन्मशून्य तो असेचि आत्मा, स्वये जन्म ना, निर्मी कसे ?|**

**अस्तित्वचि ते जंव तात्पुरते, ती न निर्मिती होत असे || २८१.**

**गौडपाद संदेशा देती, जागृतीत जे जगत दिसे |**

**ते सारेची असते भ्रांती, त्याशी ते अस्तित्व नसे || २८२.**

**जागृतीत, जग जसेही दिसते, ना सृजियेले ब्रह्माने |**

**त्याचे दिसणे आणि अनुभूती, स्विकारुनिया आचरणे || २८३.**

**जगताचे ते जेही दिसणे, आणि अनुभूती जी येते |**

**कारण त्याशी असते माया, अन्य कुणीही ते नसते || २८४.**

**निजरूपाचे अज्ञानचि ते, तुर्येचे अज्ञान असे |**

**वरील संदेशास्तव देती, शास्त्रातील आधार तसे || २८५.**

**निर्मिती ही, जी जगताची, सत्य नसे ती वरवरली |**

**बावीस ही कारिकाही सांगे, भ्रांतीने ती अनुभवली || २८६.**

मिमांसेतही हेचि कथिले, तर्कहि तेचि सांगतसे |
जैसा उदय नि अस्त रवीचा, धरतीवरुनी भासतसे || २८७.

कठ-उपनिषदि द्वितीयोध्यायीही, याची कथना सांगितले |
दिसणे हे जरि सत्य असे तरि, असे परी हे वरवरले || २८८.

बृहद श्रुती ती म्हणते ऐसे, इंद्रचि जादुगार असे |
अनेक रूपे, नसतांनाही, मायेने भासवितसे || २८९.

दक्षिणमूर्ती स्तोत्रातही ते, हेचि कथन आहे केले |
दिसणे हे जरि सत्य असे तरि, असे परी हे वरवरले || २९०.

पुरुषसुक्त ते द्वितीय श्लोकी, सांगे ईश्वर निर्मितसे |
परी निर्मिती ती वरवरली, ती न कदापि सत्य असे || २९१.

गीतेमाजी कृष्ण सांगती, जन्मे मी ना जन्मोनी |
जन्म असा हा केवळ माया, चालवी जग माया धरुनी || २९२.

*श्लोक-संभूतेरपवादाच्च संभव: प्रतिषिध्यते ।*

*को न्वेनं जनयेदिति कारणं प्रतिषिध्यते ॥ २५ ||*

ईशावास्य श्रुती सांगते, हिरण्यगर्भा उपासना |

'संभूती' हे नाम जयाचे, मोक्षालागी नेईच ना || २९३.

अंधाराचा मार्ग तयाचा, ना त्यासी उपासावे |

हिरण्यगर्भ न परमसत्य ते, भ्रांतीलागी त्यागावे || २९४.

सर्व जगत हे ऐश्वर्यचि ते, जरी असे परब्रह्माचे |

त्यांत गुंतता विफलची जीवन, राज्य असे ते द्वैताचे || २९५.

क्रीडेस्तव हे विश्व निर्मिले, भुमिका आपुली ओळखुनी |

व्यवहारी वर्ते निष्कामे, तुर्या नित्य परी ध्यानी || २९६.

परब्रह्मचि आधार ज्याचा, समर्थ ऐशा या जगता |

सृजन तयाचे कोण करू शके? नसे कुणातचि समर्थता || २९७.

बृहद श्रुती हा प्रश्न करितसे, सृजिते ब्रह्म न जगताला |

आधार देई, परि ना सृजन, कारण ब्रह्म नसे त्याला || २९८.

कठश्रुती ती अशी सांगते, ना निर्माता कुणि ब्रह्माचा |

तेही कुणाला कधी न निर्मी, नच निर्माता कुणि जगताचा||२९९

सागरासवे सहजी लहरी, आश्रय सागर जरि देई |

परि ना सागर सृजन करि त्या, हे सारे सहजी होई || ३००.

*श्लोक- स एष नेति नेतीति व्याख्यातं निह्नुते यतः ।*
*सर्वमग्राह्यभावेन हेतुनाऽजं प्रकाशते ॥ २६ ॥*

बृहद आरण्यक श्रुती वर्णिता, ब्रह्माला 'नेती-नेती' |
सारी शास्त्रे थकली शोधुनि, कैसी ब्रह्माची ख्याती || ३०१.

'देव कणा' विज्ञान शोधिते, अनुभव ये परि गंवसेना |
मूर्त-अमूर्त हि वर्णिती शास्त्रे, शोध असे चालती नाना || ३०२.

आपुल्याच जे असे अंतरी, कैसे बाहेरी गंवसे ?|
लपुनी चालवी ब्रह्मांडाला, जरि सर्वत्रचि परि न दिसे || ३०३.

बालकाचिये हास्यांमधुनी, संतोषोनी तोचि दिसे |
आणि कुणाचे पुसता आंसू, आनंदाने तोचि हंसे || ३०४.

भुकेल्यास सन्माने भोजन, तृषार्तास देता पाणी |
तोंड भरोनी आशीर्वाद दे, तृप्त तयाची ती वाणी || ३०५.

विपरित काळी, सहजी आंतुन, धैर्याची लाभे उर्मी |
लीला त्याचीची, वत्सलेने, ऐन वेळी येई कामी || ३०६.

सायंकाळी, गोधुली समयी, वत्साच्या त्या ओढीने |
गोधन धावे, त्याच्या रूपे, ममत्व नि वत्सलतेने || ३०७.

सुषुप्तीत ते येता जवळी, अज्ञाने ना ओळखिले |
तुर्या आत्मा, परम सत्य परि, केवळ त्याला अनुभवले || ३०८.

वर्णन करीता वर्णनातीता, शास्त्रे बोलती जे कांही |
शून्याला ते दाखविण्याला, लहान वर्तुळ काढित ही ||३०९.

आमुची सीमा मर्यादितची, अनंतासी वर्णने कसे? |
मन-बुद्धी नच तेथं पोहचे, शब्द मौनचि होत असे || ३१०.

जन्म जयाचा मुळी न जाहला, शोध तयाच्या जन्माचा |
तेचि आदि आणि नित्यहि, अद्वैतचि अनुभव त्याचा || ३११.

ज्ञान तयाचे होण्यासाठी, साधकावरी सोपविले |
सारे सारुनी ते बाजूला, त्यांनी त्यासी अनुभविले || ३१२.

त्याचे असणे, कांही नसणे, परि दिव्यता अनुभवणे |
समरसताचि आणि त्याशी, कैसे सांगावे नेणे || ३१३.

आपुले नसणे-जरा ना असणे, शून्य अशी ती अनुभूती |
नाही जाणीव नाही नेणीव, निखळ सौख्य नि ती शांती || ३१४.

हेचि तुर्येसी अनुभवणे, पूर्ण समर्पण हरिचरणी |
स्वानंदाला येई भरती, नसेचि चिंतन कांही मनी || ३१५.

*श्लोक-सतो हि मायया जन्म युज्यते न तु तत्त्वतः ॥*

*तत्त्वतो जायते यस्य जातं तस्य हि जायते ॥ २७ ॥*

**स्वयंसिद्ध तो, असे स्वयंभू, जन्म तयाचा ना होणे |**

**जरि अनुभूति अस्तित्वाची, मायेचेची ते असणे || ३१६.**

**जे आहेची आधीपासुनी, जन्म तयाचा तो कैसा ?|**

**आणि कांही अनुभूत झाले, समजावे माया-भासा || ३१७.**

**म्हणे 'मिमांसा' येई अनुभव, जोही तो या जगताचा |**

**तात्कालिक हा भास असेची, खेळ असे हा मायेचा || ३१८.**

**जेही येई अनुभवाला, द्वैताच्याची आधारे |**

**वरवरला तो आभास केवळ, खेळचि मायेचे सारे || ३१९.**

**जेथे कारण, बदलही तेथे, परम-सत्य ना कारण ते |**

**म्हणुनी त्याते होणे बदलही, नच मुळी ते संभवते || ३२०.**

**गौडपाद देती संदेशा, चार असे जिज्ञासूला |**

**जग-अनुभूती आणि दिसणे, सत्य न आभास वरवरला ||३२१.**

**जग हे निर्माणचि ना झाले, हा संदेश असे दुसरा |**

**स्वीकारणे जगताची अनुभूती, आणि दिसणे हा तिसरा || ३२२.**

अनुभव आणि दिसणे तैसे, तुर्येचे ते अज्ञान |
आणि दर्शवी, निज-रूपाचे, झालेची ते विस्मरण || ३२३.

अभ्यासुला सर्व श्रुतीतही, उमगतील हे संदेश |
जगास कुणीही नाही निर्मिले, स्थितीबद्दल धरी मौनास || ३२४.

गुरु, शास्त्रे नि निदिध्यासने, आपण हे जाणुनि घेणे |
स्तर ज्ञानाचा प्रत्येकाचा, तैसी उमज तया येणे || ३२५.

परि सारेचि म्हणती ऐसे, अद्वैताविण ना गंवसे |
कारण तुर्या नित अद्वैती, द्वैताचा हा प्रांत नसे || ३२६.

वरिल कारिका प्रमाण देती, जगत कधि नच सृजियेले |
ब्रह्मासम ते असे अनादि, मायेने ते रचियेले || ३२७.

तैतरेयी हे गुह्यचि म्हटले, निर्मिती कैशी रूपांची |
कशी चेतना तया चाळवी, केंव्हा वेळही गमनाची ? || ३२८.

नसेची आत्मा विषय दिसाया, दिसे न तो परि अनुभवणे |
असेचि शाश्वत-विना बदल तो, तर्क तयासी ना जाणे || ३२९.

शाश्वत नित्यचि असते ब्रह्मचि, नित्य बदलते जगत असे |
ब्रह्म न कारण त्याच्या सृजना, खेळचि मायेचा भासे || ३३०.

*श्लोक-असतो मायया जन्म तत्त्वतो नैव युज्यते ।*

*वन्ध्यापुत्रो न तत्त्वेन मायया वाऽपि जायते ॥ २८ ॥*

सत्य सदाची नित्य असे ते, जन्म न त्याचा मायेने |

वंध्या पुत्र न ये जन्माला, कल्पित संतती होई मने || ३३१.

नसेचि जन्महि तो कि जयाला, तो कैसे निर्माण करी ?|

ऐसे सृजन, आभास केवळ, खेळवी माया परोपरी || ३३२.

जोवरी अनुभुती अद्वैताची, पुरेपूर नसे मुरली |

तोवरी ऐसे आभास होती, ही तर मायेची खेळी || ३३३.

सत्याचे मुख असे झांकले, सुवर्णाचिया पात्राने |

अज्ञानाने विपरीत भासे, सत्यचि लपले ते तेणे || ३३४.

ब्रह्म लपुनिया त्या अस्तित्वे, विश्व चळतसे सहजेची |

नसलेले ते कार्यान्वित हो, ही किमया परि मायेची || ३३५.

स्वप्नी येई अनुभव याचा, नसलेले भासे असणे |

तसा गारुडी खेळ असे हा, विवेकज्ञाने हे जाणे || ३३६.

*श्लोक-यथा स्वप्ने द्वयाभासं स्पन्दते मायया मनः । तथा जाग्रद्द्वयाभासं स्पन्दते मायया मनः ॥ २९ ॥*

स्वप्नी द्वैतचि बलिष्ठ होई, आभास दिसती मायेने |
मन द्वैताचा करिते आश्रय, दिसे विविधता ती तेणे || ३३७.

जग जागृतीचे दृश्य न होई, घेत इंद्रिये विश्रांती |
आपण निर्मिता, आणि द्रष्टा, परी असे केवळ भ्रांती || ३३८.

जागृती माजी, ज्ञात्याचे जर, विवेक आणि विरक्तीने |
मन अलिप्त ते नित्य राहता, बाधा नच ती द्वैताने || ३३९.

म्हणुनि तुर्येमाजी असण्या, भानसदा ते अद्वैती |
जगतीचे व्यवहार करावे, गुंतणे न ते त्या द्वैती || ३४०

देह ओढितो व्यापाराचे, गाडे सदैव जरि जगती |
भान न विचलित नित्य असावे, असणे नित्यचि अद्वैती || ३४१.

ऐसे आचरण करिता होई, कृतार्थ जीवन सिद्धाचे |
हेचि आवडे भगवंताला, कार्य चालू दे जगताचे || ३४२.

स्वप्न जागृती आणि सुषुप्ती, सारे सारे अनुभवणे |
ध्यानी ठेवणे मायाचि ही, तरीच तुर्यि विसावणे || ३४३.

श्लोक-*अद्वयं च द्वयाभासं मनः स्वप्ने न संशयः ।*

*अद्वयं च द्वयाभासं तथा जाग्रन्न संशयः* ॥ ३० ॥

स्वप्नामाजी मन ते स्पंदित, माया खेळविते द्वैती |

तैसे जागृतीतही भुलवी, प्रपंच मायिक दावुनि ती || ३४४.

एकलेची मन द्रष्टा दृश्यही, स्वप्नी रमते ते द्वैती |

उभवितसे आपुलीच सृष्टी, शोक मोह मिथ्याचि प्रीति || ३४५.

अनेक रूपे जागृतीत ती, कार्यानुरूप नामे ही |

असे पसारा मायिक सारा, क्षणात बदले सारेही || ३४६.

नित्य बदलती रूपे नि हेतू, आकाराला जग येते |

व्यक्ती वस्तू व्यवहारहि ते, क्षणा-क्षणा रुप पालटते || ३४७.

वृथाची स्वामित्वाची भावना, आणि ममत्व अडकविते |

द्वैत नित्यचि जरी विनाशी, संगास्तव ते मन झुरते || ३४८.

आलो आपण कार्यास्तवचि, साधन क्षमता तो पुरवी |

नसेचि इथले आपुले कांही, हांव आसक्ती कशा हवी? || ३४९.

प्रारब्धी जे लिहिलेले ते, लाभे सहजी ते येथे |

चोंच देई तो चारा निर्मी, नित्यचि साधे विरक्तीते || ३५०.

जेही लाभे, विलया जाई, शाश्वत येथे कांही नसे |
नसलेले ते मिळावयाशी, लटपटी असंख्य करीत असे || ३५१.

विसरुनि जाई सारे नाटक, सारे माझेचि वाटे |
आपुले नसता इथले कांही, भाव ममत्वाचा दाटे || ३५२.

उगाच मोहे, ओढवी भोगा, विसरुनिया निजस्वरुपाला |
चार दिनांचा जरि पाहुणा, अंत नसे हव्यासाला || ३५३.

सकला माहित इथले सारे, राहणार ते येथेची |
अद्वैताचे सौख्य सोडुनि, ओढी चादर भोगाची || ३५४.

खेळ मनाचा, म्हणुनि साधके, मिथ्यापण ना विसरावे |
दिव्यत्वाला जागृत करुनी, अद्वैती त्या खेचावे || ३५५.

खेळ खेळता, जागृतीत तो, द्वैती जरि ते विहरावे |
अदवैतीच्या तुर्येलागी, एक क्षणहि ना विसरावे || ३५६.

श्लोक- *मनोदृश्यमिदं द्वैतं यत्किंचित्सचराचरम् ।*

*मनसो ह्यमनीभावे द्वैतं नैवोपलभ्यते ॥ ३१ ॥*

**द्वैतचि कारण संसाराचे, खेळ जेथं तो मायेचा |**

**अद्वैताची नित्य अनुभूती, हाच मार्ग तो मोक्षाचा || ३५७.**

**द्वैताची ती जाणीव होई, दर्शविता आपुल्या मने |**

**उपाय त्याचा असे एकचि, मना अमनचि ते करणे || ३५८.**

**विवेकदृष्टी नित्य ठेऊनी, द्वैती अनुभवी अद्वैता |**

**आभास हा जो वरवरलाची, पैल तयाच्या ते जाता || ३५९.**

**जेही दिसते इथले सारे, हा मायावी खेळ असे |**

**कांही यातील ना टिकणारे, वाळूत खोपे दिसती जसे || ३६०.**

**वैभव आणि मनोहारिता, आज असे परि उद्या नसे |**

**यांत अडकता, वृथा भोग ते, सुख-दुःखाचे ते फांसे || ३६१.**

**पूर्ण विरक्ती सहजभाव तो, व्यक्ती-वस्तू संपर्की |**

**व्यवहाराला चोख करावे, अलिप्तता परि नित राखी || ३६२.**

**खेळ जगाचा चालू द्यावा, होऊनी उचितचि सहभागी |**

**अद्वैताचे भान ठेऊनी, अंतःसंगी बहिस्त्यागी || ३६३.**

परहित साधन ना सोडावे, जे-जे वाट्याला आले |

उचित त्यासी न्याय देऊनी, निष्कर्मे त्यासी केले || ३६४.

मन विहरावे नित सत्कर्मी, लावावे त्या हरिचरणी |

देह असे ते केवळ साधन, विवेकेची ते आचरणी || ३६५.

तेणे सारी कर्मे होती, नित्य अलिप्तचि राहोनी |

द्वैती देह जरि, भान अद्वैती, मोह नि माया नसे मनी || ३६६.

श्लोक-*आत्मसत्यानुबोधेन न संकल्पयते यदा ।*

*अमनस्तां तदा याति ग्राह्यभावे तदग्रहम्* ॥ ३२ ॥

**जोवरी मन ते, द्वैत तोवरी, जगती द्वैतचि अनुभवितसे |**

**जग नि मन ते संबंधितचि, एक दुज्याविण कदा नसे || ३६७.**

**मन आणि जग उभयचि हे तर, परस्परी अवलंबी असे |**

**उसने अस्तित्वचि तयांचे, तुर्येकडूनि लाभतसे || ३६८.**

**विचार हेचि रूप मनाचे, जगत बने ते दृश्याचे |**

**विचार विरता, द्रष्यहि विरते, नसेच कारण द्वैताचे || ३६९.**

**मन आणि जग उभय उगवती, एकाची त्या समयाला |**

**एकहि विरता, दुजे न राही, स्थान नसे ते द्वैताला || ३७०.**

**जगातली ही सारी दृश्ये, विचारेच अस्तित्व असे |**

**विचार जंव दृश्यासी स्पर्शिता, ओळख-आकलन होई तसे || ३७१.**

**विचार-दृश्य हि उभयचि मिथ्या, त्यांची ये-जा सुरु असे |**

**उभयहि मिथ्या, नित्य बदलते, मायेने खेळहि भासे || ३७२,**

**मना आवडी दृश्यांची ती, काल्पनिक वा जगताचे |**

**दृश्य कल्पना जेंव्हा विरते, दर्शन बिंबे सत्याचे || ३७३.**

कधि दृश्य ते समोर असता, जागृतीतहि परि न दिसे |
कारण मन ते तदा अमनचि, आपुले ठायी गुंग असे || ३७४.

सत्य उमगता, द्वैत न राही, भान राही ते मिथ्याचे |
दृश्ये आणि विचार असता, आकलन केवळ सत्याचे || ३७५.

दृश्ये अनुभवी आत्माराम नि, स्वयेची तो हि दृश्य असे |
स्पष्ट उकल होता सत्याची, आत्म्यावाचुनि अन्य नसे || ३७६.

जगतीची ती ना संपती दृश्ये, विचार मनीचे प्रवाहिती |
लक्ष आपुले केवळ तुर्यी, विचलित होई ना शांती || ३७७.

जग असुनि ते अभाव आपणा, कारण मन ना गुंतू दिले |
संग न तूर्येचा भंगे तो, द्वैत तदा ना अनुभविले || ३७८.

घटा पाहता, अभाव त्याचा, दोन प्रकारे होत असे |
तया फोडुनी अथवा ज्ञाने, मातीचि ही, हेचि ठसे || ३७९.

तैसे जग आणिक मनहि ते, नच अभाव तो नाशाने |
सहजी त्याशी सारुनी बाजू, साधे परंतु ज्ञानाने || ३८०.

सत्य विदित होताचि मनाशी, मनपण पुरते ते विरते |
आत्मभान ते अद्वैताचे, सारे वासुदेव दिसते || ३८१.

निजरूप आपुले केवळ आत्मा, मिथ्या दृश्य नि जगताचे |
द्वैताविण तर व्यवहारचि ना, जरि सारे ते वरवरचे || ३८२.

नि:संगे ती मनी विरक्ती, संग करुनियाही नि:संगी |
मनोभाव तो नष्ट तयाने, विषयी राहुनि वैरागी || ३८३.

बाह्य जगाचे ज्ञान कराया, विषय येती आणि जाती |
विवेक ठेऊनी नित्यचि जागृत, व्यवहारीही मनी शांती || ३८४.

दुर्गुण विषयातील भोगाचे, मने जोही ते जाणतसे |
अप्सराहि त्या इंद्रपुरीच्या, कदा तया ना भुलवितसे || ३८५.

जे वाट्या आले ते भोगी, अलिप्त राही नित्य परी |
जगी दिसतसे जगासारखा, अंतरी विसरी परि न हरी || ३८६.

भोग न त्यागी, दमन करोनी, भोगे परि तो अडकेना |
पाऊस ऊनही येती जाती, विचलित नच तो कधी मनी || ३८७.

सागर सोडी ना मर्यादा, ओहटी हो वा की, भरती |
ॐकाराला नित्य गर्जुनी, प्रसन्नता हि नित्य स्थिती || ३८८.

तैसे या इहलोकी असावे, विषय स्पर्शे विचलित ना |
येथं असोनी मने नसावे, चित्ती हरिविण कांहीच ना || ३८९.

आत्मस्वरुपी नित्य भान ते, स्वानंदाची अनुभूती |

द्वैती अद्वैता अनुभविता, अविचलित अंतरीची शांती || ३९०.

श्लोक- *अकल्पकमजं ज्ञानं ज्ञेयाभिन्न प्रचक्षते ।*

*ब्रह्मज्ञेयमजं नित्यमजेनाजं विबुध्यते* ॥ ३३ ||

**ज्ञाता, ज्ञान नि ज्ञेयही सकलची, एकलेची ते ब्रह्म असे |**

**तोचि आत्माराम जाणण्या, जन्म आपणा लाभतसे || ३९१.**

**नच त्याचा तो जन्म जाहला, कुणी ना त्यासी निर्मियले |**

**असे स्वयंभू परब्रह्म ते, त्याच्या बळेचि जग चाले || ३९२.**

**बुद्धी मन आणि ती इंद्रिये, यांच्या तर तो पैल असे |**

**म्हणुनी ना तो विषय दिसाया, अनुभूतीनेचि तो गंवसे || ३९३.**

**त्याशी तादात्म्यचि होऊनी, शून्य मनाने जे ध्याती |**

**त्याची दिव्यता, आगळीच ती, तादात्म्यचि ती अनुभूती ||३९४.**

**मीचि आत्मा ठाम धारणा, ज्ञान दृष्टीही तैसीची |**

**सकल सोडुनी हरी समरसता, येई अनुभूती त्याची || ३९५.**

**कारण मी तर तोचि असतो, मायेमुळेचि अलगपणा |**

**दूर आवरण तिचे सारीता, मीचि हरी हे, ये ध्याना || ३९६.**

श्लोक-निगृहीतस्य मनसो निर्विकल्पस्य धीमतः ।

प्रचारः स तु विज्ञेयः सुषुप्तेऽन्यो न तत्समः ॥३४॥

तया जाणण्याची जी अवस्था, विवेकपूर्ण नि अ-मन असे |

संकल्पाविन असेची लय हा, परी सुषुप्ती कदा नसे || ३९७.

ज्ञात्याने ही जाणुनि घ्यावी, अभाव करुनी सकलांचा |

एकचि आत्मा चित्ती ध्यावा, प्रभाव सोडुनि मायेचा || ३९८.

मन-पवनाची एक गती ती, स्थिरचि पवनाशी करणे |

सुलभे चिदाकाश ते मिळते, बाह्याकाशी सहजपणे || ३९९.

माझे मी-पण अभाव होता, उरे एक आत्माराम |

तोचि सकलांची विश्रांती, सहजी साधे विश्राम || ४००.

ऐशा समयी मनो-अवस्था, पूर्ण जागृतीचि तेंव्हा |

ज्ञात्याने ती जाणुनी घ्यावी, तो तर भाग्याचा ठेवा || ४०१.

द्वैता लागी जगतामाजी, व्यवहारास्तव आचरावे |

अलिप्त भावे, सारे करुनी, तुर्येला न सोडावे || ४०२.

जेंव्हा जगत न अनुकुल बनते, मनास बदलावे लागे |

तरीच व्यवहारी सुलभता, कधि न यश मिळे त्यायोगे || ४०३.

पुन्हा प्रयासचि जगा बदलण्या, अनुकुलता ती होण्याला |
परि नव्हे हा मार्ग तयाचा, जाणुनि घ्यावे सत्याला || ४०४.

मार्ग जगाचा नाचि बदलता, वेधची घ्यावा सत्याचा |
अनुकूल ऐशा व्यवहारे मग, मार्ग सुचे तडजोडीचा || ४०५.

अनुभूत ऐसे द्वैत असे ते, आत्मा त्यांतही अनुभवणे |
ज्ञान-दृष्टी ती ऐशी होता, सहजी अद्वैती असणे || ४०६.

सुषुप्तीत ते नसे द्वैत जरि, तात्कालिकचि अनुभूती |
आणि असे ती अज्ञानाची, नच ऐसे परि अद्वैती || ४०७.

गौडपाद ते म्हणती त्त्या मना, 'निगृहित' ऐशा नामाने |
नित्य अलिप्तचि राहुनि जगती, करि कर्मे निष्कामाने || ४०८.

द्वैत नि अद्वैतही ते राही, नसे नाश तो कोणाचा |
विवेक दीपे ज्ञानदृष्टीने, विसरही ना तो तुर्येचा || ४०९.

मन राहे परि नित्य सुप्तचि, जैसा काष्ठी तो वन्ही |
प्रगटहि होता, सहजी विरतो, इंधन जाता संपोनी || ४१०.

अभाव वस्तूंचा तो होता, इंद्रीयाशी ना विषय मिळे |
कार्य मनाचे खुंटे तेंव्हां, मन ते जागीच जणु वितळे || ४११.

सिद्ध वर्ततो सामान्यासम, अनुभवी जगता व्यक्ती-गुणे |
भोगी त्यागी, रुसे नि हंसे, सामान्यचि त्या आचरणे || ४१२.

अलौकिकता कदा न दावी, स्वधर्म आचरण नित्य करी |
जगताच्या नियमाने चाले, कधि न विसरे परि हरी || ४१३.

हेचि अंत:संगी आणीक, बहिस्त्यागी ते वाशिष्टी |
अंतरीचा आवाज ऐकतो, मायेच्या ना परि गोष्टी || ४१४.

*श्लोक-लीयते हि सुषुप्तौ तन्निगृहीतं न लीयते ।*

*तदेव निर्भयं ब्रह्म ज्ञानलोकं समन्ततः ॥ ३५ ॥*

**लीन होई मन निद्रेमाजी, परंतु अस्तित्व ना मिटे |**

**विवेकी असता, लीन नसे मन, आत्म्यामाजी एकवटे || ४१५.**

**चार गोष्टी त्या मनाविषयीच्या, गौडपाद ते बिंबविती |**

**अस्तित्वचि जे असे मनाचे, साधक लक्ष न त्या देती || ४१६.**

**अनुभव आणि दर्शन जेही, त्यासी स्वीकारीत जावे |**

**उभयचि असते ते मायेने, हेही ना ते विसरावे || ४१७.**

**ध्यानी येता चारी गोष्टी, समजे प्रपंच मिथ्याची |**

**अन्य तयाला साधन नाही, मन होई मग तुर्याची || ४१८.**

**निग्रहित ते असेची मन ते, ज्ञानमय नि भय त्याशी नसे |**

**निद्रेमाजी बीज रूपाने, विकार ते परि सुप्त असे || ४१९.**

**उष्यामाजी गवत काढिता, शेत सर्व ते निर्मळची |**

**परंतु वर्षा थोडी होता, दिसे शेती ती गवताची || ४२०.**

**परि तयाचे जळताची बीज, नाशचि पुरता गवताचा |**

**विषय विकारहि तसे जाळता, उद्भव पुन्हा न हो त्यांचा || ४२१.**

ज्ञात्याचे मन सुप्त न होई, जागरुक निद्रेत असे |

मनचि ब्रह्मामाजी मिळवुनी, संकल्पहि तो जरा नसे || ४२२.

श्लोक-अजमनिद्रमस्वप्नमनामकमरूपकम् ।

सकृद्विभातं सर्वज्ञं नोपचारः कथंचन ॥ ३६ ॥

स्मृती देती ते मंत्र सातवा, श्रुतीमधील जो मोलाचा |

गौडपादजी करिती खुलासा, कारिकेतहि या त्याचा || ४२३.

जन्म तयाचा कदा न झाला, पूर्ण ज्ञानमय ब्रह्म असे |

नामरूप ना, नित्यप्रकाशी तया स्वप्नचि कदा नसे || ४२४.

अद्वैत न कदा विभजते, कशाचेही ते ना कारण वा |

जग ना निर्मिती ही ब्रह्माची, वा कारण की, ते अथवा || ४२५.

ध्यानी धरावे, कुणी न जगाला, कधीही ते निर्मियले |

स्वप्नासम ते दर्शन-अनुभव स्वीकारणे जैसे झाले || ४२६.

उभयचि असती अज्ञानाने, द्वैता जैसे खेळावे |

शिशूत भातुकलीचि खेळता, कल्पनाजगी, रंगावे || ४२७.

व्यवहारास्तव लटके द्वैतचि, खेळ चालवी कर्मांचा |

व्यष्टीकरवी आकार लाभे, समष्टी रूपे विश्वाचा || ४२८.

मिथ्याशी ना सत्य म्हणावे, ध्यानी नित्यची ठेवावे |

म्हणुनी सारे करणे परंतु, कशातहि ना अडकावे || ४२९.

ज्ञान तयाचे पूर्णचि होता, अन्य लागती न उपचार |
नित्य शांत ते, निर्गुण निश्चल, दिव्यचि तो साक्षात्कार || ४३०.

पूजन त्याचे नच शब्दांनी, स्तोत्र, मंत्र उपचाराने |
पूर्ण मौन नि समरस भावे, एकरूप त्याशी होणे || ४३१.

कांही नुरावे माझे मीपण, मन बुद्धी त्या अर्पूनी |
पूर्ण समर्पण त्याशी होता, सर्वस्वचि त्याचे चरणी || ४३२.

पूर्णपणे ते हरिमय व्हावे, हरिविण कांही न अनुभूती |
शून्य अहंता, अलगपणा ना, केवळ हरिचरणी प्रीति || ४३३.

हेचि त्याचे स्तवन नि पूजन, एकरूप त्यासी होता |
शब्द न उरती, कृती उपयोगी ना, निश्चल ऐशा अद्वैता || ४३४.

श्लोक- *सर्वाभिलापविगतः सर्वचिन्तासमुत्थितः ॥*

*सुप्रशान्तः सकृज्ज्योतिः समाधिरचलो भयः* ॥३७॥

अंतरीचे व्यापार स्तब्ध नि, बाह्यहि ना व्यवहार असे |

निवांत निश्चल ना उर्मी नि, वाणीने ते शब्द नसे || ४३५.

मन होता ते चतुर जेधवा, सहाय्य पूर्णचि तेही करी |

अद्वैताला मुळी न बाधा, द्वैत जरि ये व्यवहारी || ४३६.

जगतातील जी रसिक रम्यता, पुरते तिजला अनुभवणे |

घेणे पुरते आस्वादाला, परि गुंतुनी नच जाणे || ४३७.

सबाह्य मौनचि निखळ शांतता, पूर्णकाम नि निष्काम |

दंग पूर्ण तो स्वानंदीचि, तोचि असे आत्माराम || ४३८.

अस्तित्व नि व्यवहार जगाचे, यांस न बाधा आणावी |

जीही आपुली असे भूमिका, उत्तम तिजला वठवावी || ४३९.

जे जगती व्यवहारही करणे, त्यासी सत्यचि समजुनी |

सामान्यासम तदा आचरण, 'मिथ्या' ना ते मानोनी || ४४०.

परि अंतरी ठाम असावे, खेळ असे हा मायेचा |

सारे जरि व्यवहार करावे, संग न सोडी तुर्येचा || ४४१.

श्लोक-ग्रहो न तत्र नोत्सर्गश्चिन्ता यत्र न विद्यते ।

आत्मसंस्थं तदा ज्ञानमजाति समतां गतम्॥३८||

आत्म्याठायी नसे त्याग नि, स्वीकारही तो मुळी नसे |

विचारशून्यचि नित्य अवस्था, पूर्णपणे निष्काम असे || ४४२.

स्वयंभूच तो सर्वज्ञानी, पूर्ण अवस्था ज्ञानमयी |

विपरित स्थिती ना तयास बाधी, नित्यचि संतोषी राही || ४४३.

जगताच्या या रंगभूमीवर, जेही अनुभवा येई |

ते सारेचि नाटक समजुनी, विचलित जराही ना होई || ४४४.

अलिप्तता ही, जीवनास जणु, दिव्य बनविते प्रसादची |

परि जो गुंते मायाजाली, जीवन वाटते ओझेची || ४४५.

श्लोक- अस्पर्शयोगो वै नाम दुर्दर्शः सर्वयोगिभिः ।

योगिनो बिभ्यति ह्यस्मादभये भयदर्शिनः ॥३९॥

जगती आपुली अनेक नाती, ममत्व तैसे कैकांशी |

अति कठीण निर्लेप राहणे, आणि विरक्ती ती त्याशी || ४४६.

बंध आपसातील रेशमी, अलिप्त त्यासी ते होणे |

'अस्पर्शयोग'चि म्हणती यांसी, कठीण तयासी आचरणे || ४४७.

गौडपाद आचार्य सांगती, यासी उपाय एक असे |

अंतरीचा हरी तो विनवावा, मनोबलास्तव प्रार्थितसे || ४४८.

समर्थ हरीचा आश्रय असता, अन्य आश्रया नच घ्यावे |

पूर्ण त्यावरी सोपवुनिया, निर्भय नित्यची ते व्हावे || ४४९.

गीतेत नवव्या अध्यायी हे, कृष्णानेची सांगितले |

आश्रय माझा पूर्णचि घेता, सहाय्य पुरते त्या केले || ४५०.

सर्वचि कर्मे करि मजसाठी, त्याची चिंता असे मला |

योगक्षेमा मीचि वाहतो, नसेचि शंका या बोला || ४५१.

अनावरचि भावना जाहल्या, समतोलास्तव विनवावे |

त्याजवरीचि सोपवुनिया, स्थैर्य मनाचे राखावे || ४५२.

हे जरि झाले द्विधा वागणे, उपाय यासी हा खासा |
सहाय्यासी हरी निश्चित येई, अनुभव भक्तांचा ऐसा || ४५३,

कर्मयोगी ते व्हावे आपण, स्वधर्म पालन ना सोडी |
भावबंध जे या जगतीचे, त्यासीही ना ते तोडी || ४५४.

अन्यथा जगी अध्यात्माशी, कुणी कधी ना शिवणार ! |
बरा आपुला प्रपंच गाडा, जेही व्हायचे होणार || ४५५.

प्रवास हा तर अनंतातला, विवीध अस्तित्वी असणे |
अनेक नाती जन्मो-जन्मी, दैवे विस्मृती ती होणे || ४५६.

या जन्मी अध्यात्म स्तराला, शक्य तेवढे ते नेणे |
पुढल्या जन्मी उपयोगी ते, कृष्णाचे ऐसे कथणे || ४५७.

चक्र जगाचे चालू राही, नाही तयाशी विश्रांती |
बदले भुमिका वेगवेगळी, वेगळीच कर्तव्ये ती || ४५८.

ब्रह्म अनादि जगही अनादि, आपण ब्रह्मचि ते असता |
खेळ न संपे, हा खो-खो चा, येथे नित्यचि अविरतता || ४५९.

श्रद्धामय नि विनम्र भावे, हरीशी हितगुज ते करणे |
अंतरीचा हरी नित्य स्मरोनी, द्वैती गुंतून ना जाणे || ४६०.

*श्लोक-मनसो निग्रहायत्तमभयं सर्वयोगिनाम् ।*

*दुःखक्षयः प्रबोधश्चाप्यक्षया शान्तिरेव च ॥ ४० ॥*

**संयमित जो मनाशी ठेवी, भक्त सदाची निर्भय तो |**

**चिंता त्याने हरीशी दिधली, स्वरूप ज्ञानी जो होतो || ४६१.**

**नकारात्मकचि विचार येता, पाहताची त्या हांकलावे |**

**तशी लाविता संवय मनाला, सहजी संयमित व्हावे || ४६२.**

**जीवन सारे त्या सोपविता, आणि हरीशी अनुभविता |**

**खरी शांती ती त्यासी लाभते, मनात येई निर्भयता || ४६३.**

**शरण मनन नि निदिध्यासनही, अचूक दावी मार्गाते |**

**निरोध ना चित्ताचा करणे, परि करणे तो वृत्तींचा || ४६४.**

**वृत्ती नकोशा, नीट हुडकण्या, मार्गचि साक्षी भावाचा |**

**साक्षीभावे आणी विवेके, निरोध करणेची त्यांचा || ४६५.**

**द्वेष क्रोध तैसेची चिंता, आणि असूया मन-वैरी |**

**चित्त दुषित नि विकार देही, हानी होई परोपरी || ४६६.**

**आत्मबलाचा ऱ्हास होतसे, अस्वस्थ जीवन होत असे |**

**या सकलाशी निपटुनी काढी, दुजा याहुनी मार्ग नसे || ४६७.**

जेथे होई दुषीत मानस, साथ कैसी ती श्रीहरीची |

शुद्धी अंतर्बाह्य असावी, कांस तरि अध्यात्माची || ४६८.

शुद्ध जयाचे मानस ऐसे, सदाची निर्भय तो असतो |

दुःख-क्लेश ते दूरचि सरती, लाभ शांतीचा तो होतो || ४६९.

असे ज्ञान हे बहु उपयोगी, इहलोकी नि परलोकी |

बाह्याचरणी शुद्ध असावे, कैसा होईल तो दुःखी ?|| ४७०.

*श्लोक- उत्सेक उदधेर्यद्वत्कुशाग्रेणैकबिन्दुना ।*

*मनसो निग्रहस्तद्वद्भवेदपरिखेदतः ॥ ४१ ॥*

एक एक जरि थेंब काढिला, आणि चिकाटी अंगी असे |

पूर्ण सागरहि होई रिकामा, दोषांचेहि ते तैसे || ४७१.

जन्मजन्मीचे ते गाठोडे, शोध तयांचा तो घ्यावा |

हळूहळू निचरा दोषांचा, शुद्धीस्तव तो आचरावा || ४७२.

कधि यश मिळे अपयश केंव्हा, यत्न परी ना सोडावे |

चिकाटी आणि दृढचि मनाने, नित्य हरीला प्रार्थावे || ४७३.

ऐशा शुभ कार्यालागी, सहाय्य मिळते दैवाचे |

पुरती निष्ठा, आणि श्रद्धा, हेचि बल ते शुद्धीचे || ४७४.

श्लोक- *उपायेन निगृह्णीयाद्विक्षिप्तं कामभोगयोः ।*

*सुप्रसन्नं लये चैव यथा कामो लयस्तथा ॥४२॥*

विलास आणि मनोकामना, तैसे भोगहि विषयांचे |

मनातुनी बाहेरी काढी, मुख्य कार्यचि योग्याचे || ४७५.

अंतरात ते स्वये पाहुनी, दोषालागी जाणावे |

साक्षी भावे दोषा हुडकी, आणि तयाशी निपटावे || ४७६.

*श्लोक-दुःखं सर्वमनुस्मृत्य कामभोगानिवर्तयेत् ।*

*अजं सर्वमनुस्मृत्य जातं नैव तु पश्यति ॥ ४३ ॥*

**भोग आणखी काम उभयता, वाटती सुखमय ते आधी |**

**कालांतरी परि, दुःखचि देती, देही निर्मिताती व्याधी || ४७७.**

**उभया पासुनी दूर रहावे, जिथे कामना, दुःख तिथे |**

**आणि भोगा अंतचि नाही, टाळावे या उभयाते || ४७८.**

**उद्भवते जेंव्हा भोगेच्छा, पुढच्या दुःखा चिंतावे |**

**गुलाब जेथे तेथे काटे, हे न कदापि विसरावे || ४७९.**

**भोगातील आनंद संपता, त्यासी विसरुनिया जावे |**

**कधि त्यांत ते नच अडकावे, भोग हरीला अर्पावे || ४८०.**

**शांती आणि तृप्तीसाठी, मी न धावणे त्यामागे |**

**सहजी आले जे वाट्याला, संतोषावे त्या योगे || ४८१.**

**करण्यासी ते कधि न चुकणे, जगतीच्या कर्तव्याला |**

**भोगाचे ना गुलाम होई, वश नच ते आसक्तीला || ४८२.**

**भोग एकले कधि न येती, दुःख संगती ते आणिती |**

**क्षणिक देती जरि सुखाला, आणि बंधन करविती || ४८३.**

त्या भोगे वाढे आसक्ती, देही व्याधीही शिरती |
तैसेची ती कधि कुणाच्या, नच इच्छेची हो तृप्ती || ४८४.

या जगतीचा नित्य नियम की, संग कदा ना कायमचा |
संपर्की जेजे हि आले, क्षण येणार वियोगाचा || ४८५.

क्षणात दिसते, आणि विरते, शाश्वत ना इथले कांही |
हे ज्ञात्याने नीट उमगणे, ममत्वातुनी दुर राही || ४८६.

हे उमगुनिया, तयार असणे, विरह कदा नच टळणार |
जे आले ते कधी ना कधी, येथुन निश्चित जाणार || ४८७.

संगत जोवरी, मदत नि सेवा, म्हणुनी कदा न चुकवावी |
आणि निर्लेपची मनाने, विरह तयारी ठेवावी || ४८८.

उपाय दुसरा अध्यात्मिक तो, शांत मनाने चिंतावे |
जीव नि जगत न ब्रह्मे सृजिले, माया सकल चि उमगावे || ४८९.

श्रुती सांगती सारे ब्रह्मचि, मिथ्या जग हे जाणावे |
सर्व पसारा हा मायावी, तयात ना ते अडकावे || ४९०.

या अभ्यासे उमज वाढते, आणि सरते आसक्ती |
मंद श्वसने स्थिरावते मन, सत्य तयाला समजावे || ४९१.

*श्लोक-लये संबोधयेच्चित्तं विक्षिप्तं शमयेत्पुनः ।*

*सकषायं विजानीयात्समप्राप्तं न चालयेत्* ॥ ४४ ॥

जडत्व येता चित्त लीन ते, तयालागी ते जागवणे |

धावे विषयांचे मागे त्या, मानस शांतचि ते करणे || ४९२.

आत्मज्ञान न पुरते जोवरी, मालिन्य न पुरती जाई |

शुद्ध बोध तो होई तेंव्हा, मना शुद्धता ती येई || ४९३.

निश्चल शांतचि मन ते होता, क्षोभित त्यासी ना करणे |

जगत सुखाची नकोच आठवण, चंचल ना होऊ देणे || ४९४.

जडत्व कां ते मनास आले, शोध तयाचा तो घ्यावा |

अपुरी निद्रा, अतीच भोजन, वा श्रम; घ्यावा आढावा || ४९५.

हळूहळू ते नियमित जीवन, आणि शुद्धी साधावी |

रज तम हे गुण कसे वाढले, तीही कारणे शोधावी || ४९६.

सुप्त द्वेष नि आसक्तीही, मनास आणि चंचलता |

निराकरण तैसेची करावे, सुप्त समस्या मनी येता || ४९७.

मन होण्यासि सुस्थिर शांतचि, निश्चल चित्ते बैसावे |

कांहीही ना मुळी चिंतिता, अंतर्मनाशी ऐकावे || ४९८.

सहजी तेंव्हा मार्ग सांपडे, त्यानुसारचि वर्तावे |
राजमार्ग हा सुलभचि जगती, प्रेरणेशी ते ऐकावे || ४९९.

निदिध्यासन हा श्रेष्ठ मार्गचि, परब्रह्म ते मदती ये |
त्यासी कदा ना ते सोडावे, निर्देशन त्याचेचि स्वये || ५००.

चाळीस पासुनि सत्तेचाळीसही, कारिकाशी अभ्यासावे |
तेणे निग्रह होई त्वरेने, योग्य मार्गहि तो गावे || ५०१.

निदिध्यासना चार अडथळे, सुस्ती, मन बाहेरी ते पळणे |
फुकाची आठवण ती जगताची, प्रबळ आसक्ती ती होणे || ५०२.

चवथे कारण पुढे सांगती, वरील तिन्ही ते निपटावे |
शांत होई मन पुनश्च मग ते, निदिध्यासनी रंगावे || ५०३.

श्लोक- *नाऽऽस्वादयेत्सुखं तत्र निःसङ्गः प्रज्ञया भवेत् ।*

*निश्चलं निश्चरच्चित्तमेकीकुर्यात्प्रयत्नतः*॥४५.

जरी जाहले चित्तहि निर्मल, भोगालागी त्यागावे |

आत्म्यामाजी घट्ट रोवुनी, निःसंगचि ते नित व्हावे || ५०४.

भ्रष्ट न विषये होऊ द्यावे, हरी तादात्म्या साधावे |

सकली वासुदेव पाहता, समाधान सहजी यावे || ५०५.

कधि एकाग्री असता ते मन, सुखद अवस्था ती येते |

गुंतविते ती साधकासहि, रमू नये ते परि तेथे || ५०६.

कार्यासाठी जाणे असता, गारुडी खेळी ते रमणे |

क्षणिक सुखास्तव, कर्तव्याला, परि ते ठरतेचि चुकणे || ५०७.

विश्वामित्र नि मेनकेचिया, ध्यानी प्रसंगा आणावे |

पतन असे ते अगदी क्षणातचि, कमावले कां गमवावे ?|| ५०८.

पूर्ण विरक्ती सुख आनंदी, अनुभवी निश्चलता शांती |

विलक्षणचि तो आनंद दैवी, लाभे भाग्ये तो बहुती || ५०९.

सौख्य अनुभूती हा नच हेतू, निदिध्यासनी कदा असे |

स्वयेची होई सुखमय नित्यचि, स्वानंदीचि नित्य वसे || ५१०.

ऐसी निश्चल स्थिती ती येता, प्रयास मायेचा चाले |

पुरते त्यावर ध्यान असावे, नच झुकणे तिचियाही बले || ५११.

नच दिव्यत्वाला विसरावे, ध्याना घट्टचि रोवावे |

हेचि गीता षड् अध्यायी कथिले, ध्यानी पूर्णचि ते घ्यावे || ५१२.

श्लोक- *यदा न लीयते चित्तं न च विक्षिप्यते पुनः।*

*अनिङ्गनमनाभासं निष्पन्नं ब्रह्म तत्तदा॥४६॥*

चित्त लीन ना तंद्रेमाजी, नसेचि विक्षेपही जरा |

तरीच उमगे ब्रह्मरुप नि, निष्कंपाचा अर्थ खरा || ५१३.

बाह्य जगाचे व्यवहारनि ते, सुरू व्यापारचि जरि असती |

अंतर्बाह्य न उठेचि उर्मी, कदा न विचलित मन-शांती || ५१४.

जाणावे मन असे अनात्मा, नाम-रूप हे जगताचे |

जगातील जणु भाग एक हा, अस्तित्वहि मिथ्या त्याचे || ५१५.

जेंव्हा विरते आपुले मीपण, ब्रह्म-रूप तदा झाले |

मन नि ब्रह्महि नसे विलगता, परि अस्तित्वचि ते उरले || ५१६.

मनो-स्वभावा विसरू नयेचि, सुख हा त्याचा ध्यास असे |

विषय-सुखाची चाहुल येता, मन तिकडेचि धावतसे || ५१७.

लक्ष त्यावरी, नित्य असावे, आत्मरुपीचि विरवावे |

अद्वैताच्या खऱ्या सुखाचा, लाभ तेधवा तो पावे || ५१८.

चित्त ओळखे आपण आपणा, फिरे पाठमोरे हर्षे |

तत्व तेचि मी म्हणते मोदे, आनंदाच्या त्या वर्षे || ५१९.

*श्लोक -स्वस्थं शान्तं सनिर्वाणमकथ्यं सुखमुत्तमम् ।*

*अजमजेन ज्ञेयेन सर्वज्ञ परिचक्षते* ॥ ४७ ॥

**सर्वोत्तम त्या ब्रह्मसुखीचि, एकरूप निजरूपाशी, |**

**स्वस्थ शांत नि पुरते निश्चल, शब्द वर्णना ना त्याशी || ५२०.**

**दीपक जणु तो निर्वातीचा, स्थिर ज्योत ती तेजस्वी |**

**गहन चिंतनी आपणामाजी, याहुनि अन्य न स्थिती बरवी || ५२१.**

**स्थिती असे ही कैवल्याची, अज, सर्वज्ञ नि सम सकला |**

**म्हणती ब्रह्मज्ञहि तेधवा, पार नसे या सौख्याला || ५२२.**

**स्वये तोचि तो असतो तुर्या, सर्वश्रेष्ठ हि स्थिती असे |**

**आगळाचि आनंद अनुभवी, सुखमयता ती अन्य नसे || ५२३.**

**तुर्यावस्था सदैव राही, विसंबे न ती क्षणभरहि |**

**जगी व्यवहारी, देह असे जरि, तुर्या विस्मरणी नाही || ५२४.**

**सामान्यासम जरी आचरण, तुर्यामय तो सदा असे |**

**स्वधर्म पाळी, करि कर्तव्ये, परि मोही ना कदा फसे || ५२५.**

**जेही आले ते वाट्याला, उत्तम करि त्या कार्याला |**

**असंख्य करीताही ती कार्ये, शीण न वाटे तो त्याला || ५२६.**

प्रसन्न ऐसा नित्यचि राही, प्रसन्नतेला पसरवितसे |

जेथे जाई, नित संतोषी, नित्य तृप्त आनंदी असे || ५२७.

श्लोक-न कश्चिज्जायते जीवः संभवोऽस्य न विद्यते ।
एतत्तदुत्तमं सत्यं यत्र किंचिन्न जायते ॥४८॥

जीव कदा ना जन्मा येई, नित्य एकरूप तो ब्रह्मी |
परमसत्य ते एक ब्रह्मचि, अनादिच ते ना जन्मी || ५२८.

अस्तित्वचि हे या जगताचे, फसवे जरि दृष्टीस दिसले |
अनादिच हे जगत असे की, सृजन तयाचे नच झाले || ५२९.

अनुभव आणि स्थिती जगताची, तया स्वीकारी ती जैशी |
व्यवहारी जगी समचि राही, कदा न गुंते मायेशी || ५३०,

व्यवहारास्तव द्वैती वर्तता, अद्वैताला ना सोडी |
सावधान परि नित्य असावे, नकोच मायेची गोडी || ५३१.

जगत कशास्तव तुवा निर्मिले?, कधि विचारी, ना हरीला |
निर्मितीचि त्याची ना झाली, दिसणे परि आहे त्याला || ५३२.

मी आलो ते कां जन्माला?, प्रश्न असा ना कदा करी |
तुझा प्रांत तो नसे कदापि, करविता तो एक हरी || ५३३.

आपण स्वधर्म ना विसरावा, आणि अंतरी नित्य हरी |
द्वैती राहुनि निःसंगचि ते, ना मायेच्या आहारी || ५३४.

म्हणती ‘अजातीवाद’ तयाला, चवथे अध्यायी स्पष्ट करी |
विनम्र वंदन गौडपादजी, सुलभ विवेचन गहन जरी || ५३५.

‘अद्वैताशी’ आपण कथिले, स्पष्ट सुयोग्यचि शब्दांनी |
जरि वर्णनातीत ब्रह्म ते, सुलभचि श्रविता तंव वाणी || ५३६.

चरणी आपुल्या मस्तक माझे, सहाय्य केले नित्य मला |
जेथे कुंठीत बुद्धी माझी, जागविले त्वा प्रज्ञेला || ५३७.

गीता ज्ञानेश्वरीने मजला, वेळोवेळी जे कथिले |
अनुभव अमृत ज्ञानेशांचे, सहजी ते स्मरणी आले || ५३८.

कृतज्ञ परमार्थानंदांचा नि, अन्य भाष्य जये केले |
गहनाशी आणिली सुलभता, अंतर प्रकाशमय झाले || ५३९..

माऊली धावे वेळोवेळी, बुद्धी स्तब्धचि होतांना |
अचूक शब्दा हळूच सुचवी, शब्दचि काव्यी येतांना || ५४०.

|| हरी ॐ ||

लेखन समाप्ती, २६/०५/२०२१.

वैशाख सुद्ध पौर्णिमा –बोधी पौर्णिमा

## मांडुक्य कारिका- प्रकरण तिसरे- अद्वैत –काय शिकविते?

याप्रकरणात आचार्य पूज्य गौडपाद हे अद्वैत आत्मा- अद्वैत तुर्या यावर भर देत आहेत. हा पूर्ण अध्याय मूळ श्रुतीतील मंत्र क्रमांक सातच्या मध्यवर्ती विचारांशी निगडित आहे.

अद्वैताचा अध्यात्मिक अर्थ म्हणजे जे एकमेव असे आहे. ज्याचे विस्तार वा बहुरूप होत नाही. त्याचे ना विभाजन होते, किंवा अनेकविध होते.

कारण अनेकविधता ही सृजनाशिवाय शक्य नाही. अद्वैत हे त्यामुळे द्वैत होऊ शकत नाही. त्याचा गुणाकार किंवा भागाकार होऊ शकत नाही.

द्वैत असलेले जगत हे कुणीही निर्माण केलेले नाही. त्याचा कुणीच निर्माता नाही. अद्वैत तर नाहीच नाही.

सृष्टी दिसते तो भास आहे. हे डोंगर, दऱ्या, माणसे व्यक्ती सारे सत्य नाही. ते पूर्वी नव्हते, पुढे नसणार. केवळ कांही काळ त्याचा बदलता आभास द्रष्ट्याच्या आकलनानुसार होत राहतो. याला ‘अजातीवाद’ असे संबोधले जाते.

हे ब्रह्म निर्मिती नाही. ते स्वयंभू आहे. न जन्माला आले, ना त्याचा लय होणार. जग सुद्धा जन्माला आलेले नाही, त्यामुळे त्याचे स्वरूप बदलत राहिलं, परंतु ते लयाला जाणार नाही.

पूर्ण जगत हे स्वप्नासारखे त्या, त्या अनुभवावर आधारित आहे. त्याचा ज्याला जसा अनुभव येईल, तसा त्याने त्याशी तात्पुरते सत्य समजून, व्यवहार करावा. त्यातील व्यक्ती-पदार्थ आदी प्रत्येकाच्या आकलनानुसार बदलत असते. ते विनाशकारी आहे. जे संपर्कात आले ते नेहमी रहात नाही, राहणार नाही. कधी न कधी, त्याचा संपर्क तुटणारच.

हा अगदी स्पष्ट परंतु धाडसी निर्णय यातून गौडपाद आपल्याला देत आहेत.

तुम्हाला जर जगाचा अनुभव आला तर, स्वप्नवत त्याशी व्यवहार करावा. ते तसे भासते म्हणुन ते तसे आहे. त्याचे असणे हा ब्रह्माचा विषय नव्हे. प्रत्येकाचा कोणत्याही प्रसंगी अनुभव वेगळा असणार. त्याने आपल्या भूमिलेत्तील अधिकारानुसार त्याशी वागावे. पण अलिप्त असावे आणि आपले मूळ अद्वैत सोडू नये.

स्वप्न निद्राशक्तीची निर्मिती असते. आणि जग माया शक्तीची.

**या प्रकरणातील महत्वाचे मुद्दे**

**(कारिका १,२)-** कोणत्याही अध्यात्म मार्गी असणाराने द्वैतात गुंतू नये. परंतु पहिल्या व मध्यम अधिकारी व्यक्तींना द्वैतात राहूनच पुढे जाता येते. हि पहिली पण तात्पुरती पायरी आहे. द्वैत भक्ती म्हणूनच गरजेची आहे. परंतु त्यातून पुढे अद्वैतातच जाण्याचे विसरू नये. किंबहुना द्वैतात हे जीवन संपवणे दुर्दैवी आहे. द्वैत भक्तीत कदापि गुंतू नये. त्याने फक्त विरक्तीचे महत्व आणी आसक्तीचा विनाश समजून घ्यावा. अद्वैतात असणे हेच आपले ध्येय आहे.

पहिला स्तर निष्काम कर्म असून दुसरा आहे, उपासना. कर्माने ईश्वर पूजन करावे. त्यांत भक्त आणि भगवंत हे 'पावन द्वैत' आहे. उपासनेत भगवंताचे ध्यान असते. आणि त्यांतून अद्वैत गाठावे. अन्यथा तुम्ही 'कृपण' गटात बसता.

जग आणि जीव यांच्या निर्मितीतील मिथ्यापण

**(कारिका ३ ते १०)** यांत आचार्य म्हणतात, जग ब्रह्माने निर्मिलेले नाही. त्याला पोकळी आणि स्वप्न यांची उधारणे ते देतात. व्याप्त पोकळी आणि अव्याप्त असे काल्पनिक विभाजन केले जाते. घटाचा नाश केल्याने किंवा ज्ञानाने तो केवळ मातीच आहे आणि मूळ पोकळी अभंग व निश्चल राहते, हे उमगते.

जितके देह, तितक्या पोकळयात चैतन्याचा समावेश, हे जीवात्मा आणि अव्याप्त पोकळी म्हणजे भगवंत नामक कृत्रिम विभाजन होते.

त्यामुळे अनेक जीवात्मे असल्याचा मिथ्या भाव येतो. वस्तुतः उभय नेहमी एकच आहेत. आणि कदापि विभाजित होणे किंवा परत मिळणे घडत नाही

स्वप्न हे मनाची किमया असते. तर जागृतीतील जग ही मायेची. तिच्यामुळे हे दिसणे संभवते. हीच 'अमृत अनुभवा'त वर्णिलेली शक्ती आहे.

**(जगाची वरवरली मिथ्या निर्मिती (कारिका ११ ते ३०))**

उपनिषदातील सातवा मंत्र याचा आधार घेऊन यांत उलगडा आहे. जगाचि निर्मिती झालेली नसून, तो मायेचा देखावा आहे.

ब्रह्मा पासून प्राण, मन, इंद्रिये, आकाश- पोकळी- आदी तत्वे, आदींना आधार मिळतो. जसा तरंगाला पाण्याचा .

आत्मा वा ब्रह्म यापासून आकाश निघते. आणि इतर भुते जन्म घेतात. पृथ्वी पासून अन्न, आणि त्यापासून भुते निघतात. असे तैतरेय २.१.२ म्हणते.

मन सुप्त अगर ग्लानी अवस्थेत असेल, तर त्याला सारी निर्मिती खरी वाटते. म्हणून मन नित्य सावधान ठेवावे. पण अशी ग्लानी अथवा निद्रा यांनी दृश्य हे अदृश्य होते.

जागृतीतील जगांत खऱ्या सारखे व्यवहार करावे. पण त्यांत गुंतू नये.

माझा जन्म झाला आहे, असे मानू नये. केवळ अस्तित्व सत्य मानावे. मुक्त असल्याने बंधनातून सुटण्याचा प्रश्न नसतो. तसा प्रयास वृथा असतो.

**(मनाचे विलयीकरण ( कारिका ३१ ते ३९))**

जगाची निमिती झाली, असे मानू नये, जगाचे अस्तित्व मिथ्या आहे हे जाणावे. जगात देह व मन अंतर्भूत आहे. मन निर्मिती मिथ्या आहे ही जाणीव दृढ करावी. व्यक्त मनच प्रारब्धाशी संबंध असतो. जगाचे व्यवहार करण्याचे मन हे तात्पुरते साधन आहे. पण त्याशी निगडित होऊ नये

आत्मा असंग असतो. त्यामुळे सारे करावे पण कशात अडकू नये. अनासक्ती जबर हवी. स्वामित्वभाव, नाते संबंध जपणूक, देह-मन-यांशी तादात्म्य हे टाळावे. त्याचा उपयोग करावा, पण त्यांत गुंतू नये.

**निदिध्यासन ( कारिका ४०-४७)**

मनोनिग्रह अगर निदिध्यासन फार आवश्यक असते.

‘ब्रह्म अभ्यास रूप निदिध्यासन’ मध्ये साक्षी भावाने सर्व व्यवहार शुद्धी साधावी. व्यवहारात

कर्मात आपला भाग असतो पण फळात कदापि नाही. भगवंत हवी ती मदत करतात, परंतु नियंत्रक होत नाही.

असहाय्य परिस्थितीत भगवंताचे सहाय्य प्रार्थावे. पण अद्वैतातच असावे.

**(अंतिम संदेश कारिका ४८ )**

जगत निर्माण झालेले नाही. ब्रह्म अनादि आहे. त्यांतून कांहीच निर्माण होत नाही. ते ब्रह्म हेच मी आहे.

हे प्रकरण फार महत्वाचे आहे. त्याचा आशय समजणे आणि आचरणे हे ब्रह्मप्राप्ती साठी अत्यावश्यक आहे. फार छान रीतीने गौडपाद यांनी याचे स्पष्टीकरण केलेले आहे.

हरी ॐ

२६/०५/२१. बोधी पोर्णिमा




# अलातशांती

## प्रकरण –चवथे

## अलात शांती –काव्यमय भाष्य

### -- विषयप्रवेश --

आगम प्रकरण पहिले सांगे, आत्मा ब्रह्मरूप असे |
ॐकाराचे महात्म्य सांगे, निर्देशी कैवल्य कसे || १.

चतुर्थ मात्री नीरव शांती, तीन पदासह ती तुर्या |
ॐकाराच्या तीनहि मात्रा, केवळ ती असते माया || २.

नसेचि विभजन ते तुर्येचे, अखंडचि ती नित्य असे |
अद्वैताचे रूप तियेचे, तिजविण जगती अन्य नसे || ३.

दुसऱ्या वैतथ्यी हे सांगे, मिथ्याचि हे जगत असे |
दिसते तैसे नसे कदापि, मायेने ते आभासे || ४.

अंतरीचे नि बाह्याचेही, ज्ञान न बाधा करि त्याला |
परि जाणीव ती सकलाचीहि, ज्ञात असे ते तुर्येला || ५.

तिसरे अद्वैताचे प्रकरण, ब्रह्मचि केवळ सत्य असे |
अद्वैतातचि निवास त्याचा, अन्य त्याविणा कांही नसे || ६.

चवथे प्रकरण अलातशांती, वेदांतचि शब्दी पुरता |
कलश अमृताचा हा लाभे, याची अनुभूती ती होता || ७.

अलात संबोधित जियेला, मशाल तेजोमय जी तिला |
वेगे वाटोळी ती फिरता, चक्ररूप जणु वन्हीला || ८.

वन्हीने जणु रूप घेतले, मशाल फिरता दिसे जशी |
अनंत रूपे ब्रह्मही तैसे, तरि ना बाधा ब्रह्माशी ||९.

विविध रूपे निघती-लय होती, परि ब्रह्म ते शांत असे |
प्रकरणात या सारे कथिले, आता उरले कांही नसे || १०

## ||ॐ अलात शांती प्रकरण प्रारंभ||

*श्लोक- ज्ञानेनाऽऽकाशकल्पेन धर्मान्यो गगनोपमान् । ज्ञेयाभिन्नेन संबुद्धस्तं वन्दे द्विपदां वरम् ॥ १ ॥*

ॐ नारायण आदिगुरु हे, वंदन साष्टांगे केले |
अनंत आकाशासम तूं असशी, सकलाशीहि धारियले || १.

असीम ज्ञाने तुला जाणणे, आकाशासम जे की असे |
ज्ञानमूर्ती तूं स्वयेची असशी, विनम्र भावे वंदितसे || २.

जीवात्माहि आकाशासम, कणकण देही व्यापियले |
हृदय मंदिरी तूंचि वसशी, ज्ञान स्वयंभू प्रगटियले || ३.

ज्ञान,ज्ञेय नि ज्ञाता तूंचि, तुर्या रूपे बिंबविले |
सारे एकचि अद्वैती ते, हृदयी हेचि जाणवले || ४.

उष्मा आणि अग्नि अथवा, प्रकाश-भास्कर एक असे |
ज्ञानमयचि सर्वज्ञ ब्रह्म जे, ज्ञेय त्याविना अन्य नसे || ५.

सरस्वती विद्या ब्रह्माची, विनम्र वंदन तुज केले |
सुयोग्य लेखन करवी अंबे, हेचि तुजशी प्रार्थियले || ६.

नर नि नारायण ना भेदचि, जीव-शिव हि एक असे |
ज्ञानदीप तूं उज्वल केला, भेद कांही उरलाचि नसे || ७.

आमुच्यासाठी सद्गुरू रूपे, मानवरूपा तूं धरिले |

तूंचि धर्म तो व्यापक सद्गुरू, सद्भावे तुज वंदियले || ८.

श्लोक- *अस्पर्शयोगो वै नाम सर्वसत्त्वसुखो हितः ।*
*अविवादोऽविरुद्धश्च देशितस्तं नमाम्यहम्* ॥ २ ॥

अस्पर्शयोगे संबोधित जी, ती विद्या परब्रह्माची |
नि:संगे ती सुलभ लाभते, जरि संगत ती द्वैताची || ९.

व्यवहारी व्यापार बहुतहि, नि:संगचि या योगे ते |
नि:संदिग्धचि हे योगशास्त्र जे, सकलाशीही तोषविते || १०.

स्वयंसिद्ध हे शास्त्र असेचि, विदित आम्हा तयामुळे |
वंदन सत्शास्त्रा तुज केले, जाणीत तुर्या तुझ्यामुळे || ११.

द्वैताच्या ते संगे असुनी, मलिन कदा अद्वैत नसे |
मृगजळ संगे भूमी न ओली, शुद्धचि अद्वैत तसे || १२.

अस्पर्शयोगे कुणा न बाधा, सकला होई सुखदायी |
द्वैत नि अद्वैतहि संगती, उभया ना बाधा कांही || १३.

सुखमयताचि रूप ब्रह्मीचे, सदा सौख्यचि त्या संगे |
या शास्त्राशी जोही अनुसरे, लाभे सुखचि या योगे || १४.

परहित त्याचा धर्म असेचि, करीत कार्यां तो हर्षे |
सकली एकचि परमात्मा तो, स्वधर्म यज्ञे संतोषे || १५.

ब्रह्मभूत तो प्रसन्न आत्मा, शोक नि मोहही नच त्याला |
गीता अठरा-चोपन्नावे, समरस होई नित्य मला || १६.

शिरोधार्य अद्वैत नित्यचि, द्वैता आचरी व्यवहारी |
तो संसारी असुनि नसतो, कार्ये जरि तो सकल करी || १७.

सर्वव्यापी तो आकाशासम, स्पर्शहि सकलांचा होई |
परि निर्लेपची अस्पर्शयोगे, सदाचि तो निर्मल राही || १८.

आपआपल्या जपती श्रद्धा, आम्हा वादही नसे जरा |
सर्वव्यापी हे असे शास्त्रचि, चर्चेला मुळी ना थारा || १९.

सत्य राही ते सदा अबाधित, संप्रदाय जरि अलग असे |
सत्य जेहि की, तुलनात्मकचि, ते मुक्तीला देत नसे || २०.

योग्य पथावर जो ही ज्ञाता, परम-सत्य तो जाणतसे |
अस्पर्शयोगे जाणे तुर्या, मनी सदा नि:शंक असे || २१.

*श्लोक- भूतस्य जातिमिच्छन्ति वादिनः केचिदेव हि ।*
*अभूतस्यापरे धीरा विवदन्तः परस्परम्* ॥ ३ ॥

**सृजन कशाचेही ना झाले, दिसती सारी रुपांतरे |**
**आधीपासुनी जग हे निर्मित, बदलत गेले ते सारे || २२.**

**घट मातीतून, वस्त्र रुईतून, केवळ रुपांतर  झाले |**
**मूळ सत्य ना लोप पावते, कांही न येथे सृजियेले || २३.**

**अजातवादे हे प्रतिपादन, सृजन कशाचे ना होई |**
**जे आहे ते नित्य बदलते, नूतन नाम-रूपे पाही || २४.**

**कुणी विद्वज्जन ठाम वदेना, सृजन जाहले हे कैसे?|**
**काळ लोटला, वाद न संपे, विश्व-सृजन झालेच नसे || २५.**

**गुण नि धर्म प्रत्येकी वसती, त्यांतुनि तैसी उत्पत्ती |**
**घट मातीतुनी, वृक्ष बिजातुनी, ऐशा क्रमेची उत्क्रांती || २६.**

**नूतन येथे कांही असे ना, परिवर्तन परि नित्य घडे |**
**मूल गुणांचे नूतन दर्शन, दिसते परंपरा वाढे || २७.**

**रवितेजाला घेउनी उसने, चंद्र प्रकाशत आकाशी |**
**उसन्या अस्तित्वेचि हे जग, तुर्या निमित्तचि त्याशी || २८.**

अस्तित्वचि जे या जगताचे, मुळात ते आहे फसवे |
जे नाही, तेही आभासे, नाम-रूपे घेऊनि नवे || २९.

असत्कार्य नि सत्कार्यहि, वाद प्रसिद्धचि या जगती |
अंती निर्णय हाच होतसे, कशाचीही ना उत्पत्ती || ३०.

स्वप्नासम हे सृजन नि दिसणे, सारी मायेची किमया |
गंधर्वांची नभात नगरी, जैसी येऊनि जात लया || ३१.

श्लोक- *भूतं न जायते किंचिदभूतं नैव जायते ।*

*विवदन्तोऽद्वया ह्येवमजातिं ख्यापयन्ति ते ॥ ४ ॥*

**निर्मिते न वस्तू वस्तुला, आपुले आपणा, सृजन कसे ?|**

**नित्य रुपांतर परि प्रत्येकी, हाच सृष्टीचा नियम असे || ३२.**

**अनादि आत्मा, सदाची शाश्वत, जन्म तयाचा होत नसे |**

**जे नाही या जगतामाजी, ते जन्मा येईल कसे?|| ३३.**

**ससा जन्मतो रूप बदलूनी, कधि ना शृंग परि त्यासी |**

**परंपरा हि नित्य बदलती, नाम रूपे ती अहर्निशी || ३४.**

श्लोक-*ख्याप्यमानामजातिं तैरनुमोदामहे वयम् ।*

*विवदामो न तैः सार्धमविवादं निबोधत ॥ ५ ॥*

**अंती निर्णय हाच होतसे, अजात जग हे सत्य असे |**

**गौडपाद ते प्रसन्न त्यासी, खंडण-मंडन कांही नसे || ३५.**

*श्लोक- अजातस्यैव धर्मस्य जातिमिच्छन्ति वादिनः ।*

*अजातो ह्यमृतो धर्मो मर्त्यतां कथमेष्यति ॥ ६ ॥*

*श्लोक - न भवत्यमृतं मर्त्यं न मर्त्यममृतं तथा । प्रकृतेरन्यथाभावो न कथंचिद् भविष्यति ॥ ७ ॥*

*श्लोक-स्वभावेनामृतो यस्य धर्मो गच्छति मर्त्यताम् ।*
*कृतकेनामृतस्तस्य कथं स्थास्यति निश्चलः ॥ ८ ॥*

**अजात हा तर धर्मची केवळ, जन्म विवादी त्या म्हणती |**

**अजातासी तो जन्म असेना, चिरंजीव त्याची महती || ३६.**

**अमर जे असे, नष्ट ना कदा, मर्त्य न अमरही तो होई |**

**नित्यरूप जे मूळ प्रकृतीस, कदा वेगळेपण नाही || ३७.**

**नित्यचि शाश्वत ब्रह्म अमर ते, मर्त्य अवस्था त्या नाही |**

**उपासना फल अनित्यचि ते, नित्य कदाही नच होई || ३८.**

**जेही अनुभूत होई ते-ते, सारे एकचि ब्रह्म असे |**

**वेदही अंती हेचि सांगती, ब्रह्मविना कांहीच नसे || ३९.**

**श्रुती सकलही हेचि सांगती, सीमा नसे ती ब्रह्माला |**

**नित्य नि शाश्वत अनंत ऐसे, सकलचि वर्णिताती त्याला || ४०.**

अवस्था न त्याची ती बदले, सदाची अद्वैती राही |
ते ना कारण वा कि कार्यही, बाधा स्थैर्या त्या नाही || ४१.
जगत नि जीव न कदा जन्मले, परमात्मा नच जग होई |
जीवात्मा नि परमात्माही, अलग कदाही ते नाही || ४२.
तुर्येचि ना कदापि प्राप्ती, नित्य अवस्था आत्म्याची |
तुर्येविण मी नसे कदापि, नित्य असे अद्वैतीची || ४३.
अज्ञानेचि वाटे ऐसे, जीव वेगळा या देही |
देह येती नि जाती तरीही, स्थिरचि परमात्मा राही || ४४.
येथे मज नच कांही मिळविणे, पूर्णकाम मी सदा असे |
अस्पर्श योगे, जगी सहभागी, सारे करुनी, लिप्त नसे || ४५
नित्य मुक्त मी नसेचि बंधन, खेळ पाही तो मायेचा |
स्पर्श न मजला परी कशाचा, खेळ जरी हा नित्याचा || ४६.

*श्लोक-सांसिद्धिकी स्वाभाविकी सहजा अकृता च या।*

*प्रकृतिः सेति विज्ञेया स्वभावं न जहाति या ॥ ९ ॥*

जेही आहे जगतामाजी, चौकट सकला धर्मांची |

प्रकृतिधर्मचि तयास म्हणती, नियमे सारे आचरिती || ४७.

नित्यसिद्ध नि स्वभावसिद्धचि, सोडी स्वभाव ना आपुला |

म्हणती तिजलागीच प्रकृती, व्याख्या हीच असे तिजला || ४८.

आकाशे सर्वत्र वसावे, फिरत रहावे वायूने |

वन्हीने तो उष्मा द्यावा, जल वर्षावे वर्षेने || ४९.

हीच सकल ती असे प्रकृती, धर्म न आपुला सोडावा |

पदार्थ सारे वागती धर्मे, नच अपवाद कदा व्हावा || ५०.

जीवन आपुले नच मोक्षास्तव, परि उमगण्या मुक्तचि मी |

धर्म मूळचा पूर्ण जाणणे, जगताचा मी तर स्वामी || ५१.

तुर्येहून मी नसे वेगळा, तुर्याचि मम स्वरूप असे |

उगा म्हणती मज ते जीवात्मा, ब्रह्माविण मी कदा नसे || ५२.

जन्म न झाला असे अनादि, जीव नि आत्मा भिन्न नसे |

स्वयंभूच मी अज, नि शाश्वत, बदल न मजमाझी कि असे || ५३.

बाल, नि यौवन वृद्धावस्था, देह बदलतो नित्यचि तो |

सदैव आनंदीच असे मी, सारे कौतुक मी बघतो || ५४.

जीर्ण निकामी देह सोडतो, मृत्यू होई देहाचा |

चिरंजीव मी नूतन देही, शोक मला ना मृत्यूचा || ५५.

सत् चित् आनंदचि असे मी, नित्य असे मी स्वानंदी |

सुखमयता मम नित्य अवस्था, कैसे दुःख मला बांधी?|| ५६.

*श्लोक-जरामरणनिर्मुक्ता: सर्वे धर्मा: स्वभावत: ।*
*जरामरणमिच्छन्तश्च्यवन्ते तन्मनीषया ॥ १० ॥*

देही जे चैतन्य असे ते, सहजी उर्जा ब्रह्माची |
प्रकृती खेळवी देहालागी, करण्या कर्मे जगताची || ५७.

जरा मरण नि व्याधी देहा, जीवास त्याची खंत नसे |
जेही घडते, प्रकृतिनियमे, अलिप्त मी परि नित्य असे || ५८.

जरा, मरण नि व्याधी सारे, विकार असती देहाचे |
त्याची चिंता हि तर भ्रांती, वृथाची बंधन हो त्याचे || ५९.

विवेक वैराग्ये संसारी, कार्ये सकल अलिप्तपणे
मी तर केवळ साक्षी त्याशी, प्रारब्धाला अनुभवणे || ६०.

संग दिला मी जो देहाला, नि:संगे सारे करवी |
नित्य मुक्त मी, सदा अद्वैती, अलिप्तता ही नित बरवी || ६१.

श्लोक-*कारणं यस्य वै कार्यं कारणं तस्य जायते ।*

*जायमानं कथमजं भिन्नं नित्यं कथं च तत् ॥ ११ ॥*

तत्वज्ञानी कुणी ते म्हणती, कारण हेचि कार्य असे |

कारण जन्मा कैसे येईल? विकार कार्यरूपे कैसे ?|| ६२,

मातीपासुनी घट तो बनला, कारण मृत्तीकाचि असे |

परि मृत्तिका जन्मलीच ना, जन्म तियेला कदा नसे || ६३,

म्हणुनि कारण कार्य असेना, जे दिसते ती तर भ्रांती |

गौडपाद ते ठाम सांगती, जन्म नसेचि या जगती || ६४.

जे आहे ते नित्य बदलते, सृजन तयाशी म्हणू नये |

रुपांतर ते नित्य होतसे, नाम-रूप नवे होये || ६५.

श्लोक-*कारणाद्यद्यनन्यत्वमत: कार्यमजं यदि ॥*

*जायमानाद्धि वै कार्यात्कारणं ते कथं ध्रुवम् ॥ १२ ॥*

**सांख्यवादी ते म्हणती ऐसे, कारणाविना कार्य कसे ?|**

**अज मातीतुनी घटा निर्मिती, येथे कारण अजचि असे || ६६.**

**कार्य बदलते, नित्यचि समये, जन्म नि लय तो तया असे |**

**परि कारण ते नित्य असेची, एकरूप त्या कार्य नसे || ६७.**

**तर्कशुद्ध ना वाद असे हा, तथ्यहीन तो सहजी दिसे |**

**भूमी न ओली मृगजळ जेथे, जल भ्रांतीविण अन्य नसे || ६८.**

*श्लोक-अजाद्वै जायते यस्य दृष्टान्तस्तस्य नास्ति वै ॥*

*जाताच्च जायमानस्य न व्यवस्था प्रसज्यते ॥ १३ ॥*

जन्म जयाचा कधि न झाला, कार्य तयापासुनि कैसे ?|

हि तर वंध्यापुत्र निर्मिती, कल्पनेतली गोष्ट असे || ६९.

परि वास्तव दृष्टांत नसती हे, खेळ कल्पनेचाची असे |

म्हणुनि असत्कार्य-वाद हे, तथ्य ज्यात ते मुळी नसे || ७०.

बांगडी सोन्याची जी कल्पिली, मनी सोनाराच्या ती असे |

तिला निर्मिण्या सोने लागे, जन्म तयाचा होत नसे || ७१.

सत्कार्य-वादी नसेचि शंका, गौडपाद तो स्वीकारिती |

दुजा वाद तो अमान्य त्यांना, चर्चा त्यावर कशास ती?|| ७२.

*श्लोक - हेतोरादिः फलं येषामादिर्हेतुः फलस्य च । हेतोः फलस्य चानादिः कथं तैरुपवर्ण्यते ॥ १४ ॥*

**मानव जैसी करितो कर्मे, देहहि तैसा लाभतसे |**

**अधर्म वा धर्माचरणचि, जन्म-हेतू तो होत असे || ७३.**

**जैशी कर्मे फळहि तैसे, शेती होई कर्माची |**

**धर्म-अधर्मे पुढील फलांची, पूर्वपीठीका वादाची || ७४.**

*श्लोक- हेतोरादिः फलं येषामादिहेतुः फलस्य च ।*

*तथा जन्म भवेत्तेषां पुत्राज्जन्म पितुर्यथा ॥ १५ ॥*

**कुणी वादी ते असे सांगती, हेतू कारण कार्य असे |**

**धर्म-अधर्मचि असती कारण, देह ही तैसा लाभतसे || ७५.**

**वादिंचे हे असे सांगणे, जणु ऐसे प्रतीपादितसे |**

**पुत्रापासुनी जन्म पित्याचा, सांगे कुणीही न होत नसे || ७६.**

**उष्ण तूप जंव थंड होतसे, हलका थर येई वरला |**

**तूप असोनी, तुपास झांकी, तैसी माया ब्रह्माला || ७७.**

**फलापासुनी हेतू निर्मिती, कथनचि हे विपरीत असे |**

**स्वच्छ दिसे ती विसंगतीची, यावर चर्चा करितसे || ७८.**

श्लोक- *संभवे हेतुफलयोरेषितव्यः क्रमस्त्वया ।*

*युगपत्संभवे यस्मादसंबन्धो विषाणवत्* ॥ १६ ॥

कारण आणि कार्य निर्मिती, एकत्रचि वादी म्हणती |

काय असे क्रम? तो सांगावा, जन्म न एकत्रचि होती || ७९.

जोवरी जन्म न हो पुत्राचा, पितृपद ना आपैसे |

पोटी संतती होई तेंव्हा, मातृपद लाभे जैसे || ८०.

दोन्ही शिंगे गायीची ती, समयी एकचि उत्पत्ती |

एक न कारण असे दुज्याचे, उभयहि एकत्रचि येती || ८१.

श्लोक- *फलादुत्पद्यमानः सन्न ते हेतुः प्रसिध्यति ॥*

*अप्रसिद्धः कथं हेतुः फलमुत्पादयिष्यति* ॥ १७ ॥

**कार्य नि कारण एके वेळी, जरी सृजन ते होत असे |**

**कैसे स्थापित कराल त्या क्रम?, काल जेधवा अन्य नसे || ८२.**

**फलापासुनी जी हि निर्मिती, कारण बनेल ती कैशी? |**

**सत्ता अधीन ज्याही फळी ती, फळाआधीच असेल कशी?|| ८३.**

**कुकर्म करिता, फल व्याधींचे, फलाधीन यातना किती? |**

**फला आधीची कुणा कळेना, असेल त्याची किती व्याप्ती? || ८४.**

**फल जन्माच्या नंतर हेतू, हेतू नंतर फल जन्मे |**

**परस्परांच्या विरोधी क्रिया, त्यांचा संबंध कसा जमे ?|| ८५.**

*श्लोक- यदि हेतोः फलात्सिद्धिः फलसिद्धिश्च हेतुतः ।*
*कतरत्पूर्वनिष्पन्नं यस्य सिद्धिरपेक्षया ॥ १८ ॥*

**हेतू आणि फल यांच्यातील , कालक्रम ना ठाम असे |**

**उभयांचीहि कालएकता, प्रस्थापित ती होत नसे || ८६.**

**गळ्याविना ते कैसे गाणे, गाण्याविन हि कसा गळा?|**

**मळ्याविना ती कैशी शेती, पिका-विना तो कसा मळा?|| ८७.**

**पुण्ये लाभे देह पुण्यशील, सहजी पुण्य-वृत्तीचि असे |**

**पुण्यवंत ना देह लाभता, हातुनी पुण्यहि घडत नसे || ८८.**

**हा संदेह न होत नाहीसा, चर्चा किती जाहली जरी |**

**विचारातले दोष यातले, पुढिल कारिका स्पष्ट करी || ८९.**

श्लोक- अशक्तिरपरिज्ञानं क्रमकोपोऽथ वा पुनः ।

एवं हि सर्वथा बुद्धैरजातिः परिदीपिता ॥ १९ ॥

विद्वज्जन होताचि निरुत्तर, होती सिद्धांतहि मौनी |

अजातवादचि सिद्ध होतसे, सिद्धांती म्हणती ज्ञानी || ९०.

आधी कोण नि नंतर कोणही, करुनी चर्चा ते थकले |

अजातवादे प्रश्नचि मिटती, कारण चर्चेचे नुरले || ९१.

श्लोक-बीजाङ्कुराख्यो दृष्टान्तः सदा साध्यसमो हि सः।
न हि साध्यसमो हेतुः सिद्धो साध्यस्य युज्यते॥२०॥

आधी बीज नि नंतर अंकुर, बीजचि आदिस्थान असे |
कार्य-कारणाचाचि भाव तो, या दृष्टांते उमजतसे || ९२.

श्लोक- *पूर्वापरापरिज्ञानमजातेः परिदीपकम् ।*

*जायमानाद्धि वै धर्मात्कथं पूर्वं न गृह्यते ॥ २१ ॥*

**कोण पूर्वी उत्पन्न जाहले, आणि नंतर ते कोण?|**

**याचे उत्तर कुणा न ठावे, अशक्य याचे ते ज्ञान || ९३.**

**हेतू-फल यातील प्रथमता, उत्तर नसेचि ते याचे |**

**अजातवादालाचि मानिता, शमन होतसे प्रश्नांचे || ९४.**

**जगताआधी काय नेमके?, उत्तर ना या प्रश्नाला |**

**त्या अज्ञाना तसे ठेवणे, हीची उकल असे त्याला || ९५.**

श्लोक- स्वतो वा परतो वाऽपि न किंचिद्वस्तु जायते।
सदसत्सदसद्वापि न किंचिद्वस्तु जायते॥ २२॥

वस्तू कोणतीही असली तरी, आपणाशीचि न सृजन करी |
निर्मिती नच ती आपणातुनी, तिज ना निर्मित वा दुसरी || ९६.

सत्य असत्य नि सत्यासत्याहि, वस्तु न निर्मित कवणाला |
जे आहे ते आधीपासुनी, होत परि त्या बदलाला || ९७.

एक कार्य ना दुज्यास निर्मी, कुणी नच निर्मित नव कांही |
जे-जे आहे, तेची आधीचे, नाम-रूप जरि ते नाही || ९८.

जीही निर्मिती होई बदले, मूळ धर्म ये संगतीला |
फुला पासुनि होई अत्तर, सुगंध तोची ये त्याला || ९९.

मातीपासुनी वस्त्र न निपजे, वाळू तुनी ना तैल कदा |
जरि रुपांतर, तरि निजधर्मे, काष्ठ जाळीता राख सदा || १००.

ज्या मातीतुनी वृक्ष निघतसे, राख होऊनी तिजशी मिळे |
फुटता घट तो होई माती, सोन्यातुनी लेणी उजळे || १०१.

*श्लोक- हेतुर्न जायतेऽनादेः फलं चापि स्वभावतः ।*

*आदिर्न विद्यते यस्य तस्य ह्यादिर्न विद्यते ॥ २३ ॥*

अनादिच फल हेतू न निर्मे, अनादि हेतू न निर्मी फला |

अथवा स्वभावत:चि करितसे, निर्मित ते की आपणाला || १०२.

फल नि हेतू उभयहि अजचि, स्वये न निर्मित कवणाला |

जन्म न त्यांचा, अनादिच ते, नसते कारण हि त्याला || १०३.

चवदा ते तेवीस कारिका, विविध वादे व्यापियली |

वैदिक-सृष्टी-प्रक्रियाहि जी, वेदामध्ये सांगितली || १०४.

गौडपाद जरि स्वयेचि वैदिक, मानितीही ते नच तिजला |

पूर्ण विचारे आणि चिंतने, बाजूस सारीतीच तिजला || १०५.

गौडपादजी म्हणती ऐसे, वेद सांगती यांतुनी जे |

अध्यात्मीची प्रथम पायरी, नवीन अभ्यासीचि साजे || १०६.

शाळेमाजी 'ग' गवताचा, पुढती विसरा गवताशी |

तैसी प्रारंभिक अवस्था, पुढती धरावे ना त्याशी || १०७.

वेदामाजी कर्म-कार्य हा, वाद कि जोही कथियेला |

कर्मचि निर्मिती कारण तेथे, ऐसा नियमचि सांगितला || १०८.

नीट करू अभ्यास काय हा, कर्म-कार्य-वादहि असे |
कर्म नियम तो निगडित सृजनी, स्वरूप नियमाचे कैसे?|| १०९.
सृजनाशी हे ब्रह्म न कारण, ते तर अद्वैतीची असे |
निर्मितीस ना कांही जवळी, निर्मिल ते कवणास कसे ?|| ११०.
वेत्ते म्हणती, ब्रह्म न कारण, मान्यचि हे आम्हास असे |
परि जगत ते स्पष्टचि दिसते, विना सृजन मग ते कैसे?|| १११.
एकचि उत्तर आम्हा माहित, निर्मिती माया शक्तीची |
असे ईश्वरा आधीन तीही, उणीव ना साहित्याची || ११२.
म्हणजे जग हे ईश्वर निर्मित, कल्पनेविना कांही नसे |
ब्रह्मसूत्र ते म्हणे त्यावरी, जर हे ईश्वर निर्मितसे || ११३.
विषम असे ही सर्व निर्मिती, अनेकविधता त्यांत असे |
जीव कुणी ते वृक्ष वेलीची, अनेक प्राणी ते कैसे?|| ११४.
मानव जन्मा येती तेही, पैलवान कुणी ते दुबळे |
कुणास भ्रांती दोन भोजनी, श्रीमंतीत ते कुणी लोळे || ११५.
एक जगत परि काय विविधता, एक सुखी दुसरा दुःखी |
ईश्वर कैसा विषम वागतो?, समानता तो ना राखी || ११६.

कुणी संत नि सज्जन परिहि, अनेक निर्दयी ते असती |
कुणी स्वर्गी तर नरकी दुःखे, कुणी बिचारे ते पिचति || ११७.

उत्तर याचे ईश्वर निर्मित, जगत असे हे जे दिसते |
नसे त्याची ही तैसी इच्छा, पाहतसे तो कर्माते || ११८.

ज्याने जैसे ही पेरियले, तसे पीक त्याचे पदरी |
बाभूळ पेरी काटे मिळती, मिळेल कैसा आम्र करी ?|| ११९.

सृजनी विषमता ही कर्मांनी, ईश्वर केवळ साक्षी असे |
समन्वयचि तो नित्य राखणे, काम तयाचे अन्य नसे || १२०.

कर्म-कार्य हा वाद असा तो, जनी मानसी दृढ झाली |
वेत्ते पुसती पुण्य-पापहि, कर्मे ही कोठुनी आली?|| १२१.

जन्मा आधी प्रारब्धाची, कुणी बांधली गाठोडी ?|
कुणा दिले भरगच्च परंतु, कुणा वाटणी ती थोडी || १२२.

कर्म-वादी यावरी सांगती, शिल्लक असेल पूर्वीची |
या जन्मी ती घेऊनी येई, भोगुनीचि संपायाची || १२३.

गौडपाद यावरती म्हणती, प्रणाली न ही त्याज्य असे |
परि स्वीकारी तात्पुरतीचि, पूर्ण बोध जोवरी नसे || १२४.

वास्तव एकचि जगत दिसे जे, त्यासी कुणी ना निर्मियले |

अनुभव त्याचा, दिसते जैसे, तैसे त्याशी मानियले || १२५.

पदार्थ व्यक्ती त्याचि असता, ओळख वेगळी प्रत्येकी |

म्हणुनि आचरण नसे सारखे, अंतर तैसेचि राखी || १२६.

ज्ञानी पंडित अनेक जगती, जगत निर्मिती शोधीतसे |

असंख्य वाद नि मते कितीतरी, त्यासी तो नच अंत असे || १२७.

नवीन वेदांती जे असती, सावधतेने चर्चावे |

अंतरी आपण ठाम असावे, अद्वैता ना सोडावे || १२८.

कर्म-कार्य या वादामाजी स्पष्टीकरणे असती सहा |

प्रत्येकाशी अभ्यासोनी, विचार अंतरी करीत रहा || १२९.

पहिले यातील कर्मचि कारण, देहचि कर्मा घडवितसे |

मुख्य असे हे यातील कारण, कर्म जसे जगही तैसे || १३०.

विधान पहिले चूक यामुळे, मूळ कारणी कर्म नसे |

देहावाचून पाप-पुण्यहि, सहजी ते होणार कसे ?|| १३१.

दुसरे विधान देहचि कारण, चूकचि ते सहजी ठरते |

जैशी कर्मे देहही तैसा, अन्य नियम नाही त्याते || १३२.

तिसरे देह नि कर्म उभयता, एकत्रचि वर्तन त्यांचे |
कारण-परिणामाचे जे नाते, एकत्रित ना होण्याचे || १३३.

चवथे देह नि कर्म घडविती, परिणाम नि कारण संगे |
देहाने ते कर्म निर्मिती, कर्मे देहचि त्या योगे || १३४.

उभय सृजन ना कदा संगती, परस्परांचे ते नाते |
एक दुज्यावर अवलंबूनचि ते, संगत कैसी ती होते?|| १३५.

ऐशी गल्लत होईल कैशी, पिता न पुत्राचे पोटी |
कारण आणि परिणामाची, अदलाबदली, ती खोटी || १३६.

वरील चारी सुलभ समजण्या, खोल विचारे जाऊ पुढे |
असे शृंखला अती दीर्घचि, कर्मे देहचि नित्य घडे || १३७.

देहानुसार घडती कर्मे, कर्मानुसार देह मिळे |
वृक्ष नि बीज नि, बीज नि वृक्ष ही, संगत यांची नच ती टळे || १३८.

अशी शृंखला असे अनादि, अशीच पुढती चालतसे |
कर्म-कार्य हा वाद असा हा, जगत निर्मिती दावितसे || १३९.

चला करू या गहन विचारे, ज्ञान बुद्धीला काय रुचे |
सखोल अभ्यासे मग उमजे, निश्चित स्वरूप जन्माचे || १४०.

पुढील पांचवी आणि सहावी, मांडणी गहन विचारांची |
सुस्थिर बुद्धी आणि विवेके, करू योग्य उकल त्यांची || १४१.

शरीर जन्मले पूर्वचि कर्मे, जे मागील देहे केले |
तेही जन्मले त्याचे मागील, देहाने जे साठविले || १४२.

अशी शृंखला चालत आली, अनादि काळापासोनी |
मूळ कोणते होई न निश्चित, झाली सुरवात कोठोनि ? || १४३.

नंतर म्हणती, मूळ कारणा, कां शोधा? सुरवात नसे |
फसवी पळवाटचि ही शोधिली, ज्ञान-योगी ना टिकत असे || १४४.

गौडपाद म्हणती जर ऐशी, कर्म-देह शृंखला असे |
तर मग मार्गचि ना मोक्षाला, बंधनातुनी मुक्ती नसे || १४५.

ना सुरुवात नि ना शेवटही, विसरुनि मोक्षा मग जावे |
कशास शास्त्रे, आणि अध्ययन, हाती कांहीच ना यावे || १४६.

म्हणुनि उत्तर यांशी एकचि, जन्म जगाचा ना झाला |
कल्पनेतले व्यक्तिनिष्ठ ते, आणि करा व्यवहाराला || १४७.

वर्तमानी जे आहो आपण, पूर्वीचे ते विसरावे |
दैवे हा नरदेह लाभला, उद्धरुनी पावन व्हावे || १४८.

रिती नि नियमा या जगताच्या, त्या-त्या वेळी पाळावे |
निष्ठेने व्यवहार करावे, परि कशात न अडकावे || १४९.

द्वैती राहुनी असंग त्याचा, तुर्येते न सोडावे |
स्वधर्म यज्ञे करुनी आचरण, कृतार्थ नित्यचि ते व्हावे || १५०.

दिसे शरीर नि, दिसे कर्म ही, मायेचीचि ही किमया |
साक्षीभावे सर्व पहावे, तात्कालिकचि महत्व तया || १५१.

बाह्य पदार्थहि जे हि दिसती, तया स्वीकारी ते जैसे |
जगतामाजी अंतर्भूत ते, मिथ्या असती तरि ते तैसे || १५२.

*क-प्रज्ञप्तेः सनिमित्तत्वमन्यथा द्वयनाशतः ।*

*संक्लेशस्योपलब्धेश्च परतन्त्रास्तिता मता ॥ २४ ॥*

विषयनिमित्ते, ज्ञान तयाचे, विषयशून्य ते ज्ञान नसे |

विविध विषय ते ज्ञान तसेचि, विरह नि दुःख तये भासे || १५३.

निमित्त असता ते विषयांचे, ज्ञान तयाचे होत असे|

ज्ञानी विविधता विविध विषयहि, ज्ञान म्हणोनी एक नसे||१५४.

असते ज्ञानहि एकचि केवळ, त्रास न विरह नि दुःखाचा |

जे जे दिसती पदार्थ जगती, करी स्वीकारचि तूं त्याचा || १५५.

जाणीव दुःखाची ती होई, सहेतुकेच्या अनुभूतीने |

विषय स्पर्शे सुख नि दुःखचि, नच ते होई की अन्ये || १५६.

विषय वेगळे, ज्ञान वेगळे, भेद प्रत्ययासी येई |

म्हणुनी ज्ञानाचे कारण ते, विषय कदापिचि नाही || १५७.

जसे आकलन ते विषयाचे, ज्ञान होतसे तैसेची |

अनुभूतीला जोड मिळतसे, अशी कारणे ती त्याची || १५८.

वस्तु संपर्की येताची, उठती कंपने ज्ञानाची |

तेणे आकलन वैविध्याचे, हीचि महती असे त्याची || १५९.

विवीध वस्तूंच्या संपर्काने, विविध भावना त्या उठती |

तये रम्यता येत जीवनी, हीची असे त्यांची महती || १६०.

विविध कल्पना सृजन शक्य ते, स्वये न परि ते क्लेशाचे |

त्याचे कारण बाह्य विषयचि, अन्य कदापि न इतरांचे || १६१.

मूळ धारणा अस्तित्वाची, नित्यची आनंदी असणे |

उष्ण पाणीही सहजी जैसे, शीतल स्वभावता होणे || १६२.

श्लोक- *प्रज्ञप्तेः सनिमित्तत्वमिष्यते युक्तिदर्शनात् ।*
*निमित्तस्यानिमित्तत्वमिष्यते भूतदर्शनात्* ॥ २५ ॥

**म्हणती ज्ञान की, होय निमित्ते, वस्तुदर्शन जरि होता |**

**नुरे निमित्तचि ते ज्ञानाचे, यथार्थचि झाले असता || १६३.**

**मटके, रांजण, आदि विविधता भिन्नचि होई ज्ञानाने |**

**परि विवेके त्यासी पाहता, केवळ मातीचि ये ध्याने || १६४.**

**प्रकाश नसता, जरि रज्जू ती, सर्पचि वाटे भ्रांतीने |**

**भ्रांती जाता, यथार्थ ज्ञाने, येई रज्जूचि ती ध्याने || १६५.**

**असे विविधता केवळ द्वैती, अद्वैती त्या स्थान नसे |**

**तेथे सारी एक अनुभुती, कुठेच वैचित्र न भासे || १६६.**

**ज्ञानाशी कारण ते द्वैती, विविधताहि तेणे भासे |**

**स्वीकारि म्हणती गौडपाद ते, व्यवहारा जंव करीतसे || १६७.**

*श्लोक-चित्तं न संस्पृशत्यर्थं नार्थाभासं तथैव च ।*

*अभूतो हि यतश्चार्थो नार्थाभासस्ततः पृथक ॥ २६ ॥*

**विषया किंवा विषयाभासा, ज्ञानशक्ती ना स्पर्शितसे |**

**कारण ते तर अभावरुपी, आकलन त्याचे होत नसे || १६८.**

**विना आश्रये ज्ञान न होई, अभाव होता ज्ञेयाचा |**

**ज्ञान तयाचे नच ते होई, जेंव्हा अभाव वस्तूचा || १६९.**

**स्फटिक निर्मळ जरी ठेविता, रंगीतशा वस्त्रावरती |**

**त्याच रंगीचा स्फटिक वाटे, ज्ञान विलासाची भ्रांती || १७०.**

**पदार्थरुपा आकलन जैसे, निमित्त त्याशी ज्ञानाचे |**

**आचरणी तो विवेक असता, यथार्थ आकलन हो त्याचे ||१७१.**

**अद्वैती ना पदार्थ कांही, सर्व एकले ब्रह्म असे |**

**जाणीव स्पर्शी नच कोणाला, भिन्नताचि ती मुळी नसे || १७२.**

*श्लोक-निमित्तं न सदा चित्तं संस्पृश्यत्यध्वसु त्रिषु ।*

*अनिमित्तो विपर्यासः कथं तस्य भविष्यति ॥ २७ ॥*

पदार्थ नसताहि जे दिसणे, प्रतीति ती विपरित असे |

पूर्वी पाहिले त्या दृष्टीने, नसताहि तैसे भासे || १७३.

सोंड पाहिली जी हत्तीची, स्मरण चित्ती जे ठसलेले |

फांदी वृक्षाची अंधारी, वक्र तशीचि जंव दिसले || १७४.

स्मरणे संदर्भास जोडुनी, ज्ञान हत्तीचे ते होते |

जगी असलेले कोठे तरीही, ध्यानी येऊनि अनुभवते || १७५.

जागृतीत जे कुठे पाहिले, चित्ती उमटतो तसा ठसा |

स्वप्नी तेचि मनात येता, नसता भासचि होत तसा || १७६.

विषय तोचि आकलनी येतो, जगांत कोठेतरी असे |

परि घडेना ऐसे कांही, अस्तित्वी नसताही दिसे || १७७.

विपरित प्रतीति अज्ञानाने, ज्ञानदृष्टीने सत्य दिसे |

यथार्थ जोवरी नसे आकलन, निर्णय तोवरी उचित नसे || १७८.

श्लोक- *तस्मान्न जायते चित्तं चित्तदृश्यं न जायते ।*

*तस्य पश्यन्ति ये जातिं खे वै पश्यन्ति ते पदम् ॥२८॥*

**जन्म नसे तो चित्ताला नि, विषय पाही, त्यासीही नसे |**

**पक्षी उडता आकाशी तो, नच उमटती पाऊल ठसे || १७९.**

**कुणी म्हणे जर चित्त जन्मते, ते म्हणणे परि होत असे |**

**पक्षी उडता चिन्ह पदांचे, जणु आकाशी त्याशी दिसे || १८०.**

**विषय निमित्ते चित्त उगवते, विषय नसे तर चित्त नसे |**

**परमार्थी तर विषय नसेचि, अभाव चित्ताचाही असे || १८१.**

**व्यवहारी जे चित्ती उमटे, आकलन विषयाचे होई |**

**अभाव असता तो विषयाचा, चित्त न येई ते उदयी || १८२.**

**चित्त समरसे विषयासंगे, ज्ञान तसे करुनी देई |**

**परि परमार्थी, विषयचि नाही, चित्त अजन्माचि राही || १८३.**

**बौद्धवादी ते असे मानिती, 'सर्वं दुःखं दुःखंची' |**

**परि वेदांती ऐसी दृष्टी, अवस्थाच ही चित्ताची || १८४.**

**पाप कर्मी ते दुःखचि निपजे, पुण्य कर्मी परि सुखमयता |**

**नित्य दुःख वा नित्य सुखहि ना, अनुभुती जैसे आचरिता||१८५.**

मुळात हा संसार नसेचि, भासे ती केवळ माया |
वृथा दुःख वा सुख अनुभुती, अस्तित्वचि परि नसे जया||१८६.

अद्वैती जो नित्यचि असतो, नित्य निर्गुणी वृत्ती असे |
अनुभवितो तो पूर्णचि शांती, जेथे सुख वा दुःख नसे || १८७.

## २४ ते २८ कारिकांचा आशय

बुद्धमतांचा विचार येथे, गौडपादजी करीत असे |
‘नास्तिक दर्शन’ यांसी म्हणती, शिकवण वैदिक मान्य नसे ||१८८.
चार प्रणाली, दोन मानिती, सारे जग हे सत्य असे |
स्पष्ट दिसे नि येई अनुभुती, मिथ्या मानीत त्यास कसे? || १८९.
‘माध्यमिका’ ही तिसरी त्यांतील, म्हणे बाह्य जग जेहि दिसे |
केवळ द्रष्ट्याशी ते दिसते, परि त्याशी अस्तित्व नसे || १९०.
जैसे स्वप्नी दृष्ट्या दिसते, परि निश्चित मिथ्याचि असे |
‘सर्वार्थ-मिथ्या’ म्हणुनि चवथी, बाह्य जगा मानीत नसे ||१९१.
म्हणती जग नि जाणीव दोन्ही, मिथ्याविण ना अन्य असे |
शून्यवादी जे माध्यमिका ते, म्हणती शून्यचि परि भासे || १९२.
वरिल कारिका अभ्यासिती या, बुद्धवादीचि तत्वांशी |
गौडपाद ते करिती भाष्य जे, श्लोक देत मतितार्थाशी || १९३.
अठ्ठावीस नि पुढती कारिका, गौडपादजी देत असे |
मनन चिंतने, रुंदवू कक्षा, ज्ञानाची ती अभ्यासे || १९४.
अठ्ठाविसचि शिकवणूक ती, नच जग जन्मासि आले |
वाद दोन्ही ते देऊनि उत्तर, सिद्धचि त्यांनी हे केले || १९५

कर्म-कार्य हा वाद स्वीकारिती, परि तात्पुरती सोय म्हणे |
यथार्थ ज्ञाने; मीचि तुर्या, अद्वैताहुनी ना अन्ये || १९६.

अंती निष्कर्ष तो एकचि, सारे केवळ ब्रह्म असे |
द्वितीय प्रकरणी बत्तीस मध्ये, हेची विस्तृत वर्णितसे || १९७.

पारमार्थिकी दृष्टी ठेविता, सृष्टी नि स्थितीहि कांही नसे |
ना जन्म नि मोक्ष-साधना, लयही लयाला जात असे || १९८.

अद्वैताशी ठाम धरोनी, द्वैती जगती वागावे |
जसे आकलन, तसेचि वर्तन, विरक्तीस ना सोडावे || १९९.

व्यावहारिकता परि न सोडणे, जग नियमा ना तोडावे |
भुमिका ओळखुनिया आपुली, सारे करी ना अडकावे || २००.

नित्य परि हे ध्यानी ठेवणे, माझे कांही ना इथले |
देह साधने, चढे पायरी, उडे लक्ष ना हरीवरले || २०१

प्रपंच्यात या जैसे दिसते, जेहि अपेक्षित मजकडुनि |
संग सोडुमी, विवेक योजुनि, उचित आणि ते आचरणी || २०२.

मायेचा मोहकचि पसारा, भल्या-भल्यांची मति फिरते |
म्हणुनि सावध नित्य असावे, कधि न विसरणे तुर्येते || २०३.

श्लोक-*अजातं जायते यस्मादजातिः प्रकृतिस्ततः ।*
*प्रकृतेरन्यथाभावो न कथंचिद्भविष्यति* ॥२९॥

**वादी म्हणती, जन्मा येते, जाणीव अजन्मा जी म्हणती |**

**गौडपाद ते म्हणती शक्य ना, कारण प्रकृती तशी ना ती || २०४.**

**जोही चालतो तो साराची, मायेचाची खेळ असे |**

**ब्रह्मचि शाश्वत, जग हि अजन्मा, दृश्य कल्पितचि अन्य नसे||२०५.**

**सापेक्षचि सत्यता जगाची, पूर्ण असे ती अवलंबी |**

**सापेक्षचि त्या महत्व द्यावे, ना शेवट ना आरंभी || २०६.**

**जग नाही ऐसे ते नाही, आहे परि ना शाश्वत ते |**

**परम सत्य आधार तयाला, मायेच्या हाती असते || २०७.**

**व्यक्ती काल नि व्याधी अवस्था, रूप तयाचे नित बदले |**

**आता  दिसे ते परत ना दिसे, परंपरा परि नित चाले || २०८.**

**स्वप्नी जागृती अलग अनुभुती, जरी दृश्य तेचि वाटे |**

**निश्चित स्वरूपा, कुणी न जाणती, नवलचि हे याचे मोठे ||२०९.**

**विचार करिता जग निर्मितीचा, मूल-कारणाशी अडते |**

**ठाम न मत ते कदा कुणाचे, शाश्वत कारण न सांपडते || २१०.**

गौडपाद आपणा सांगती, वेळोवेळी जग जैसे |
आचरण तैसेची ठेवावे, विरोध व्यवहारी न असे || २११.

स्वधर्मयज्ञा नित आचरावे, सारे कृष्णार्पणचि करी |
असुनी नसावे, जणु सत्य हे, परि ना विसरी, कदा हरी || २१२.

कधी कर्तव्ये पार पाडिता, स्थिती ती विपरित जरि होई |
ऐके हृदयाचे, ना चिंता, शरण हरीला ते जाई || २१३.

समाधान चित्तात असावे, परहित नित्यचि साधावे |
जीवन आहे त्याची साठी, कदापि न हे विसरावे || २१४.

जग हे शाश्वत न कदापि, ठाम अंतरी ठेवावे |
काळाला नच उल्लंघित ते, विश्वामाजी विचरावे || २१५.

ब्रह्म असे ते एकमेवचि, अद्वितीय नि नित्य असे |
जन्म तयाचा कदा न झाला, सर्वव्यापी होऊनी विलसे || २१६.

जन्म नसे ज्या, चित्त असे हे, म्हणती जन्माला येते |
मूलरूप प्रकृती तयाची, जन्मशून्यचि संभवते || २१७.

ज्ञान स्फुरण ते जन्मशून्यचि, परि कदा ते ब्रह्म नसे |
मायिकचि तो जन्म मानला, द्वैती ती भ्रांतीचि असे || २१८.

कारंज्याला नळी जोडिता, पाणी थुई थुई नाचतसे |

नच पाण्याची मूळ प्रकृती, कृत्रिम मोहकता भासे || २१९

निराकार नि नर्तन गती ना, तरि पाणी तैसे दिसते |

तशी चित्ताचि भ्रांत अवस्था, अनुभूतीस ती येते || २२०.

श्लोक- *अनादेरन्तवत्त्वं च संसारस्य न सेत्स्यति ।*

*अनन्तता चादिपतो मोक्षस्य न भविष्यति* ॥ ३० ॥

वेत्ते म्हणती, जग न जन्मले, हे सत्यचि जर मानियले |

मूल-कारण ना गंवसे परिहि, सत्य आम्हा कळो आले || २२१.

हे जग ऐसे नित्य बदलते, तरीही शाश्वत हेचि खरे |

दिसती सारे नियमे चाले, अंत तयासी नाहीच रे || २२२.

अनादि आणि शाश्वत जर हे, अंत तयाशी तो नाही |

जीवास म्हणजे मोक्षाचा तो, लाभ कदापि ना होई || २२३

द्वैताचाचि  स्वीकार यांतुनी, मी आणि जग दोन असे |

उभयासी तो अंतचि नाही, विदित यांतुनी हो ऐसे || २२४.

उपासनेने लाभ जाहला, जरि कदा त्या मोक्षाचा |

तो ना शाश्वत पुनश्च जाईल, हाची अर्थ असे याचा || २२५.

उपजे ते नाशे, आणि, नाशिले ते पुन्हा दिसे |

ऐसे ज्ञानेश्वरी सांगते, परम सत्य ते हेचि असे || २२६.

आदि असे जे द्वैत असे त्या, अंत कदापि तया नसे |

शाश्वत मिथ्या द्वैत असे ते, अद्वैतीची मोक्ष असे || २२७.

द्रव्य अजन्मी, जग हि अजन्मी, द्वैतालाही जन्म नसे |
नसेचि आदि आणी अंतहि, संसारहि मग अमर असे || २२८.

मग मोक्षाची खुंटे आशा, भव चक्रीचे ते फेरे |
मुक्ती कसली ?, नित्यचि बंधन, सूचित ऐसे या द्वारे || २२९.

ज्यासि असे सुरुवात कधितरी, अंत तयाचा होणार |
अशी मुक्ती जणु, जामीन सुटका, शिरी बंधन ते राहणार ||२३०.

मोक्ष प्राप्ती हि कधीच नसते, ती तर आपुली निज-स्थिती |
नित्य-प्राप्ती, मीचि असे ती, यत्न तयाला ना असती || २३१.

गीतेत सांगे हरी पार्थाशी, ज्ञान इंद्रिये विषयही ते |
अनुभूत करती शीत उष्ण नि, सुख दुःखाच्या भोगाते || २३२.

ते ना शाश्वत येती जाती, तया अर्जुना सहन करी |
स्वरुप जगाचे जया समजते, शक्य तयाशी होत तरी || २३३.

म्हणुनी मिथ्यापण जाणावे, खेळ असे हा मायेचा |
जाणुनि मिथ्या, दुर्लक्षावे, अनित्य ऐशा भोगाचा || २३४.

या जगताचा जन्म न झाला,  चालत हे ऐसे राही |
जैसे आहे त्यास स्वीकारी, खेळी अडकणे परी नाही || २३५.

श्लोक- *आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ।*

*वितथैः सदृशाः सन्तोऽवितथा इव लक्षिताः ॥३१॥*

आधी नसते नि नंतरहि, मधेच जेही भासतसे |

ते न कदापि सत्य म्हणावे, नसे परि मिथ्या भासे || २३६.

या जगताचा जन्म न झाला, दिसते ते तर वरवरले |

त्यातील खेळही फोलची मानी, सत्य न ते माया खेळे || २३७.

अजातवादा समजुनी घ्यावे, स्वधर्म जगती आचरावे |

कल्पनेतला खेळ समजुनी, जग-रीती ना सोडावे || २३८.

द्वितीय प्रकरणी बत्तिसावी, अठ्ठेचाळीस तिसऱ्याची |

उभय कारिका हेची सांगती, नसे निर्मिती जगताची || २३९.

स्वप्नासम अस्तित्व असे ते, भोग अनुभूती येत असे |

तया असे अस्तित्व पाहता, परी नित्यता त्यांत नसे || २४०.

प्रचलित नियम न उल्लंघावे, देश शुद्धी च्या करी यत्ना |

विवेक वैराग्ये आचरावे, द्वैती गुंतणे कदाची ना || २४१.

श्लोक-*सप्रयोजनता तेषां स्वप्ने विप्रतिपद्यते ।*

*तस्मादाद्यन्तवत्त्वेन मिथ्यैव खलु ते स्मृताः ॥ ३२ ॥*

**स्वप्न सृष्टी ती नसते आधी, आणि नंतर ही नसते |**

**व्यक्तीच्या त्या-त्या स्वप्नीची, दिसती त्या व्यवहाराते || २४२.**

**जे ना आधी, नसेही नंतर, त्याचे अस्तित्वची फसवे |**

**म्हणुनी स्वप्नसृष्टी ती मिथ्या, तिच्यात ना ते अडकावे || २४३.**

**भूक शमन वा तृष्णा शमनहि, स्वप्नीचे पुरते फसवे |**

**दान-धर्म वा तीर्थ स्नानही, स्वप्नीचे विसरुनी जावे || २४४.**

श्लोक- *सर्व धर्मा मृषा स्वप्ने कायस्यान्तर्निदर्शनात् ।*

*संवृतेऽस्मिन्प्रदेशे वै भूतानां दर्शनं कुतः ॥ ३३ ॥*

**पर्वत नद्या नि विशाल सागर, जरि स्वप्नी ते पाहियले |**

**मावणार ना इवल्या देही, मिथ्या कल्पनाचि खेळे || २४५.**

श्लोक- न युक्तं दर्शनं गत्वा कालस्यानियमाद्गतौ ॥

प्रतिबुद्धश्च वै सर्वस्तस्मिन्देशे न विद्यते ॥३४॥

जागृतीत जरि स्वप्न-प्रदेशी, त्वरित जाणे शक्य कसे ?|

इथली सृष्टी विशाल असता, स्थळ-काळा संकोच नसे || २४६.

प्रसंग तिथला तिथेच विरतो, पुन्हा संगती शक्य नसे |

स्वप्ना मिथ्या उमगुनी पुरते, नाटक जणु संपले असे || २४७.

*श्लोक-मित्राद्यैः सह संमन्त्र्य संबुद्धो न प्रपद्यते ।*

*गृहीतं चापि यत्किंचित्प्रतिबुद्धो न पश्यति ॥ ३५ ॥*

**स्वप्नी जीही चर्चा झाली, जागृतीत ना मानी कुणी |**

**वचने-आश्वासने तेथली, स्वप्नी जावी विसरोनी || २४८.**

**स्वप्नी लाभल्या सुवर्ण मुद्रा, अनेक रांजण भरलेले |**

**जागृत होता खिसा रिकामा, स्वप्नीचे स्वप्नी विरले || २४९.**

**वास्तव वाटे स्वप्न-सृष्टीचे, कल्पनेतला खेळ परी |**

**परंतु स्वप्नी सत्यची वाटे, नच जाणवते ती दूरी || २५०.**

**अल्पकाळी त्या स्वप्नामधल्या, जाई दूरची देशाला |**

**विविध दर्शने घेई तेथे, स्थळ-काळचि जणु स्तब्धवला || २५१.**

**आणि अचानक येत जागृती, पाही आपण तेथेची |**

**सारी दृश्ये संकोचती जणु, परी विरे ते स्वप्नीची || २५२.**

**जे-जे भेटे स्वप्नामाजी, जागृतीत ते स्वस्थानी |**

**जेही बोलणे, व्यवहारहि ते, सारे विरते ते स्वप्नी || २५३.**

**तीस कारिका येथवरी ते, आठवण देती स्वप्नाची |**

**गौडपाद पूर्वीची कथियले, द्वितीय प्रकरणी ती त्याची || २५४.**

उदाहरण हे महत्व राखी, अनेक जागी वेदांती |
त्याने 'मिथ्या' सुलभ समजते, अनुभव त्याचे नित येती ||२५५.

गौडपाद ते तुलना करुनी, जागृत जगता स्वप्न म्हणे |
वास्तवात ते मिथ्या तरिही, अस्तित्व नि दिसणे || २५६.

दिसते जरि परि, वास्तव नसते, क्षणात बदलुनिया जाई |
आधी आणि नंतर नसते, अल्पकालचि ते राही || २५७,

एकचि जग परि असे वेगळे, आकलन एक न कोणाचे |
कैसे याला सत्य म्हणावे?, खेळचि हे तर मायेचे || २५८.

अस्तित्व नि तो जन्म जगाचा, उभय ही वास्तव ते नाही |
त्याची दृश्यता ग्राह्य धरावी, जी कि अज्ञाने येई || २५९

कुणी अविद्या तिजला म्हणती, विशाल व्याप्ती मायेची |
निकष सर्व हे स्वप्नालाही, अनुभूती ही प्रत्येकाची || २६०.

द्रष्टा पाही स्वप्नी परि जे, त्यासी खरेची ते वाटे |
जागृतीत परि जेंव्हा येई, उमगे सारे ते खोटे || २६१.

उभया उसनेचि अस्तित्वहि ते, लाभे जेकी तुर्येने |
जगास ना ते नाकारावे, व्यवहारी त्या आचरणे || २६२.

**मनी विरक्ती, पूर्ण नि:संगी, नियम पाळुनी जगताचे |**

**परि रहावे नित अद्वैती, स्वरूप आपुले तुर्येचे || २६३.**

*श्लोक-स्वप्ने चावस्तुकः कायः पृथगन्यस्य दर्शनात् । यथा कायस्तथा सर्वं चित्तदृश्यमवस्तुकम् ॥ ३६ ॥*

जागृती मधला आणि स्वप्नीचा, देह वेगळा कदा नसे |

परि स्वप्नीचा देह मनाचा, मिथ्या जागृतीचाहि असे || २६४

निद्राधीन जो देह स्वप्नीचा, तो न पाहतो स्वप्नांना |

जेही पाहणे स्वप्न-सृष्टीचे, देह वेगळा बघतांना || २६५

स्वप्न-सृष्टी नि दृश्य जगतहि, सारे सारे मिथ्याची |

फसव्या लाभास्तव आसक्ती, कांही ना उपयोगाची || २६६.

स्वप्नी उभवितो, देह-मनाची, स्वतंत्र सृष्टी ती आपुली |

आपुल्या निर्मितीतचि रमतो, कल्पित देहे, त्या काली || २६७.

श्रुती सांगते, ज्ञान दृष्टीने, नीट पाही कि मिथ्या हे |

स्वप्न-जागृती जीही अनुभूती, साक्षीभावे त्या पाहे || २६८.

ना स्वप्नातील, नच जागृतीचा, देह आपुला कदा असे |

दोन्ही तात्पुरते कार्यास्तव, येथ आपुले कांही नसे || २६९.

मनास धरुनी हाताशी ते, खेळ जागृती मायेचा |

दिसते ते तर मुळीच नसते, स्वीकार फोलचि बंधाचा || २७०.

देह हि मिथ्या, पदार्थ मिथ्या, वृथा न अडकू त्यांत तुवा |

अद्वैताचा ध्यास धरावा, नित्य त्यांत सहवास हवा || २७१.

केन श्रुती ती स्पष्ट सांगते, ना उपासने ब्रह्म मिळे |

परमसत्य ते तूंचि असशी, बोधे हे तत्काळ कळे || २७२.

श्लोक- *ग्रहणाज्जागरितवत्तद्धेतुः स्वप्न इष्यते ।*

*तद्धेतुत्वात्तु तस्यैव सज्जागरितमिष्यते* ॥३७॥

जागृतीत ते जसे आकलन, होत असे ते विषयांचे |

विषय ग्रहण ते तसेचि होई, कार्य चालता स्वप्नाचे || २७३.

त्या-त्या समयी द्रष्ट्याला ते, सारे वास्तवचि वाटे |

स्वप्नातुनी ती जागृती येता, प्रसंग स्वप्नीचे खोटे || २७४.

स्वप्ना कारण जागृत सृष्टी, स्वप्नसृष्टी मिथ्याचि जसे |

जागृत सृष्टी तशीच मिथ्या, बोधे ध्यानी येत असे || २७५.

आत्मबोध तो गुरुकृपेने, खरी जागृती ती होई |

ब्रह्मज्ञानीच्या प्रभात समयी, जगपण ते विरुनी जाई || २७६.

*श्लोक-उत्पादस्याप्रसिद्धत्वादजं सर्वमुदाहृतम् । न च भूतादभूतस्य संभवोऽस्ति कथंचन ॥ ३८ ॥*

पदार्थ कैसा निर्मित झाला, सिद्ध न करता ते येई |

अज नि शाश्वत ब्रह्मापासुनी, शक्य मिर्मिती ती नाही || २७७.

मूळ पदार्थ न तसे राहती, नित्यचि परिवर्तन चाले |

नवे रूप नि नामहि नवे, नूतन कांही न निर्मियले || २७८.

*श्लोक-असज्जागरिते दृष्ट्वा स्वप्ने पश्यति तन्मयः ।*
*असत्स्वप्नेऽपि दृष्ट्वा च प्रतिबुद्धो न पश्यति ॥३९॥*

**जागृतीतल्या मिथ्या दृश्या, द्रष्टा तन्मय होऊनिया |**
**पाहतसे नि तैसे स्वप्नी, जरि असे ती मन-किमया || २७९.**

**स्वप्नी दिसे ते स्वप्नीच राही, संबंध न त्या जागृतीशी |**
**उभय सृष्टी ना कार्य-कारणे, नाते एक नि दुसऱ्याशी || २८०.**

**स्वप्न-जागृती उभय अनुभूती, कारण अज्ञानची असे |**
**जगत-जीव नि ईश्वर यांचे, तयेची अस्तित्वहि भासे || २८१.**

**कर्मचि कारण सुख-दुःखाला, फल लाभे कर्मानेची |**
**अन्य न कारण असे तयाला, पेरियले उगवे तेची || २८२.**

**दृश्य जगाच्या व्यवहाराला, ज्ञानी मिथ्याचि म्हणती |**
**परी स्वीकारी, जणु सत्य ते, सामान्यचि त्या आचरणे || २८३.**

**द्वैती राही द्वैत दाऊनि, परि न गुंते व्यवहारी |**
**असुनी तुर्येमाजी, जगती, मुक्तपणेचि कार्य करी || २८४.**

**प्रपंच नि परमार्थ साधिता, जीवन्मुक्ती ती झाली |**
**स्वधर्म पालन, निदिध्यासन हि, उणीव उभयी ती नुरली || २८५.**

श्लोक-*नास्त्यसद्धेतुकमसत्सदसद्धेतुकं तथा ।*

*सच्च सद्धेतुकं नास्ति सद्धेतुकमसत्कुतः* ॥ ४० ॥

**मिथ्यत्व न ते, कारण होई, दुसऱ्या त्या मिथ्यत्वाला |**

**सतापासुनी असत न निर्मे, असत न निर्मित सत् याला || २८६.**

**मातीला देऊनी आकारा, कुलाल घट तो निर्मियला |**

**मातीत ना ती उणीव कांही, भेद रूपे घट जरि झाला || २८७.**

**हि न निर्मिती, परिवर्तन हे, मूळ अजन्मा तैसेची |**

**आभास होई नव निर्मितीचा, भर ती नाम नि रुपाची || २८८.**

श्लोक- *विपर्यासाद्यथा जाग्रदचिन्त्यान्भूतवत् स्पृशेत् । तथा स्वप्ने विपर्यासाद्धर्मास्तत्रैव पश्यति* ॥ ४१ ॥

**जागृत असता जरि ये भ्रांती, अकल्पिता वास्तव समजे |**

**स्वप्न-द्रष्टा तैसेचि तो, अतर्क्यहि सत्यचि उमजे || २८९.**

**ज्या वस्तूंचे कधि न चिंतन, अशी दृश्ये ही तो पाही |**

**म्हणुनी जागृती आणि स्वप्नीचे, कार्य नि कारण ते नाही ||२९०.**

**मिथ्यालाही सत्यचि समजे, कारण केवळ अज्ञान |**

**परमसत्य ते ज्ञात न होता, केवळ 'अहं' चेची भान || २९१.**

*श्लोक- उपलम्भात् समाचारदस्तिवस्तुत्ववादिनाम् ।*

*जातिस्तु देशिता बुद्धैरजातेस्त्रसतां सदा ॥ ४२ ॥*

**परमसत्य ते ज्या ना उमगे, भौतिका मानिती खरे |**

**इंद्रियाशी ती होत अनुभूती, स्पर्शे, उपयोगास करे || २९२.**

**सामान्यांना सुलभ वाटतो, प्रपंच हा जो द्वैताच्या |**

**दिसती प्रत्यक्षचि वस्तू नि, मार्ग सुलभ तो प्राप्तीचा || २९३.**

**इहलोकीच्या पुण्ये निश्चित, परलोकी तो स्वर्गाचा |**

**व्यवहाराला पूर्ण सुलभता, मार्ग पूजने भक्तीचा || २९४.**

**जे न इंद्रियागम्य असे ते, विचार करिती ना त्याचा |**

**ब्रह्मसूत्री ते असे सांगणे, स्वीकार तो संसाराचा || २९५.**

**उपेक्षा न ज्ञात्याने करणे, जरि खेळ तो मायेचा |**

**सामान्यासम जगी वागणे, विसरचि ना अद्वैताचा || २९६.**

**अध्यात्माचा मार्ग जयाचा, त्यास पायरी हि पहिली |**

**बोध ठाम तो होण्यालागी, कर्म महती ती सांगितली || २९७.**

**अस्तित्व नि व्यवहार तसेची, उपयोगी जगतात असे |**

**सत्य म्हणोनी समोर दिसती, मिथ्या म्हणणे त्या कैसे ?|| २९८.**

अद्वैताची पूर्ण विरक्ती, ममता वत्सलता नाही |
द्वैती संबंधास राखणे, जगती सुलभचि ते जाई || २९९.

अजात वादा सामान्यांना, म्हणुनि कदा ती रुचि नसे |
सुलभचि संसाराशी करणे, पुजने भजने प्रीति असे || ३००.

दुजे मत असे व्यक्ती म्हणोनी, स्वतंत्रची अस्तित्व असे |
व्यवहारेचि जग हे चाले, असत्य त्या मानणे कसे ?|| ३०१.

हळूहळू त्या बोध करावा, खेळ असे हा मायेचा |
द्वैते निश्चित होते बंधन, मार्ग नसे हा मुक्तीचा || ३०२.

स्वप्नातील जशी मिथ्या सृष्टी, जागृतीतली तैसीची |
सत्य नसे तो कल्पनेतला, नकोच आसक्ती त्याची || ३०३.

आभास हा जो सत्य वाटतो, नित्य बदलता, संसारी |
नाटकातल्या जशा प्रसंगी, कल्पनाच परि ती सारी || ३०४.

जोवरी ना उत्तम अधिकारी, ब्रह्म उमगणे कठीण अति |
अभ्यासूने राहुनी द्वैती, अभ्यासावी नित्य श्रुती || ३०५.

भक्ती, पूजा आदि सारे, प्रथम नि मध्यम अधिकारी |
द्वैतातुनी जाणे अद्वैती, नाही गुंतणे संसारी || ३०६.

हे सारे अध्यात्मी उपयोगी, मन शुद्धि जेणे होई |
ज्ञान-योग तो होई सुलभचि, साधक सन्मार्गी राही || ३०७.

कैवल्य श्रुती स्पष्टचि सांगे, पंच तत्व ते मुळी नाही |
जे दिसते ती केवळ माया, ब्रह्म एकले नित पाही || ३०८.

ज्ञात्याने हे ध्यानी धरावे, जगत नि ब्रह्म न निर्मियले |
नवे कांही ना निर्मित होई, परिवर्तन परि नित चाले || ३०९.

आत्मा अधिष्ठान या जगता, ब्रह्मशक्तीने जग चाले |
परमात्मा परि अलिप्त त्यातुनि, उमगताची बंधन सुटले || ३१०.

ब्रह्मापासुनी कांही न निर्मित, अद्वैती ते स्थिरचि असे |
ज्ञानदृष्टीने सारे बघता, ब्रह्मविणा ते अन्य नसे || ३११.

अजातवादा ठाम असावे, मतांतरे ती बहु असती |
गौडपाद ते सोदाहारणे, हेचि आपणा बिंबविती || ३१२.

श्लोक- *अजातेस्त्रसतां तेषामुपलम्भाद्वियन्ति ये । जातिदोषा न सेत्स्यन्ति दोषोऽप्यल्पो भविष्यति ॥ ४३ ॥*

द्वैती जे जन नित्य पाहती, उत्पत्ती नित संसारी |

नवे जन्म ते जसे मानवी, सृष्टीतहि ते रोज परी || ३१३.

तया वाटते, अस्तित्वाशी, आवश्यक जन्मा येणे |

दिसते जग त्या कसा जन्म ना? मग तर खोटेची दिसणे || ३१४.

अशा जनांना गहन विचारी, कदा त्वरेने न्या न्यावे |

जरि रमती ते जन संसारी, अल्पकाळ असू द्यावे || ३१५.

दोष न त्याचा विशेष असतो, विलंब होई मुक्तीला |

परि तोवरी सदाचार नि भरचि द्यावा शुद्धीला || ३१६.

कर्म-योग नि उपासनाही, सहाय्यकारी त्या होई |

पूर्वतयारी उत्तम होई, सुलभता ती बोधी येई || ३१७.

कृष्ण सांगती गीतेमाजी, बंधन कर्माचे नुरते |

निष्कामचि ती वृत्ती होई, सोडी हळू आसक्तीते || ३१८.

*श्लोक-उपलम्भात्समाचारान्मायाहस्ती यथोच्यते ।*
*उपलम्भात्समाचारादस्ति वस्तु तथोच्यते ॥ ४४ ॥*

जादुगार कुणी मायेनेचि, हत्ती दाविती आपणाला |
असतो तो तर, इंद्रियगोचर, व्यवहारहि होती त्याला || ३१९.

परि सत्य ना नजरबंदी ती, मुळी नसे तो, तरी दिसे |
नसत्या वस्तूसंगे व्यवहारहि, होतांना ते दिसत असे || ३२०.

भिंगरी कि ती, फिरता वेगे, अति वेगे जणु हलत नसे |
भुमीवरती एके जागी, सरळ फिरे जणु स्तब्ध दिसे || ३२१.

तैसे जगती पदार्थ दिसती, व्यवहारहि त्यास्तव होती |
परि सारे ते असती फसवे, तात्पुरती असते भ्रांती || ३२२.

सत्य भासते अल्प काळ ते, मिथ्याचि ते परि असती |
ज्ञात्याने हे समजुनी घ्यावे, मनी पूर्ण अनासक्ती || ३२३.

ज्या द्वैताचा मोह सुटेना, कर्म योग त्या सांगावा |
उपासनेसी त्यास लावणे, सदाचारहि शिकवावा || ३२४.

भगवंताने असे निर्मिला, जणु खेळ हा जादूचा |
यावे खेळावे, ते नियमे, परि ना हव्यासचि त्याचा || ३२५.

कारण सारे हे मायावी, त्यांत गुंतणे अज्ञान |
यथार्थ बोधे ज्ञानदृष्टीने, होते मायेचे ज्ञान || ३२६.

जगत जरी हे असेचि मिथ्या, ईश्वरास ते हवे असे |
दुजे खेळण्या काय तयाला?, म्हणुनी मायिक निर्मितसे || ३२७.

म्हणुनि त्या आधार दिला तो, भक्कम ऐशा ब्रह्माचा |
आणि खेळ हा नाविन्यास्तव, धर्म तयाशी बदलाचा || ३२८.

आपण येतो येथे अनुभूती, घेण्या मानवजन्माची |
विसरुनी आपले महानपण ते, रुचि घेई सुख-दुःखाची || ३२९.

म्हणुनि यांत ते सामील होणे, नेमिलेची ते कार्य करी |
उत्तम खेळा खेळूनियाहि, जाणे परत आहेचि घरी || ३३०.

स्तोत्र दक्षिणामूर्तीचे ते, असेच आपणा सांगतसे |
जादुगार जो बहु महानचि, योगीराज जो स्वये असे || ३३१.

आपुल्या इच्छेने हे घडवी, विशाल मायिक विश्वाशी |
आधी बिजातुनी दावी अंकुर, सारे मिळविशी आकाशी ||३३२.

काळ नि जागा जरि वेगळी, आज दिसे ते उद्या नसे |
विनम्र वंदन तुला सद्गुरू, तुजसम अन्य न कुणी असे || ३३३.

**जैसा जादुगाराचा हत्ती, दिसे नि येई उपयोगी |**

**व्यवहारहि ते त्याचे संगे, परि अंती निरुपयोगी || ३३४.**

**तैसे भगवंताने रचिली, विशाल विश्वाची माया |**

**आवश्यक व्यवहार करावे, मिथ्या समजावेचि तया || ३३५.**

*श्लोक-जात्याभासं चलाभासं वस्त्वाभासं तथैव च ।*
*अजाचलमवस्तुत्वं विज्ञानं शान्तमद्वयम् ॥ ४५ ॥*

आत्मतत्व हे असे अजन्मा, अचल नि निर्गुण अद्वयची |
पूर्ण शांत विज्ञानमयचि ते, धर्मशून्य ख्याती त्याची || ३३६.

परी रचितसे स्व-मायेने, अशी नगरी ही विश्वाची |
तयात व्यवहारहि ते होती, धर्म- गुणी परि मिथ्याची || ३३७.

नववे अध्यायी गीतेच्या, भगवंतांनी हे कथिले |
द्वैत मानुनी मज न भजावे, सर्वव्यापी मी सांगितले || ३३८.

अनंत असता सांत फुका करी, पूर्णकाम इच्छा न मनी |
आवाहन नि विसर्जनहि ते, करिती मजला अज्ञानी || ३३९.

सातवे अध्यायी ते कथिले, मम माया ती दुरत्यया |
ना गुंतावे मायाजाली, सत्याची ती रुचि जया || ३४०.

जन्म जणु तो जगताचा नि, भास गतीचा जो भासे |
तसेची दिसणे असते जाणीव, पूर्ण स्थिर अद्वैती असे || ३४१.

तिचा जन्म ना आणि स्थिरचि, निराकारचि स्वरूप जया |
ऐसी भासमान ही रचना, फसवी नित्यचि ती माया || ३४२.

भाष्यकार आपणा सांगती, हि तर रचना मायेची |

ईश्वर आणि मायेनेचि, मिळुनी रचना जगताची || ३४३.

स्वप्नी रचितो, खेळ मनीचे, कल्पनेत ते मन रमते |

जगत खेळ तो ईश्वर खेळे, त्या-त्या वेळी सत्यचि ते || ३४४.

माया फिरता ती वेगाने, वाटे कल्पित स्थैर्य असे |

एकचि जाणीव विविध प्रकारे, जेही नसे तेही ते दिसे || ३४५.

अनुभव हे तर प्रत्यक्षचि ते, परि सत्य ते कदा नसे |

नसे जन्म त्या आणि गतीही, मिथ्याचि ते परी भासे || ३४६.

*श्लोक- एवं न जायते चित्तमेवं धर्मा अजाः स्मृताः ।*

*एवमेव विजानन्तो न पतन्ति विपर्यये ॥ ४६ ॥*

ज्ञानमयचि जे चित्त असे त्या, जन्म धर्म ते अजचि असे |

ज्ञान जयाला दिव्य जाहले, द्वैत मोही तो फसत नसे || ३४७.

शुद्धचि जाणीव न ती जन्मते, जीव जन्म ना घेत असे |

जे ही ऐसे ठाम जाणती, दुर्दैवी तो कदा नसे || ३४८.

सखोल ऐसे भाष्यहि समजे, द्वैत अनुभूती त्या नाही |

नसे मूळ ही या जगताला, नसे गतीही त्याठायी || ३४९.

जीवात्माहि ना जन्मेचि, मी ही नित्यची अद्वैती |

नसे जन्म ना ब्रह्म अलगता, तुर्या हीचि मम स्थिती || ३५०.

भाष्यकार ते पुन्हा संगती, विपरित काळ हि तो येता |

शरण हरीला भावे जावे, तोचि सोडवील गुंता || ३५१.

अद्वैती ते नित्य पाठीशी, स्वयेचि तो भगवंत असे |

समर्थ ऐसा पाठीराखा, व्यथा नि चिंता मुळी नसे || ३५२.

गीतेत कृष्ण स्वयेची सांगे, पूर्ण कामना जो सोडी |

नित संतोषी, स्व-स्थ नित्यचि, तया हरीची नित गोडी || ३५३.

**ज्ञान ब्रह्मीचे ऐसे होता, विरक्ती प्रपंची असे तया |**

**अधिष्ठान मी जागृती जगता, आणि स्वप्ना जरि माया || ३५४.**

**उमगे सहजी, जन्म नि मरणहि, जीवात्म्याला मुळी नसे |**

**शुद्ध असे ती केवळ जाणीव, साधन म्हणुनी देह असे || ३५५.**

**माया निर्मित या देहाला, ईश्वर आदेश ते जैसे |**

**मला गुंतणे नसे प्रपंची, पूर्ण ब्रह्म ते मीचि असे || ३५६.**

श्लोक-ऋजुवक्रादिकाभासमलातस्पन्दितं यथा।
ग्रहणग्राहकाभासं विज्ञानस्पन्दितं तथा ॥ ४७ ॥

श्लोक-*अस्पन्दमानमलातमनाभासमजं यथा।*

*अस्पन्दमानं विज्ञानमनाभासमजं तथा* ॥ ४८ ॥

पेटती परी मशाल फिरता, तेजोरेषा अवकाशी |

कधी वाकडे, किंवा तिरपे, भासे तिज फिरवाल जशी || ३५७.

परि स्थानीचे तेज स्वस्थानी, नच थोडेही हालतसे |

अग्नी नच त्या सृजीत रेषा, परि फिरविता भास दिसे || ३५८.

त्या रेषा ना सृजन जाहल्या, ना केल्या कि वन्हीने |

अजात आणि स्थिर स्वस्थानी, आभास केवळ ते दिसणे||३५९.

कुणी अंधारी, उदबत्तीला, जरी फिरविले वक्र असे |

उमटती रेषा जैशा फिरता, सत्य सृजन तेव्हां भासे || ३६०.

अद्वैतचि जणु अलात अथवा, मशाल मानी दृष्टांती |

भंवतीचा अंधार जणु कि, मायातत्वचि जे जगती || ३६१.

अलात स्पंदन सृजिते भासा, उमटति आणि लया जाती |

रेषांचे हे नर्तन चाले, अद्वैतातुनी हे द्वैती || ३६२.

परमात्माचि अलात येथे, विश्व नि प्रकार फिरण्याचे |

अलात सुस्थिर, प्रकार नाही, फिरता राज्य प्रकारांचे || ३६३.

गौडपाद ते इथे सांगती, माया जाणीव अंधारी |

स्वप्न जागृती विचार नाना, विविध अनुभूती येत तरी || ३६४

जेंव्हा जाणीव शांत निवांतचि, सुस्थिर अद्वैताचि स्थिती |

सुषुप्तीत वा सुस्थिर मानस, अद्भुत अनुभव ती शांती || ३६५.

दृश्य एक परि येई विविधता, जाणीव जैशी घेत गती |

जाणीवेतली गतीचि विश्व हे, गतिमान नित ते द्वैती || ३६६.

तेजोरेषा जरि नाचती, येती आणि लया जाती |

वन्ही बिंब ते आपुल्या ठायी, निवांत आणि शांत स्थिती ||३६७.

कार्य नि कारण जरि विविधता, निर्गुण निश्चल ब्रह्म असे |

जाणीव गतीने, दिसे विविधता, ते ब्रह्माचे कार्य नसे || ३६८.

श्लोक- *अलाते स्पन्दमाने वै नाऽऽभासा अन्यतोभुवः ।*

*न ततोऽन्यत्र निस्पन्दान्नालातं प्रविशन्ति ते* ॥ ४९ ॥

**अलात फिरता आभास होतो, तो न वन्हीच्या फिरण्याने |**

**आभासास ना, अलात कारण, स्थिरताहि नच होई तिने || ३६९.**

**तसेच ज्याही उमटती रेषा, स्थिरता त्या जेंव्हा येई |**

**तेजोरेषा तदा पुनरपि, वन्हीत विरोनिया जाई || ३७०**

**अर्थ एकचि निघे त्यातुनि, जेही नर्तन रेषांचे |**

**तो असतो कि आभास केवळ, स्थैर्य ना चळे अलाताचे||३७१.**

श्लोक-*न निर्गता अलातात्ते द्रव्यत्वाभावयोगतः ।*

*विज्ञानेऽपि तथैव स्युराभासस्याविशेषतः* ॥ ५० ॥

त्या रेषा ज्या द्रव्ये बनती, अलातातुनी येत नसे |

द्रव्य हि ते तर, आभास असतो, केवळ ते मिथ्याची असे||३७२.

श्लोक-*विज्ञाने स्पन्दमाने वै नाभासा अन्यतोभुवः ।*

*न ततोऽन्यत्र निस्पन्दान्न विज्ञानं विशन्ति ते ॥ ५१ ॥*

**अलात फिरणे हे विज्ञानचि, उभयहि ते मिथ्या असते |**

**उत्पत्ती नि ज्ञान तयाचे, सत्य कदापि ते नसते || ३७३.**

*श्लोक-न निर्गतास्ते विज्ञानाद् द्रव्यत्वाभावयोगतः।*

*कार्यकारणताभावाद्यतो चिन्त्याः सदैव ते ॥ ५२ ॥*

**द्रव्यत्वाचा अभाव तेथे, आभास सोडी न ज्ञानाला ||**

**म्हणुनि कार्य कारण भावहि, नसे येत तो जन्माला || ३७४,**

**सत्य ज्ञान ते अलात निश्चल, आभास जोही होत असे |**

**ज्ञान तयाचे अचिंत्य केवळ, भ्रांतिविना ते अन्य नसे || ३७५.**

**वरील चारी कारिकांचा आशय**

**गौडपाद बिंबविती यातुनी, अजातवादचि सत्य असे |**

**एकचि वन्ही बिंबापासुनि, रेषा जन्मताही न, दिसे || ३७६.**

**अलात अद्वैती दृष्टांती या, द्वैत दिसतसे रेषांचे |**

**अलात द्वैताला नच कारण, नाते कांही न उभयांचे || ३७७.**

**वाटे बिंबातुनि या रेषा, नसे निर्मिती बिंबाची ||**

**तेजोरेषा दिसणे केवळ, असते ती तर भ्रांतीची || ३७८.**

**स्थिरातुनी न अस्थिर निपजे, स्थिर ना कारणचि त्याला |**

**नच आभासा त्याने बाधा, परि अद्वैता स्थिरतेला || ३७९.**

**एकचि अद्वैताच्या मधुनी, अनेकता जी आभासे |**

तो साराची आभास मिथ्या, जग हे तैसेचि भासे || ३८०.

खेळचि सारा जाणीवेतुनी, निघतो आणि लय होई |

परि ते निघणे नि लय होणे, केवळ मिथ्याची राही || ३८१.

नित्य नि शाश्वत ब्रह्म असे ते, सृजन न त्यातुनि ते होई |

परि जगता  आधार ब्रह्मचि, जरि जन्मा कारण नाही || ३८२.

विश्लेषण करितांना याचे, चार प्रश्न यावरी पुसती |

काय अलातामधुनी जाहली, तेजोरेषा उत्पत्ती ? || ३८३.

किंवा सृजिल्या त्या रेषा, कुणाही अन्या पासोनी ? |

अलात वन्ही बिंब-भागचि,  रेषा गेल्या न विभजोनी || ३८४.

अलात बिंबा पासुनि ना त्या, तसेचि अन्यापासोनी |

वन्ही अलातीपासुनि जन्म ना, आधार त्याविण ना कोणी||३८५.

अचिंत्य आणि अगम्य हे तर, दिसे परि ना जन्म तया |

मिथ्या त्या आधार सत्यचि, म्हणुनि ही केवळ माया || ३८६.

पुढे विचारिती, स्थिर अलात ती, झाली आपुल्या स्वस्थानी |

तेजोरेषा कोठे गेल्या? बाहेरी कि वन्हीस्थानी ?|| ३८७.

गौडपाद उत्तरती त्या रेषा, अलाती न वा बाहेरी |

कारण त्या तर नव्हत्यातीची, भासा वाचुनी न अन्य परि ||३८८.

दिसणे त्यांचे सत्य वाटले, आणि नर्तन ही त्यांचे दिसले |

जन्म न झाला, दिसल्या तरीही, कांहीहि नच ते घडले, || ३८९.

त्यांचे दिसणे आणि लय होणे, आभासाविण अन्य नसे |

अद्वैताचा आधार त्याशी, हे चि परंतु सत्य असे || ३९०.

द्वैत हि तैसे आभास केवळ, जरी अस्तित्व तया दिसते |

अद्वैताच्या आधाराने, खेळ जरी हा, सत्य न ते || ३९१.

ज्ञात्याने ते ब्रह्म नि जग हे, असे बोलणे टाळावे |

द्वैत असे ही मिथ्या भ्रांती, सारे ब्रह्मचि बोलावे || ३९२.

द्वैत असे ज्ञानास विसावा, पुरते अज्ञान न जाता |

ऐशा प्रारंभीचि वाटे, अस्तित्व हि आहे जगता || ३९३.

तेंव्हा ज्ञाना अवगत होण्या, कर्म-योग नि उपासना |

ज्ञान-योग तो अवगत होता ब्रह्माविण, ते कांहीचि ना || ३९४.

ब्रह्म जगत ना कदा वेगळे, ब्रह्म एकलेचि असते |

तरंग सागर दोन नसेची, सागर आश्रयचि देते || ३९५.

मशाल आणि तिचिया रेषा, काय वेगळे ते म्हणणे ?|
ज्ञानदृष्टीने तेजोरेषा, वन्ही-विन ना ते अन्ये || ३९६.

अकरावे अध्यायी गीतेच्या, कृष्ण सांगती पार्थाशी |
उघडे डोळे ठेऊनी पाही नच थारा अद्वैताशी || ३९७.

मी नि जगत हे नसे वेगळे, मजवरी जग हे खेळतसे |
हा तात्पुरता आभास पार्था, मजवाचुनी कुणी अन्य नसे ||३९८.

होण्यासाठी ईश्वर दर्शन, डोळे बंद न  ठेवावे |
कोठे ईश्वर? प्रश्न चुकीचा, ईश्वर नाही त्या दावावे || ३९९.

जगत नि ईश्वर कांही न नाते, अंगावरती धूळ जशी |
येई जाई, देह आश्रयी, संबंध नच तो माझ्याशी || ४००.

गती असे तंव जगतचि भासे , नीरव शांती ब्रह्मचि ते |
चिदाकाश आकाशी मिळता, तुयेची अनुभूती येते || ४०१.

म्हणुनी गीतेत कृष्ण सांगती, विभूती माझी मौन असे |
पूर्ण समर्पण त्याचे चरणी, सर्वत्रचि तो हरी दिसे || ४०२.

सत्तेचाळीस ते बावन्नी, अलात दृष्टांता दिधले |
अजातवादा सिद्ध कराया, उदाहरण हे छान दिले || ४०३.

हलवितांचि ती मशाल उठती, फिरत्या तेजाच्या रेषा |
एकचि वन्ही बिंब परंतु, मिथ्या वाटती अनेकशा || ४०४

त्या रेषा ना द्रव्यचि असती, नसता कांही त्या दिसती |
घट मातीहुनि नसे वेगळा, असते नित्यचि ती माती || ४०५.

तैसे ब्रह्महि असे एकले, जाणीव फिरता द्वैत दिसे |
परि मिथ्या, आभासचि केवळ, ब्रह्म नित्य ते स्थिरचि असे||४०६.

जगता कुणी ना जन्म दिला नि, नसेची नाते ब्रह्माशी |
आश्रय घेउनी ब्रह्माचा ते, अस्तित्वाच्या भासाशी || ४०७.

विविध नाम नि रूपे जी दिसती, नाही ब्रह्माशी नाते |
सारा खेळ असे हा मिथ्या, नाही त्याशी भासविते || ४०८.

सारी नाम-रूपे हि फसवी, सत्य एकचि ब्रह्म असे |
मांडुक्याच्या पूर्ण श्रुतीचा आशय या वाचुनी नसे || ४०९.

शाश्वत नित्यचि तुर्या तीचि, मीच अन्य कांहीच नसे |
ब्रह्म नि तुर्या एकचि आहे, ज्ञान-दृष्टीला हेचि दिसे || ४१०.

प्रपंच म्हणुनी कांही नसे ते, खेळ असे तो मायेचा |
व्यवहारास्तव खेळ निर्मिला, लेश हि नाही सत्याचा || ४११.

ब्रह्म नि जगताचे ना कांही, कार्य नि कारणचि नाते |

ईश्वर-मायेने हि मिळोनी, कल्पियले या जगताते || ४१२.

*श्लोक- द्रव्यं द्रव्यस्य हेतुः स्यादन्यदन्यस्य चैव हि ।*
*द्रव्यत्वमन्यभावो वा धर्माणां नोपपद्यते ॥ ५३ ॥*

**व्यवहारी ते द्रव्य मिश्रणे, नूतन वस्तू होत असे |**
**द्रव्य तेधवा निर्मिती कारण, ऐसे नित्यचि स्पष्ट दिसे || ४१३.**

**दोन भिन्न ती विविध मिश्रणे नवे नाम नि रूप दिसे |**
**परी द्रव्य  ना निर्मी आपणा, दुजे रुपांतर होत असे || ४१४.**

**आत्म्याजवळी नसे अन्यचि, मिश्रण ना ते संभवते |**
**नित्यचि निर्गुण, ना वस्तू तो, तेणे निर्मिती न होते || ४१५.**

**जग नि ब्रह्म न कधी वेगळे, एकचि असता, ना नाते |**
**सारे एकचि परब्रह्म ते, देत भिन्न कां नामही ते ?|| ४१६.**

**हा तरंग नि तोचि सागर, ऐसे विभाजन का करणे ?|**
**ढग आभाळी खेळती खेळा, आभाळा भिन्न न म्हणणे || ४१७.**

**भगवंता लागे न शोधणे, स्वयेची मी तर तोचि असे |**
**ज्ञान दृष्टीने स्पष्ट अनुभूती, मज मी शोधावे कैसे ?|| ४१८.**

**व्यवहारी दृष्टी अज्ञाला, जे हि जगत असे दिसते |**
**दृष्टी ज्ञानमयी ती ज्याची, ब्रह्मचि अनुभूत ते होते || ४१९.**

*श्लोक- एवं न चित्तजा धर्माश्चित्तं वाऽपि न धर्मजम् । एवं हेतुफलाजातिं प्रविशन्ति मनीषिणः ॥ ५४ ॥*

*श्लोक-यावद्धेतुफलावेशस्तावद्धे तुफलोद्भवः । क्षीणे हेतुफलावेशे नास्ति हेतुफलोद्भवः ॥ ५५ ॥*

**चित्त असे आत्मैक रूपची, नित्यचि निर्गुण ते असते |**

**निर्मिती कारण पदार्थ आणि, धर्म तयांचे जडचि ते || ४२०.**

**पदार्थ निर्मिती नव वस्तूला, चित्ताचे ते कार्य नसे |**

**आत्म्यामाजी कारण नाही, अभाव हेतू-फलीहि असे || ४२१.**

**पूर्ण समर्पण जेंव्हा होई, फल-हेतूंना कारण ना |**

**अज्ञानाचा नाशचि होता, कारण नाही दुःखांना || ४२२.**

**फल नि हेतू, हेतू नि फल, चक्र संपते मग तेंव्हा ?|**

**जन्म-मृत्यूचे तुटते बंधन, शुद्ध ज्ञान लाभे जेंव्हां || ४२३.**

**अज्ञानाचा खेळ जोवरी, व्यष्टी-समष्टी हे चाले |**

**कर्म-कारणी पकडी न यावे, अलिप्त नित्यचि हेचि भले||४२४.**

**जाणीवेतुनी नच ती निर्मिती, निर्मितीतुनी जाणीव ना |**

**ज्ञाते निर्णय पुरता घेती, कारण-कार्यहि जन्मे ना || ४२५.**

**म्हणुनि जगती दिसते जे-जे जाणीवेतुनी ना निघते |**

ब्रह्म न निर्मी, ना घे जन्मा, कालातीतचि ते असते || ४२६.

त्याचे असणे परि दृग्गोचर, तो तर खेळची मायेचा |

भगवंता ते हवेचि नाटक, म्हणुनि व्यवहारचि त्याचा || ४२७.

जीवात्मा-परमात्मा ऐसे, दोन कदापि ते नसती |

अज्ञान्याला ऐशी भ्रांती, ज्ञात्या मनी केवळ शांती || ४२८.

ज्ञाता जाणे कर्म नि देहहि, यांचे ना कसले नाते |

कार्य नि कारण भाव न उभयी, जणु मंचावर नाटक ते || ४२९.

*श्लोक-यावद्धेतुफलावेशः संसारस्तावदायतः ।*

*क्षीणे हेतुफलावेशे संसारं न प्रपद्यते ॥५६॥*

**फल-हेतूंचा अभिनिवेश हा, लांबवीचि संसाराला |**

**मी ना कांही कर्म ते करी, फल कैसे मग ते मजला || ४३०.**

**कर्मी अकर्मचि जया साधले, मुक्त नित्य तो, संसारी |**

**नाटकात मी दुःख दिले तरी, शिक्षा मजशी नाही तरी || ४३१.**

**मी करीता सारेची समर्पण, बाहुली मी जणू कळसूत्री |**

**मज ना ठाऊक नर्तन वर्तन, नाटक हे तर बहुपात्री || ४३२.**

**'पुनरपि जननं पुनरपि मरणं', सहभाग न माझा त्याशी |**

**देहा चाळवी प्रकृतीच ती, संबंधचि नाही मजशी || ४३३.**

**लोह-चुंबका सम मी स्थिरचि, संपर्के उर्जा उठती |**

**जड देहाला चेतन लाभे, तीचि कार्या त्या शक्ती || ४३४.**

**संसारा या कधि न तृप्ती, एक संपले दुजे हवे |**

**पुर्णत्वाच्या लाभासाठी, यथार्थ ज्ञानचि लाभावे || ४३५.**

**संसारी या युद्ध नित्यचि, नित्यचि चालती तडजोडी |**

**माझे मी-पण जपण्यास्तवचि, व्यवहाराच्या उतरंडी || ४३६.**

मोक्षाला ना देई साधना, जाणीव हा संसार नसे |

नको गुंतणे तयात कधीही, अद्वैतातचि नित्य वसे || ४३७.

या बोधास्तव कर्म-मार्ग नि, उपासना ती प्रारंभी |

होता तुर्येच्या बोधाला, कशावरहि  ना अवलंबी || ४३८.

स्वधर्म पालन विहीत कर्मे, यांशी कदापि ना सोडी |

नियम एकचि सारे करी परि, आसक्ती पुरती तोडी || ४३९.

कांही येथले नाही माझे, मजला इच्छा ना कसली |

पूर्णकाम मी नित्य तृप्तचि, ब्रह्मरूप वृत्ती झाली || ४४० .

श्लोक-संवृत्या जायते सर्व शाश्वतं नास्ति तेन वै ।

सद्भावेन ह्यजं सर्वमुच्छेदस्तेन नास्ति वै ॥५७॥

दृश्य दिसे ते अज्ञानाने, विषय त्यातुनि ते निघती |

मोह सुटे तो तये इंद्रिया, आणि वाढे आसक्ती || ४४१.

म्हणुनी सावध नित्य असावे, प्रपंचात ना गुंतावे |

मी चि तुर्या, नित्य धारणा, अद्वैता ना विसरावे || ४४२.

या जगती ना कांहीचि शाश्वत, आदी ब्रह्म ते अजचि असे |

ते शाश्वत नि सर्वव्यापीही, आधार त्याविण अन्य नसे || ४४३.

श्रीकृष्ण सांगे गीतेमाजी, अज्ञानचि ती रात्र असे |

ज्ञाता ज्ञानी जागा राही, प्रपंच रात्र तया भासे || ४४४.

अज्ञान्याला प्रपंची गोडी, विचार ना त्या सत्याचा |

पिणे नि खाणे, संग्रह करणे, काल यांत आयुष्याचा || ४४५.

ज्ञात्या सारे ब्रह्मची दिसते, जग नि ब्रह्म न  अलग असे  |

नित्यची तो तर अद्वैतीचि, द्वैत तया ना कुठे दिसे || ४४६.

चिरंजीव वा मर्त्य असे मी?, दृष्टी आपुली असे जशी |

देहभावना असे जोवरी, मम मृत्यू भावना अशी || ४४७.

**देही गुंतता, मरण असेचि, ब्रह्म जाणता, शाश्वत मी |**

**गौडपाद म्हणती जग मिथ्या, परि व्यवहार करी नामी || ४४८.**

श्लोक-धर्मा य इति जायन्ते जायन्ते ते न तत्त्वतः ।

जन्म मायोपमं तेषां सा च माया न विद्यते ॥५८||

अजन्माचि परब्रह्म असे ते, कल्पित धर्म हि त्या भंवती |

परी धर्म ते सारे मायिक, भासमानचि ते असती || ४४९.

आत्मदेव तर नित्यचि अज तो, कधि न जन्मासी आला |

धर्म जाहले मायेतुनी ज्या, जन्म न तियेचाहि झाला || ४५०.

माया म्हणजेची ती ऐशी, जी न कदापिहि असते |

ती नच झाली, तिजपासुनि जे, कल्पित धर्महि मिथ्या ते ||४५१.

म्हणुनी सत्यावरल्या आभासे, प्रतीत धर्म जेहि होती |

ते सारेची मायिक म्हणुनि, ना अस्तित्वी ते असती || ४५२.

दिसते जेहि भवती जगती, अविद्याचि ती समजावी |

तेथे कैसी ती उत्पत्ती?, केवळ माया जाणावी || ४५३.

जादुगार जो महान ईश्वर, त्याने मायेच्या करवी |

सारा कल्पित प्रपंच रचिला, नसता कांही तरि दावी || ४५४.

श्लोक-यथा मायामयाबीजाज्जायते तन्मयोऽङ्कुरः । नासौ नित्यो न चोच्छेदी तद्वद्धर्मेषु योजना ॥ ५९ ॥

कल्पित माया बीजास घेऊनि, अंकुर त्यातुनि निर्मियते |

आत्मधर्म ते त्यातुनि निघती, आणि जगत तये दिसते || ४५५

दृष्टि पारमार्थिक ती होता, कळते माया ही सारी |

ना जीवाने जन्म घेतला, ना प्राणी या संसारी || ४५६

जगत न नित्य न, अनित्य कारण, सर्व पसारा मायेचा |

जैसे स्वप्नी सत्य भासते, त्या आधार न सत्याचा || ४५७.

द्वैताधारे कल्पित खेळचि, सत्य भासतो व्यवहारी |

अद्वैतावरी रचित पसारा, मायिक अवघ्या संसारी || ४५८.

अगम्य आणि अतर्क्य सारे, त्याच्या नियमे ते चाले |

आणि पुढती चालत राहील, कल्पनेतचि ते रचिले || ४५९.

*श्लोक-नाजेषु सर्वधर्मेषु शाश्वताशाश्वताभिधा ।*

*यत्र वर्णा न वर्तन्ते विवेकस्तत्र नोच्यते ॥ ६० ॥*

**उत्पत्ति ना ऐशा धर्मा, अशाश्वत कि शाश्वत म्हणणे ?|**

**जे नाही त्या काय निवाडा? शब्दि कैसे ते वदणे? || ४६०.**

**आत्मरूप मी, या जगताला, आधार केवळ तो दिधला |**

**मी ओळखता, मलाचि पुरते, प्रतीत आभास तो झाला || ४६१.**

**जोवरी पगडा अज्ञानाचा, सारे जग सत्यचि भासे |**

**इंद्रियगोचर असता सारे, व्यवहारहि ते आभासे || ४६२.**

**मजला मी जे व्यष्टी उमगुनी, गुंतत गेलो संसारी |**

**माझे वाटे सारे मजला, मायिक दुनिया जरि सारी || ४६३.**

**कल्पिताशीचि सत्य मानिता, बदल हवे ते त्या करण्या |**

**प्रयास केले मीचि वृथाचि, माझे मनीचे अनुसरण्या || ४६४.**

**श्रुती माऊली धाऊनी आली, बोधामृत मज पाजियले |**

**माझे निजरुप मला उमगता, मीचि ब्रह्म हे तंव कळले || ४६५.**

**अज्ञानाची ती काळोखी, जेंव्हा मिटुनिया जाई |**

**तेंव्हा कळते, फुका अडकलो, ज्यासी अस्तित्वचि नाही ||४६६.**

ब्रह्मापासुनी उसने घेऊनि अस्तित्वाशी ते रचिले |

सुरु जाहला खेळ अनादि, अनंत काळहि तो चाले || ४६७.

परब्रह्म मी मला न लागे, कसलाही तो आधार |

स्वयंभूचि मी शाश्वत असता, नित्य चि मायेच्या पार || ४६८.

जेही व्यापार नि व्यवहारही, जगता माजी ते होती |

मिथ्या देहचि करी तयांना, लिप्त न ते मजला होती || ४६९.

देहा आश्रय मी तो दिधला, करण्या जगीच्या व्यवहारा |

जीर्ण देह तो गळुनी पडता, दुज्या देहीच्या व्यापारा || ४७०.

जीवन हा तर नित्य प्रवाहचि, विविध त्या व्यवहारांचा |

त्यास अंत ना, सुरुची राहील, मोडणे नि घडणे यांचा || ४७१.

मी तर आहे केवळ साक्षी, पाही नाटक कैसे हे ?|

सुख न दु:खहि मला तयाचे, सहजी घडते हे आहे || ४७२.

या मायेचे स्वरूप अगम्यचि, काय केधवा ते होई |

कुणा कळेना, परि खेळ हा, नित्यची तो चालत राही || ४७३

परब्रह्माने मज हा दिधला, देह कार्य ते करण्याला |

विहीत कार्ये, नेमियलेली जगता आकार देण्याला || ४७४.

चार दिनांचा मी रहिवाशी, इथले माझे नच कांही |

जीवन होण्या सुलभ म्हणूनिया, दिधली कांही नातीही || ४७५.

मज ठाऊक हे अनित्य सारे, संपर्की जे ही येते |

त्यांचेशी संबंध संपता, ते सारे विरुनी जाते || ४७६.

म्हणुनि ममत्व आणि बंधन कदापि न होऊ देणे |

परब्रह्माशी नित्य मी निगडीत, कुठे न अडकुनी ते जाणे || ४७७.

*श्लोक-यथा स्वप्ने द्वयाभासं चित्तं चलति मायया । तथा जाग्रद्द्वयाभासं चित्तं चलति मायया ॥ ६१ ॥*

द्वैताचा भ्रम चित्त निर्मिते, स्वप्नी प्रेरित मायेने |

तसेचि जागृतीमाजी माया, द्वैता दाखवी भासाने || ४७८.

*श्लोक-अद्वयं च द्वयाभासं चित्तं स्वप्ने न संशयः ।*

*अद्वयं च द्वयाभासं तथा जाग्रन्न संशयः ॥ ६२ ॥*

स्वप्नामाजी भ्रमित मनाने, आभास होई द्वैताचा |

व्यवहारास्तव माया खेळे, नि:संशय तो अज्ञानाचा || ४७९.

## कारिका ६१ व ६२ भाष्य

स्वप्नी चित्त ते जाई विभागुनी, द्रष्टा नि ते दृश्य असे |

माया विभाजन होई जागृतीत, देह जगत ते अलग दिसे ||४८०.

स्वप्नी दृश्ये सत्य वाटती, शोक मोहहि तैसाची |

पडता वाटे दुखते मजला, जाणीव हा ऐशी हा भ्रमची || ४८१.

जागृती जणु हि प्रदीर्घ निद्रा, अज्ञानेचि ती येई |

सत्यासम ती दिसती दृश्ये, जोवरी बोध न तो होई || ४८२.

*श्लोक-स्वप्नदृक्प्रचरन्स्वप्ने दिक्ष वै दशसु स्थितान् ।*
*अण्डजान्स्वेदजान्वापि जीवान्पश्यति यान्सदा ॥ ६३ ॥*

**स्वप्नी फिरतांना द्रष्टा तो, पाही सकलहि दाही दिशा |**

**अंडज, स्वेदज आदी पाही, द्रष्टा तेथे जीव दशा || ४८३.**

*श्लोक-स्वप्नदृक चित्तदृश्यास्ते न विद्यन्ते ततः पृथक् ।*

*तथा तद्दृश्यमेवेदं स्वप्नदृक्चित्तमिष्यते ॥ ६४ ॥*

**द्रष्टा स्वप्नी, स्वयेचि बनतो, विविध पदार्था त्या दृश्यी |**

**तैसे चित्तहि ते दृष्ट्याचे, तादात्म्यहि त्या वस्तूंशी || ४८४.**

*श्लोक-चरञ्जागरिते जाग्रद्दिक्षु वै दशसु स्थितान् ।*
*अण्डजान्स्वेदजान्वापि जीवान्पश्यति यान्सदा ॥६५॥*

**जागृत द्रष्टा नित्य फिरतसे, पाहत विविध सृजन क्रिया |**
**परि ते असते केवळ कल्पित, जैसे ती खेळे माया || ४८५.**

*श्लोक-जाग्रच्चित्तेक्षणीयास्ते न विद्यन्ते ततः पृथक ।*

*तथा तद्दृश्यमेवेदं जाग्रतश्चित्तमिष्यते* ॥६६॥

**चारी वर्गीचे बघतो जीवही, सृष्टीमाजी विविधता |**

**चित्तचि खेळे विविध रूपाने, तेचि द्रष्टा ते असता || ४८६.**

श्लोक- उभे ह्यन्योन्यदृश्ये ते किं तदस्तीति चोच्यते ।
लक्षणाशून्यमुभयं तन्मतेनैव गृह्यते ॥ ६७ ॥

जीव नि चित्तहि परस्परावर, अवलंबून ते राहतसे |
यातील सत्य न होई न निश्चित, उभया ज्ञानहि होई जसे || ४८७.

मन नि देह ना एक गणावा, मन जगताशी समरसले |
देह होतसे येथे द्रष्टा, मन सांगे तैसे दिसले || ४८८.

जग नि मन हे नित्य संगती, एक नसे तंव दुजेही नसे |
जगत खेळ हा मनेची निर्मित, ते मायेला वशचि असे || ४८९.

मन हेचि कारण बंधासि, आणि मुक्ती ही तेणे |
दूर सारिता मनास तरिचि, शांती लाभते बोधाने || ४९०.

मन निद्राधीन जेंव्हा पुरते, तेंव्हांचि जग हे विरते |
स्वप्नी त्याचे राज्य सुरु ते, तेची दृश्ये दाखविते || ४९१.

वस्तू वा व्यक्ती ते यांचे, जैसे आकलन ते होई |
तैसिची ती ओळख ऐसे, ज्ञान तये ध्यानी येई || ४९२.

दुरुनी पाहता दिसे वेगळे, परंतु जवळी अलग असे |
त्या त्या वेळी जशी अवस्था, तैसेची ते भासतसे || ४९३.

श्लोक-*यथा स्वप्नमयो जीवो जायते प्रियतेऽपि वा ।*

*तथा जीवा अमी सर्वे भवन्ति न भवन्ति च* ॥६८॥

स्वप्नीचा जीव स्वप्नीचि जन्मे, आणि विरे तो स्वप्नीची |

उपजे जे-जे , ते-ते नाशे, हीच रीत या जगताची || ४९४.

श्लोक-*यथा मायामयो जीवो जायते प्रियतेऽपि च ।*

*तथा जीवा अमी सर्वे भवन्ति न भवन्ति च* ॥ ६९ ॥

जीव जन्मणे आणि मरणे, घडते हे तर मायेने |

आत्मा परि तो नित्य अजन्मा, त्याशी ना येणे-जाणे || ४९५.

श्लोक- *यथा निर्मितको जीवो जायते प्रियतेऽपि वा ।*

*तथा जीवा अमी सर्वे भवन्ति न भवन्ति च* ॥ ७० ॥

जीव अनुभवी जन्म-मृत्यूचा, खेळ होतसे या जगती |

परि जीवचि असत्य म्हणुनि, जन्म-मृत्यू ही तर भ्रांती || ४९६.

## कारिका ६८ ते ७० चा आशय

माया उसने घेत असे त्या, जगताच्या अस्तित्वाला |

होई मायेने दृगोचर, ना अस्तित्वचि ते त्याला || ४९७.

क्षणात असते, क्षणात विरते, आणि बदलते क्षणोक्षणी |

ही सारी मायाची रचना, चालवी आपुल्या नियमांनी || ४९८.

म्हणुनी जगता ना उपेक्षिणे, त्याशी जेंव्हा व्यवहारी |

विवेकेचि कृती नित्य करावी, द्वैता जेंव्हा अनुसरी || ४९९.

*श्लोक-न कश्चिज्जायते जीवः संभवोऽस्य न विद्यते ।*

*एतत्तदुत्तमं सत्यं यत्र किंचिन्न जायते ॥७१ ॥*

दृष्टी ज्ञानमयी तंव उमगे, जन्म जीवाचा नच होतो |

तो तर केवळ आश्रय दाता, देही चेतना पुरवितो || ५००.

तो ना कारण उत्पत्तीचे, ना जन्मे ना जन्मवितो |

साधन केवळ कार्यास्तवचि, येतो आणि तो जातो || ५०१.

या जगती ना कांही जन्मते, परावर्तने नवे दिसे |

नित्य अशा या बदलानेचि, नित्यचि नूतन जग भासे || ५०२.

सत्य असे हे व्यावहारिकचि, बदल होतसे क्षणोक्षणी |

गौडपाद ते म्हणुनि म्हणती, मिथ्या परि दिसते नयनी || ५०३.

तुर्या हेचि सत्य त्याविना, अन्यहि कांही जे दिसते |

ते तर सारे मायेनेची, वास्तविक कांही नसते || ५०४.

जगात दिसते, सत्य असे ते, व्यक्तीनिष्ठचि मायेने |

अनुभवजन्मचि सत्य दिसे ते, स्वप्न निर्मिले चित्ताने || ५०५.

**श्लोक-*चित्तस्पन्दितमेवेदं ग्राह्यग्राहकवद्वयम् ।***

***चित्तं निर्विषयं नित्यमसङ्गं तेन कीर्तितम् ॥ ७२ ॥***

**ग्राह्य नि ग्राहक यांची प्रचीति, उभयहि स्पंदन चित्ताचे |**

**पुरुष सदा ती असंग याशी, खेळचि सारे मायेचे || ५०६.**

**घट हे ग्राह्य नि द्रष्टा ग्राहक, जगत ग्राह्य ते मायेने |**

**मिथ्या तरी ना करी उपेक्षा, सहभागी व्यवहाराने || ५०७.**

**विचारातल्या गतीमुळे ते, अद्वैतातचि द्वैत दिसे |**

**अलात फिरता, वन्ही रेषा, जैशा नाचत दिसत असे || ५०८.**

**विचार येती आणि जाती, स्पंदन होई चित्ताचे |**

**अद्वैती ते द्वैत उद्भवे, खेळ सर्वचि मायेचे || ५०९.**

**शुद्ध ब्रह्म परि असंग याशी, खेळाशी संबंध नसे |**

**जन्म नि लय हा विषय न त्याचा, मायाचि ते रचित असे ||५१०.**

श्लोक- *योऽस्ति कल्पितसंवृत्या परमार्थेन नास्त्यसौ ।*
*परतन्त्राभिसंवृत्या स्यान्नास्ति परमार्थतः* ॥ ७३ ॥

व्यक्तिनिष्ठ अस्तित्व दिसे हे, जया कल्पना साकारी |
जैशी दृष्टी ती द्रष्ट्याची, तैसे ते प्रत्ययकारी || ५११.

मायाजातिवाद असे हा, जया जन्म ना तेही दिसे |
जैसे दिसते तसे स्वीकारी, व्यवहारहि ते करी तसे || ५१२.

कल्पनेचिये आवरणाने, असते अस्तित्वहि ज्याशी |
नसेचि सद्वस्तू ती कदापि, दिसे कल्पिले जे तिजशी || ५१३.

आपुले अंगी गरगर फिरता, स्तब्ध होत मग ते तेंव्हां |
वाटे भंवती फिरे भराभर, वृथाची आभासचि फसवा || ५१४.

तशा आपुल्या नित्य कल्पना, भूतांचा आभास करी |
सारुनिया परि त्याचि कल्पना, ज्ञान दृष्टी येताची खरी || ५१५.

अद्वैतावरी द्वैत खेळते, कल्पनेची दुनिया सारी |
सकलामाजी एकचि ईश्वर, आणि भुतेहि त्यांत परी || ५१६.

त्यासाठी अज्ञान मिटावे, व्हावे ज्ञान नि आत्म्याचे |
नको आसक्ती, पूर्ण विरक्ती, दर्शन घडते ब्रह्माचे || ५१७.

श्लोक- *अजः कल्पितसंवृत्या परमार्थेन नाप्यजः ।*
*परतन्त्राभिनिष्पत्त्या संवृत्या जायते तु सः ॥ ७४ ॥*

**व्यवहारचि साऱ्या जगताचे, माये आधारे चाले |**

**सर्वव्यापी तो एकचि आत्मा, आश्रयेचि जगपण आले || ५१८.**

**नाम-रूपाने भुते वेगळी, कार्य-क्षमता अलग असे |**

**परि हे सारेचि वरवरले, अंतरी एकचि ब्रह्म वसे || ५१९.**

**तीच एकली कार्य-शक्ती ती, चलन-वलन तिजमुळे असे |**

**देह असे ते साधन केवळ, व्यवहारे जग ते भासे || ५२०.**

श्लोक- *अभूताभिनिवेशोऽस्ति द्वयं तत्र न विद्यते ।*

*द्वयाभावं स बुद्ध्वैव निर्निमित्तो न जायते* ॥ ७५ ॥

अज हि कल्पना सापेक्षचि कि, जग व्यापारा अनुषंगे |

आत्म्याचा ना जन्म जाहला, प्रचलित शब्दे ते उमगे || ५२१.

मिथ्या या जगताला म्हणता, श्रुती तया ना नाकारी |

नाम रूपे ती विविधतेस्तव, उपयोगी ती व्यवहारी || ५२२.

जगताशी व्यवहार कराया, नसे श्रुतींचि आडकाठी |

प्रचलित नियमे सारे करणे, परि आठवे जगजेठी || ५२३.

वास्तव सत्यचि माझे मी-पण, कदा न त्याशी विसरावे |

द्वैती वर्तन करिताही ते, व्यवहारी ना गुंतावे || ५२४.

ध्यानी येण्या परब्रह्म ते, बाह्य जगाला सारावे |

गीता सांगे व्हा अंतर्मुख, केवळ आत्म्याला ध्यावे || ५२५.

श्लोक- *यदा न लभते हेतूनुत्तमाधममध्यमान् ।*

*तदा न जायते चित्तं हेत्वभावे फलं कुतः* ॥ ७६ ॥

कर्म चि कारण या संसारा, जसे कर्म तो जन्म तसा |

उत्तम, मध्यम अधम कि अथवा, कर्मांचा जन्मीहि ठसा || ५२६.

या जगती ती तशीच ओळख, भोगे पूर्व-कर्म उमगे |
पूर्वी पेरिले आता उगवले, गीताही हेचि सांगे || ५२७.

श्लोक- *अनिमित्तस्य चित्तस्य यानुत्पत्तिः समाद्वया ।*
*अजातस्यैव सर्वस्य चित्तदृश्य हि तद्यतः* ॥ ७७ ॥

चित्त स्थिर ते अजात असता, नित्य असे ते अद्वैती |
सारे द्वैत नसे अस्तित्वी, अनुभूत केवळ ती शांती || ५२८.

विचार गती जंव येई चित्ता, द्वैत उमटते या जगती |
स्थिर मशाल ती न वन्ही रेषा, बिंब आपुल्या निज-स्थिती||५२९.

श्लोक-*बुद्ध्वा निमित्ततां सत्यां हेतुं पृथगनाप्नुवन् ।*
*वीतशोकं तथा काममभयं पदमश्नुते* ॥ ७८ ॥

अभावी असता कारण तेंव्हा, नसे प्रयोजन कर्मांचे |
तेथे केवळ ती निश्चलता, आणि सौख्य स्वानंदाचे || ५३०.

मम अस्तित्व न कदा जन्मले, तैसा मृत्यू मुळी नसे |
जन्म-मरण हे फेरे सरले, देह त्यागिला तरि मी असे || ५३१.

देह असे हे केवळ साधन, होता जीर्णचि मृत्यू असे |
शोक-मोह हे भयचि सरले, नित्य मुक्त ब्रह्मात वसे || ५३२.

देश-काल नि कर्म याचिया, पूर्ण पैल मी नित्य असे |
पूर्ण शांतीची नित्य अवस्था, सौख्याला ती सीमा नसे || ५३३.

श्लोक- *अभूताभिनिवेशाद्धि सदृशे तत्प्रवर्तते |*
*वस्त्वभावं स बुद्ध्वैव निसःङ्गं विनिवर्तते* ॥ ७९ ॥

मिथ्या वस्तूंची आसक्ती, मन धावे ते त्याजकडे |
परि उमगे हे असत्य सारे, माघारी येणेचि पडे || ५३४.

द्वैती अज्ञाने ते वाटे, व्यक्तिनिष्ठ वस्तूही खरी |
धन, रुप कीर्ति, कामिनी कांचन यावे वाटे मजचि करी || ५३५.

जे येते ते पुनश्च जाते, भोगहि क्षणीक ते असती |
वृथाची तो हव्यास तयाचा, अंती दुःखाची प्राप्ती || ५३६.

सारे ते तर अपूर्ण असते, समाधान ते ना पुरते |
पुन्हापुन्हा त्या मागे जाणे, परि नच तृप्ती ती होते || ५३७.

ज्ञाता जाणे विषय सकलहि, सारेची मिथ्या असती |
पूर्णता नि नित्यता, नसे त्या, अंतरी सौख्य नि ती शांती || ५३८.

कस्तुरी मृग तो धावे मिळण्या, सुगंध मोहक कस्तुरीचा |

अज्ञाने त्याशी न कल्पना, तोचि असे स्वामी त्याचा || ५३९.

कृष्ण सांगती गीतेमाजी, सकल कामना त्याग करी |

अंतरी ऐश्वर्याचा साठा, फुका शोधिशी बाहेरी || ५४०.

पूर्ण असे तू, विहित कर्म ते, नित्यचि उत्तम तूं आचरी |

निष्कामे निष्ठेने करिता, समाधान ते येत करी || ५४१.

## कारिका ७५ ते ७९ आशय

मिथ्या हे जग अस्तित्वचि ना, आणि जन्म हि तया नसे |

व्यक्तिनिष्ठ अस्तित्व असे त्या, मायेच्या योगे भासे || ५४२.

हे अस्तित्व हि असेच उसने, आश्रय याला ब्रह्माचा |

व्यवहारास्तव द्वैती रचना, खेळ असे हा मायेचा || ५४३.

मी येथे तर केवळ साक्षी, व्यवहारा संबंध नसे |

अज्ञाने चालेचि जगत हे, सत्य न मुळी ते कदा असे || ५४४.

मीचि सर्वा व्यापियले ते, मी जगताचा भाग नसे |

देहाचा संबंधचि केवळ कार्यापुरता येथं असे || ५४५.

सुरवातीला महती सांगती, उपासना नि कर्मांची |

जैशी कर्मे जन्म हि तैसे, हिची शिकवण गीतेची || ५४६.

परंतु उन्नत यातुनी होता, नसेचि बंधन कर्मांचे |
ब्रह्मज्ञाना पहाट होता, दार खुले अद्वैताचे || ५४७.

द्वैती अद्वैतास पाहणे, दृष्टी येत ती ज्ञानाची |
मीचि अधिष्ठान या जगता, ओळख ती निज-रुपाची || ५४८.

विवेक वैराग्येचि उन्नती, जाणीव नित्यचि मुक्तीची |
आणि अंती उच्च अवस्था, समरसता ती उर्जेची || ५४९.

जेंव्हा वाटे हतबलता ती, श्रद्धा भावे श्री हरीला |
पूर्णतया ते शरणचि जावे, उचित सहाय्या करण्याला || ५५०.

श्लोक- निवृत्तस्याप्रवृत्तस्य निश्चला हि तदा स्थितिः ।

विषयः स हि बुद्धानां तत्साम्यमजमद्वयम् ॥ ८० ॥

भोगातुनी निवृत्तचि पुरता, चित्त तयाचे स्थिरचि असे |
निश्चल आणि विकारशून्यहि जणु मूर्त शांतीचि वसे || ५५१.

ब्रह्मस्थिती हि नि:सीम जेही निष्कामेचि अनुभवती |
याचि देही ते मुक्त जाहले, होता ब्रह्माची प्राप्ती || ५५२.

ज्ञात्याला हे पुरते कळते, खरी शांती ना बाहेरी |
हृदय मंदिरी स्वये हरी तो, अंतरी शांती खरोखरी || ५५३.

तो परिवाराची करि कर्तव्ये, नित्य समाधानीच मनी |
जेहि आले त्या वाट्याला, दावी उत्तम ते करुनी || ५५४.

ना कार्याचा करि कंटाळा, सारे करी तो शांत मने |
त्या ना चिंता, ताण-तणावहि, सारे करि तो जोमाने || ५५५.

गीता सांगे, प्रवाह जेंव्हा, प्रवेश सागरी तो करितो |
तो तुडुंब नि पूर्ण शांत चि, तैशी शांती अनुभवितो || ५५६.

पूर्णकाम नि नित्य शांत तो, ना शोधी पुर्णत्वाशी |
अंतरी त्याच्या असीम खजिना, थांबवी बाहेर शोधाशी || ५५७.

जरि व्यवहारा सकल करी तो, गुंते कशातही नाही |
करि सारी कर्मे निष्कामे, ईश्वर चरणी ती वाही || ५५८.

ज्ञान जयाला यथार्थ झाले, नित्यतृप्त चिंता नाही |
चिंता ही आसुरी संपदा, टाकी तिला ती लवलाही || ५५९.

सदैव जाणे तुर्याचि तो, अनादिचि ना जन्म तया |
मुक्त असे तो भव-चक्रातुनी, शिवे न त्याशी ती माया || ५६०.

जरि कर्मे तो करितो सारी, फल-आशा ती त्यासी नसे |
पूर्णब्रह्म तो स्वये जाहला, निरिच्छ तो अंतरी असे || ५६१.

*श्लोक-अजमनिद्रमस्वप्न प्रभातं भवति स्वयम् ।*

*सकृद्विभातो ह्येवैष धर्मो धातुस्वभावतः ॥ ८१ ॥*

**आत्मा अज नि बहु तेजस्वी, स्वयेचि प्रेरक आपणाशी |**

**स्वयंप्रकाशी, आणि स्वयंभू, निद्रा स्वप्नहि ना त्याशी || ५६२.**

**आत्मवस्तूला विकार नसती, आणि नसे स्थित्यंतर हि |**

**स्वतंत्र आणि नित्य असुनिया, आपणातची स्थित राही || ५६३.**

**आत्माचि आश्रय सकलाशी, आश्रय त्याशी नच लागे |**

**कूटस्थ तो परि, नित्य तृप्तचि, लिप्त कदापि ना भोगे || ५६४.**

**त्याच्या अंशे, प्रकाशयोगे, सूर्यादि तळपती गगनी |**

**स्व-संवेद्यचि अनुभूती त्याची, सोहंद्वारे दे स्मरणी || ५६५.**

**आत्मज्ञानी नित्य शांतचि, स्वयेचि रमला स्वानंदी |**

**उठो वादळे या संसारी, अनुकुली, प्रतिकुली आनंदी || ५६६.**

**मीचि जाणीव देई मनाला, तसेची इंद्रिया सकला |**

**देही जे चैतन्य असे ते, मम अस्तित्वे, कार्याला || ५६७.**

**व्यक्तीनिष्ठ संसार अनुभवी, परि स्पर्श ना मायेचा |**

**अद्वैती मी नित्य निवासी, साक्षी केवळ कर्मांचा || ५६८.**

कदा न बंधन मजला कसले, नित्य मुक्त मी असे सदा |

भौतिक सारे बंधहि विरले, चिंता शोक नसेच कदा || ५६९.

*श्लोक- सुखमाव्रियते नित्यं दुःखं विव्रियते सदा ।*

*यस्य कस्य च धर्मस्य ग्रहेण भगवानसौ ॥ ८२ ॥*

सर्वश्रेष्ठ तो आत्मा असता, अन्य वस्तूची अभिलाषा |

धरिता, आत्म्यावरी आच्छादन, ये काळोखी जशी निशा||५७०.

हे आच्छादन अज्ञानचि कि, प्राप्त ज्ञान जणु अस्तवले |

विवेक सरला, माया व्यापे, नको तेचि वाट्या आले || ५७१.

ऐसे होता हरी दुरावे, त्याचे प्रगटन कठीण अती |

असुरी वृत्ती उफळे वेगे, त्वरितची आणि अधोगती || ५७२.

ज्ञान लाभते बहु कष्टाने, श्रवणाने सत्संगाने |

त्यास प्रयासे जतन करावे, नित्यचि ते निदिध्यासाने || ५७३.

ज्ञान नसे केवळ प्राप्तीस्तव, आचरण त्याचे नित व्हावे |

अभ्यासाने चित्ती बिंबवुनी, जीवनात ते आणावे || ५७४.

म्हणुनि लागे सावधानता, क्षणोक्षणी साक्षीभावे |

कृति प्रत्येकचि शुद्ध असावी, सारे करि ईश्वर भावे || ५७५.

निजस्वरुपाचे भान नित्य ते, महानतेला आचरावें |

क्षण मोहाचा एकहि पुरता, फुकाचि अवनत कां व्हावे ?||५७६.

आसक्ती हे कारण मोठे, आमंत्रण दे अवनतीला |

द्वेष मोह नि असूया क्रोधे, स्वये बोलवी हानीला || ५७७.

मांगल्याची नित्यचि वर्षा, क्षण-क्षण तेणे तो उजळे |

तुर्या मीचि नच विस्मरणी, मोह तयाने दूर पळे || ५७८.

गीता हेचि सदैव सांगे, महानता आपुली जपणे |

ब्राह्मीस्थिती ती सदैव राखुनि, दिव्यत्वाला अनुसरणे || ५७९.

अंतरीचा भगवंत नित्यचि, जीवन क्रम पाही आपुला |

कदा न अनुचित अल्पहि वर्तन, प्रसन्न ठेवी नित हरीला ||५८०.

श्लोक-*अस्ति नास्त्यस्ति नास्तीति नास्ति नास्तीति वा पुनः ।*
*चलस्थिरोभयाभावैरावृणोत्येव बालिशः ॥८३॥*

अनेक पंडित आणि वेत्ते, करिती चर्चा आत्म्याची |
झांकी अविद्या आत्मतत्व ते, कांस धरावी ती श्रुतीची || ५८१.

विविध संप्रदाय नि धर्म हि, विपरित ज्ञानाशी देती |
ज्ञानामाजी संशय आणुनी, गोंधळात टाकिती मती || ५८२.

तुर्या जाणुनी नि अनुभवुनी, व्यवहाराला ना सोडी |
संसाराच्या व्यापाराला, सत्संगाने ते जोडी || ५८३.

काळाचे ना परि उल्लंघन, प्रचलित नियमा अनुसरणे |
द्वैती राहुनी सुयोग्य कृतीने, तुर्या कदा न विस्मरणे || ५८४.

व्यवहाराला करिता जगती, संग होतसे बहुतांचा |
विवेक नित्यचि ठेवी जागृत, मार्ग अनुसरी श्रुतीचा || ५८५.

निदिध्यासाने सुपंथ उमगे, अहंकार ना ज्ञानाचा |
अहंभाव ने हळूच ज्ञात्या, उद्भव तोचि विनाशाचा || ५८६.

*श्लोक-कोट्यश्चतस्त्र एतास्तु ग्रहार्यासां सदावृतः ।*
*भगवानाभिरस्पृष्टो येन दृष्टः स सर्वदृक् ॥ ८४ ॥*

**अस्ति, नास्ति, अस्ति-नास्ति नि नास्ती-नास्ति ही चार मते |**

**शास्त्रांनी ही प्रतिपादिली, गोंधळातचि मन पडते || ५८७.**

**आत्मा आहे, आत्मा नाही, मुळात आत्मा तो नाही |**

**नाही-नाही शक्यचि नाही, आत्माचि नाही कांही || ५८८.**

**मते अशी हि गोंधळ करिता, आत्म्या आच्छादित करिती |**

**परि चारीवर ना मत दर्शन, केले कांही वेदांती || ५८९.**

**शब्दातीत जो, त्यावरी चर्चा, होईल कैसी शब्दांनी ?|**

**स्वयंसिद्ध तो नित्यचि आत्मा, मल येई तो आवरणी || ५९०.**

**आत्म्यावरला अज्ञानाचा, मळ जातासे ज्ञानाने |**

**मीचि तुर्या निश्चय होता, संशय मिटती श्रद्धेने || ५९१.**

*श्लोक-प्राप्य सर्वज्ञतां कृत्स्नां ब्राह्मण्यं पदमद्वयम् ।*
*अनापन्नादिमध्यान्तं किमतः परमीहते ॥ ८५ ॥*

**मी तुर्या ही अनुभूती येता, सहजी सर्वज्ञता येई |**
**अद्वैती अस्तित्व स्थिरावे, संशय ना तेथे राही || ५९२.**

**आदि-मध्य वा अंत नसे तो, अनंत हे अस्तित्व असे |**
**पूर्णकाम मी परब्रह्मचि, अधिक मागण्या कांहीं नसे || ५९३.**

**बोध लाभता, सरती साधने, तुष्टी लाभे आत्म्याला |**
**आता देहाच्या अस्तित्वे, केवळ करणे कार्याला || ५९४.**

**पूर्ण तृप्ती ती सहजी लाभली, अनंत अनुभूतीहि येता |**
**जेही करणे परहितास्तव, देह असे कार्यापुरता || ५९५.**

**गीतेत हेचि कृष्णे वदले, सारे सारे मी असता |**
**नाही मजला मिळवायाचे, कर्मे सारी परहिता || ५९६.**

श्लोक- *विप्राणां विनयो ह्येष शमः प्राकृत उच्यते ।*
*दमःप्रकृतिदान्तत्वादेवं विद्वाञ्शमं व्रजेत् ॥ ८६ ॥*

ब्रह्म जाणता ब्राह्मण होई, विनय वृत्ती सहजी होई |
दमन इंद्रियांचे ते सहजी, जीवनी समदृष्टी येई || ५९७.

जगती असणे सान म्हणोनि, थोरपणा पुरता सोडी |
तरीच जवळीक भगवंताची, ज्ञात्या वैरी ती प्रौढी || ५९८.

नसे खंड परि श्रवण नि मनना, नित्यचि निदिध्यासान होई |
उन्नतीला नसती त्या सीमा, क्षितिजहि उंचावत जाई || ५९९.

गीतेतील त्या दैवी संपदा, सांभाळाव्या ज्ञात्याने |
एक क्षण जरि मोहाचा तो, हानी अपार ती त्याने || ६००.

म्हणुनि निदिध्यासानावरी, गौडपाद ते भर देती |
तरीच अद्वैता न सोडुनि, साधती व्यवहारहि द्वैती || ६०१.

सद्भाव नि साधुभावहि, उभया निष्ठेने जपणे |
साक्षीभाव तो नित्य असावा, तोल सहजी जमे तेणे || ६०२.

करणे व्यवहाराशी पुरते, 'मिथ्या' परि ना विसरावे |
माया असते फार प्रभावी, म्हणुनि सावधान व्हावे || ६०३.

अद्वैती ते नित्य राहणे, विवेक आणि वैराग्ये |
कशात ना गुंतणे नियम हा, सहजी साधे त्या योगे || ६०४

नित्यचि  शांती अनुभवी जगती, स्थितप्रज्ञ लाभली स्थिती |
ब्राह्मीस्थिती हि सर्वश्रेष्ठचि, तेणे ब्रह्म-अनुभूती || ६०५.

मी तुर्या हे जरि अनुभवे, जग-कार्या ना सोडावे |
ईश्वर निर्मित जगताला या, पुरते साह्यभूत व्हावे || ६०६.

भगवंतहि ना सोडी कार्या, जरि त्याशी कामना नसे |
अद्वैतासह द्वैत साधणे, सिद्धाचे हे कार्य असे || ६०७.

विचार येतील, आणि जातील, प्रसंग येतील भले-बुरे |
श्रद्धा आणि निष्ठेनेचि, निष्कामे त्याशी आचरे || ६०८.

शांती, उत्साही असणे नि श्रद्धा, अढळचि नित्य हवी |
ज्ञात्याला सांगती महर्षी, जीवन्मुक्ता हे आठवी || ६०९.

मन नित्य ते उन्नत व्हावे, श्रवण मनन निदिध्यासाने |
प्रगतीला या अंत असेना, नित्यचि पुढती ते जाणे || ६१०.

ज्ञान योग हा कधी ना संपे, प्रगती तैशी चित्ताची |
द्वैत भोवती, कदा न विसरे, नित्यचि आठवण तुर्येची || ६११.

*श्लोक-सवस्तु सोपलम्भं च द्वयं लौकिकमिष्यते । अवस्तु सोपलम्भं च शुद्धं लौकिकमिष्यते ॥ ८७ ॥*

वस्तू लाभती अनुभवजन्यचि, लौकिक जागृती ती असते |
आणि अनुभवे कल्पित दृश्ये, ती स्वप्नीची स्वप्नी विरते||६१२.

तीन पाद ते जागृत, स्वप्न नि, सुषुप्ति ऐसे मायेचे |
अवस्था त्रयी विवेक योगे, तोल सांवरी नित त्यांचे || ६१३.

तुर्येचा आधार तयांना, बदल नित्य तो त्यांत असे |
तुर्या परि ती सुस्थिर नित्यचि, तेची अधिष्ठान भक्कमसे || ६१४.

परमसत्य ते मीचि असे हे, नित्यचि ध्यानी ठेवावे |
गौडपाद देती ती तयांना, लौकिकास भिन्नची नावे || ६१५.

जागृत 'द्वय लौकिक' तो जाणा, 'शुद्धचि लौकिक' स्वप्नाला |
आणि सुषुप्तिस 'लोकोत्तर' ते, संबोधिती ऐसे तिजला || ६१६.

अनुभव आणि पदार्थ दर्शवी, जोडी जागृतीची ती स्थिती |
अवस्थेत या अनुभव असती, पदार्थ बाहेरी असती || ६१७.

स्वप्नी जरि तो अनुभव असतो, परि पदार्थ ना बाहेरी |
पदार्थ संगे असे जागृती, स्वप्नी पदार्थ नसती परी || ६१८.

*श्लोक-अवस्त्वनुपलम्भं च लोकोत्तरमिति स्मृतम् ।*

*ज्ञान ज्ञेयं च विज्ञेयं सदा बुद्धैः प्रकीर्तितम् ॥ ८८ ॥*

**अशी अवस्था जिच्यात नसती, अनुभव आणि पदार्थही |**

**सुषुप्ति तया नाम असे ते, जेथे उभयहि ते नाही || ६१९.**

**ज्ञात्याशी ती जाण असे कि, ज्ञान ज्ञेय नि विज्ञेयाची |**

**ज्ञानचि अनुभव, पदार्थ ज्ञेयहि, नित्य रूपे बदलती त्यांची || ६२०**

**उभयचि व्यक्तीनिष्ठ सत्यचि, अधिष्ठान त्या आत्म्याचे |**

**नित्य स्थिरचि तो, बदल तया ना, नाम तया विज्ञेयाचे || ६२१.**

**ज्ञान नि ज्ञेयहि दोन्ही मिथ्या, सत्य नित्य आत्मा असतो |**

**आत्मा मायेच्या योगे तो, प्रपंच धरी नि अनुभवतो || ६२२.**

**गीता सांगे, असत्यास ते, दिसे परी अस्तित्व नसे |**

**सत्याचा कधी अभाव नसतो, ज्ञाता उभया जाणतसे || ६२३.**

**सत्याला जे सत्यचि जाणे आणि मिथ्या मिथ्याला |**

**त्याशीचि चातुर्य म्हणावे, नित्य असे ते ज्ञात्याला || ६२४,**

*श्लोक-ज्ञाने च त्रिविधे ज्ञेये क्रमेण विदिते स्वयम् ।*

*सर्वज्ञता हि सर्वत्र भवतीह महाधियः ॥ ८९ ॥*

**ज्ञान असे ते तीन प्रकारे, तैसेची ते ज्ञेय असे |**

**महान बुद्धिवंत असे तो, सर्वज्ञता त्याशीचि  वसे || ६२५.**

**जागृती स्वप्नी अनुभव तैसा, पदार्थ आंत कि बाहेरी |**

**सुषुप्तिमाजी अनुभव केवळ, परि अज्ञाने, सौख्य तरी || ६२६.**

**तीन प्रकारे ज्ञान नि ज्ञेयहि, जाणुनि ज्ञाते  सोडावे |**

**जाणे विज्ञेयचि तो आत्मा त्याशीचि समरस व्हावे || ६२७.**

**यथार्थ अनुभवी जो तुर्येला, उणीव नि इच्छा मुळी नसे |**

**सकलांच्या तो नित्यचि जवळी, सर्वव्यापी सकलात असे||६२८.**

*श्लोक- हेयज्ञेयाप्यवाक्यानि विज्ञेयान्यग्रयाणतः ।*

*तेषामन्यत्र विज्ञेयादुपलम्भस्त्रिषु स्मृतः ॥ ९० ॥*

टाकुनि देण्यायोग्य असे त्या, हेय म्हणोनि जाणावे |

जाणण्यास जे योग्य असे त्या, ज्ञेय असे संबोधावे || ६२९.

बृहदारण्यक करिते व्याख्या, विज्ञेय ते असती चार |

समजुनी त्याचे मनन करावे, कृतीने करणे आचार || ६३०.

श्रवणी ते अवधानचि उत्तम, कुशाग्र चातुर्येचि मती |

दुसरे ते श्रेयस्कर बाल्यचि, नसे दंभ नि आसक्ती || ६३१.

मन निर्मळ नि नसे द्वेषहि, नित्य वर्तमानीचि असे |

अहंकार लवलेश नसे तो, बदल्याची भावना नसे || ६३२.

तिसरे म्हणजे मुनी ते व्हावे, मौने सहजी ती शांती |

निदिध्यासाने पावन आचरण, आत्मतत्व सहजी प्राप्ती || ६३३.

चवथे ते तर बहुमोलीचि, सुयोग्य ज्ञाना पचवावे |

पुरते अंतरी ठामचि व्हावे, व्यवहारी ते आणावे || ६३४.

हेय समजते जाणुनि त्याशी, ज्ञान नि अनुभव त्यास हवा |

याशी म्हणती ज्ञान पचविणे, जाणा यथार्थ या भावा || ६३५.

ब्रह्मनिष्ठ त्याशीच म्हणावे, काम क्रोध सहजी शमले |

आसक्ती नि द्वेष जीवनी, पुरते हद्दपार झाले || ६३६.

स्तुती आवडे, गौरवी हर्षे, निंदा श्रवणे क्षुब्ध मनी |

समजावे न अजुनि पचले, जे पडले त्याचे श्रवणी || ६३७.

जेही जैसे, आले वाट्याला, ईश-प्रसाद तो समजावा |

आवड-निवड नाही कार्यी, ब्रह्मनिष्ठ तो जाणावा || ६३८.

मंद नि मध्यम अधिकारी जे, अभ्यासी जे वेदांता |

त्यास्तव गौडपाद सांगती, ज्ञान राखि तोचि ज्ञाता || ६३९.

उत्तम अभ्यासी जे असती, ग्रहण नि पचनहि ज्ञानाचे |

श्रवण नि मनन हि बहु आवश्यक, कार्य साधते प्रगतीचे ||६४०.

नुसते ज्ञान नसे उपयोगी, दृढ आशय तो मनी व्हावा |

सहजी जीवनी ते झिरपावे, प्रत्यय कृतीत तो यावा || ६४१.

*श्लोक-प्रकृत्याकाशवज्ज्ञेयाः सर्वे धर्मा अनादयः ।*

*विद्यते न हि नानात्वं तेषां क्वचन किंचन ॥ ९१ ॥*

**आत्म्याचे जे ज्ञेय धर्म ते, अनादि आकाशासम असती |**

**समदृष्टीने जगती पहावे, हीन-थोर ते कुणी नसती || ६४२.**

**सर्वकाळ ते नित्य सारखे, अद्वय ब्रह्म स्वयेचि असे |**

**जगती असते जरि विविधता, विभाजन तेणे होत नसे || ६४३.**

**आकाशासम सर्व जीवही, अजात, शुद्धचि असती |**

**नामरुपा ज्या आश्रय दिधला, भिन्न जरि ते दिसती || ६४४.**

**तरी आत्मा तो एक नित्यची, वरकरणी भिन्नचि असता |**

**अनेक लहरी सागर एकचि, सकला एकचि जलमयाता || ६४५.**

**जीवाने न विसरावे आपुले, सर्वव्यापीपण ते केव्हां |**

**बदले देह नि येई जाई, देह गळे नि येई नवा || ६४६.**

**ज्ञानमयचि तो जीव मूलतः, कुतार्थ त्या शंका नसती |**

**अज्ञानाच्या मिलनत्वाने, फुकाच येई त्या भ्रांती || ६४७.**

**वाटे त्याला प्रपंच माझा, अडकुनी होई ना मुक्ती |**

**व्यवहारातचि पूर्ण अडकतो, आणि ढळे मनीची ती शांती||६४८.**

अनित्य नि:सीम ऐसा आत्मा, अनेक देहा  व्यापितसे |

देहकृतीला केवळ साक्षी, आत्मा नित्य अलिप्त असे || ६४९.

ब्रह्म अनुभूती मज होण्याला, कशा  साधना हवी मला ?|

नित्य प्राप्त ते मिळवायास्तव, गरज कशाची ती मजला ?|| ६५०.

अजन्माचि मी शाश्वत आत्मा, जन्म-मृत्यू ते मला नसे |

देहा आश्रय केवळ दिधला, तेणे कार्या करीतसे || ६५१.

द्वैत असे ते देहांचेची, जगी व्यवहारहि करण्याला |

परि चैतन्य न कदा विभजले, देहा आश्रय देण्याला || ६५२.

श्लोक- *आदिशान्ता ह्यनुत्पन्नाः प्रकृत्यैव सुनिर्वृताः ।*

*सर्वे धर्माः समाभिन्ना अजं साम्यं विशारदम् ॥ ९३ ॥*

आत्मतत्व वा ब्रह्म कधी ना, जन्म तयाचा तो झाला |

सर्वार्थे ते परिशुद्धचि, नित्य समाधानचि त्याला || ६५३.

जीव असे तो नित्य मुक्तचि, खंड तयाचे ना पडले |

नित्य मुळातचि शांत असे तो, स्थिती त्याची ती नच विचले||६५४.

निश्चलता हा तर स्वभाव त्याचा, सहजी शांती लाभतसे |

परि अज्ञाने विचलित होई, आणि शांती हरवतसे || ६५५.

*श्लोक-वैशारद्यं तु वै नास्ति भेदे विचरतां सदा ।*

*भेदनिम्नाः पृथग्वादास्तस्मात्ते कृपणाः स्मृताः ॥ ९४ ॥*

द्वैतामधुनी जे ना निघती, भेदभाव ते अनुसरती |

प्रपंचात ते पुरते रमले, त्याशी कृपणचि ते म्हणती || ६५६.

मी नि माझे ही आसक्ती, गुंतविती या संसारी |

परब्रह्माचा विचार करी ना, ते मायेच्या आहारी || ६५७.

आपणाशीचि भोक्ता मानिती, भोग्य आणि हा संसार |

भौतिक सारे सत्य मानिती, माझा म्हणती परिवार || ६५८.

शत्रू-मित्र नि आपला-परका, भेद मनी तो नित्य असे |

विशाल दृष्टी नसता कृपणचि, म्हणती त्याशी ते ऐसे || ६५९.

परमसत्य ज्यांनीही जाणिले, विशाल समदृष्टी त्यांची |

भेद दृष्टी जे प्रपंची ठेविती, कल्पना न त्या सत्याची || ६६०.

कृपणीचि जे राहिले अशुद्ध मानस ते त्यांचे |

नरदेही जरि जन्म घेतला, सार्थक नाही जन्माचे || ६६१.

प्रपंच हा तर नित्य बदलतो, विनाशकारी सारेची |

अशांत मन नि नसत्या चिंता, ओढ नसे त्या सत्याची || ६६२.

इथले कांही नच ते आपुले, सारे उसने या जगती |
भौतिक सारे मर्यादेतची, नियंत्रण न आपुले हाती || ६६३.

इथल्या कोणाची कदा न तृप्ती, अंत नसे तो हांवेला |
आणि हाती कांही न राही, जे येते ते जाण्याला || ६६४.

म्हणुनी तुर्येला जाणून घ्यावे, नियम पाळुनी जगताचे |
परि विरक्ती नित्य असावी, भान नित्य ते तुर्येचे || ६६५.

*श्लोक-अजे साम्ये तु ये केचिद्भविष्यन्ति सुनिश्चिताः । ते हि लोके महाज्ञानास्तच्च लोको न गाहते ॥९५॥*

ज्याशी उमगले, प्रपंच मिथ्या, ओढ तयांना सत्याची |
तुर्येमाजी समरस होती, नित्य स्थिती अद्वैताची || ६६६.

नश्वर देही अमर जाहले, भाग्यवंत ते नर असती |
सार्थक केले या जन्माचे, जन्म-मृत्यू फेऱ्या चुकती || ६६७.

परंतु ऐसे अति विरळचि, पैल करिती जे मायेला |
द्वैताच्या या संसारातचि, बांधुनी घेती चक्राला || ६६८.

प्रपंच आणि परमार्थहि तो, ज्ञाते निभाऊनि नेती |
असती देहाने या जगती, परि निवास तो अद्वैती || ६६९.

साऱ्या कर्तव्याशी करुनी, नित्य अलिप्तचि असती सदा |
जेंव्हा जगती सुटे न गुंता, प्रार्थिती सुटण्या ती आपदा || ६७०.

नच नाकारिती कर्मयोग नि, उपासनेला सिद्धहि ते |
सहाय्य जेंव्हा भगवंताचे, श्रद्धेने नतमस्तक होते || ६७१.

श्रीकृष्णाने वचन दिले ते, जेही प्रार्थिती श्रद्धेने |
सहाय्याशी मी धाऊनी जातो, मार्ग दावी तत्परतेने || ६७२.

परि सारे हे करितांनाहि, गुंतणे न मायेमाजी |

आणि स्वीकारी प्रसाद त्याचा, जयात ईश्वर तो राजी || ६७३.

श्लोक- *अजेष्वजमसंक्रान्तं धर्मेषु ज्ञानमिष्यते*

*यतो न क्रमते ज्ञानमसंगं तेन कीर्तितम्* ॥ ९६ ॥

**अद्वैताशी समरस होता, सगुण नि निर्गुण भेद नसे |**

**जेही अनुभवी जगता माजी,  तेही तर तुर्याचि असे || ६७४.**

**नाम-रूपे जरि भिन्न भासती, सिद्ध ब्रह्मचि त्यांत दिसे |**

**भेद शून्य ती दृष्टी जाहली, ब्रह्मावाचुनी अन्य नसे || ६७५.**

**ब्रह्मासम ते ज्ञान अजन्मा, भ्रांती केवळ अज्ञाने |**

**प्रकाश आणि सूर्य न भिन्नचि, उभयचि ते एकोप्याने || ६७६.**

**तैसे तुर्यी ज्ञान स्वयंभू, हे जाणावे सर्वज्ञे |**

**मलीनता ती दूरचि होता, सिद्धहि उजळे तो ज्ञाने || ६७७.**

**अद्वैती ज्ञात्याला जगती, मिथ्यापण जरि जाणवते |**

**व्यवहारी तो सावध राही, उल्लंघी ना नियमाते || ६७८.**

**अलिप्ततेने करि व्यवहारा, बदल कराया ना पाही |**

**जेही जैसे, तसे स्वीकारी, जगतचि चालू ते राही || ६७९.**

**द्वैत असे ते सदैव मिथ्या, विसर तयाच्या नसे मनी |**

**सत्य एक अद्वैत जाणुनि, ब्रह्मनिष्ठ तो होवोनी || ६८०.**

जगताशी अस्तित्व असे ते, व्यक्तिनिष्ठ ना सत्य असे |
कधि ना शाश्वत, जणु स्वप्नचि ते, नसलेलेही तेथं दिसे || ६८१.

ब्रह्माचे नाते न जगाशी, केवळ ते आश्रय दाता |
जन्म नसे तो ब्रह्माचा नि, तसेचि नाही तो जगता || ६८२.

आत्मज्ञान प्राप्ती ती नित्यची, नलगे प्रयास त्यासाठी |
ज्ञानदृष्टीने अंतरी पाहे, सहजी अनुभूत जगजेठी || ६८३.

*श्लोक-अणुमात्रेऽपि वैधर्म्ये जायमाने विपश्चितः ।*

*असङ्गता सदा नास्ति किमुतावरणच्युतिः ॥ ९७॥*

**गौडपाद ते पुन्हा सांगती, निदिध्यासान नच सोडावे |**

**जाणुनि घ्यावा ईश्वर हेतू, जशी प्रेरणा वागावे || ६८४.**

**ममत्व आणि आसक्तीचि मुख्य कारणे दुःखाची |**

**असंग म्हणुनि नित्य असावे, उकल होत ती प्रश्नाची || ६८५.**

*श्लोक-अलब्धावरणाः सर्वे धर्माः प्रकृतिनिर्मलाः ।*

*आदौ बुद्धास्तथा मुक्ता बुध्यन्त इति नायकाः ॥९८॥*

**सकल जीव ते सदा मुक्तचि, आणि शुद्धता पूर्ण असे |**

**नित्यचि सर्वज्ञता ती संगे, तुर्येवाचुनी अन्य नसे || ६८६.**

**नसे आवरण जीवावरती, निर्मल ते नित्यची असती |**

**भेद बुद्धीने येई आवरण, अज्ञानाची ती महती || ६८७.**

**आसक्ती आणि ममत्व जगती, वृथा बंधने निर्मियती |**

**ज्ञात्या जाण ती असेचि पुरती, माझे कांही नसे जगती || ६८८.**

**मज जगताचे ज्ञान असो वा, नसो परी ते ब्रह्माचे |**

**पुरते व्हावे, याच जन्मी ते, तरीच सार्थक ते त्याचे || ६८९.**

**देहा आश्रय द्यावा परि ती , देहबुद्धीचि टाळावी |**

**व्यवहारी ते स्वधर्मपालन, असंग राहुनी, नित करवी || ६९०.**

*श्लोक-क्रमते न हि बुद्धस्य ज्ञानं धर्मेषु तापि नः ।*

*सर्वे धर्मास्तथा ज्ञानं नैतद्बुद्धेन भाषितम् ॥९९॥*

भाग्यवंतचि ब्रह्मनिष्ठ तो, अमृत ब्रह्मज्ञानाचे |

परमानंदे सेवन करिता, अनुभव घेई तुर्येचे || ६९१.

जये चाखिले ब्रह्मरसाला, अन्य रसा बाजू सारी |

कदा न आश्रय तो विषयांचा, तया प्रिय तो एक हरी || ६९२.

प्रकाश जो कि स्वये जाहला, गोडी कां अंधाराची ?|

सर्वश्रेष्ठ तुर्यांचि लाभता, तुच्छ विषय ते सर्वपरी || ६९३.

परमसत्य जो स्वये जाहला, आकाशासम ज्ञान असे |

तत्वे जाणे धर्मांची तो, त्या सम तुल्यचि कुणी नसे || ६९४.

अनंत, निश्चल, ब्राह्मीशांती, त्यांत पहुडला स्वानंदे |

विकार देहाचे ते विरले, अद्वैती परमानंदे || ६९५.

पूजनीय नि स्थितप्रज्ञ तो, नित्यचि नि:संगे राही |

स्पर्श न विषयांचा तो त्याला, समदृष्टी सकला पाही || ६९६.

अज्ञानीहि असे अद्वैती, परि न जाणतो अज्ञाने |

मिटता मोहाचे आच्छादन, सहजी व्याप्त हो तो ज्ञाने || ६९७.

प्रपंच विषय नि पदार्थ सारे, ना उमगती ते ज्ञात्याला |

अद्वैती ना अन्य त्याविना, सकलचि ब्रह्म गमे त्याला || ६९८.

श्रुती माऊली वत्सल भारी, ज्ञानमयी करी ज्ञात्याला |

निजरुपातची समरस करवी, स्वयेचि तुर्या तो झाला || ६९९.

प्रपंच उपशम सहजी जाहला, द्वैती अनुभवी अद्वैता |

तुर्येशी तो समरस होता, पूर्ण होतसेचि ज्ञाता || ७००.

*श्लोक-दुर्दशमतिगम्भीरमजं साम्यं विशारदम् । बुद्ध्वा पदमनानात्वं नमस्कुर्मो यथाबलम् ॥ १०० ॥*

गहन अति जे समजण्यासचि, अनुत्पन्न नि शून्य मले |
अद्वितीय त्या आत्मपदाला, जाणुनि वंदन मी केले || ७०१.

जयजय आत्मरुपा, स्व-संवेद्या, कदा न स्मरणातुनि जावो |
पावन दर्शन आणि अनुभूती, जीवनात सदा येवो || ७०२.

अंत:प्रेरणेद्वारा सुचवी, श्रेयस मजला काय असे |
कदा न आसक्ती मज राहो, नित्य विरक्ती भाव वसो || ७०३.

विनम्र वंदन गुरु माऊली, मजकरवी हे घडवियले |
अती गहन तरी तंव कृपेने, काव्य-भाष्य हे रचियेले || ७०४.

नसे जाणता, छंद, व्याकरण, उचित शब्द कधि गंवसेना |
तूचि प्रेरणा दिधली मजला, आशय पुढती नेतांना || ७०५.

नमन आपणा श्रोते वाचक, उणीवा जाणुनी क्षमा करी |
आपण ज्ञाते, करूनि पूर्तता, दोषहि घ्यावे ते उदरी || ७०६.

विनम्र वंदन ईश्वर-सद्गुरु, आणि पावन शास्त्रांना |
लाभ जाहला तुर्येचा मज, द्वैत कुठेहि असेचि ना || ७०७.

नमस्कार मम आत्मरुपाला, स्व-संवेद्य ते नित्य असे |

हरी रूप ते नित्य पूजनीय, हरिविण जगती कांही नसे || ७०८.

ब्रह्म अनुभूती सर्वश्रेष्ठचि, निज-स्वरूपचि जरि माझे |

मीचि मजला कठीण उमगणे, जन्माही आले नच जे || ७०९.

नित्य अस्पर्शी, शुद्धनि निर्मल, अद्वितीय  सुस्थिरचि |

निश्चल असुनी, अती गतिशील, गणना ना त्या रूपांची || ७१०.

अजन्मा तरी, माया आश्रय, घेऊनि जगती खेळतसे |

जाणुनि त्याशी जो समरसाला, चिरंजीव तो होत असे || ७११.

ब्रह्मरूप ते स्वये होत जो, पुरता निर्भय तो झाला |

त्या सत्संगे भव-भय नाशे, नसेचि बंधन ते त्याला || ७१२.

गौडपाद आचार्य सद्गुरू, सुलभ ज्ञान अद्वैताचे |

बहु जन्मांनी प्रकाश झाला, वंदन त्यांच्या चरणांचे || ७१३.

||हरिॐ तत्सत्||

चतुर्थ प्रकरण काय शिकविते?

या प्रकरणाला ‘अलात शांती’ हे नांव दिलेले आहे. त्याच खुलासा सुरवातीच्या काव्य भाष्यात आहे. यांत वेदांताची मुख्य शिकवणूक १०० कारिकांच्या द्वारा आचार्यांनी दिलेली आहे.

दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रकरणात ‘ब्रह्म सत्यं-जगन्मिथ्या’ हे स्पष्टपणे विषद केलेले आहे. उपनिषदात ब्रह्म हीच तुर्या असल्याचे प्रतिपादन आहे. जीव हेच ब्रह्म असल्याचे त्याने स्पष्ट होते.

हे सगळे झाल्यावर या वेगळ्या प्रकरणाची रचना कां केली गेली? मिथ्या याचे चार बाबतीत स्पष्टीकरण आधीच आलेले आहे, एक त्याला अस्तित्व नाही. जन्म नाही. परंतु फक्त दृश्यमानता आहे, ती मायेने अगर अविद्येने आहे. जग दिसते पण ते जन्मलेले नाही, हे पचनी पडणे, अति कठीण. अनेक त्याच्या जन्माविषयी सांगत असता, हे विधान तर्काला पटेल, असे होणे आवश्यक होते. हा मननाचा विषय आहे. आणि आचार्यांनी त्याला छान प्रतिपादिले आहे. पहिली तीन प्रकरणे श्रवणाची आहेत.

१. कारिका १ ते २७ अनेक प्रणालींचे विचार आणि प्रतिपादन

यांत पांच चिचार सरणींचा विचार केलेला आहे.

पहिली असत्कार्य वाद – हा न्याय वैशेषिक पद्धतीचा आहे. दुसरी सत्कार्यवाद हा सांख्य आणि योग यांचा आहे. तो आचार्यांनी खोडून काढला आहे. तिसरीत कांही वेदांतिक पद्धती ‘विशीष्ट-अद्वैत आणि इतर यावर आधारित असून ब्रह्मापासून जग निर्माण झाले असे कांही म्हणतात. परंतु ब्रह्म अद्वैती असल्याने तो कोणतीही निर्मिती साधन नसल्याने करू शकत नाही असे आचार्य म्हणतात.

चवथ्यात कर्म-कार्य-वाद आहे. प्रथम कर्म कुणी केले ? हा मुख्य विषय त्यांत आहे. आचार्य यावर ही तात्पुरती विचारसरणी असून प्राथमिक असे सांगतात.

पांचवी बुद्धाची विचारसरणी आहे. यावर स्वप्नांची उदाहरणे देऊन हे खोडून काढतात.

२. वेदातील विचार प्रणाली आधारे जन्माबद्दल उहापोह (कारिका २८ ते ७१)

यांत महत्वाच्या प्रश्नांची उकल आहे. यांत तैतरीय,(2.१.२), (२.६.३), मुंडक, (२.१.३), छांदोग्य (६.२.३ व ४,) कठ(२.१.११ ), बृहदारण्यक ( २.३.६), कैवल्य (22) यातील संदर्भ देऊन प्रतिपादन केलेले आहे.

३. संसाराचे कारण ( कारिका ७२ ते ८६)

हे जग केवळ भासमान दृश्य आहे मात्र त्याला अस्तित्व नाही असे सांगून या प्रश्नाची उकल होणे शक्य नाही असे निर्णायक विधान करून ते म्हणतात, जग आहे, तसे स्वीकारून अद्वैती राहून व्यवहार करावा.

४. तिन्ही अवस्थांचे अनुभव विश्लेषण ( ८७ ते ८९)

मी या तिन्ही अवस्थांचा केवळ साक्षी आहे. आणि मायेच्या प्रभावाने हे चालते, असे सांगतात

५. महत्वाच्या साधना (९०) -याला गीतेचा मुख्यत्वे आधार दिला आहे. या साधनांचे द्वारे, मंनोशुद्धी साधते. मी निश्चल असून हे इंद्रियांचे स्वभाव धर्म आहेत. माझा यांचेशी संबंध नाही. त्यांतच काय स्वीकारार्ह आहे आणि काय नाही, याचा खुलासा आहे. हेय, ज्ञेय आणि विज्ञेय याचा उत्तम खुलासा यांत आहे.

६. उपसंहार ( ९१ ते १००) यांत महत्वाच्या दोन गोष्टी आचार्य आपल्याला सांगतात, जे आपण शोधीत आहोत, ती शांती, आनंद, अभय, ते आपल्याजवळ आहेच. दुसरे द्वैत हाच संसार आहे. आणि अद्वैत हाच मोक्ष. अद्वैताचा त्याग करायचा नसून त्याशी लिप्त न होणे आवश्यक आहे. द्वैत आणि अद्वैत वेगळाले नसून एक सत्य व दुसरा त्यावरील आभास आहे.

शेवटी प्रार्थना करून ते प्रकरण संपवितात.

हे संपूर्ण कार्य करतांना डॉक्टर श्री आर. डी. पाटील [(से.नि.)प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालय- शेगाव] यांनी उत्तम सहकार्य दिले. त्यांचे धन्यवाद.

अद्वैत जीवनात उतरो. हीच प्रार्थना. हरी ॐ.

अण्णा

नाशिक-पंचवटी

२४/०६/२०२१. वटसावित्री पौर्णिमा







अणणा (श्री. मधुकर सोनवणे) यांची ई साहित्यवरील इतर पुस्तके
क्लिक/टॅप करताच उघडतील

